॥ श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र ॥

द्वितीय-खण्ड

अध्याय ४६ ते ७१

॥ सभा-प्रारम्भ-प्रार्थना ॥

दक्षिणास्यसमारम्भा शङ्कराचार्यमध्यमा । अस्मदाचार्यपर्यन्ता स्मर्या गुरुपरम्परा ॥१॥

श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम् । नमामि भगवत्पादं शङ्करँल्लोकशङ्करम् ॥२॥

शङ्करं शङ्कराचार्यं केशवं बादरायणम् । सूत्रभाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ॥३॥

ईश्वरो गुरुरात्मेति मूर्तिभेदविभागिने । व्योमवद्व्याप्तदेहाय दक्षिणामूर्तये नमः ॥४॥

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशङ्कर परिज्ञानाश्रम शङ्करसद्गुरु ।
केशव वामन कृष्ण पाण्डुरङ्ग आनन्द परिज्ञानगुरु । सद्योजात शङ्करसद्गुरु ॥५॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः । गुरुस्साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥६॥

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ॥
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥
॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥७॥

ॐ

श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र

द्वितीय-खण्ड

अध्याय ४६ ते ७१

लेखिका

श्रीमती उमाबाई आरूर (अध्याय १-५७)

श्रीमती शांताबाई नागरकट्टी (अध्याय ५८-५९)

सौ.उषा रवीन्द्र बिजूर (अध्याय ६०-७१)

ग्रंथानुक्रम

		पृष्ठसंख्या
१.	प्रकाशकाचे निवेदन (चौथी आवृत्ति)	II
२.	प्रकाशकाचे निवेदन (तिसरी आवृत्ति)	IV
३.	प्रकाशकाचे निवेदन (दुसरी आवृत्ति)	V
४.	प्रकाशकाचे बोबडे बोल (पहिली आवृत्ति-संक्षिप्त)	VI
५	कृताञ्जलिः	VIII
६.	संशोधकाचे नम्र निवेदन	IX
७.	सारस्वतांचे मूळ– श्री.वि.ग़.जोशी	XII
८.	ग्रंथलेखिकेची प्रस्तावना	XV
९.	अध्यायानुसार विषयानुक्रम	XVIII
१०.	श्रीगुरुपरंपरास्तोत्र	XXIV
११.	प्रथम खण्ड : ग्रंथ अध्याय -१ ते ४५	१ ते ३९१
१२.	आरती श्रीमत् पांडुरंगाश्रम स्वामींची	३९२
१३.	आरती श्रीसद्गुरुंची	३९२
१४.	श्रीमती उमाबाई आरुर यांना आदरांजली	३९३
	द्वितीय खण्डः ग्रंथ अध्याय - ४६ ते ७१	३९५
१५.	आरती श्रीसद्गुरुंची	७०९
१६.	शरणाष्टक	७१०
१७.	श्रीमदानंदाश्रमसद्गुरुस्तवनम्	७११
१८.	श्रीमती उमाबाई आरुर यांना आदरांजली	७१३

अध्यायानुसार विषयानुक्रम

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
	द्वितीय खण्डः		
	नवम धर्मगुरु- श्रीमदानंदाश्रम		
४६.	एक एक अक्षरेंकरोन स्तुति. जगीं स्वधर्म रक्षायाकारण अवतार घेई रमारमण.	१०९	३९५
४७.	आनंदाश्रम नाम घेऊनि लीला दावियली. जन्मा येतांचि ब्रह्मज्ञान प्राप्त झालें तयां कोठून, ब्रह्मतेज कैंचें ते? ''हा घोडा नाहीं कधींही देखिला'' काय यामाजीं चतुरता? कैसी घडे हिंसा अधर्मे?	१३६	४०५
४८.	बहुत श्रमें विद्याभ्यास केला. खरे साधु कैसे असती? कल्पना नसतां कैसा घडे व्यापार?	८९	४१६
४९.	एकान्तवास करावा म्हणोन जाती स्वामी ग्राम सोडोन; प्रार्थुनी आणिती भक्तजन. गुरुकृपा झालियावांचुनी एकरूपभाव ये कैसा? कासया होय मठाचें बंधन? स्वामींसी इतुके कासया दुःख होय?	१९९	४२३
५०.	हरिद्वार-हृषीकेशादि क्षेत्रयात्रा करिती; कृष्णाचार्य स्वामींकडोनि केलें श्रवण. कल्पना म्हणजे मिथ्या सारी, ती सद्गुरु कैसेनि?	१३७	४३८
५१.	गुलवाडी अंबाबाईसी पांडुरंगाश्रम-आनंदाश्रम स्वप्नीं भेटलें, एकरूपचि आपण ऐसें दाविलें. स्वामींसी नसे इच्छा, तरी कासया मठाची चिंता? अवतारिक, तरी त्यासी कैंचें असाध्य म्हणोन पैसा गोळा करावा? पांडुरंगाश्रम स्वामी कडक होते, अपराध होतां क्षोभती. तरी ते अज्ञचि कीं काय? रथोत्सव रहित केला, काय कारण? ठरविला साधन-सप्ताह.	१६१	४४९
५२.	तोंबत बंधुद्वय यांना अनुताप झाला ऐकतां प्रवचना, शरण गेले सद्गुरु-चरणा. कासया जन परमार्थहीन जगीं? प्रवचन ऐकती जगीं अनेक जन, सकलांचेही पूर्ण मन कां न लागे परमार्थी? शांतता जनांच्या अंतरी कैसी येई?	११२	४६२
५३.	नारायण शूद्र भक्त खटल्यांतुनी केला मुक्त. सुब्राय भटजी यांप्रत भक्ति उपजली. सद्गुरुचि सर्वां अधिष्ठान, त्याची सत्ता सकलां कारण, हे कैसें ओळखावे? गुरुवरा भजाया मन उत्सुक व्हावया काय उपाय? सद्गुरुसहवास करितां सहजचि येती सद्विचार कैसें?	११४	४७१
५४.	मठ स्वामी आमुच्यास्तव, म्हणोनि वर्गणी द्यावी जनांनीं सर्व. स्वामींनी त्रयोदश वरुषांपासून बहुत कष्ट सोशिले. ते कोणते? संसाररूप नदी तरोनि जावया करावें? सत्कर्मे कैसेनि स्वधर्म होय? सरकार सकलही न देती कर. वर्गणी सकलांनी कां द्यावी? वर्गणी दिल्यानें काय होय आमुचें कल्याण? उत्सव-अभिषेकांत पुण्य काय? सद्गुरु आले भूतळीं, तरी आम्हीं करावें काय?	१५२	४८०
५५.	गुरुदासाचे सद्गुरु शिवानंदतीर्थ, यांचे सद्गुण; अवतरले ते साक्षात दत्त. मोक्षगुरु आणि धर्मगुरु एकरूप असती. आमुचे जातीचे स्वामी असोन, कां जावें अन्य स्थळीं आत्मज्ञानासाठीं आपण?	१७८	४९२

अध्याय	विषय	ओंव्या	पृष्ठ
५६.	एक एक अक्षरेंकरोन स्तुति. नऊ आश्रमांसी नमन. सद्गुरुंनी जनांचा काय उद्धार केला असे? भटजी कासया ठेविले? भटजींचे वर्णन. श्रीस्वामींचि आम्हां रक्षिती कैसे? साधन-सप्ताहसमयीं रक्षिले जन.	१७४	५०६
५७.	गुरुदासाची माता सौभाग्यें निवर्तली स्वामींच्या आशीर्वादे, सकल अध्यायाचें सार. फलश्रुती. सप्ताह करणें कवणे रीती? पुण्यप्राप्ति कासयानें होय? गुरुनाथें वदविलें समस्त कैसे?	१४७	५२२
	दशम धर्मगुरु श्रीमत् परिज्ञानाश्रम		
५८.	रेखाटले परिज्ञाश्रम जन्मचरित्र. जन्मस्थान शिराली तीर्थक्षेत्र चित्रापुर सारस्वतांचे.	१८५	५३५
५९.	कथिले शिष्य-स्वीकार भले परिज्ञानाश्रम नाम दिधले, स्वामी आनंदाश्रमांनी.	१८३	५४८
६०.	संपूर्ण गुरुतत्वाचे केले वर्णन. सद्गुरु महिमा वर्णिला संपूर्ण. समाधिस्थ होती स्वामी आनंदाश्रम.	१४६	५६२
६१.	वर्णिला पट्टाभिषेक सोहळा. स्वामींचा कार्याविषयी सगळा कथिला वृत्तान्त.	१५५	५७४
६२.	स्वामी परिज्ञानाश्रम करिती पर्यटन. भक्तांसी धर्मसार उपदेश केला भक्तोद्धार.	१५७	५८७
६३.	स्वामी परिज्ञानाश्रम महानिर्वाण वार्ता. देवी प्राणप्रतिष्ठा जाहला कार्ला ग्रामांतरी.	१२२	६००
	एकादश धर्मगुरु श्रीमत् सद्योजात शंकराश्रम		
६४.	स्वामी सद्योजातांची बाल्यावस्था, स्वामी परिज्ञानाश्रम भेटीची वार्ता, स्वामी ईश्वरानंदगिरींची प्रत्यक्ष भेट	१५३	६११
६५.	स्वामी सद्योजातांचे श्रीवल्लीसी आगमन, शृंगेरी मठाधिपतींची अनुमती, पट्टाभिषेक सोहळ्याचे वर्णन	११८	६२५
६६.	गुरुपद यात्रा	१५४	६३५
६७.	स्वामींच्या यात्रा विविध स्थळी, रामनगर येथील आशिर्वचन	१२९	६४९
६८.	स्वामींचे धार्मिक, सांस्कृतिक कार्य देवीपूजन, शिवमहात्म्यआशिर्वचन	१४१	६६०
६९.	स्वामींचे सामाजिक कार्य, तीर्थ- महिमा	१६४	६७३
७०.	गुरुपूजन विषयावरिल स्वामींचे आशिर्वचन	१३०	६८८
७१.	जप, तप,श्रीचक्र विषयांवरील स्वामींचे आशिर्वचन	९७	७००

श्रीगुरुपरंपरास्तोत्रम्

शिवं हरिं पद्मभुवं वसिष्ठं शक्तिं च तत्पुत्रपराशरं च।
व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविन्दयोगीन्द्रमथास्य शिष्यम्।।
श्रीशंङ्कराचार्यमथास्य पद्मपादं च हस्तामलकं च शिष्यम् ।
तं तोटकं वार्तिककारमन्यानस्मद्गुरून् सन्ततमानतोऽस्मि।।
दृग्दृश्यज्ञानशून्याय स्वप्रकाशस्वरूपिणे। चिन्मयानन्दरूपाय अच्युताश्रम ते नमः।।
तस्य पादाम्बुजे लीन आनन्दाश्रमयोगिराट्। तमहं सन्ततं वन्दे सच्चित्सुखमयं विभुम्।।
आनन्दाश्रमयोगीन्द्रपादपङ्कजषट्पदः। कैवल्याश्रमविख्यातस्तत्त्वज्ञाननिरूपकः।।
रक्तशुक्लपदद्वन्द्वं स्मृत्वा च गुरुपादुकाम्। ध्यानाद्ब्रह्ममयो जातो नृसिंहाश्रमदेशिकः।।
तत्पादाम्बुजभक्तिस्थः केशवाश्रमसंज्ञकः। तद्धस्तपद्मसञ्जातः सर्वागमविशारदः।।
वामनाश्रम इत्याख्यस्तदनन्तरतां गतः। करकञ्जात्तस्य जातः कृष्णाश्रम इतीरितः।।
पाण्डुरङ्गाश्रमाह्वोऽभूत्तस्मात्कृष्णकराम्बुजात्। परिज्ञानाश्रमगुरुं प्रणतोऽस्मि निरन्तरम्।।
त्वमेव सद्गुरुवरस्त्वमेव परमेश्वरः। त्वमेव सच्चिदानन्दस्त्वां विना नान्यथा गतिः।।
इत्थं यः पठते नित्यं गुरोर्नामावलिं पराम्। सायं प्रातर्मुहुर्भक्त्या स मुक्तो नात्र संशयः।।

।। ॐ तत्सत् ।।

ॐ

श्रीविजापुरगुरुपरंपराचरित्रस्यास्य रचयित्र्या हृद्गता निःसीमा भक्तिरेव ललितमधुरकवितारूपेण निःसृतवतीति मन्यामहे। एतस्य संशोधने मुद्रणे प्रकाशनादौ च व्यापृतानामपि केवलमन्याजभक्तिस्तत्तत्कार्येषु प्रयोजिकेत्यत्र न कश्चन विरायलेशः। समेषामेषामस्य ग्रन्थप्रियं प्रेम्णा पठतामपि भक्तवत्सलस्य भगवतो भूतभावनस्य भवानीशंकरस्य कृपया सकलेप्सितसिद्धिस्तथा –

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥

इति भगवदुपदिष्टस्य संसारसागरतः समुद्धरणरूपस्य भक्तिमार्गफलस्य लाभश्च यथावसरं भूयादिति शम्।

तत्सत्

—

परमपूज्य आनंदाश्रम स्वामिजींचे आशीर्वादपर हस्ताक्षर

परमपूज्य आनंदाश्रम स्वामिजींची समाधि (चित्रापुर मठ)

श्रीचित्रापुर मठ, बंगळुरु

अथ श्रीचित्रापुरगुरुपरंपराचरित्र-प्रारंभः।

द्वितीय-खण्डः।

ॐ

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर।
परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु।।
केशव वामन कृष्ण पांडुरंग।
आनंद परिज्ञानगुरु।।
सद्योजात शंकर सद्गुरु।।ॐ।।

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ।। श्रीमत्परमहंस। 'आनंदाश्रमस्वामी' हें नाम सुरस। ऐकतां होय परम संतोष। तल्लीन होत मन आपुलें।।१।। आणि 'गुरुमहाराजकी जय'। ऐसें कर्णीं पडतां, चिन्मय-। स्वरूपीं ज़ावया उशीर न होय। इतुकी महिमा तव नामा।।२।।

श्रीमदानंदाश्रमराया। अज्ञ बालकासी ने तव पायां। कवण देईल तुज़वांचूनियां। मुक्ति बापा मज़लागीं।।३।।

मन करोनि निर्विकल्पीं स्थिर। जीवन्मुक्ति साधिली थोर। तुज़ला कैसें म्हणावें नर। देवचि अससी निश्चयें।।४।।

तपोबल असे दृढतर। म्हणोनि तुझें वाक्य साचार। असत्य न होय निर्धार। सत्यचि होय तें पाहीं।।५।।

परम रसाळ तुझी वाणी। ऐकतां मन हें उल्हासोनी। निजानंदीं समरस पावे झणीं। काय नवलाई ही देवा।।६।।

रहिवासी तूं हृदयीं असतां। कैंचेंही भय नाहीं सर्वथा। श्रीसद्गुरु माझा असतां। काय उणीवता आम्हांसी।।७।।

मधुर अन्न ज़वळीं असतां। कासया क्षुधेची करावी चिंता। तैसा तूं मम सद्गुरु ताता। असतां कासया हिंडावें।।८।।

परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

हंबरतां वत्स धेनु धांवे। तैसा भक्तां पावसी तूं स्वभावें। किती सद्गुण बा वर्णावे।
मेदिनी ही न पुरेल।।९।।

सकल चिंता तुज़ला भज़तां। निवारिसी कृपेनें ताता। मोक्षचि झणीं देसी हाता।
यावरी आणिक शब्दचि ना।।१०।।

आमुचा संग तुज़ न बाधे। तुझा संग आम्हां साधे। कैसें तें देवा सांगतों लक्ष दे।
माझ्या बोबड्या बोलासी।।११।।

नंदन मी तव अज्ञ बाळ। तुझे भक्त अमित प्रेमळ। परि मज़कडे येईं अमळ।
माझे बोल ऐकाया।।१२।।

दारा-धन-सुत सर्व पसारा। यांतचि काल घालविला सारा। म्हणोनि तुज़ विसरलों गुरुवरा।
भक्तवत्सला करुणाघना।।१३।।

श्रवण करितां तुझें वचन। होय तेव्हां क्षणेंच स्मरण। कीं मी आलों कोठूनि कोण।
कळे सहज़चि तव कृपें।।१४।।

मज़ मी कोण ऐसें कळतां। मी-तूंपणाचा भेद ताता। नुरे अणुमात्र निश्चयें सर्वथा।
ऐसी मूर्ति तव देवा।।१५।।

स्वार्थ नसतां किंचित। बोधिसी जनां प्रेमानें निश्चित। केवळ जगाच्या कल्याणार्थ।
अवतार ज़ाण तव देवा।।१६।।

मी-माझें ज़ाउनी अवघें। ब्रह्मचि अससी तूं बा निजांगें। ऐसिया देवा तुझिया संगें।
पावती जन निजरूपा।।१७।।

गुरुराया आणिक काय सांगूं। करितां क्षणभरी तुझा संगु। साध्य होय परमार्थ चांगु।
नाहीं संशय यामाजीं।।१८।।

रुसलास ज़री तूं आमुच्यावरी। ब्रह्मानंदचि त्यामाझारीं। ऐसा सत्संग विचित्र भारी।
सांगाया नकळे मज़लागीं।।१९।।

मत्सर नसे तुझ्या पोटीं। नसे अणुमात्र वक्र दृष्टी। ज़े ज़े शब्द बोलसी ओठीं।
आनंदचि असे त्यांमाजीं।।२०।।

हा बरवा हा वाईट ऐसा। भेद नाहीं तुज़ला सहसा। म्हणोनि तुझिया सहवासा।
करितां होय आत्मज्ञान।।२१।।

राग द्वेष नासुनी सारे। केवल निजानंदचि उरे। मग काय उणीवता बा रे।
आम्हां निजभक्तांसी पां।।२२।।

ज़री ऐसी संगती मिळे। तरीच भक्तिभाव फळे। तेणेंच समाधान पावलें।
जगीं सर्व आज़वरी।।२३।।

कीर्तनीं गावया तव गुण-महिमा। कवणही न मिळे द्यावया उपमा। तूंचि जगीं सर्वत्र आम्हां।
व्यापुनी दिससी बा पाहीं।।२४।।

ज़री पाहूं गेलों अन्य। तूंचि भरला असशी पूर्ण। मग कैंची उपमा देऊन।
करूं गुणगान तव बापा।।२५।।
यज्ञ-यागादि जप-तप-हवन। केलें ज़री रात्रंदिन। तरी तव पद नमिल्यावांचोन।
न होय ज्ञान कवणाही।।२६।।
एवं तुझ्या संगेंकरोनी। सकलाभीष्टें पावती या जनीं। ठेवितां विश्वास तव चरणीं। निजात्मज्ञान होय खरें।।२७।। दुर्जनसंग करितां देवा। हृदयीं सांठवे पापांचा ठेवा। आणि बाधे आमुच्या जीवा। संग तो अनिवार बा पाहीं।।२८।। येती त्यांचे दुर्गुण अंगीं। मग फजिती होय जगीं। संसारामाजीं पोटाची खळगी। भराया अवघड होय त्यांसी।।२९।। ऐशियां कैंचा परमार्थ-लाभ। म्हणोनि देवा तुझाचि सुलभ। सत्संग लाभतां सहज़चि कोंब। फुटे हृदयीं परमार्थाचा।।३०।। ऐसी तुझी मूर्ति सुंदर। तूं असशी निःसंग साचार। तेवीं तुज़ला न बाधे निर्धार। संग कवणही बा देवा।।३१।। दुर्जनसंगें तुज़ न येती दुर्गुण। अथवा सज्जनसंगें सद्गुण। नलगे घेणें तुज़लागोन। गुण अवगुण बा पाहीं।।३२।। निर्गुण असशी तूं गुरुराया। दुर्गुण बाधती कैसे तव पाया। अथवा सद्गुण तुज़ घ्यावया। काय कारण सांग प्रभो।।३३।। तुझ्या अंगीं सद्गुण संपूर्ण। औषधासही न सांपडे दुर्गुण। तेव्हां आणिक कोणते सद्गुण। घ्यावे कोठोन तूं देवा।।३४।। अमृताचा घडा पूर्ण। तेथें कटुत्व ये कोठोन। तैसी देवा तुझी ज़ाण। मूर्ति सद्गुणखाणीची ही।।३५।। तेथें कैंचें दुर्गुण उठती। आणिक कासया सद्गुणप्राप्ति। कवणाकडोनि घ्यावी ती। काय उणीवता तुज़ म्हणुनी।।३६।। कीं तुज़ला दुर्गुण जनांचें। न बाधती कधींही साचे। आणि तव सद्गुण

न वचे। दुर्जनसंगें निर्धारीं।।३७।। लोखंडाची ऐरण कठिण। तीवरी सोनार काय करिती आपण। सोनें-चांदी इत्यादि आणोन। ठोकिती बहुत नित्य पहा।।३८।। परि त्या चांदी-सोन्याचा गुण। न लिंपे त्या ऐरणीलागून। जैसी तैसीच ती ऐरण। राहे स्वच्छ ठायींच।।३९।। तैसी देवा तुझी मूर्ति। कवणाचेही दुर्गुण तुज न येती। आणि तुझे सद्गुण निश्चितीं। तुज सोडोनि जाती ना।।४०।। जरी भक्त तुझे सद्गुण। घेती तरी तुझें उणें न होय त्यांतून। कीं तूं असतां परिपूर्ण। उणें होईल कैसेनि।।४१।। सूर्यप्रकाशें व्यवहार सकल। करितां तत्प्रकाश उणा होईल। ऐसी भीति कवणा वाटेल। हें तंव सहसा न घडेचि।।४२।। तैसा तूं माझा दयाळ। तव स्वरूपाचा प्रकाश सोज्ज्वळ। सद्गुण हेचि प्रकाशती प्रेमळ। त्यावरी भक्तजन वर्तती।।४३।। तव सद्गुणांच्या आश्रयेंकरोनी। भक्तांचें जिणें चाले ये जनीं। तेणेंचि होती ब्रह्मज्ञानी। निश्चयें ताता गुरुनाथा।।४४।। म्हणोनि आतां 'आत्मनिवेदन'। नवम भक्ति दे तूं जाण। नाहीं विदित 'मी हा कोण'। जाहलों गुंग संसारीं।।४५।। म्हणोनि केली प्रार्थना सदया। नवम आश्रमा आपुल्या ठायां। नवविधा भक्ति मागूनियां। चरणीं ठेवितों मस्तक हें।।४६।। तरी आतां कृपा करोनि। मोक्ष देईं मजलागोनि । सत्वरी ये बा धांवोनी। करीं माझें समाधान।।४७।। तूंचि आतां देउनी स्फूर्ति। करवीं झणींच ग्रंथसमाप्ति। तुजवांचोनि मी मंदमति। काय करितों ग्रंथ खरा।।४८।। सकल जनांची पुरविसी हौस। ऐसा तूं मम जगन्निवास। मजवरीच कां बा उदास। होसी देवा कृपाघना।।४९।। तुझे गुण गाण्यापुरती। देईं मज विचार-स्फूर्ति। त्याविण नको मज जगतीं। अन्य विचार-चतुराई।।५०।। जरी देवा मी भक्तिहीन। तरी

तुज़लागीं सर्व समान। म्हणोनि आतां मज़लागोन। न धिक्कारीं दयाळुवा।।५१।। तुज़वांचोनि कवण करील। चरित्र-वर्णन देवा सकल। वृथाचि अहंता धरोनि तळमळ। करितों रात्रंदिन पाहीं।।५२।। माता असतां मुलांसी कैंची। पाकचिंता लागेल साची। कोण हरील क्षुधा आमुची। ऐसें भय मुलांसी नसे।।५३।। तैसी तूं गुरुमाउली असतां। व्यर्थचि घेउनी माथीं अहंता। करितों दिवस-रजनीं चिंता। केव्हां कार्य होईल हें।।५४।। हाचि माझा अपराध थोर। तव चरणांसी विसरलों साचार। तरी आतां तू करुणाकर। क्षमा करीं या निजबाळा।।५५।। असो आतां श्रोते हो सज्जन। या या झडकरी सकलही धांवोन। आनंदाश्रम सद्गुरु दयाघन। निजभक्तांस्तव अवतरती।।५६।। ऐका[1] त्यांचें चरित्र सत्य। असे प्रेमळ रसभरित। तत्काळ मन तल्लीन होत। काय सांगूं नवलाई।।५७।। शिराली या ग्रामीं एक। 'रामचंद्र' या नामें देख। 'हरिदास' हें उपनाम सुरेख। शोभे त्या ब्राह्मणासी।।५८।। परम सात्त्विक चतुर भाविक। सद्गुणांची खाणीच तो देख । यावरी काय सांगूं आणिक। वर्णन त्यांचें तुम्हांसी ।।५९।। पांडुरंगाश्रम सद्गुरुनाथ। यांचा शिष्य असे तो निश्चित। गुरुभक्ती अंगीं अमित। असे त्या हरिदास ब्राह्मणा।।६०।। रात्रंदिन मठामाझारीं। ज़ाउनी परमादरें सेवा करी। श्रीस्वामींची मूर्ति धरी। प्रेमपूर्वक निजमानसीं।।६१।। सद्गुरुवचनीं दृढ विश्वास। आत्मज्ञान झालें त्यास। ऐसा तो रामचंद्र हरिदास। पुण्यपुरुष निश्चयेंसीं।।६२।। त्याचें मुख्य आराध्य दैवत। भगवान

१ पुढील वर्णन आणि अध्याय ४७ मधील वर्णन हा भाग प्रत्येक कुटुंबीयानें लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तसेंच आचरण व निष्ठा ठेवल्यानें सुसंतति जन्मास येते व कुटुंबांत पवित्र संस्कार राहतात.

श्रीकृष्ण देवकीसुत। यासी भज़े तो दिवसरात। निष्काम मनें प्रेमानें।।६३।। करी जन्माष्टमीचें व्रत। दृढभावें भजन करीतसे शांत। कृष्णमय होय चित्त। नाहीं संशय यामाजीं।।६४।। ज़री झ़ाला आज़ारी आपण। तरीही नेम न सोडी पूर्ण। हातुनी घडेल तितुकें करोन। प्रेम संपादी श्रीहरीचें।।६५।। हातानें करी श्रीकृष्णसेवा। पायानें प्रदक्षिणा घाली देवा। अंतरीं धरोनि दृढभावा। वदे नाम वाचेनें।।६६।। शब्द स्पर्शादि पंच विषय। यामाजीं प्रभु वसुदेवतनय। हाचि भरला ऐसा निश्चय। असे मानसीं त्याच्या पैं।।६७।। मुलें लागती त्याच्या पाठीं। कीं आम्हां सांग कथा गोमटी। तेव्हां प्रेमानें सांगतसे ओठीं। कथा सुंदर श्रीहरीच्या।।६८।। कथा सांगूं लागतां सविस्तर। अंतरी लोटे प्रेमाच़ा पूर। अश्रुधारा वाहती थोर। नयनांतुनी त्याच्या, सात्त्विक।।६९।। तामस-राजस- सात्त्विक। तीन प्रकारें नयनाश्रु देख। वाहती लागुनी अंतरीं रुखरुख। परिसा कवण ते आतां।।७०।। घडतां चूक आपुल्याकडोन। होतसे जेव्हां अपमान। तेव्हां अश्रु लोटती नयनांतून। हे 'तामस' अश्रु ज़ाणावे।।७१।। संसारीं नाना संकटें येतां। अथवा आप्त-मोह नावरे चित्ता। तये समयीं अश्रु ढाळितां। 'राजस' बोलूं त्यांलागीं।।७२।। देव गुरु यांच्या चरणीं। भक्ति-प्रेम अतिशय ज़डोनी। आठवितां त्यांचे सद्गुण निजमनीं। नयनीं वर्षती प्रेमाश्रु।।७३।। अथवा अन्याचें बघोनि दुःख। कळवळे अंतःकरण अधिक। सात्त्विक प्रेमें नयन सुरेख। भरोनि येती तात्काळ।।७४।। आणिक संसारीं नानापरी। परोपकारास्तव निर्धारीं। अन्यांचें सुख बघुनी सत्वरीं। अश्रु येती नेत्रांतुनी।।७५।। हेही अश्रु म्हणती 'सात्त्विक'। दोष नाहीं परि एक। भेद त्यांतही असे सुरेख। सांगूं आतां अवधारा।।७६।। देव सद्गुरु यांच्या मूर्ति। हृदयीं

प्रगटतां सात्त्विक वृत्ति। उचंबळोनि प्रेम चित्तीं। नावरे भक्तांच्या अणुमात्र।।७७।। तैसियासी अश्रु ज़े येती। ते शुद्ध सात्त्विक असती। अभिमानाचें कल्मष ना चित्तीं। परम शांत शुद्धचि तो।।७८।। ज़री दिसती संसारीं आपणा। अन्याच्या सुखदुःखीं सात्त्विक भावना। तरी अभिमानरूप कुसळ ज़ाणा। असे त्यामाजीं सत्य पहा।।७९।। विचार करितां समज़े आपणां। संसारांतील साऱ्या कल्पना। अभिमानासहित असती ज़ाणा। लय पावती त्या पाहीं।।८०।। म्हणोनि ज़री झ़ाले सात्त्विक अश्रु। त्यांतही अभिमान असे थोरू। परि परमार्थी वळेल तो नरू। सत्संग लाभतां निर्धारें।।८१।। ज्याची असे दृढतर भक्ती। देव-सद्गुरु-चरणावरुती। त्यासी सात्त्विक भाव प्रगटती। अश्रु लोटती नयनांतुनी।।८२।। तेचि शुद्ध सात्त्विक भाव। अभिमानाचें नसे नांव। त्यांतील अश्रूंत केवळ देव। दिसे त्या भक्तालागीं पैं।।८३।। म्हणोनि ते अश्रु शुद्ध। सात्त्विक असती हें सहज़ सिद्ध। म्हणोनि बोलिलों वरी भेद। सात्त्विक अश्रूंत दोन पहा।।८४।। असो रामचंद्र हरिदास भक्त। कथा सांगतां तल्लीन होत। घळघळां अश्रु नेत्रीं वाहत। मग मुलें आनंदें नाचती पैं।।८५।। वाटे मुलांसी कां हा रडत। म्हणती मानसीं करूं गंमत। म्हणोनि ज़ाती दुडदुडां धांवत। कथा ऐकाया आनंदें।।८६।। आणि म्हणती सांग बा आणिक। कथा गोड आम्हांसी एक। तेव्हां सांगूं लागती सुरेख। कथा प्रेमळ हरिदास।।८७।। आणि पुनरपि सद्गदित। होउनी अंतरीं प्रेमभरित। नेत्रांतुनी अश्रु वाहत। होय तल्लीन त्यासरशीं।।८८।। कृष्णरूपचि दिसे जगत। मुलें हीं तेव्हां होती तटस्थ। काय झ़ालें यासी म्हणत। आनंदोनि निजमानसीं।।८९।। ऐसी त्याची भक्ति अपार।

निष्काम शुद्ध असे थोर। करीतसे प्रेमपुरःसर। हरिकथा सुंदर निर्लोभें।।९०।। करितां हरिकथा होय तन्मय। 'हरि होउनी हरिगुण गाय'। वर्णन कराया मज़ला न होय। सद्गुण त्याचे सकलही।।९१।। असो ऐसा भक्त देखोनी। वैकुंठवासी श्रीकृष्ण निजमनीं। म्हणतसे आतां अवतार अवनीं। घ्यावा जगाच्या कल्याणा।।९२।। रामचंद्र हरिदास हाचि। माझा भक्त निष्काम खचितचि। म्हणोनि अवतार घ्यावा ह्याचि। भक्ताच्या उदरीं निश्चयेंसीं।।९३।। याची भार्या सीताबाई। महापतिव्रता सद्गुणी असे ही। आणि माझी भक्ति पाहीं। करी निष्काम निर्लोभें।।९४।। म्हणोनि मी यांच्या उदरीं। अवतरतां कार्य होय झडकरी। संन्यास घ्यावया निर्धारीं। अनुकूल होतील मज़लागीं।।९५।। ज़े असती खरे भक्त। त्यांची विचारशक्ति अद्भुत। त्याग कराया होती समर्थ। नाहीं संशय यामाजीं।।९६।। परोपकारास्तव निर्धारीं। हरिदास आणि त्याची अंतुरी। पुत्रमोह सारूनि दुरी। अर्पिती मज़लागीं स्वामींस।।९७।। तेवींच ऐशियांच्या सदनीं। घ्यावा अवतार लगबगें ज़ावोनी आणि जनांसी लावावें भजनीं। प्रेम देवोनि सकलांसी।।९८।। संगें नेतां लक्ष्मीसी आपण। जितुकें व्हावें तितुकें ज़ाण। नच होय जगाचें कल्याण। म्हणोनि संन्यास घ्यावा पैं।।९९।। आणि चित्रापुर-सारस्वत-। मठामाजींच रहावें खचित। त्यांसी क्षुधा लागली बहुत। गुरुप्रेमाची ये समयीं।।१००।। करावें त्यांचें समाधान। प्रेम देउनी घ्यावें आपण। त्यांचें निःसीम प्रेम ज़ाण। तेव्हां तरतील निजभक्त।।१०१।। ऐशी आली कल्पना चित्तीं। श्रीविष्णूच्या ज़ाणा निश्चितीं। म्हणोनि आतां अवतार जगतीं। घेत चित्रापुर-ग्रामीं।।१०२।। पुढील अध्यायीं हेंचि कथन। अवतरतील

रुक्मिणीरमण। हरिदास रामचंद्र यांचें सदन। ज़ाईल ब्रह्मानंदें भरोनि।।१०३।। आमुचे श्रीसद्गुरुस्वामी। 'आनंदाश्रम' म्हणतों ज्यां आम्ही। विचार करितां अंतर्यामीं। कळेल अवतार विष्णूचा हा।।१०४।। तेवींच वदविलें मज़कडोनी। विष्णूचा अवतारचि हा म्हणोनी। न धरावा संशय निजमनीं। श्रोते हो तुम्हीं अणुमात्र।।१०५।। खचितचि मी अज्ञ पामर। काय वर्णन करवेल थोर। गुरुइच्छेपरी होत समग्र। तेणेंचि वदविलें हें सारें।।१०६।। चांगुलें असे ज़ें या ग्रंथांत। तोचि वदवीतसे हो निश्चित। ज्या चुका दिसतील यांत। त्या माझ्या अहंकारवृत्तीच्या।।१०७।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें षट्चत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१०८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां होय मोह हा दूर। षट्चत्वारिंशाध्याय रसाळ हा।।१०९।। अध्याय ४६।। ओंव्या १०९।।ॐ तत्सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।।इति षट्चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा करुणासागरा। धांवतचि येईं तूं त्वरा। तिष्ठती श्रोते सकलही गुरुवरा। कधीं पाहूं तुज़ म्हणूनि।।१।। म्हणोनि झडकरीं येईं अवनीं। तू निश्चयें कृपेची खाणी। उद्धरिता तुज़वांचोनि। नाहीं कोणी या जगतीं।।२।। तुझी भक्ति करी ज़ो साचार। न ये भय कसलेंही त्यासमोर। यापरता नाहीं आणिक विचार। देवा दयाळा कृपाघना।।३।। परि देवा मज़लागोन। न कळे तव महिमा ज़ाण। तेवींच तुझें मी नायकें वचन। ऐसा मूढ मी असें।।४।। न करितां तुझें वचन-पालन। कैंची भक्ति उद्धवे ज़ाण। ज़री केले नाना यत्न। होती त्याविण निष्फळ ते।।५।। ज्यासी कळे वचन-रहस्य। तोचि पार होईल खास। त्यावीण अन्य साधन तयास। नलगे कांहीं लागत पैं।।६।। म्हणोनि देवा सद्गुरुनाथा। नाहीं मागत आणिक ताता। वचन पाळाया मज़ला आतां। देईं शक्ति तूंचि बा।।७।। असो इकडे रामचंद्र हरिदास। मागील अध्यायीं वर्णिलें त्यास। दोन कन्या एक पुत्र परियेस। असती ज़ाण त्यालागीं।।८।। ऐसें असतां उगवला दिवस। आम्हां अज्ञांच्या भाग्याचा बहुवस। हरिदास- भार्या सीताबाईस। धरिला गर्भ त्या समयीं।।९।। ऐका आतां सविस्तर। डोहाळे तियेचे परम सुंदर। साक्षात् विष्णूचा अवतार। तेव्हां काय वर्णावें।।१०।। साध्वी सीताबाई इज़सी। ज़ाहली इच्छा काय ती परियेसीं। सात्त्विक आहार आवडे निश्चयेंसी। तोचि घेई ती प्रेमें।।११।। अंगीं आली परम शांति। आणि प्रसन्न सर्वदा चित्तीं। पुराणश्रवण-भजनप्रीति। लागली बहुतचि तिज़लागीं।।१२।। पुढें कार्य असे थोर। त्याची खूण ही साचार। परि कवणाही

हा विचार। कळला नाहीं त्या समयीं।।१३।। येथें कवणेंही न धरावा संशय। कीं लटिका हा डोहळ्यांचा विषय। बोलसी तूं देखिल्याविण काय। उगीच बडबड करिसी कां।।१४।। परि नव्हे लटिका माझा बोल। केलिया याचा विचार खोल। ज्यांनीं स्वामींचें चरणकमल। पाहिलें त्यांसी कळेल हें।।१५।। गर्भिणीला लोटले दिवस। पूर्ण भरले नऊ मास। उगवला सकलांचा सुदिन खास। परिसा पुढें श्रोते हो।।१६।। शके अठराशें चोवीस। शुभकृत् नाम संवत्सरास। ज्येष्ठ वद्य अष्टमीस। सीतामाय प्रसवली।।१७।। ज़ाहलें असे परम सुंदर। सुहास्य-वदन मनोहर। पुत्ररत्न महाचतुर। बघतां थक्क होती जन।।१८।। ब्रह्मतेज मुखावरी विलसे। आणि शांति सद्गुण भासती खासे। ऐशी मूर्ति कसल्या पुण्यवशें। लाभली आम्हां कळेना।।१९।। पूर्वसुकृत महाथोर। मायबापें केलें अपार। म्हणोनि उदरा आला कुमर। साक्षात् श्रीधररूप हा।।२०।। ज्याच्या अंगीं ब्रह्मज्ञान। त्याचें वदन सदा प्रसन्न। म्हणोनि विलसे तेज तें पूर्ण। सत्पुरुषांच्या मुखावरी।।२१।। आतां येथें कराल प्रश्न। कीं जन्मा येतांचि ब्रह्मज्ञान। प्राप्त झालें तयां कोठून। ब्रह्मतेज कैंचें तें।।२२।। तरी ऐका श्रोते हो सज्जन। साधु-सत्पुरुषांचें जनन। तें ब्रह्मज्ञानात्मकचि पूर्ण। जन्माआधींच ते ज्ञानी।।२३।। साक्षात् परमेश्वराचा अवतार। तो नित्य मुक्तचि असे साचार। विश्वकल्याणा अवतरे प्रभुवर। नलगे ज़ोडावें ज्ञान तया।।२४।। परि दावाया आम्हां अज्ञांसी। गुरु-उपदेश घेती सायासीं। साधन-अभ्यास करोनि दिननिशीं। ज्ञान पावती परमादरें।।२५।। त्यांनीं ज़री न केला गुरुवर। अथवा न केला आत्मविचार। अन्यही न करतील साचार। म्हणोनि गुरु करिती ते।।२६।। अज्ञ जनांपरी करिती व्यवहार।

परि योग्य तोचि करिती साचार। आणि लाविती जनांही सत्वर। परमार्थासी प्रेमानें।।२७।। असो ऐसी सद्गुरुमूर्ति। अवतरली शिराळी-ग्रामाप्रति। आनंदले आप्तजन चित्तीं। मुखकांति पाहूनियां।।२८।। दिवस लोटले एकादश। मग उगवला दिवस द्वादश। सकलही मिळोनि आनंदें त्यास। पाळण्यांत घालिती प्रेमानें।।२९।। शांतमुख बघुनी नयनीं। 'शांतमूर्ति' हें नाम कर्णीं। बोलुनी दाविलें बालका त्या क्षणीं। आनंद ज़ाहला सकलांसी।।३०।। सकल नारी येऊनी तांतडीं। म्हणती 'बाळा ज़ो ज़ो' घडीघडी। आणि म्हणती बाळा तोडीं। प्रपंच गोडी ही आमुची।।३१।। अससी तूं वैकुंठवासी। आम्हां सकल अज्ञ जनांसी। कैसें पार घालावें म्हणोनि रडसी। खराचि कां तूं देवा।।३२।। तेवीं स्वधर्मरक्षणाकरितां। जनांलागीं देऊनि हाता। कैसें उपदेशूं त्यांच्या हितार्था। म्हणोनि चिंतेनें रडसी कां।।३३।। न ऐकूं पुढें तुझें वचन। म्हणोनि चिंता तुज़लागोन। लागली म्हणोनि आक्रंदोन। रडसी कीं सांग छकुल्या रे।।३४।। अथवा जन्म वायां घालुनी। देव-गुरूंसी न भज़ती कोणी। काय करूं ऐशियां लागुनी। म्हणोनि रडसी कां बापा।।३५।। कासया तुज़ इतुकी चिंता। सारें जगचि तुझिया हाता। ऐसें असुनी रडसी कां ताता। माझ्या तान्हुल्या शांतमूर्ति।।३६।। तुज़ काय लागली भूक। निजभक्त-प्रेमाची एक। म्हणोनि मुख पसरोनि देख। उव्यां उव्यां करुनी रडसी।।३७।। तुज़ काय उणीवता म्हणुनी। रडसी ऐसा आक्रंदोनी। विषयांचा वीट येउनी। उव्यां करोनि वमन करिसी।।३८।। असो आतां माझ्या देवा। उगी उगी तूं करुणार्णवा। जन धरूनि दृढतर भावा। येतील शरण तव पायां।।३९।। तुझी वृत्ति स्वरूपीं लीन। हीच तुज़ निद्रा

ज़ाण। करीं आतां सुखेंकरोन। माझ्या बाळा करुणाळा।।४०।। ऐशापरी बहुविध गाउनी। गेल्या नारी आपुल्या सदनीं। असो पुढें ऐकावें कर्णीं। श्रोते सज्जन तुम्हीं हो।।४१।। बाळ झालें सुंदर सुकुमार। दिवसेंदिवस ज़ाहलें थोर। शांत वृत्ति त्याची अपार। वर्णवेना आमुचेनि।।४२।। नाम ज़ैसें 'शांतमूर्ति'। त्यापरीच़ घेतली कीर्ति। अंगीं वसे बहुत शांति। बाळपणींच़ हो ज़ाणा।।४३।। न करी खोड्या कधीं काळीं। न ज़ाई दुर्जन-संघ-मेळीं। ज़री आला दुर्जन ज़वळी। नच धिक्कारी त्यालाही।।४४।। त्यासी प्रेमानें घेउनि ज़वळी। दुर्गुण त्याच़े सर्व उधळी। ऐसी प्रेमळ मूर्ति कोंवळी। किती सद्गुण वर्णावे।।४५।। कर्नाटक शाळेमाजीं। ज़ाई नेमानें प्रेमें सहजीं। सांगती ज़ो अभ्यास गुरुजी। करी निष्ठेनें नित्य पहा।।४६।। परम चतुर बुद्धि त्याची। नाहीं अहंता अणुभरी साची। हौस असे सकल कार्याची। स्वधर्मापरीच़ ती ज़ाणा।।४७।। माता पिता स्वधर्म पाळिती। त्यापरीच़ आपण वर्तती। ज़री लहान बाळ तरी ती। किती प्रीति स्वधर्माची।।४८।। पितयासंगें ज़ाई नित्य-। नेमानें स्वामींच्या मठांत। भजन आरती करुनी येत। आनंदें डोलत निजसदना।।४९।। गृहीं येतां पित्याज़वळ। ज़ाउनि बैसे तिष्ठत बाळ। निद्रा आळस टाकुनी समूळ। ऐकाया कथा पुराणींच्या।।५०।। पिता सांगे कथा गोड। नानाविध सविस्तर उघड। धरी हृदयीं ज़री अवघड। कथा अनेक असतांही।।५१।। परम भक्ति असे अंगीं। प्रेमें भजत गुरुदेवालागीं। निष्काम निरहंकार राहत जगीं। परम कनवाळू हो ज़ाणा।।५२।। सूर्योदयापूर्वी उठुनी। मुखमार्जनादि सकल सारुनी। तुलसी बेल-पुष्पें घेउनी। ज़ात गोपाळकृष्ण-देऊळीं।।५३।।

गृहाज़वळी त्यांचें देऊळ।'गोपाळकृष्ण' म्हणती सकळ। तेथें द्यावया फुलें सोज्ज्वळ। ज़ात घेउनी सूर्योदयीं।।५४।। यापरि करी सेवा अनेक। रात्रंदिन त्यांतचि गर्क। सदा सुप्रसन्न असे मुख। आणि वृत्ति अति शांत।।५५।। नाहीं कवणही मानावमान। देव-गुरूंपुढें वांकवी मान। ऐसी मूर्ति सुंदर सगुण। किती वानूं गुण त्याचे।।५६।। केलें पितयानें मौंजीबंधन। अष्टमवर्षीं प्रेमेंकरून। ब्रह्मचर्य पाळिलें पूर्ण। दृढ निष्ठेनें बालकें त्या।।५७।। तेथें गोपाळकृष्ण- देउळीं। ज़ो करी पूजा तये वेळीं। त्याच्यावरी श्रद्धा चांगली। होती त्याची सहज़ पैं।।५८।। आणि श्रावणमासामाझारीं। उत्सव होत असे त्यांच्या घरीं। रमावल्लभदास-सांप्रदायापरी। करीत बाप हरिदास।।५९।। त्यांच्या संगें सदा रात्रीं। ज़ाउनि प्रेमानें भजन करी। आळस निद्रा सारोनि दुरी। बैसे भजनासी नियमानें।।६०।। अद्यापिही तये स्थानीं। कृष्णजन्माष्टमीचे दिनीं। सवड झालिया ज़ाती रजनीं। उत्सवालागीं प्रेमभरें।।६१।। असो एवं परमभक्त। आमुची शांतमूर्ति विख्यात। सकल सद्गुण अंगीं अमित। लिहाया मेदिनी न पुरेचि।।६२।। असतांही वय लहान। हृदय कनवाळू त्यांचें पूर्ण। न बोलती कठोर वचन। कवणालागींही अणुमात्र।।६३।। अंगीं नसे किंचितही क्रोध। असे ज़री कुणाचा अपराध। तरीही त्यासी कठोर शब्द। न बोलती ते कदापिही।।६४।। ज़री कुणीही बोलती आपणा। प्रत्युत्तर न देती त्यांना। ज़री प्रसंगीं बोलिले कवणा। न दुखवितां अंतर बोलती।।६५।। आणि सुहास्य वदनांतुनी। निघे जी कोमल मधुर वाणी। सुंदरशा वाक्येंकरोनी। देती उत्तर सकलांसी।।६६।। यावरी एक सुरस कथा। बाळपणींची सांगूं आतां। श्रोतीं सावध करोनि चित्ता। परिसावी

प्रेमादरानें।।६७।। शाळेमाजीं एके दिनीं। बैसले असतां मार्गावरोनी। एक इसम गेला घेउनी। घोडा आपुला त्या समयीं।।६८।। त्यासी बघुनी सारीं मुलें। पहाया धांवलीं तत्काळें। आमुचे चरित्रनायकही ते वेळे। धांविन्नले सवें त्यांच्या।।६९।। पाहूनियां घोडा सुंदर। मुलें आलीं शाळेभीतर। तेव्हां बघुनी त्यांचा मास्तर। काय बोलिला तें ऐका।।७०।। म्हणे तुम्हीं घोडा ऐसा। देखिला ना कीं अजुनी सहसा। कासया पळालां करुनि साहसा। शिकणें सोडुनी आपुलें पैं।।७१।। यावरी बोलिले आमुचे चतुर। भावी आनंदाश्रमस्वामी गुरुवर। गुरुजी सांगतों आमुचा विचार। परिसावा तो कृपेनें।।७२।। म्हणे गुरुजी कीं ''हा घोडा। नाहीं कधींही देखिला बापुडा। म्हणोनि आम्ही धांवुनी दुडदुडां। गेलों पहाया लगबगेंसीं''।।७३।। ऐसें ऐकतां मधुर वचन। मुलें गुरुजी सारे जन। खदखदां हांसती पोट धरोन। म्हणती भलारे शांतमूर्ति।।७४।। पहा कैसें दिधलें उत्तर। बालपणींच इतुके चतुर। काय यामाजीं चतुरता थोर। ऐसें म्हणाल तरी ऐका।।७५।। पहा शिक्षक काय बोलिला। घोडा अजुनी ना कीं देखिला। पठण सोडोनि धांवुनि गेलां। यावरी बोले शांतमूर्ति।।७६।। जो हा घोडा मार्गीं गेला। तो ना आम्हीं कधींही देखिला। काय अर्थ यामाजीं भरला। ऐका सविस्तर हो पाहीं।।७७।। जगीं असती अनेक घोडे। त्यांचें आम्हां काय कोडें। हा जो देखिला दृष्टीपुढें। तो देखिला नव्हता यापूर्वीं।।७८।। हें असे सत्यचि उत्तर। कीं हा घोडा न पाहिला साचार। परि न सुचला हा विचार। कवणालागीं ते समयीं।।७९।। आणिक ऐका सूक्ष्म अर्थ। श्रोतीं करोनि सावध चित्त। सद्गुरुनाथ जैसें स्फुरवित। तैसें सांगूं आतां पैं।।८०।। हा घोडा येथें विचार

करितां। सारें आत्मरूपचि तत्त्वतां। कैसें तें ऐका आतां। चित्त सावध करोनियां।।८१।। 'तो हा' येथें काय भेद। नसे सर्वथा निश्चयें द्विविध। केवळ एकचि ब्रह्म प्रसिद्ध। 'तो हा' हें विशेषण त्यागावें।।८२।। 'हा' म्हणतां 'तो' एक असे। ऐसें सिद्ध होय आपैसें। तेव्हां एकरूप होईल कैसें। 'हा' शब्द लावितां पैं।।८३।। म्हणोनि म्हणती शांतमूर्ति। 'हा कधीं ना पाहिला' निश्चितीं। 'तो' असे ज्याच्या चित्तीं। 'हा' शब्द येत सहज़ तैं।।८४।। 'हा' शब्दचि नाहीं येथें। म्हणोनि बोलिले प्रेमळ चित्तें। आम्हीं ना पाहिलें 'हा' या शब्दातें। केवळ ब्रह्मचि सारें हें।।८५।। म्हणोनि 'हा घोडा' या विशेष वाक्यें। ना पाहिला ऐसें सांगितलें निकें। एवं बाळपणींच़ ऐशा कौतुकें। बोलती आमुच़े गुरुराय।।८६।। पहा कैसी सूक्ष्म बुद्धि। कुणीं ही शिकविली का ती आधीं। बाळपणापासुनी जनांसी बोधी। परम चातुर्यंकरोनियां।।८७।। परि याच़ा न कळतां अर्थ। म्हणती बुद्धिचातुर्य अमित। 'हा घोडा ना देखिला' म्हणत। हाचि अर्थ बांधियला।।८८।। यापरी साधु हे ज़े सारे। त्यांच्या भाषणीं महत्त्वचि भरे। एकही शब्द व्यर्थ न सरे। बाळपणींही मुखांतुनी हो।।८९।। ऐसे नानापरी शब्द। प्रेमयुक्त असती प्रसिद्ध। ऐकतां सकलां होय आनंद। हांसती गदगदां जन प्रेमें।।९०।। सांगूं ज़ातां सकल लीला। जन्मभरी ग्रंथ ज़री लिहिला। संपूर्ण करावया मज़ला। दिवस न मिळे कदापिही।।९१।। असो आतां ऐका पुढती। देव-गुरूंवरी असे भक्ती। एकें स्थापिली दत्तमूर्ति। हरिदासमठासंनिधीं हो।।९२।। तेथें ज़ाउनी पूजा करिती। न धरितां कामना कांहीं चित्तीं। न चुकतां नित्य नेमाप्रति। शांतमूर्ति ते पाहीं।।९३।। अहोरात्र भक्तिप्रेम। हेंचि असे त्यांच़ें काम। सत्कर्मीं झिज़विती

काया उत्तम। धरिती नाम सतत मुखीं।।९४।। मायबाप यांची आज्ञा। शिरसावंद्य असे त्यांना। स्वधर्मापरी करिती वर्तना। अज़ुनी बाळ असतांही।।९५।। म्हणती मानसीं रात्रंदिन। स्वधर्म हेंचि मुख्य साधन। याचि मार्गीं ज़ातां आपण। जनही मागुती येती पैं।।९६।। आपण तरुनी जनांसी तारणें। तरीच़ होय धन्य हें जिणें। आपुलें कार्य स्वधर्म रक्षिणें। म्हणोनि झ़टती त्यालागीं।।९७।। एवं करिती स्वधर्माचरण। मौंजीबंधन झ़ालियापासोन। आठव्या वरुषीं इतुकें ज्ञान। आलें कोठुनी सांगा हो।।९८।। स्वधर्म हाचि मुख्य जनांसी। नातरी भय सतत मानसीं। ज़री राजा झ़ाला त्यासी। स्वधर्मचि श्रेष्ठ असे हो।।९९।। मागील अध्यायीं हेंचि कथन। केला ज़री अधर्म आपण। हिंसा घडे निश्चयें हातून। कैसी ती सांगूं आतां हो।।१००।। पहा कैसी घडे हिंसा अधर्में। कीं स्वधर्म करी ज़ो नित्यनेमें। त्याच्या हातुनी पापकर्में। न घडती सहसा ज़ाणा हो।।१०१।। ज़ो करी खरा स्वधर्म। तो पापा भीइज़े हा नेम। न करी कधींही हिंसाकर्म। कैसें तें हें परिसा हो।।१०२।। ब्राह्मणें सेवूं नये मदिरा मांस। ऐसें शास्त्रीं कथिले बहुवस। ज़ो पाळी स्वधर्म तयास। निषिद्ध वाटोनि त्यागी तें।।१०३।। पशु पक्षी यांच़ें मांस। पशु मारिल्यावीण एखाद्यास। न मिळे कदापि खावयास। हिंसा घडे प्रत्यक्ष ती।।१०४।। ज़री तें घेतलें विकत त्यानें। तरी दोषचि लागे तेणें। ज़ो वागे स्वधर्माचरणें। तो करी त्याग सहज़चि।।१०५।। ज़ो कोणी अधर्म करी। तो न मानी विधि-निषेध अंतरीं। तया हातुनी हिंसा सारी। घडे निश्चयें हो ज़ाणा।।१०६।। मांसभक्षणाविण आणिक। बहुत हिंसा असे देख। पुढती सांगूं ती आणिक। सद्गुरुकृपें अणुमात्र।।१०७।। असो स्वधर्माची

शृंखला एक। मनासी घट्ट बांधितां देख। ज़री देखिले दुर्विषय सन्मुख। न घेववती तयासी ते।।१०८।। श्वान ज़ाय विष्ठादि खावया। चांगुले पदार्थ देतांही तया। बांधी शृंखला घेऊनियां। धनी त्याचा ते समयीं।१०९।। जेव्हां सुटते शृंखला कंठींची। तेव्हां धांवे श्वान त्वरेंचि। विष्ठादि असे जेथ त्याची। ओढ असे तेथ धांवे।।११०।। तैसें आम्हां अज्ञजनांसी। श्रीस्वामींनीं स्वधर्मशृंखलेसीं। बांधिलें घट्ट निश्चयेंसी। प्रेमाचा गांच घालूनियां।।१११।। ज़री प्रेमगांच सुटला अणुमात्र। स्वधर्मशृंखला निसटे पवित्र। तेव्हां धांवे मन हें सर्वत्र। दुर्विषयांकडे तत्काळ।।११२।। श्वान ज़ाउनी भलतें खातां। वेडें होय तें कीं तत्त्वतां। तैसा कोणी दुर्विषयीं ज़ातां। दुर्गुणी होय तो ज़ाणा।।११३।। प्रपंच-परमार्थीं दोहींकडे। नाडला खास, येई सांकडें। मग धांवे इकडूनि तिकडे। कोणी ना ढुंकिती त्यालागीं।।११४।। म्हणोनि स्वधर्म सारा आपुला। सद्गुरु सांगती ज़ैसा भला। तैशा रीतीं करितां त्याज़ला। नाहीं कवणही भय ज़ाणा।।११५।। धरितां प्रेम त्यांच्या चरणीं। कैंचें भय त्यालागोनी। परि असावें अंतःकरणीं। अनिवार प्रेम ज़ाणा हो।।११६।। असो यापरी स्वधर्म-ममता। हृदयीं धरोनि शमवी चित्ता। केवळ लोकहितार्था। करी कार्य शांतमूर्ति।।११७।। तेवींच नाहीं अन्य चिंतन। जगाच्या कल्याणावांचोन। ज़री बालक आपण लहान। तरीही प्रेम अनिवार।।११८।। परि न दावी कवणालागून। कीं आपुली इच्छा अमुक म्हणोन। मीही सर्वजनांसमान। असें अज्ञ हें दावी।।११९।। पहा कैसी वृत्ति त्यांची। जनांसी दावी असें मी अल्पचि। परि श्रीविष्णूची ही मूर्ति साची। तयांसी कैसें वानावें।।१२०।। सकल विद्यापारंगत। पुढें बोलूं त्या

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

गोष्टी प्रख्यात। आतां धरूं मूर्ति सतत। श्रीगुरूंची हृदयीं हो।।१२१।। जन्माआधीं ब्रह्मज्ञानी। वामदेवासमान मुनी। केवळ जगाच्या कल्याणावांचोनी। अन्य चिंतन ना त्यांसी।।१२२।। प्रपंच सारा मिथ्या ऐसा। निश्चयचि त्यांचा परियेसा। परमार्थ नवा करावा नलगे सहसा। जीवन्मुक्तचि असती ते।।१२३।। घेतला अवतार आम्हांस्तव। उद्धरावे अज्ञ जड जीव। म्हणोनि लागली चिंता सदैव। पार घालूं कैसें यांतें।।१२४।। कीं यांच्या पूर्वजीं करोनि साहस। स्थापिला मठ प्रेमें बहुवस। जनासी व्हावा धर्मोपदेश। म्हणोनि सद्गुरु आळविला।।१२५।। आमुच्या सारस्वत पूर्वजांनीं। केली जी व्यवस्था सुंदर जनीं। ती आम्हीं बरवी राखुनी। करावा उद्धार जनांचा।।१२६।। हेचि चिंता शांतमूर्तीस। लागली असे रात्रंदिवस। अवतार जो विष्णूचा खास। 'पालन करणें' धर्म त्याचा ना।।१२७।। एवं आमुचे चरित्रनायक। शांतमूर्ति सुखदायक। अवतरले होउनी स्वधर्मरक्षक। चित्रापुर-ग्रामीं हो ज़ाणा।।१२८।। म्हणोनि बालपणींच इतुका। स्वधर्म पाळिला कौतुकें निका। ऐसा त्यांचा अपूर्व देखा। भक्तिभाव प्रख्यात।।१२९।। पहा कैसें प्रेम अद्भुत। बालपणींच इतुके शांत। नाहीं कवणापाशीं भांडत। कदापिही निर्धारें।।१३०।। आपुले सवंगडी असती त्यांसीं। प्रेमानें वागती निश्चयेंसीं। मृदु वचनीं बोलुनी परियेसीं। खेळती तयांसंगें हो।।१३१।। एकही नसे न्यूनता अंगीं। रूप-गुण-विद्येची त्यांलागीं। संपूर्णता असोनि, विरागी। जन्मापासुनी पहा हो।।१३२।। मदनासारिखें रूप सुंदर। बुद्धि असे परम चतुर। आणिक करूं पुढें विस्तार। सद्गुणांचा परिसा हो।।१३३।। श्रोते होउनी सावधान। सर्वांगाचे करोनि कान। परिसा तुम्ही प्रेमळ सज्जन। पुढील अध्यायीं वर्णन हें।।१३४।।

आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें सप्तचत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।१३५।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां होय जीवन्मुक्त साचार। सप्तचत्वारिंशाध्याय रसाळ हा।।१३६।। अध्याय ४७।। ओंव्या १३६।। ॐ तत्सत्-श्रीमदानंदाश्रमस्वामी- सद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति सप्तचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ।। जय जय सद्गुरो दयासागरा। तूंचि सर्व सारस्वतां आसरा। तुज़वांचोनि कवणही विचारा। न होय पात्र कदापिही।।१।। तूंचि सर्व जगीं एक। सर्व जनांचा रक्षक। ऐसें असतां आम्ही सकळिक। कासया ज़ाऊं अन्य स्थळीं।।२।। जेथें असे तुझी प्रीति। तेथें कैंची सांगें भीति। परि देवा नसतां दृढ भक्ति। कैसा प्राप्त होसी तूं।।३।। म्हणोनि देईं तुझी भक्ति। त्यावीण नलगे अन्य मज़प्रति। हेंचि देवा आतां निश्चितीं। मागणें तुज़पाशीं करुणाळा।।४।। नाहीं मानसीं भक्ति-प्रेम। तेव्हां कैंचा ज़ोडेल राम। परि देवा तुझें नाम। गातां सारें लाभतसे।।५।। काय तुझ्या नामाची महिमा। नलगे त्यासी कवणही उपमा। वर्णन कराया अज्ञांसि आम्हां। न कळे ज़ाण निश्चयेंसीं।।६।। तुझ्या कृपेवीण सर्वथा। न ये स्फूर्ति निश्चयें ग्रंथा। म्हणोनि देवा ये ये आतां। धांवोनि वेगें मम हृदयीं।।७।। भावहीन भक्तिहीन। म्हणोनि न टाकीं मज़लागोन। तूंचि अव्हेरितां येथून। कोण पावेल मज़ देवा।।८।। ज़री नाहींत अंगीं सद्गुण। तरी असती बहुत दुर्गुण। ते कैसेनि ज़ातील तव कृपेवीण। सांगें देवा कृपाघना।।९।। धरितां देवा तुझी कांस। तूं न टाकिसी आपुला दास। कैसा मज़ चढे उल्हास। करितां करितां स्वतन तुझें।।१०।। मातेच्या मांडीवरी बालक। लडिवाळें ज़ाऊनि बैसतां देख। पाजी पान्हा निश्चयात्मक। प्रेमकटाक्षें पाहूनियां।।११।। तैशी तूं मम सद्गुरुमाउली। निजभक्त येतां ज़वळी। परम प्रीतीनें तयां सांभाळी। नाहीं संशय यामाजीं।।१२।। असो आतां ऐका सज्जन। तुम्ही श्रोते हो सावधान। मागील अध्यायीं केलें निरूपण। सद्गुणवर्णन श्रीगुरूंचें।।१३।। आतां ऐका आणिक

सकल। चरित्र त्यांचें परम प्रेमळ। ऐकतां वृत्ति तल्लीन होईल। काय सांगूं श्रोते हो।।१४।। असे ती कथा बहु रसाळ। शांतमूर्ति परम प्रेमळ। सात्त्विक वृत्ति हृदय सरळ । किती वानूं त्यांचें हो।।१५।। ज़री असे बालक आपण । बुद्धि चतुर अधिकचि ज़ाण। लाज़ती बघुनी वडील जन। म्हणती धन्य धन्य तयासी।।१६।। एकमेकां वदती हें कैंचें। बुद्धिचातुर्य अमितचि याचें। सद्गुण अंगीं भरले याचे। बालपणींच कैसे हे।।१७।। अज़ुनी दहा वरुषांचें बाळ। किती याचें अंतःकरण कोमल। साक्षात् श्रीधरचि हा वेल्हाळ। मुखकमळ कैसें शोभे पहा।।१८।। जी कां साक्षात् विष्णुमूर्ति। धन्य त्यांची जगीं कीर्ति। काय वर्णील हा मंदमति। अज्ञ पामर मी असें।।१९।। कार्यावांचून न करी भाषण। न दुखवी कदापि कवणाचें मन। सदा करी देवाचें ध्यान। अंतरा-पासोनि प्रेमानें।।२०।। असो ऐसे लोटले दिन। त्रयोदश वरुषें भरलीं पूर्ण। आतां ऐका सावधान। तुम्ही सज्जन श्रोते हो।।२१।। श्रीपांडुरंगाश्रमस्वामी। यांच्या चरित्रीं कथिलें आम्हीं। नवम आश्रम ऐकिला तुम्हीं। सावधचित्तेंकरोनियां।।२२।। आणिक सांगावें नलगे विवरण। आनंदाश्रम- नामाभिधान। शिष्यस्वीकार झाल्यापासून। पुढील वृत्त ऐका हो।।२३।। गुरूपदेश झालियावरी। सद्गुरु पांडुरंगाश्रम झडकरी। मुक्त झाले म्हणोनि भारी। दुःख झालें तयांना।।२४।। गुरुप्रेमाची आली भरती। सदा अंतरीं सद्गुरुमूर्ति। अणुमात्र विषयवासना चित्तीं। नुरली निश्चयें त्यांच्या हो।।२५।। अज्ञ बालक असतांही। वैराग्य अंगीं त्यांच्या येई। न सांपडे आप्तांच्या मोहीं। मठींच राहती प्रेमानें।।२६।। निज भगिनीची कन्या एक। खेळविली करुनि बहु कौतुक। ती येई 'मामा' म्हणूनि सन्मुख। परि न

ढुंकती तिज़कडे।।२७।। पहा कैसें आपुल्या मनासी। आवरिलें त्यांनीं निजधैर्येंसीं। कवणें कथिलें सांगा त्यांसी। मोह तो दूर साराया।।२८।। संन्यासधर्म परम कठिण। तशांत अज़ुनी बालपण। तरीही पाळिती प्रेमेंकरोन। विधियुक्त न चुकतां।।२९।। उपज़ल्यापासोनि गुरूंचा सहवास। संन्यासधर्म कोणता हें त्यांस। विदित असल्यानें करिती साहस। पाळाया धर्म यथार्थत्वें।।३०।। असे ज़ैसा संन्यासधर्म। त्यापरी करिती कडक नेम। परि सद्गुरु पांडुरंगाश्रम-। संग ना म्हणोनि तळमळती।।३१।। कीं आतां आमुचें कर्तव्य काय। स्वधर्म रक्षणें हेंचि होय। तरी आतां काय उपाय। करावा कैसा कवण्यापरी।।३२।। जनासी बोध कराया आपण। आधीं करावें धर्माचें अध्ययन। तेंचि सद्गुरूंच्या मुखेंकरोन। नाहीं घडलें दैववशें।।३३।। पहा श्रोते हो साधुजनांची। वृत्ति निरभिमानी असे साची। साक्षात् अवतरे श्रीविष्णूचि। त्यासी काय शिकणें असे।।३४।। परि म्हणे आपुल्या मानसीं। उपासना वाढवावी निश्चयेंसीं। धरीतसे गुरुमूर्ति दिननिशीं। हृदयीं आपुल्या प्रेमानें।।३५।। ऐका तुम्हीं सावधचित्तें। खरे साधु कैसे असती तें। जीवन्मुक्त ज़री असती ते। सद्गुरुप्रेम त्यां अनिवार।।३६।। गुरुप्रेमेंचि सकल कार्य। करिती निश्चयें साधुवर्य। गुरुवीण जगीं अन्य विषय। न दिसे त्यांसी अणुमात्र।।३७।। साऱ्या जगामाजीं भरलें। गुरुप्रेम एकचि चांगलें। त्याविण आणिक कांहीं नुरलें। ऐसें गुरुप्रेम अगाध।।३८।। म्हणोनि सद्गुरुस्वामींलागीं। दोष द्यावया ठावचि ना जगीं। गुरुप्रेमावीण त्यांच्या अंगीं। नसे कल्पना अन्य पहा।।३९।। सद्गुरुसन्मुख अज्ञचि आपण। करुणा भाकिती रात्रंदिन। परि त्यां समज़ूं नये अज्ञ। कदापिही आम्हीं हो।।४०।। श्रीरामें

केला वसिष्ठ गुरु। पुसिला प्रेमें त्या आत्मविचारु। सांदीपनीसि श्रीकृष्ण थोरू। गेला शरण सद्भावें।।४१।। असो आतां ऐका सावध। आनंदाश्रम स्वामी प्रसिद्ध। ध्याउनी नमिती सद्गुरुपद। म्हणती रक्षीं दयाळा।।४२।। मग करोनि विचार मानसीं। तेथील शास्त्री सद्गुणराशी। कायकिणी सुब्राय भटजी यांसी। पाचारिलें प्रेमभरें।।४३।। परम आतुर होऊनि म्हणती। विद्याभ्यास सारा मज़प्रति। करवावा आतां तूंचि निश्चितीं। अवश्य म्हणती शास्त्री तैं।।४४।। संस्कृत व्याकरण तर्कशास्त्र। काव्यआदिकरोनि पवित्र। अभ्यास करावया श्रोत्र। उत्सुक झ़ाले स्वामींचे।।४५।। आळस सारा करोनि दूरी। विद्याभ्यास करिती निरंतरीं। असतां तीव्र बुद्धि निर्धारीं। काय त्यांसी कठिण असे।।४६।। सकल विद्येमाजीं प्रवीण। होते झ़ाले पहा पूर्ण। श्रीगुरुकृपा असतां पूर्ण। काय अवघड तयांसी।।४७।। ज़री ना घडलें गुरुमुखें अध्ययन। तरी सद्गुरु न टाकिती कृपाघन। सुब्रायभटजी-मुखीं प्रगटोन। करविला अभ्यास विद्येचा।।४८।। येणेंपरी सर्वांमाजीं। निपुण ज़ाहले गुरुकृपें सहजीं। गुरुस्मरणावीण ना दुजी। कल्पना ज़ाणा तयांसी।।४९।। येथें संशय येईल श्रोत्यांसी। कीं श्रीस्वामींच्या मानसीं। गुरुवीण चिंतन अन्य ना म्हणसी। तरी हें आम्हां न पटेचि।।५०।। कल्पना नसतां कैसा घडे। व्यापार, सांगा आम्हांपुढें। तरी आतां बोलांकडे। चित्त देऊनि ऐकावें।।५१।। ज़े असती खरे गुरुभक्त। ते असती सदा विरक्त। गुरुवीण तयां अन्य ना दिसत। पांचही विषयांत श्रीगुरुचि।।५२।। विषयांचें ज्ञान झ़ालियावीण। कल्पना येतील केवीं कोठून। सद्गुरूचि एक दिसतसे पूर्ण। मग कल्पना त्या अन्य कैशा।।५३।। ज़री उठे अन्य कल्पना। गुरुप्रेमा-

वीण ती नाहीं ज़ाणा। मूळ कारण सद्गुरुराणा। कैसें तें बोलूं दृष्टांतें।।५४।। प्रपंचामाजीं हरएक प्राणी। करिती धडपड बहुविध जनीं। उदरभरणास्तव दिनरजनीं। काळ घालविती सारे हो।।५५।। कीं धनावांचुनी न घडे जीवन। तेंचि मिळवाया सारे यत्न। म्हणोनि जगीं आपुलें तनुमन। त्याचि कार्या लाविती।।५६।। कवण्याही द्वारें ज़ो कां यत्न। धनचि मिळवायाकारण। म्हणोनि सकल जनांलागून। तेंचि ध्यानीं मनीं स्वप्नीं।।५७।। कोणत्या ठायीं मिळेल पैसा। कवण उपाय करावा कैसा। उगीच़ बसतां न मिळे आपैसा। काबाड-कष्टांवांचुनियां।।५८।। ऐशा विचारें सकल जन। करिती नानापरी प्रयत्न। मनामाजीं राहे धन। गुप्तपणें पहा पां।।५९।। ज़री करिती नाना कष्ट। आणि करिती कार्यें नीट। परि धनाच़ा हेतु घट्ट। सर्व कार्यांतीं गुप्त असे।।६०।। नानापरी कर्में करितां। कल्पनेविण न घडती सर्वथा। एक कल्पना मानसीं असतां। दुजी कैंची येईल ती।।६१।। तेव्हां कैंच़ेंही करो कर्म। त्यांतचि मन रमे हा नेम। तेव्हां नाठवी धनाच़ें नाम। एकाग्र मनें कर्म करीं।।६२।। समज़ा एक शिक्षक उत्तम। मुलांसी शिकवी धरोनि प्रेम। तेव्हां मानसीं न जपे तो मम। पैसा अडका कांहींएक।।६३।। शिकविण्याच़ें करितां कार्य। कैसा आठवील अन्य विषय। तैसें करितां बंद होय। क्रिया सारी त्याची पैं।।६४।। म्हणोनि कवणही कार्य करितां। धन ऐसें न जपे सर्वथा। परि गुप्तरूपें त्याचिया चित्ता। हेतु असे धनाच़ा।।६५।। तद्वत् ज़री स्वामिराय चतुर। च़ालणें बोलणें इत्यादि समग्र। व्यापार करिती अव्यग्र। तरी गुरुपाय न विसंबती।।६६।। ज़ैसा आम्हांसी धनाच़ा गुप्त। हेतु असे मनीं सदोदित। तैसे आमुच़े सद्गुरुनाथ। धरिती

गुरुचरण हृत्कमलीं।।६७।। करोत नाना विचार तर्क। येवोत कल्पना त्या अनेक। घडो व्यवहार सकळिक। परि गुप्त अंतरीं गुरुप्रेम।।६८।। तें कैसें ज़ाईल सांगा। प्रेमनिश्चय असे दांडगा। अन्य पसारा सारा वावुगा। कल्पनादिक पहा हो।।६९।। बालक ज़री मातेसी सोडुनी। इकडे तिकडे खेळायालागुनी। धांवत ज़ाय परि निजमनीं। ध्यास असे तो मातेचा।।७०।। पडतां अथवा कुणींही मारितां।'आई' म्हणोनि धांवे तत्त्वतां। माता तयाच्या सर्वदा चित्ता। म्हणोनि माय धांवत ये।।७१।। तैसे स्वामी सद्गुरुराय। करोत व्यवहार पहा अन्य। अणुमात्र न विसंबती पाय। पांडुरंगाश्रम-सद्गुरूंचे।।७२।। येथें 'व्यवहार' म्हणतां मानसीं। प्रपंच समज़ूं नका त्यासी। व्यापार म्हणती सकल क्रियेसी। चालणें बोलणें इत्यादिकां।।७३।। असो यापरी सद्गुरुराय। गुरुवीण नाठविती अन्य विषय। दुजी कल्पना ज़री येय। तरी न विसंबिती गुरुमूर्ति।।७४।। यापरी स्मरण सतत। करितां होती परम विरक्त। संन्यासधर्म कडक पाळित। परम प्रीतीनें निर्धारें।।७५।। पांचही विषय जिंकोनि सारे। मन परमार्थीं लाविलें त्वरें। ग्रंथ वेदांताचे बरे। वाचिती परम प्रीतीनें।।७६।। विवेक वैराग्य आदिकरोनि। चारी साधनीं युक्त असोनि। झिज़विती सदा तनु मन वाणी। परमार्थीं ते रात्रंदिन।।७७।। साक्षात् श्रीराम अवतरे निश्चितीं। तेव्हां साधनें सहज़चि असती। आणावीं न लागती त्यांप्रति। साधनें अथवा सद्गुण ते।।७८।। केवळ शुद्ध परिपूर्ण ब्रह्म। तेथें कैंचीं साधनें उत्तम। हा आम्हां अज्ञांचा भ्रम। असो पुढें परिसा हो।।७९।। सारे सद्गुण अंगीं पूर्ण। नसती अणुमात्रही दुर्गुण। स्मरणीं गुंगले रात्रंदिन। श्रीसद्गुरूंच्या ते पाहीं।।८०।। ध्यानीं मनीं स्वप्नीं ज़ाणा।

न विसंबिती सद्गुरुराणा। त्यावांचोनि अंतःकरणा। न शिवे अन्य विषय कधीं।।८१।। श्रीसद्गुरुचरणांविण। ज़री अन्य चिंतील मन। तरी करी त्यासी ताडण। काय तें ऐका प्रेमानें।।८२।। विवेकाची करोनि छडी। उगारीतसे त्यावरी घडीघडी। विषयीं मारूं नको उडी। म्हणोनि ताडण करिताती।।८३।। ऐसें करोनि रात्रंदिन। ओढिलें परमार्थीं आपुलें मन। सदा धरी अनुसंधान। निजस्वरूपाचें पहा हो।।८४।। ऐसें असतां क्षणोक्षण। लोटले सहज़चि अनेक दिन। तेव्हां करिती स्वामी सघन। मानसीं विचार एकचि पैं।।८५।। कीं जन्मा आलियाचें काज़। कवण असे आमुचें आज़। याचा पडावा मज़ला उमज़। तरी उपाय काय करूं।।८६।। म्हणोनि आळविती सद्गुरूलागीं। पुढील अध्यायीं सांगूं वेगीं। कैसे झाले ते विरागी। तेंही बोलूं गुरुकृपेंचि।।८७।। आनंदाश्रम-परमहंस। शिवानंदतीर्थ पुण्यपुरुष। यांच्या कृपाप्रसादें अष्टचत्वारिंश। अध्याय गुरुदासें संपविला।।८८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां भेटेल श्रीसद्गुरुवर। अष्टचत्वारिंशाध्याय रसाळ हा।।८९।। अध्याय ४८।। ओंव्या ८९।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति अष्टचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः ।।ॐ।। जय जय देवा सद्गुरुनाथा। तूं सर्वजनांसी आश्रयदाता। म्हणोनि धांवलों चरणीं ताता। हरपली सर्व चिंता पैं।।१।। तुझे चरण धरितां दृढतर। नाहीं भय त्या कवणही थोर। अगाध महिमा तुझा अपार। बोलतां वाचा शिणली बहू।।२।। मी असें अज्ञ पामर। महिमा वर्णन करवेना सत्वर। तूंचि हृदयीं बैसोनि विचार। देईं दयाळा बा देवा।।३।। तुझी कृपा नसतां निश्चयें। कवणही कार्य ना होय पाहें। म्हणोनि देवा धांवूनि तूं ये। उशीर न करीं ये समयीं।।४।। 'तूं मी एक' ऐसा भाव। झालियाविण कृपेसी ठाव। न मिळे निश्चयें सर्वथैव। म्हणोनि चरणीं लागतों मी।।५।। ऐशी माझी प्रार्थना ऐकुनी। संशय येईल श्रोत्यांच्या मनीं। कीं गुरुकृपा झालियावांचुनी। एकरूपभाव ये कैसा।।६।। तुम्ही म्हणतां गुरु-शिष्य एक। ऐसा निश्चय न होतां देख। गुरुकृपा न होय निश्चयात्मक। ऐसें श्रोते पुसतील।।७।। तरी ऐका सावधान। स्थिर करोनि आपुलें मन। कीं सद्गुरुकृपेची खूण। अनिर्वाच्य म्हणोनियां।।८।। जेथें उगवला वासरमणि। तेथें अंधार न राहे धरणीं। तैसी गुरुकृपा होतांक्षणीं। अज्ञान ज़ाय सारें हें।।९।। ज्याचें अज्ञान ज़ाय सर्व। त्यासी गुरु-शिष्य- एकरूपभाव। सहज़चि आंगीं बाणे अपूर्व। क्षणमात्रें ज़ाण निश्चयेंसी।।१०।। परि गुरुभक्ती असावी दृढतर। कीं 'सद्गुरु आणि मी एकरूप निर्धार'। ऐसी भावना वाढवावी निरंतर। विचारेंकरोनी हृदयींच हो।।११।। विचार करितां वारंवार। दृढता होय चित्तीं सत्वर। मग कृपेसी काय उशीर। होईल सांगा हो तुम्ही।।१२।। म्हणोनि आधीं सद्गुरुमूर्ति। धरावी सदा आपुल्या चित्तीं। तेव्हां येईल विचारस्फूर्ति। एकरूप भावनेची।।१३।।

मग भावना होतां दृढतर। सहज़चि कृपा करी गुरुवर। मागावें नलगे, कष्ट ना थोर। सत्य सत्य त्रिवाचा।।१४।। गुरुकृपा झ़ालियावांचुनी। अपरोक्षज्ञान न पावे कोणी। परि आधीं घ्यावें समज़ोनि। परोक्षज्ञानें घडीघडी तें।।१५।। गुरुचरणीं धरितां विश्वास। परोक्षज्ञान ये हातास। परोक्षज्ञान म्हणिजे तुम्हांस। सांगूं आतां गुरुकृपेंचि।।१६।। सद्गुरुमुखें करितां श्रवण। 'मी ब्रह्म' ऐसें बाणे पूर्ण। तेव्हां कळे मी हा कोण। कोठूनि आलों हें सारें।।१७।। तोंवरी मी हा देहचि सुंदर। समज़ुनी सज़वी प्रेमपुरःसर। विषय सत्य मानुनी परिकर। होय रममाण त्यामाजीं।।१८।। जेव्हां सद्गुरु-उपदेश होय। वेदांतरहस्य कळों येय। तेंचि परोक्षज्ञान चिन्मय। ठसे पूर्ण हृदयांतरीं।।१९।। परि न होय अपरोक्षज्ञान। सद्गुरुकृपा झ़ालियाविण। म्हणोनि सद्गुरु, मी एकचि समज़ोन। झिज़वावें मन त्यामाजीं।।२०।। तेव्हां होईल सहज़ची कृपा। चुकवी जन्ममरणखेपा। यावरी नका धरूं कोपा। श्रोते सज्जन तुम्ही हो।।२१।। कीं श्रीसद्गुरूंसी ज़ो न भज़े। त्यावरी कृपा न करिती ज़े। तैसियां, सद्गुरु म्हणतां न साज़े। भेद दिसे त्यांठायीं।।२२।। ऐशी शंका श्रोत्यांस येतां। उत्तर ऐका त्याचें आतां। भेद नाहीं त्यांच्या चित्ता। अणुभरीही निश्चयेंसीं।।२३।। मातेसी जैशीं आपुलीं बालकें। सर्वां समान ती त्यां देखे। तैसे श्रीगुरूंसी सर्व सारिखे। राजा रंक सारे पैं।।२४।। अणुभरी अभिमान नाहीं मनीं। 'मी-तूं'पणाचे भेद दोन्ही। गेले त्यांचे हरपोनी। केवळ ब्रह्मचि ते बघती।।२५।। असो, मग गुरुकृपा होतां। अपरोक्षज्ञान होय तत्त्वतां। अपरोक्ष म्हणिजे काय हें आतां। परिसा भाविक श्रोते हो।।२६।। अपरोक्ष म्हणिजे निजस्वरूपाचा। अनुभव यावा प्रत्यक्ष त्याचा। कीं मी असें परिपूर्ण साचा। भरलों व्यापक सर्वांतरीं।।२७।।

आणिक ऐका दृष्टांतासहित। साखर गोड रुचिकर बहुत। ऐसें कुणीतरी सांगतां आपुल्याप्रत। विश्वास उपज़े निजमनीं।।२८।। ऐकुनि साखरेचें वर्णन। ध्यास लागे हृदयीं ज़ाण। तीचि आठवे रात्रंदिन। जेणें ऐकिलें त्यासी पैं।।२९।। ऐशा वर्णनाच्या ध्यासें। अनुमानें मानसीं साखर दिसे। परि प्रत्यक्ष ऐशीच असे। याचा अनुभव ना येत।।३०।। आणि तियेची रुची कैसी। तीही न कळे आपुल्या जिव्हेसी। अनुमानेंचि माने मानसीं। अमुक रुचि म्हणोनियां।।३१।। अपरोक्ष म्हणिजे त्याचा स्वाद। चाखोनि बघतां अनुभव प्रसिद्ध। तद्वत् प्रत्यक्ष अनुभवासी वेद। म्हणती अपरोक्षज्ञान पहा।।३२।। तें व्हावया गुरुकृपेविण। सारीं साधनें निष्फळ ज़ाण। देह झिज़विला रात्रंदिन। तरीही न होय ज्ञान पहा।।३३।। त्यांच्या कृपेसी व्हावया पात्र। उपासना करावी अहोरात्र। तेव्हांचि होय परम पवित्र। अपरोक्षज्ञान तत्काळ।।३४।। म्हणोनि आधीं उपासना। करावी गुरुभक्ति हेचि ज़ाणा। झिज़वावें त्यांतचि आपुल्या मना। न विसंबतां क्षण एक।।३५।। एवं गुरुभक्ति हेंचि एक। साधन मुख्य निश्चयात्मक। तया पोटीं साधनें सकळिक। असती निश्चयें ज़ाणा हो।।३६।। म्हणोनि गुरुप्रेम हेंचि एक। अपरोक्षज्ञाना पाववी देख। पुढें बोलूं विवरण सुरेख। श्रीगुरुकृपेंचि अणुमात्र।।३७।। मागील अध्यायीं केलें निरूपण। श्रीस्वामी आनंदाश्रम सघन। होतां पहा गुरुस्थानापन्न। संन्यासधर्म पाळिती।।३८।। अंगीं आलीं साधनें चारी। परि सद्गुरुसंग नसतां अंतरीं। कवणा विचारूं सन्मार्ग ये अवसरीं। म्हणोनि आळविती गुरुनाथा।।३९।। ऐसें मागील अध्यायीं कथिलें। आतां ऐका पुढती ये वेळे। कैसें वैराग्य तें कडक भलें। काय करिती तें ऐका।।४०।। लागला सद्गुरुचरणीं ध्यास।

आळविती तयासी रात्रंदिवस। म्हणे देवा उद्धरीं दास। भक्तवत्सला करुणाकरा।।४१।। जय जय देवा सद्गुरुनाथा। तुज़वांचोनि नाहीं त्राता। तूंचि देईं या मम चित्ता। स्थिरता शीघ्र दयाळा।।४२।। कुठें ज़ाऊं कवणा विचारूं। कैसा होऊं यांतूनि पारु। कोण सांगेल मज़ला विचारु। आतां आत्मज्ञानाचा।।४३।। हें मठाचें बंधन मज़ला। परमार्थ करूं नेदी आपुला। कासया मीं संन्यास घेतला। आयुष्य व्यर्थचि ज़ात असे।।४४।। तुझा संग नाहीं घडला। आत्मविचार कराया मज़ला। उपदेशमात्र अवचित ज़ाहला। पूर्वपुण्येंकरोनी।।४५।। हे गुरुनाथा तुझी सेवा। नाहीं घडली अणुमात्र या जीवा। आतां काय करूं देवा। प्रभो सद्गुरो दयाळा।।४६।। धांव धांव श्रीसद्गुरुमाये। काय उपाय सांगा झणीं ये। नको बंधन मज़लागीं हें। मठाचें निश्चयें ये समयीं।।४७।। प्रपंचबंधन नको म्हणोनि। साधक घेती संन्यास या जनीं। परि आम्हां मठस्थ- स्वामींलागोनि। अधिकचि बंधन हें सारें।।४८।। गृहस्थासी आपुलाचि एक। प्रपंच सांवरितां कष्ट अनेक। विश्रांती मनासी न मिळे देख। कंटाळे बहुत तो बापा।।४९।। आमुच्या शिरीं सर्व जनांचा। भार असे सर्वही साचा। यांतचि जन्म ज़ाय आमुचा। न घडे परमार्थ अणुमात्र।।५०।। नको नको सर्वथा पसारा। चित्तासी न मिळे अणुमात्र थारा। तेव्हां काय करावें गुरुवरा। दावीं मार्ग परमार्थाचा।।५१।। ऐसें आळविती नानापरी। अश्रु वाहती घळघळ नेत्रीं। श्रीसद्गुरूंसी हृदयांतरीं। ध्याती घडीघडी प्रेमानें।।५२।। आणि म्हणती सद्गुरुराया। हृदयीं प्रगटूनि तूंचि माझिया। विचार सांगें मज़ला सदया। कृपा करोनि बाळावरी।।५३।। वारंवार करिती नमन। पुनरपि म्हणती सोडवी बंधन। देईं आतां आत्मज्ञान। त्याविण जिणें व्यर्थचि

हें।।५४।। यावरी श्रोत्यांसी येईल प्रश्न। कासया होय मठाचें बंधन। इतुकें कां कंटाळे मन। ऐका उत्तर त्याचें पैं।।५५।। परमार्था पाहिजे एकाग्र मन। त्यावीण न होय आत्मज्ञान। मठस्थस्वामी त्यांलागोन। भार थोर मठाचा।।५६।। साऱ्या आपुल्या भक्तजनांसी। सांभाळावें लागे त्यांसी। सकळांचे समाधान दिननिशीं। करितां सारा जन्म ज़ाय।।५७।। दहा जनांचीं दहा मतें। तेव्हां बुचकळती यांचीं चित्तें। कवणाचें मत घ्यावें, यांतें। कठिण प्रसंग ऐसा हा।।५८।। स्वधर्मासी धरोनि निर्णय। करावा लागे त्यांसी उपाय। आणि न दुखवितां कवणाचें हृदय। समाधान करावें सर्वांचें।।५९।। एकाचें मत घेतां दुसऱ्यासी। खिन्नता येई त्यांच्या मानसीं। म्हणोनि युक्तीनें सकल जनांसी। समाधान करावें पैं।।६०।। तेव्हां करावा लागे विचार। सूक्ष्माहूनि सूक्ष्म अतितर। मग करावा निर्णय थोर। न दुखवितां कवणासी।।६१।। तेव्हां त्यांतचि घालावें मन। सूक्ष्म विचारीं रात्रंदिन। मग कैंचें परमार्थसाधन। विश्रांति न मिळे क्षणभरी।।६२।। याचि कारणें मठाचें बंधन। कठिण होय परमार्थालागुन। यावरी आणिक येईल प्रश्न। तुम्हांलागीं श्रोते हो।।६३।। कीं स्वामींसी इतुकें कासया। दुःख होय आपुल्या हृदया। ज़ाहलें काय उणें हो तयां। अवतारी पुरुष असतां ते।।६४।। त्यांचें ऐकावें उत्तर श्रोतीं। ज़री ते उपज़त ज्ञानी असती। देह घेतां त्यापरी वर्तती। प्रारब्धापरी तेही पैं।।६५।। तेवीं मनाचा धर्मही साचा। न चुके कदापि सर्वथा त्यांचा। कैसें तें ऐकाया मोर्चा। फिरवा येथें तुम्ही हो।।६६।। षड्विकार हे सर्वांलागीं। अज्ञां-ज्ञानियां समान जगीं। नाना व्याधी सुखदुःख भोगी। प्रारब्धापरी सकलही।।६७।। पहा अवतारी पुरुष म्हणोनी। चालणें

बोलणें उपज़ल्याक्षणीं। न करी तो कदापि या जनीं। सर्वांपरीच़ वर्ते तो।।६८।। कीं मी एक ज्ञानी म्हणोनि। गर्व नसे अणुमात्र स्वमनीं। अन्यांपरी आपणही राहुनी। ज़ोडिती परमार्थ प्रेमभरें।।६९।। हळूहळू जन्मा आलियावरी। क्रमेंकरोनि क्रिया सारी। पालथें होणें, रांगणें त्याउपरी। च़ालूं लागे मग तो पैं।।७०।। तेणेंपरीच़ हाहू करोनी। पुढें क्रमानें बोले तो क्षणीं। बुद्धिचातुर्य हेंही वाढुनी। जगाच़ें ज्ञान त्यास कळे।।७१।। तैसें परमार्थींही अज्ञ होउनी। वर्ते जनांमाजीं धरणीं। हळुहळू पायरी एकेक च़ढोनि। मग तो पावे ज्ञानासी।।७२।। एवं जनांमाजीं देव। अवतरोनि दावी सर्व। लीला जनांसी निश्चयें अपूर्व। प्रपंचपारमार्थिक दोन्ही।।७३।। म्हणोनि सद्गुरुस्वामीरायें। आळविलें आपुल्या सद्गुरुमाये। हें ऐकूनि समजूं नये। स्वामीही अज्ञ आमुच्यापरी।।७४।। असो आतां ऐका पुढें। श्रीस्वामींसी पडलें साकडें। कैसें करावें ज़ाऊं कुणीकडे। ऐसा विचार च़ालविला।।७५।। एकांतवास केलियावीण। न होय कदापि आत्मज्ञान। म्हणोनि आतां ज़ावें येथुन। तरीच़ सार्थक जन्माच़ें।।७६।। तेव्हां स्वामी पांडुरंगाश्रम। विचार सुच़विती परम उत्तम। कीं सोडावा हा चित्रापुरग्राम। सार्थक होईल निश्चयेंसीं।।७७।। जगामाजीं हिंडतां निश्चित। कवणही मिळेल साधुसंत। तयापाशीं ज़ावूनि त्वरित। कार्य आपुलें साधावें।।७८।। येथेंचि बैसतां न मिळे कवण। ब्रह्मनिष्ठ सत्पुरुष म्हणोन। ज़ावें धुंडीत सोडूनि हें स्थान। तीर्थयात्रा करावया।।७९।। परि येथील भक्तजन। ज़ाऊं नेदी मज़लागोन। यासी काय उपाय आन। न दिसे निश्चयें मज़लागीं।।८०।। ऐसा विचार करोनि मानसीं। प्रार्थना करिती सद्गुरुपाशीं। देवा आतां तूंचि मज़सी। पार घालीं दयाघना।।८१।। यापरी

प्रार्थना करितां दिननिशी। कांहीं दिन लोटले परियेसीं। सुचला विचार निजमानसीं। गुरुकृपेंचि ते समयीं।।८२।। तेव्हां आपुला भक्त उत्तम। विठ्ठल सुब्रायभटजी त्याचें नाम। तो असे भक्त भाविक परम। जिवलग साचा स्वामींचा।।८३।। तयालागीं एके दिनीं। पाचारिला एकांतीं बैसुनी। जो विचार आला स्वमनीं। बोलती काय तो ऐका।।८४।। बोलती सुब्राया आम्हां आतां। करावें स्वहित हीचि चिंता। रात्रंदिन लागली चित्ता। नाहीं अणुमात्र चैन पाहीं।।८५।। म्हणोनि आतां जावें येथुनी। मिळतील साधु ऐशिया स्थानीं। त्यांच्या मुखें वेदांत श्रवण करोनि। करावें हित आमुचें पैं।।८६।। आणि करावा एकांतवास। तरीच होईल सार्थक खास। नातरी मन हें आमुचें उदास। नलगे लक्ष कवणीकडे।।८७।। परि जाऊं न देती भक्त। म्हणोनि न कळवितां कवणाप्रत। जावें हेंचि दिसे उचित। ऐसें वाटे आम्हांसी।।८८।। येचि दिनीं अर्धनिशीं। येथूनि जावें निश्चयेंसी। तरीच कार्य होईल परियेसीं। जाईं पुढें तू आधीं।।८९।। आम्हीं येऊं अर्धनिशीं सुखरूप। कवणाही न कळवितां झपझप। तुज भेटूं जैनांच्या बस्तीसमीप। हाडवळळी ग्रामींच्या।।९०।। ऐसें ऐकतां स्वामींचें वचन। सुब्रायभटजी वंदी चरण। आणि बोले 'प्रभो स्वामिन्। आज्ञा वंद्य आपुली ही'।।९१।। सुब्रायभटजी श्रीस्वामींचा। निःसीम भक्त असे साचा। हृदयीं धरिली सद्गुरुवाचा। नाहीं कळविलें कवणाही।।९२।। जो असे खरा भक्त। तो नुल्लंघी आज्ञेप्रत। त्यांचें वचन असे जें गुप्त। तें न सांगे कदापि कवणाही।।९३।। हेंचि गुरुभक्तिचें लक्षण। आज्ञेपरी करी वर्तन। असो आतां सावधान। पुढें परिसा श्रोते हो।।९४।। मग गुरु शिष्य दोघे मिळुनी। विचार करिते जाहले ते क्षणीं। ठरविल्यापरी गेला निघोनि। सुब्रायभटजी आधींच।।९५।। गुरुवार रात्रीं

अर्धनिशीं। स्वामी आले खिडकीपाशीं। तेथें बांधोनि सुंदर रशी। त्याच्या आश्रयें उतरले।।९६।। माडीवरोनि उतराया। खाशी युक्ती सुचली गुरुरायां। श्रीविठ्ठलअवतार मग तयां। युक्तीसी काय उणीव।।९७।। श्रीकृष्ण खचित सात्त्विक भोळा। परम शुद्ध प्रेमाचा पुतळा। परि नाना युक्ति ऐशी ही कला। कवणाही नाहीं त्यासमान।।९८।। असो मग उतरले वेगें। निज़ले हो भटजी अवघे। ऐशा समयीं चालूं लागे। कोंवळी मूर्ति पवनगतीं।।९९।। न घेतांचि वसनें वळकटी। त्वरित धांवली उठाउठीं। लागली मार्ग क्रमाया गोमटी। मूर्ति कवणाही न दिसतां।।१००।। पहा कैसी सद्गुरुभक्ति। किती सांगूं आंगीं विरक्ती। तेणेंचि पार पडले निश्चितीं। नाहीं अनुमान यामाजीं।।१०१।। असो मग ते पवनगतीं। मार्गक्रमण करू लागती। क्षण एक न घेतां विश्रांति। गेले सद्गुरुस्मरण करीत।।१०२।। चालिले एकटे निर्जन वनीं। देवचि दिसे साऱ्या त्रिभुवनीं। तेचि साक्षात् देव म्हणोनि। नाहीं भय त्या कवणाचें।।१०३।। असो मग ते पोंचले स्थानी। ठरविल्यापरी हाडवळ्ळीच्या वनीं। जैनाच्या बस्तीज़वळी ज़ाउनी। बघती चहुंकडे भटजीस ।।१०४।। नाहीं भेटला सुब्राय। तेव्हां स्वामीसद्गुरुराय। म्हणती मानसीं करूं काय। कुठें शोधूं रात्रीं या।।१०५।। सागर-गांवा ज़ातां वाटेत। हाडवळ्ळी हें खेडें वसत। हाडवळ्ळीच्या वनीं तेथ। जैन बस्ती असती पैं।।१०६।। हाडवळ्ळीमाजीं दोन बस्ती। एक पूर्वेस, पश्चिमेस दुसरी ती। एका ठायीं भटजी बैसती। स्वामींसी तिष्ठती ते समयीं।।१०७।। परि स्वामींस हे नाहीं विदित। भटजी कैंच्या बस्तीशीं बैसत। तेव्हां गेले स्वामी त्वरित। दुसऱ्या दिशेस हो पाहीं।।१०८।। भटजी गेले अन्य दिशेसी। चुकले उभयतां एकमेकांसी। भटजी वाट बघोनि ते दिवसीं। गेले

आपुल्या ग्रामासी।।१०९।। असो इकडे स्वामीराय। सुब्रायभटजीस शोधिती लवलाह्य। फिरतां फिरतां शिणले पाय। न मिळे भटजी तरी पैं।।११०।। धुंडितां धुंडितां ज़ाहली पहांट। श्रमले परि ना सोडिती हट्ट। वनींच़ वृक्षासी लावूनि पाठ। बैसले एकांतीं ध्यानासी।।१११।। तहान भूक विसरूनि सारें। तेथेच ठाण मांडिले बरें। आज़ तरी येईल त्वरें। सुब्रायभटजी या स्थानीं।।११२।। म्हणोनि अंधार होई तोंवरी। तेथेंच़ वास केला निर्धारीं। ज़री रात्र ज़ाहली बरी। तरीही नाहीं भटजी पैं।।११३।। मग उठले तेथूनि झडकरी। हाडवळ्ळी-ग्रामांतरीं। तेथील जैन पाटिलाच्या घरीं। गेले हळुहळू लपोनियां।।११४।। आणि बोलती पाटिलापाशीं। मी एक नवाईत व्यापारी परियेसीं। आतां ज़ाऊं कुठे ये निशीं। म्हणोनि झोपाया आलों पैं।।११५।। तुमच्या पडवीवरी थोडी। ज़ागा देतां कां पांच़घडी। पहांटे उठोनि ज़ाईन तांतडी। माझिया ग्रामीं तत्काळ।।११६।। तेव्हां पाटील म्हणे अवश्य। झोपूनि उठा सावकाश। इतुकें बोलूनि अंथरावयास। दिधली च़टई प्रेमानें।।११७।। अंधारीं स्वामींच़ें न देखिलें मुख। परि मनुष्यधर्म म्हणोनि देख। ज़ागा च़टई दिधली सुरेख। जैन पाटील येणें पैं।।११८।। तेथुनी मग अरुणोदय। होतांचि उठले सद्गुरु सदय। लगबगेंसीं पुढती ज़ाय। सद्गुरुस्मरण करीत मनीं।।११९।। असो, इकडे शिराली ग्रामीं। मठांत नाहीं सद्गुरुस्वामी। ऐसी पसरतां ज़ईंथईं बातमी। दुःखित झाले जन सारे।।१२०।। मठांतील भटजींसी। अधिकचि दुःख ज़ाहलें मानसीं। हुडकाया लागले लगबगेंसीं। भटजी सारे हो तेवीं।।१२१।। जिकडेतिकडे करिती तार। शोधार्थ धांवती जन समग्र। भटजी, नोकर, गृहस्थ सर्वत्र। शोधिती स्वामींलागीं पैं।।१२२।। परि नाहीं लागला पत्ता।

म्हणोनि लागली सकलांसी चिंता। म्हणती काय करूं आतां। प्रार्थिती भवानीशंकरासी।।१२३।। म्हणती देवा दयासागरा। तूंचि स्वामींसी पाठवीं माघारां। गुरूविण नाहीं भक्तां आसरा। हें नलगे सांगावें तुज़लागीं।।१२४।। तूंचि स्फुरवुनी त्यांच्या मानसीं। माघारां आणीं झ़डकरी त्यांसी। ऐसी प्रार्थना चरणापांशी। भवानीशंकरा गुरुदेवा।।१२५।। ऐसी करुणा भाकुनी भक्तजन। लागले तात्काळ कार्यालागून। आतां काय करावें आपण। कवण उपाय योज़ावा।।१२६।। मठाच़े मणेगार शुक्ल मंगेश भट्ट। यांनी केला विचार उत्कृष्ट। ज्योतिषादि बघोनि झ़टपट। करिती शोध सत्य पहा।।१२७।। मग मठाच़े अनंत भट्ट। उपनाम त्यांच़ें बड्डुकुळी श्रेष्ठ। त्यांच़ा पुत्र आत्माराम ज्येष्ठ। यासी केला प्रश्न पहा।।१२८।। आत्माराम भटजीस एक। अंजन ही विद्या सुरेख। अवगत होती त्यासी देख। तें बघावें ऐसें योजिलें पैं।।१२९।। आत्माराम भटजीच़ा पुत्र। दहा वरुषांच़ें बाळ पवित्र। त्याच़ें नाम नागेश तो पात्र। त्यासी अंजन लागतसे।।१३०।। अंजन लावोनि नागपत्रीं आरसा या तळहातांत। दीपापाशीं धरितां ज्योत होय प्रतिबिंबित। तेथ नेटानें बघतां मारुती आदि उपास्य दैवत। दिसती, दाविती प्रश्नदृश्यें।।१३१।। विचारितां कवणही प्रश्न। लिहून दावी मारुती आपण। दावी दृश्यें प्रश्नास धरोन। संशय नाहीं यामाजीं।।१३२।। परि तें नाहीं सकलांसी दिसत। कुणी एकासी असे लागत। आत्मारामभटजींच़ा सुत। त्यासी लागत त्या समयीं।।१३३।। असो विचारितां अंजनामाजीं। आनंदाश्रमस्वामी गुरुजी। हाडवळ्ळीच्या वनांत आजी। असती ऐसें सांगे तो।।१३४।। इतुकें सांगतां नागेश येणें। गाडी ज़ुंपविली मंगेशभटजीनें। सागरग्रामा ज़ावया त्वरेनें। कांहीं जनांसी

घेऊनियां।।१३५।। मंगेशभट्ट अनंतभट्ट। आदिकरोनि गेले थेट। सागरग्रामा चालिले झटपट। ज़ईंतईं बघत स्वामींतें।।१३६।। ज्या दिवशीं पाटील-सदनीं। स्वामी निज़ले होते त्या दिनीं। मंगेशभटजी आदिकरोनि। ज़ावया निघाले सागरासी।।१३७।। येतां वाटेंत पाटील-सदनीं। मनुष्य पाठविला मंगेशभटजींनीं। तो गडी विचारी ओरडुनी। कीं स्वामींस पाहिलें का तुम्हीं।।१३८।। पाटील म्हणे मीं ना पाहिलें। परि स्वामीराय तये वेळे। तेथेंच पडवीवरी निज़ले। नाहीं विदित पाटलासी।।१३९।। तया बापुड्यासी काय विदित। ज़ो व्यापारी नवाइत। तोचि स्वामीं सद्गुरुनाथ। कपटनाटकी कृष्ण असे।।१४०।। मठाचा गडी आणि पाटील। दोघेही ज़ें बोलिले सकल। स्वामींनीं ऐकिलें होतें समूळ। परि ना बोलिले अणुमात्र।।१४१।। पहा कैसी आंगीं विरक्ती। तेवींच मठ सोडूनि ज़ाती। वाटेंत ज़ईंतईं कष्ट सोशिती। वर्णन कराया अशक्य।।१४२।। असो मग ते सारे जन। गेले सागरासी निघोन। तपास करिती पूर्ण। ना मिळती कवण्याही स्थानीं ते।।१४३।। इकडे शिरालीहूनि आणिक। भटजी आत्माराम म्हणे देख। मीही शोधार्थ निश्चयात्मक। ज़ावें हेंचि उचित असे।।१४४।। आणि तार केली सागरा। कीं मीही शोधार्थ ज़ातों त्वरा। हाडवळ्ळीग्रामीं पाटिलांच्या घरा। ज़ाउनी चहुंकडे बघतों मी।।१४५।। सागराहूनि गाडीवाला। शिरालीस यावया निघाला। वाटेंत स्वामी भेटले त्याला। आनंदला मानसीं अनिवार।।१४६।। आत्मारामभटजी हाडवळ्ळीस। आले म्हणोनि विदित असे त्यास। म्हणोनि धांवला लगबगें खास। पाटिलाच्या त्या स्थानीं।।१४७।। मोटारीपरी बैलगाडी। हांकिली तेणें परम तांतडीं। पाटिलाच्या घरीं सोडी। बैल आपुले क्षणमात्र।।१४८।। करितां चौकशी पाटीलापांशीं।

भटजी गेले अन्य स्थळासी। तेथें धांवत सुटला परियेसीं। गाडी घेउनी तत्काळ।।१४९।। आत्मारामभटजींस गांठुनी। अमुक ठायीं स्वामी मिळाले म्हणोनी। सांगता भटजी आनंदूनि मनीं। सांगती आपुल्या रयतासी।।१५०।। म्हणती धांवत ज़ाईं येथुनी। भेट घेईं स्वामींची झ़णीं। मी येईं तोंवरी पडूनी। राहीं त्यांच्या पदकमळीं।।१५१।। असो त्यासी धाडिला पुढती। मागें गेला नागेश पवनगती। आपण गाडीवरी बैसोनी ज़ाती। भटजी लगबगें ते समयीं।।१५२।। कीं त्यांच्या पायासी होती सूज़। च़ालाया नच होय म्हणूनि सहज़। गाडीवरी बैसुनी काज़। कराया निघाले प्रेमभरें।।१५३।। असो तिकडे गेला रयत। स्वामींस गांठाया लगबगें धांवत। अंतर्ज्ञानी स्वामी फिरत। कळवळोनी माघारां।।१५४।। भेटला रयत स्वामींलागीं। साष्टांग नमन केलें मार्गीं। मूर्ति बघतांचि त्यांच्या अंगीं। प्रेम भरलें अनिवार।।१५५।। कंठ ज़ाहला सद्गदित। रोमांच अंगीं उभे राहत। घळघळ अश्रु नेत्रीं वाहत। रयताच्या त्या तेव्हां हो।।१५६।। आणि म्हणे स्वामी सदया। थांबा ज़ाऊं नका येथूनियां। स्फुंदस्फुंदोनी रडत हें पाहुनियां। सद्गुरुस्वामी कळवळले।।१५७।। आणि म्हणती कां बा रडसी। कोण कुठिल तूं सांग आम्हांसी। येरू बोले रयत मी त्यांसी। बड्डुकुळी आत्मारामांच़ा।।१५८।। ते येती गाडीवरी मागें। नागेश येत धांवत वेगें। मज़ पाठविला त्याचिया संगें। आलों पुढती धांवुनियां।।१५९।। ऐकिल्याक्षणीं रयताच़े शब्द। क्षणभरी स्वामी राहिले स्तब्ध। तें बघुनी रयता झ़ाला आनंद। पाहे टकमकां मुखकमळ।।१६०।। तोंवरी नागेश धांवत येत। पितृवाक्यें थेट स्वामीपायां झ़ोंबत। तयामागें भटजी गाडींत। पातला सन्निध स्वामींच्या।।१६१।।

आणि स्वामींचे चरण घट्ट। धरिता ज़ाहला आत्मारामभट्ट। आणि म्हणे गुरुराया झटपट। यावें आपुल्या स्थानासी।।१६२।। केला साष्टांग प्रणिपात। म्हणे सद्गुरो आपण कृपावंत। नका ज़ाऊं अन्य स्थळांत। आम्हां अज्ञांसी टाकुनियां।।१६३।। आपण ज़ातां शिराली सोडुन। मठ कासया आम्हांलागुन। शोभा कैंची आपुल्यावीण। मठासी बा गुरुराया।।१६४।। तुज़वीण अन्य आसरा। नाहीं आम्हां अज्ञ पामरां। दावील कोण मार्ग खरा। आपणचि सांगा गुरुराया।।१६५।। बहुत कासया बोलूं आतां। हे चरण न सोडीं मी सर्वथा। येऊं ऐसें अभयवचन देतां। तेव्हांच सोडीन चरण हे।।१६६।। ऐसी प्रार्थना करितां तेणें। द्रवलें चित्त श्रीगुरूंचें दयेनें। अवश्य म्हणोनि हास्यवदनें। ऊठ येतों म्हणती ते।।१६७।। पहा कैसे सद्गुरुराय। केवल प्रेम बघती सदय। भक्तप्रेमानें बांधले ज़ाय। तेवींच अवश्य म्हणती पहा।।१६८।। लहान बाळ आपुल्या पित्यासी। म्हणे मी ज़ाऊं ना दें तुज़सी। मीं धरिलें असतां कैसा ज़ासी। सोडीना हात तव बाबा।।१६९।। तेव्हां बाप राहे तेथ। पुत्रप्रेमासाठीं हांसत। सोड रे बाळा म्हणोनि विनवित। प्रेमानें तो अडला हो।।१७०।। मुलाचा हात सोडवुनी घ्यावया। काय कष्ट होतील तया। परि तो न ज़ातांचि, परतुनियां। येतो संगें बाळाच्या।।१७१।। तैसी आमुची सद्गुरुमाय। ज़ावया त्यांसी कवणाचें भय। केवळ भक्तांच्या प्रेममय। वृत्तीसी भुलोनी अडले हो।।१७२।। साक्षात् श्रीविष्णूचा अवतार। दया-क्षमा-शांतीचे सागर। तेवींच उठले करोनी निर्धार। ज़ावया मठासी माघारां।।१७३।। हाडवळ्ळीच्या पाटिला-घरीं। आधींच कळविलें असे निर्धारीं। मी स्वामींसी घेउनि येई तोंवरी। दूध शहाळीं आणा पैं।।१७४।।

ते दिवशीं होता रविवार। नारळ काढूं नये हा आचार। पूर्वजांचा असे थोर। हें विदित ज़री पाटिलासी।।१७५।। तरी स्वामींसाठीं शहाळीं काढितां। दोष नाहीं कदापि सर्वथा। ऐसें म्हणोनी पाटिलें तत्त्वतां। काढिलीं शहाळीं प्रेमभरें।।१७६।। सद्गुरुसंनिधीं कांहीं एक। विधिनिषेध कवण ना देख। सद्गुरु गुणदोषातीत निश्चयात्मक। तेवींच भय ना कवणही।।१७७।। असो मग स्वामी सद्गुरुराय। आणि बापलेंक भटजीद्वय। रयत आदिकरोनी ते समय। आले परतुनी हाडवळ्ळीस।।१७८।। येतां गाडी हाडवळ्ळीग्रामांत। थांबविली ठरविल्यापरी तेथ। आला पाटील प्रेमानें धांवत। सद्गुरुनाथां भेटाया।।१७९।। आणि करोनी साष्टांग नमन। म्हणे स्वामिन् कृपा करोन। आमुच्या सदनीं करावें आगमन। पावन होईल गृह माझें।।१८०।। तेव्हां वदले सद्गुरुनाथ। आलों होतों तुमच्या गृहांत। शुक्रवारीं रात्रीं येथ। पहुडलों आम्ही निश्चयेंसीं।।१८१।। तेव्हां त्यास आठवलें त्वरित। आला होता एक नवाईत। तेचि हे सद्गुरुनाथ। समज़ला मानसीं तत्काळ।।१८२।। आणि तेणें केला आक्रोश। स्फुंदस्फुंदोनी रडे बहुवस। आणि म्हणे अपराध विशेष। घडला देवा मज़कडूनी।।१८३।। काय मीं मूर्खें केला अविचार। मुख न बघतांचि निज़विलें बाहेर। चटई दिधली फाटकी शीघ्र। मी निज़लों सुखानें गादीवरी।।१८४।। मी जेविलों पोटफुटे तोंवर। उपवासी राहिलां आपण रात्रभर। ऐसा मी अज्ञ पामर। धिक्कार असो मज़लागीं।।१८५।। आतां देवा मज़ पामरा। क्षमा करावी आपण कृपासागरा। आपणचि अज्ञजनांचा आसरा। करावा स्वीकार सेवेचा।।१८६।। करावें प्राशन पाणी नारळ। दूध केळीं घ्यावें ये वेळ। तेव्हां गहिवरोनी प्रेमळ। नाहीं अपराध तव म्हणती।।१८७।।

आणि त्याच्या समाधानार्थ। एक शहाळें घेतलें तेथ। प्रेमानें आशीर्वाद देत। सद्गुरुराज पाटिलासी।।१८८।। इतुक्यामाजीं ज़ाहली रात्र। अंधार पसरला सर्वत्र। तरीही कित्येक जन आले शीघ्र। दर्शनालागीं स्वामींच्या।।१८९।। एकचि गाडी सोबतीवीण। ज़ावया वाघांचें भय म्हणोन। नाहीं हांकीत कोणीही ज़ाण। परि हांकिली गाडी तैं।।१९०।। पोहोंचले शिरालीस सुरक्षित। सद्गुरुकृपेंचि निश्चित। रात्रीं तीन प्रहर होतां मठांत। आले दयाळ पहा हो।।१९१।। गडबडोनि उठले मठीं जन। वाज़विला नगारा, घंटा घण घण। आनंद थोर ज़ाहला ज़ाण। साऱ्या जनांलागीं हो।।१९२।। ऐकुनी नगारा घंटारव। उठला सारा शिराली गांव। घेतली सकळीं मठासी धांव। प्रेमासरसी तत्काळ।।१९३।। मग सूर्य उगवल्याक्षणीं। तारा पाठविल्या गृहस्थांलागुनी। जिकडे तिकडे अन्य स्थानीं। आले गुरुराज म्हणोनि।।१९४।। पहा कैसे सद्गुरुनाथ। प्रार्थितांचि द्रवलें त्यांचें चित्त। तेवींच आले धांवत। मठामाजीं माघारां।।१९५।। खचितचि मठाच्या भटजींचे। उपकार बहुतचि झाले साचे। नातरी सद्गुरुस्वामी यांचे। चरण ना लाभते आम्हांसी।।१९६।। असो आतां पुढील अध्यायीं। स्वामींचें हृदय कोमल पाहीं। शांत उदार सद्गुण सर्वही। हेंचि वर्णूं गुरुकृपें।।१९७।। परमहंस आनंदाश्रम। शिवानंदतीर्थस्वामी उत्तम। त्यांच्या कृपाप्रसादें एकोनपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१९८।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां लाभती साधनें चार। एकोनपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१९९।। अध्याय।।४९।। ओंव्या।।१९९।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकोनपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय स्वामी सद्गुरुराया। तूं सर्व जगासी आश्रय सदया। नाम-रूप ज़ातां विलया। तूंचि अससी सर्वत्र।।१।। ज़ैसें सुवर्ण-अलंकार। एकचि असे साचार। कीं नाम-रूप त्यागितां समग्र। उरे केवळ सुवर्णाचि।।२।। तैसा देवा तूं गुरुराया। ज़ें ज़ें दिसे नामरूप जगीं या। त्याच़ा त्याग समूळ केलिया। तूंचि अससी सर्वत्र।।३।। सुवर्ण ज़ैसें अलंकारीं। पूर्ण व्यापिलें आंत-बाहेरी। अणुमात्र ज़ागा नुरे निर्धारी। अलंकारीं सुवर्णावीण।।४।। तैसा तूं नाम-रूपांतरीं। आंत-बाहेरी अससी निर्धारीं। तुज़वांच़ोनि ज़ागा अणुभरी। नाहीं निश्चयें बा ताता।।५।। तेव्हां आमुच्या हृदयामाजीं। अंतर्बाह्य व्यापक सहजीं। अससी तूं आमुच़ा गुरुजी। कैसा वर्णूं तुज़लागीं।।६।। जी जी आम्हां कल्पना येत। ती ती तूंचि अससी सतत। यावरी श्रोते होऊनि संशयग्रस्त। म्हणतील काय बडबड ही।।७।। कल्पना म्हणिजे मिथ्या सारी। ती सद्गुरु कैसेनि सांग बरी। ऐका त्याच़ें उत्तर झडकरी। चित्त देऊनि इकडे हो।।८।। कल्पना मिथ्या हें वचन सत्य। परि त्यांतील ज्ञान हें नित्य। ज़ैसी लहरी असे असत्य। जल सत्य हो पाहीं।।९।। सागर आणि लहरी यांच़ें। जल असे एकचि साच़ें। समुद्र-लहरीसी भेद नसतां कैंच़ें। उदक वेगळें होईल।।१०।। तैसें निजस्वरूपाच़ें ज्ञान। आणि कल्पनेंतील एकचि ज़ाण। कल्पना निजस्वरूप एक असोन। ज्ञान वेगळें केंवीं होय।।११।। असो आमुच़ा सद्गुरु सखा। निजस्वरूपचि असे देखा। कल्पनेमाजीं भरला निका। नाहीं संशय यामध्यें।।१२।। म्हणोनि सद्गुरु कल्पनेआंत। भरला व्यापक सदोदित। तेव्हां वर्णील कोण त्यांप्रत। वेगळा

होऊनि कैसेनि।।१३।। असो आतां ऐका चरित्र। मागील अध्यायीं कथिलें सविस्तर। आनंदाश्रमस्वामी गुरुवर। ज़ातां प्रार्थून आणिलें।।१४।। मग ते राहिले मठामाझारीं। परि मनासी चैन नसे अणुभरी। कवणही कार्य करिती वरिवरी। कर्तव्य म्हणोनि आपुलें।।१५।। रात्रंदिन एकचि चिंता। काय करूं उपाय आतां। न घडे परमार्थ येथें राहतां। नाहीं शंका यामाजीं।।१६।। ऐसें म्हणोनि सद्गुरुनाथा। आळवीतसे काय करूं आतां। तूंचि स्फुरवीं माझिया चित्ता। कवणही उपाय करुणाळा।।१७।। ज़री आणिक ज़ाऊं येथुनी। तरी जनासि दुःख होय मनीं। जनांच़ें मन दुखविणें याहुनी। नाहीं हिंसा अन्य ती।।१८।। पहा कैसी साधूंची वृत्ति। जनांच़ें मन कधीं ना दुखविती। तीचि मोठी हिंसा समज़ती। काय कोमल हृदय पहा।।१९।। मानवांहातुनी अनेक हिंसा। घडती परि तें नकळे सहसा। आम्हां अज्ञांसि परियेसा। खचित खचित निर्धारें।।२०।। असत्य भाषण च़हाडी च़ोरी। जनीं दिसती हे दुर्गुण भारी। हीच़ असे हिंसा खरी। यापरी ओळखा अन्यही।।२१।। ऐशी नानाप्रकारें। हिंसा होत आमुच्या करें। ती न दिसतां आम्ही त्वरें। शोधितों अन्याच़ें हिंसाकर्म।।२२।। म्हणतों तो च़हाडखोर। हा असे महाच़ोर। यासी असे नरक घोर। पापी जन्मले धरणीवरी।।२३।। ऐसी करितों जनांची निंदा। यापरी घडे हिंसाचि सदा। आणिक बहुविध अन्यांसी बाधा। देतों आपण अज्ञानें।।२४।। आपुल्या कार्यास्तव जनांसी। देतों पीडा बहुवसी। नकळे अज्ञपणें आम्हांसी। हिंसा घडली ही म्हणोनि।।२५।। केवळ आपुल्या स्वार्थासाठीं। लागतों बहुपरी जनाच्या पाठीं। परि तें न दिसे आमुच्या दृष्टी। पाप घडलें म्हणूनियां।।२६।। एकावरी करितों प्रीति।

दुज्यासी छळणें त्यासि ना मिति। हेहीं एक पाप निश्चितीं। आणिक बोलूं तें ऐका।।२७।। एकाचें करितसे स्तवन। दुज्यासन्मुख रात्रंदिन। हेंही एक पाप हातून। सूक्ष्मरूप होय खरें।।२८।। कैसें तें पहा आतां। कीं हुरहुर लागे दुज्याच्या चित्ता। करीतसे परम चिंता। माझें हा न करी स्तवन कधीं।।२९।। मी इतुकें याचें करितों काम। परि मज़ म्हणेना हा उत्तम। ऐसें त्याच्या मनासी परम। होय दुःख अनिवार।।३०।। म्हणोनि ऐसीं बारीक सारीक। पापें घडती हातून अनेक। परि साधुपुरुष देख। न करिती ऐसीं पापें कधीं।।३१।। असो ऐसीं पापें सर्वही सांगतां। विस्तार होईल निश्चयें ग्रंथा। म्हणोनि सांगूं पुढती आतां। सद्गुरुकथा परिसा ती।।३२।। मग स्वामी विचार करिती। काय करूं गुरुराया म्हणती। आतां देईं तूंचि मति। न कळे मज़ कांहीं हो।।३३।। मज़ पाहिजे एकांतवास। येथें जनसमूह बहुवस। येती ज़ाती रात्रंदिवस। पुण्यभावना धरोनियां।।३४।। त्यांसी नका येऊं म्हणतां। दुःख होय त्यांचिया चित्ता। आणिक येथ बहुविध चिंता। लागती मनासी अहर्निशीं।।३५।। म्हणोनि येथें नानापरी। परमार्थासी प्रतिकूल भारी। तेवींच मठाचीं बंधनें सारीं। नकोत मज़ला दयाघना।।३६।। ज़री ज़ाऊं सोडुनी येथून। दुःख करितील सकल जन। ऐसें त्यांचें दुखवोनि मन। ज़ाणें हेंहीं उचित नव्हे।।३७।। म्हणोनि देवा आतां काय। करावा सांगें युक्त उपाय। करीं माझें मन निर्भय। तारीं तारीं निजदासा।।३८।। इतुकें बोलतां कंठ दाटला। घळघळ अश्रु वाहती डोळां। अधर कांपती ते वेळां। अनुताप झाला थोर पहा।।३९।। म्हणती देवा मज़ला आतां। सकल कार्या आश्रयदाता। तुज़वांचोनि नसे सर्वथा। अन्य कवणही गुरु-

राया।।४०।। तूं माझ्या संनिध असतां । कैंचें भय मज़ला ताता। वृथाचि कासया करावी चिंता। भक्ताभिमानी तूं अससी।।४१।। कवण्याही साधुपुरुषद्वारें। तूं भेट देईं मज़ला त्वरें। बोधामृताचे तुषार स्वकरें। उडवुनि तळमळ शांत करीं।।४२।। एकाग्र होऊनि चातक। पर्जन्यासी ध्यायी सम्यक। तैसा मी तुझा किंकर बालक। मार्गप्रतीक्षा करीत असें।।४३।। तूं अससी सर्वांठायीं। तुज़हुनि ठाव रिता नाहीं। जगींचा साधु असो कवणही। तुझेंचि स्वरूप मानीन मी।।४४।। आतां भेटेल ज़ो साधु। तोचि करील मज़ला बोधु। तुझाचि तो कृपाप्रसादु। ऐसें समज़तों मी देवा।।४५।। म्हणोनि देवा सद्गुरुराया। धांवा झडकरी दर्शन द्याया। कोणाच्याही द्वारें तूंचि सदया। भेट देईं मज़लागीं।।४६।। प्रल्हादानें बाहतां सत्वरी। काष्ठांत प्रगटलासी तूं हरी। तेव्हां सजीव ऐशा शरीरीं। प्रगटाया असाध्य काय तुला।।४७।। त्यांतही साधुपुरुष-शरीरीं। प्रगट व्हाया उशीर ना लवभरी। म्हणोनि प्रार्थितों भेट दे झडकरी। प्रभो दयाळा गुरुराया।।४८।। यावरी श्रोते करितील प्रश्न। कीं अन्य साधूंच्या ठायीं प्रगटोन। कासया द्यावें दर्शन। व्यापक असतां गुरुनाथ।।४९।। श्रीस्वामींच्या हृदयीं प्रगटुनी। कां न सांगावे विचार झणीं। तरी परिसा उत्तर ये क्षणीं। लक्ष देउनी प्रेमानें।।५०।। अन्या निमित्तमात्र करोनी। आपणचि विचार करिती स्वमनीं। ज़ैसा असे प्रचार धरणीं। त्यापरी वर्तती ज्ञानी हो।।५१।। श्रीसद्गुरु हृदयांतरीं। प्रगटल्याविण आत्मविचारीं। नच होय गति निर्धारीं। कोण्याही साधकाची पहा हो।।५२।। ज़री केलीं अनेक साधनें। गुरुकृपेवीण व्यर्थचि जिणें। ती झालिया काय उणें। भक्तालागीं पहा हो।।५३।। म्हणोनि गुरुभक्ति हेंचि साधन। मुख्य असे साधकांलागोन।

अन्य साधनें सकलही ज़ाण। तयापोटीं आलीं पहा।।५४।। व्रत नेम अनुष्ठान। तीर्थयात्रा संतर्पण। यज्ञयाग-जपतपादि साधन। न होय गुरुभक्तीसमान पहा तें।।५५।। वेदांतश्रवण केलें अपार। अथवा निदिध्यास करी निरंतर। ध्यानधारणादि योग सुंदर। करितांही न होय आत्मज्ञान।।५६।। एवं बहुविध केली खटपट। तरी ती सारी होय फलकट। गुरुभक्ति ही एकचि थेट। घेऊनि ज़ाय निजरूपा।।५७।। म्हणोनि गुरुभक्ति मुख्य साधन। तेणेंचि गुरुकृपा होय पूर्ण। गुरुकृपा झालिया उशीर तो कवण। निजात्मज्ञाना पहा हो।।५८।। गुरुभक्तिचिया पोटीं। आलीं सर्व साधनें मोठीं। हें नलगे वेगळें सांगावें ओठीं। करोनि बघतां सहज़ कळे।।५९।। देह रक्षाया नाना उपचार। स्नान-वस्त्रादिक अपार। केले ज़री अन्नावीण साचार। न ज़गे देह कदापिही।।६०।। अन्नचि मुख्य शरीरासी। म्हणोनि अन्नमय कोष म्हणती त्यासी। सकल प्राणी अन्नेंचि परियेसीं। वाढे ज़गे पहा हो।।६१।। ज्या ज्या प्राण्या ज़ो ज़ो आहार। त्यासी अन्न बोलिज़े साचार। एवं अन्नावीण कवणही थोर। साधुपुरुषही वांचेना।।६२।। तैसें येथें नानापरी। साधन अभ्यास केला ज़री। गुरुभक्तीवीण अंतरीं। न होय आत्मज्ञान कदा।।६३।। म्हणोनि श्रीसद्गुरुलागीं। अनन्य भज़तां निश्चयें वेगीं। आत्मज्ञान होय जगीं। सत्यचि ज़ाणा संशय ना।।६४।। गुरुभक्ति दृढ होतांक्षणीं। कृपा सहज़ होय झणीं। त्यासी कष्ट अणुमात्र कोणीं। करावा नलगे निश्चयेंसीं।।६५।। गुरुकृपा ही सहज़चि असे। परि ती भावनेच्या हातीं वसे। सद्गुरूच्याही हातीं नसे। कारण सकल जन समान त्यां।।६६।। पहा रज्जूवरी दिसे विखार। पाय पडतां कांपे थरथर। म्हणे मज़ डसला भयंकर। ऐसें समज़े

वृथाचि।।६७।। विदित असे ज्या रज्जु म्हणोनि। तो म्हणे पहा दिवा घेउनी। साप नव्हे तो रज्जु धरणीं। पडला असे निश्चयेंसीं।।६८।। परि हा न धरी विश्वास। ढुंकूनही न बघे त्यास। तेव्हां भय वाढे बहुवस। सापचि डसला म्हणोनियां।।६९।। त्यासी काय करावें तेणें। चूक कवणाची सांगा त्वरेनें। याचीच ऐसें म्हणतां निश्चयानें। दोष न होय सर्वथा।।७०।। तद्वत् येथें सद्गुरुराज। ज्ञानदिवा हातीं घेउनी सहज। उभे असती भक्तकाज। कराया तिष्ठत प्रेमानें।।७१।। परि आम्हीं त्यांच्या वचनीं। विश्वास न धरितां आपुल्या मनीं। नाना कुतर्क उठवितों झटकुनी। तेवींच देहभान वाढे पैं।।७२।। म्हणोनि आम्हीं सद्गुरुनाथा। दोष न द्यावा अणुमात्र सर्वथा। त्यांच्या वचनीं विश्वास धरितां। पार पडे निश्चयेंसीं।।७३।। गुरुकृपेंचि होय ज्ञान। श्रवण जरी करी अन्याकडून। तरी सद्गुरु आपुला जो असे कृपाघन। तोचि हृदयीं प्रगटे हो।।७४।। तेणेंचि होय आत्मज्ञान। परि करावें श्रवण मनन। श्रुति-युक्ति-अनुभव प्रमाण। ज्ञानासी लागे हें पाहीं।।७५।। म्हणोनि आनंदाश्रम स्वामीराय। शोधिती कवणही साधूचे पाय। युक्ति सांगावया आपुली गुरुमाय। गुप्त असे म्हणोनियां।।७६।। पहा कैसी स्वामींप्रति। किती असे सद्गुरुभक्ति। म्हणोनि रात्रंदिन ध्याती। सद्गुरुचरण दृढतर ते।।७७।। असो मग श्रीस्वामी सतत। गुरुमातेचें ध्यान करीत। राहिले भार घालुनी स्वस्थ। सद्गुरूवरी त्या समयीं।।७८।। कांहीं दिन गेलियावरी। स्वामी गेले गोकर्णामाझारीं। परिवारासहित पोंचली स्वारी। सकल जन आनंदले।।७९।। तेथें कांहीं दिन केला वास। त्या ठायीं एक सत्पुरुष। कृष्णाचार्यस्वामी नामें परमहंस। भेटले अवचित तयांसी।।८०।। ते हृषीकेशींचे रहिवासी।

जीवन्मुक्त ऐसे संन्यासी। त्यांस बघतां श्रीस्वामींसी। आनंद ज़ाहला अनिवार।।८१।। कंठ होय सद्गदित। प्रेमाश्रु नयनीं वाहात। परि नच दाविती जनांप्रत। आवरुनी धरिती हृदयीं हो।।८२।। असो त्यांसी बघतांक्षणीं। हे साधु ऐसें कळलें मनीं। मुंगीसी साखरेची गोडी कोणीं। सांगावी नलगे सहज़ कळे।।८३।। जेथें असे शर्करा उत्तम। तेथें मुंगी ज़ाय हा नेम। कळे का तिज़ला शर्करा नाम। कैसी पारख होय तिज़।।८४।। तैसे ज़े खरे साधक। त्यांसी साधूंची लागे पारख। कोणीं सांगावें नलगे देख। आम्हां अज्ञ जनांपरी।।८५।। त्यांत आमुचे स्वामिराय। साक्षात् भगवान् अवतार होय। कळे त्यांसी सर्वांचें हृदय। सांगावें नलगे कुणींही त्यां।।८६।। असो मग सद्गुरुनाथें। काय केलें ऐका झणीं तें। प्रेमपुरःसर सावध चित्तें। तुम्ही प्रेमळ श्रोते हो।।८७।। श्रीस्वामी सद्गुरुनाथ। आणि कृष्णाचार्य प्रख्यात। संभाषण होतां दोघांचें तेथ। एकमेकां प्रेम उपज़लें।।८८।। परि ते गेले आपुल्या ग्रामांत। हृषीकेशक्षेत्रीं त्वरित। इकडे स्वामी सद्गुरुनाथ। आले चित्रापुर-ग्रामीं पैं।।८९।। परि धरिले निजमानसीं। कृष्णाचार्यांकडे ज़ातां मज़सी। परमार्थलाभ निश्चयेंसीं। घडेल खचित संशय ना।।९०।। ऐसा करोनि विचार स्वमनीं। हृषीकेशीं ज़ावोनि झणीं। परमार्थश्रवण त्यांच्याकडुनी। करावें ऐसें चिंतिती।।९१।। आमुचे सद्गुरु पांडुरंगाश्रम। हेचि ते मज़ भेटले गुणग्राम। तेचि सांगतील बोध उत्तम। म्हणोनि ज़ावें शीघ्रगतीं।।९२।। कांहीं दिन तेथेंचि राहुनी। समज़ुनी घ्यावें त्यांच्याकडोनी। तरी आतां सर्वांलागुनी। कळवावा विचार हेंचि बरें।।९३।। ऐसा विचार करोनि मानसीं। कळविला सारा हेतु जनांसी। तेव्हां अवश्य म्हणोनि ते समयेंसी। केली सिद्धता लोकांनीं।।९४।।

मग अन्य ग्रामींचे कांहीं जन। आणि शिरालीचे मिळोन। निघाले स्वामीसंगतीं आपण। परम उत्साहें त्या क्षेत्रा।।९५।। ज़ातां वाटेमाजीं बहुत। गांवोगांवीं वास करीत। चालले हुबळी-पुणें-मुंबईप्रत। दिल्ली आदि शहरींही।।९६।। तेवीं बहुविध पवित्र स्थानीं। राहुनी पुनीत केली धरणी। आनंद ज़ाहला सकलांलागुनी। मूर्ति बघुनी प्रेमळ ती।।९७।। ज्या ज्या स्थळीं केला मुक्काम। त्या त्या स्थळीं प्रवचनें उत्तम। दिधलीं, तेव्हां सकलांचें प्रेम। वाढलें स्वामींच्या चरणीं हो।।९८।। अनेक भाषा असती अवगत। एका ग्रामीं असतां तेथ। महाराष्ट्रीयांनीं प्रार्थिलें बहुत। सांगावें प्रवचन म्हणोनियां।।९९।। कीं आम्हांसी मराठीवीण। अन्य भाषेचें नसे ज्ञान। मराठींत सांगावें प्रवचन। म्हणोनि चरण वंदियले।।१००।। त्यावरी बोलती कृपाघन। आम्हांसि मराठी न कळे पूर्ण। तेव्हां म्हणती सर्व जन। न करणें अनुमान तुम्हीं हो।।१०१।। कैसें ज़री बोलिलां आपण। आनंदचि आम्हां होय पूर्ण। आपुल्या मुखींचें करावें श्रवण। इतुकीच इच्छा आमुची हो।।१०२।। ऐसें ऐकतां अवश्य म्हणोनि। प्रवर्तले ते मराठी प्रवचनीं। बोलिले अस्खलित वाचेकरोनि। मराठी भाषा उत्तम।।१०३।। ऐकतां जन झाले तटस्थ। प्रेम उचंबळे हृदयांत। पूर्ण झालियावरी बोलत। आपापसांमाजीं ते जन।।१०४।। मराठी न येतां बोलिले उत्तम। विषय समज़ला आम्हां सुगम। म्हणती धन्य धन्य परम। प्रेमळ मूर्ति ही पाहीं।।१०५।। ऐसें बोलुनी एकमेकांप्रति। धन्यवाद स्वामींसी देती। आनंद ज़ाहला मनासि अति। काय सांगूं हो आतां।।१०६।। त्यांसी काय असे उणीवता। शिकावें नलगे नवीन आतां। सकल विद्या येती हाता। न लागतां क्षण संशय ना।।१०७।। ऐशापरी जेथें तेथें राहुनी। गेले हृषीकेशक्षेत्र-स्थानीं। कांहीं दिवस

मुक्काम करोनि। घालविला काल परमार्थीं।।१०८।। कृष्णाचार्य-स्वामींज़वळी। श्रीमत् शंकराचार्यांचीं सगळीं। ब्रह्मसूत्रादि भाष्यें ते वेळीं। श्रवण केलीं प्रेमानें।।१०९।। ऐसा कांहीं दिवस तेथ। काल क्रमिला परमार्थांत। कार्य सिद्ध ज़ाहलें समस्त। उशीर न लागला तयांसी।।११०।। आधींच़ शेत नांगरुनी सर्व। बीज पेरिलें उत्तम भरीव। पाऊस पडतांक्षणीं सदैव। उगवे तृण सुंदर तें।।१११।। मग हंगामीं येती कणसें। त्यासी उशीर न लागतसे। श्रीसद्गुरुस्वामींसी तैसें। ज्ञान विज्ञानही ज़ाहलें।।११२।। आधींच़ चारी साधनें अंगीं। गुरूपदेश-बीज पडलें वेगीं। श्रवणरूप पर्जन्यालागीं। पहात होते वाट ते।।११३।। तेव्हां गुरुमहाराज बोलले। कृष्णाचार्यरूपें भेटले। श्रीस्वामींच्या हृदयीं ते वेळे। घातला पर्जन्य कर्णद्वारें।।११४।। तेव्हां 'मी ब्रह्म' ऐसें स्फुरण। हेंचि शेत उगवलें भरून। हिरवें गार ज़ाहलें पूर्ण। आनंदाच्या अंकुरांनीं।।११५।। वारंवार आनंदाच्या। उकळ्या येती अंतरीं साच्या। म्हणोनि मुखावरी त्यांच्या। तेज अपार विलसतसे तें।।११६।। असो ऐसें असतां पाहीं। त्या ग्रामीं एकदां कांहीं। उत्सवनिमित्तें स्वामींस सर्वांहीं। पाचारिलें होतें पैं।।११७।। तेथें बहुत संन्यासी यांना। बोलाविलें अनेक जनांना। ते स्थळीं आमुच़ा सद्गुरुराणा। बैसला एकीकडे ज़ाऊनियां।।११८।। तेव्हां तेथील मुख्य गृहस्थ। आला स्वामींज़वळी तेथ। मुखकांति पाहतां विस्मित। झाला चित्तीं अनिवार।।११९।। हे न होत सामान्य पुरुष। ही ज़ागा नव्हे योग्य यांस। ऐसें समज़ुनी सावकाश। आला ज़वळीं स्वामींच्या।।१२०।। आणि बोले कर ज़ोडोनि। यावें येथें कृपा करोनि। ऐसें म्हणोनि गेला घेऊनि। उच्च स्थानीं बैसविलें।।१२१।। पहा कैसी असे मूर्ति।

सहज़चि विलसे मुखावरी कांति। परिचय नसतां अणुमात्र चित्तीं। कैसें प्रेम त्या उद्भवलें।।१२२।। तेवींच़ दिधलें उच्चस्थान। कळलें कैसें त्यालागून। कीं हे स्वामी श्रेष्ठ म्हणोन। वदनचि सांगे त्यांच़ें पैं।।१२३।। ऐशी आमुची गुरुमाउली। कवणही बघतांचि येई ज़वळी। महिमा अपार असे त्या स्थळीं। पुढील अध्यायीं सांगूं ती।।१२४।। ऐशापरी तेथ कांहीं दिवस। राहुनी स्वामी परमहंस। आले वेगें आपुल्या ग्रामास। चित्रापुर-मठातें।।१२५।। परि तें ब्रह्मसूत्रभाष्य पूर्ण। ऐकावें दृढ व्हावया कारण। म्हणोनि येथें केलें पाचारण। कृष्णाचार्यस्वामींसी।।१२६।। येतांचि कांहीं दिन श्रवण। केलें बहुत प्रेमेंकरोन। संशय सारे होउनी निरसन। ब्रह्मज्ञान दृढ होत।।१२७।। 'मी ब्रह्म' ऐसें अनुसंधान। धरिलें अणुमात्र न होय खंडण। सहज़ासहज़ आनंदपूर्ण। भोगी निजात्मरूपाच़ा।।१२८।। वास्तविक विचार करितां। भोगणेंचि नाहीं चित्ता। भोग्य भोक्ता-भोगणें तत्त्वतां। त्रिपुटी तेथें न उरे पैं।।१२९।। ब्रह्मानंद भोगितो म्हणाया। भोक्ताचि नुरे तया ठाया। भोक्ता म्हणतां वेगळा होऊनियां। पहावें लागे ब्रह्माहुनी।।१३०।। म्हणोनि येथें 'मी ब्रह्म' ऐसा। भाव मुळीं न साहे सहसा। कवणही भाव न धरितां आपैसा। सहज़ानंदचि त्या ठायीं।।१३१।। एवं सद्गुरु 'आनंदाश्रम'। ऐसें शोभे त्यांसी नाम। नामापरीच़ राहती परम। आनंदामाजींच़ सर्वदा।।१३२।। हें बघुनी कृष्णाचार्य-स्वामी। विस्मित होती अंतर्यामीं। ऐसी मूर्ति देखिली ना मीं। कवणे ठायीं म्हणती ते।।१३३।। ऐसे स्वामींच़े शांत सद्गुण। आणि एकाग्र करितां श्रवण। लगेच़ चित्तीं होय ग्रहण। ब्रह्मज्ञान ते समयीं।।१३४।। असो आतां पुढील अध्यायीं। आणीक लीला दावील गुरुमाई। आतां ऐकिलें तितुकें हृदयीं। धरूं आपण

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

प्रेमानें।।१३५।। श्रीस्वामी-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थस्वामी उत्तम। यांच्या कृपाप्रसादें पंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१३६।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां ब्रह्मनिष्ठ होय साचार। पंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१३७।। अध्याय।।५०।। ओंव्या ।।१३७।। ॐ तत्सत्- श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा श्रीगुरुनाथा। तूं सर्व जगाची होसी माता। पहाया गेल्या तुज़ला ताता। न सुचे कांहीं निश्चयेंसीं।।१।। तुझ्या नामाचें करितां गान। परम शांत होय मन। महिमा अपार करितां वर्णन। न उरे भान कांहीं एक।।२।। ऐसी तूं मम माउली देवा। प्रेमाची खाणचि मिळाली सर्वां। मग आम्हां काय उणें तेधवां। पूर्वपुण्य अमित असे।।३।। म्हणोनि लाभले ज़े ऐसे चरण। न विसरावे कधींही ज़ाण। ऐसी कृपा करावी आपण। भक्तवत्सला गुरुराया।।४।। असो आतां श्रोते हो सज्जन। परिसा सावध चित्त करोन। श्रीसद्गुरूचे आणिक सद्गुण। प्रेमळ चित्तेंकरोनियां।।५।। मागील अध्यायीं केलें कथन। स्वामी आनंदाश्रम दयाघन। यांनीं संपादिलें आत्मज्ञान। कृष्णाचार्यद्वारें पैं।।६।। श्रीरामें वसिष्ठाकडोन। 'योगवासिष्ठ' श्रवण करोन। संपादिलें आत्मज्ञान। हेंही ज़ाणा तैसेंचि।।७।। आतां ऐका पुढील कथा। कीं स्वामी आपुलिया चित्ता। दिनरजनीं लाविती परमार्था। अखंड धरिती अनुसंधान।।८।। करितां अभ्यास वारंवार। 'मी ब्रह्म' हें दृढ होय साचार। मग जीवन्मुक्तदशा थोर। आली लवलाहीं त्यांसी पैं।।९।। शांत मूढ आणि घोर। ऐसे वृत्तीचे तीन प्रकार। त्यांत शांत वृत्तीमाजींच थोर। आनंद प्रगटे हें शास्त्रसिद्ध।।१०।। आधींच शांतवृत्ति यांची। म्हणुनी सत्वर ब्रह्मानंदाची। झाली प्राप्ति, मग उणीवता कैंची। समाधानासी हो पाहीं।।११।। जेथें असे तृप्त मन। तेथें सहज़चि समाधान। ज्यासी होय ब्रह्मज्ञान। त्यासी तृप्ति सर्वदा।।१२।। जेथें असे द्वैत-भेद। तेथेंचि होय मनासी खेद। मीचि सर्वांठायीं समृद्ध। तेथ कैंचा भेद

उठे।।१३।। जगामाजीं हरएक जनां। आपुल्याहुनी वेगळ्या ज़ाणा। वस्तूसाठीं खेद होय मना। न मिळतां ती आपुल्यासी।।१४।। आप्तइष्ट नाना भोग। यांतचि गर्क होय जग। त्यांत अणुमात्र होतां वियोग। कष्ट अनिवार होय मना।।१५।। आणि आपुलें देह हें पहा। सुखरूप सदा असावें ध्यास हा। अणुमात्र कष्ट येतां, महा-। दुःख होय त्या पाहीं।।१६।। इतुकें व्हावया काय कारण। मी व माझें हेंचि ज़ाण। परि ब्रह्मज्ञानियांलागून। सारें ब्रह्मचि, अन्य नसे।।१७।। सर्वांमाजीं मीचि असें। मज़हुनी अन्य स्थळचि नसे। तेव्हां भेद कैंचा दिसे। मावळुनी ज़ाय तात्काळ तो।।१८।। भेदचि नाहीं तेथें कैंची। इच्छा होय विषयांची। म्हणोनि तृप्ति असे त्यांची। सदा सर्वदा निश्चयेंसीं।।१९।। ज़ो असे सदा तृप्त। समाधान असे त्याप्रत। इच्छा नसे कवणही किंचित। पैसा अडका इत्यादिकांची।।२०।। यावरील कवणही करील प्रश्न। कीं स्वामींसी नसे इच्छा आन। तरी कासया मठाची चिंता ज़ाण। उन्नति व्हावी म्हणोनियां।।२१।। तोंबत केशवराव येणें। पैशासाठीं दिधलीं व्याख्यानें। इंग्रजीत, म्हणोनि मातृभाषेनें। दिधलें प्रवचन स्वामींनीं।।२२।। त्यांत यांनीं कां घ्यावा भाग। यांसी पैसा आणि मठ व्हावा चांग। तरी निरिच्छ कां म्हणसी सांग। श्रीस्वामींसीं तूं पाहीं।।२३।। तरी ऐका त्याचें उत्तर। सांगूं आतां सविस्तर। चित्त आपुलें करोनि स्थिर। बैसा सावध होऊनियां।।२४।। श्रीसद्गुरुस्वामीनाथा। नसे अणुमात्र कवणही चिंता। केवळ जगदोद्धाराकरितां। सकलही कार्यें करिती ते।।२५।। अवतारचि जनकल्याणा। म्हणोनि चिंतिती उन्नति ज़ाणा। देवतार्चनादि कर्मांगाविना। आत्मोन्नति होत नसे।।२६।। वेदोक्त कर्मांनीं कल्याणकारी। शक्ति उद्भवे

जगदंतरीं। हें वर्म ज़ाणोनि अभ्यंतरीं। जनोन्नतीस्तव करविती कर्में।।२७।। देह झिज़विती रात्रंदिवस। अणुमात्र मनीं न होती उदास। आणि अभिमान नसे त्यांस। 'मीं केलें' असें म्हणोनियां।।२८।। याचिकारणें दिधलें व्याख्यान। स्वार्थ नसे यांत अणुप्रमाण। केवळ इच्छिती जनकल्याण। नाहीं अणुमात्र किमपिही।।२९।। पहा त्यांसी कासया इतुकें। त्यांत आपुलें घालावें डोकें। केवळ जनहित व्हावें निकें। अन्य हेतु ना येथें।।३०।। ते असती बालसंन्यासी। नाहींत आप्त-इष्ट तयांसी। सारें जगचि आप्त परियेसीं। हें सकलांसी विदित असे।।३१।। इतुकें असतां करिती कां कष्ट। जनहितार्थ हें दिसे स्पष्ट। न बघतां श्रेष्ठ-कनिष्ठ। सकलां समान सांभाळिती।।३२।। ज़री केला स्थिरता-फंड। न दे ज़ो त्या न करिती दंड। परि उन्नति व्हावी अखंड। मठाची चिरकाल ही इच्छा।।३३।। आतां कवणही करील प्रश्न। अवतारिक म्हणतां त्यांलागून। त्यांसी कैंचें असाध्य म्हणोन। पैसा गोळा करावा हो।।३४।। तरी परिसा उत्तर तुम्ही। अवतार-पुरुष निश्चयें स्वामी। त्यांस असाध्य नाहीं हें आम्ही। वचन मान्य करूं पहा।।३५।। परि स्वामी नव्हे मांत्रिक। अथवा नव्हे जादूगार एक। सिद्धि नाहीं त्यांच्यानजीक। खरे साधु असती ते।।३६।। ते न दाविती चमत्कार। न पडे पैसा येऊनि हातावर। त्यांच्या संनिध आत्मविचार। मिळे भरपूर, ना तोटा।।३७।। असो एवं श्रीस्वामींसी। सिद्धि प्राप्ति नसे त्यांसी। असली ज़री तरी ते सिद्धीसी। वश न होती पहा हो।।३८।। म्हणोनि स्वामी सद्गुरुनाथ। सिद्धीसी न होती अंकित। खरे ज़े असती साधुसंत। सिद्धीप्रत ते ढुंकिती ना।।३९।। त्यांची महिमा सहज़ासहज़। प्रगट होय पहा तेज। फणस पिकला तेथें रोज़। सुवास येई आपैसा।।४०।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

फणस पिकला हें पहावें नलगे। सुवासेंचि कळों ये वेगें। तैसें साधुसंतांसंगें। सहवास न करितां सहज़ कळे।।४१।। कीं त्यांच्या महिमेवरोनि। हे साधु ऐसें कळे झणीं। ज़री भक्तिहीन असला धरणीं। त्यासीही कळे हे साधु।।४२।। सुवासें कळे फणस पिकला। महिमा बघतां 'साधु भला' । हें ज़ाणे अभक्तही, त्याला। हें सांगावें नलगे हो।।४३।। असो जनांच्या कल्याणास्तव। त्याकडुनीच़ करविती सर्व। तेवींच़ स्थिरता-फंड अपूर्व। करावा लागे व्यवहारदृष्टीं।।४४।। रामकृष्णादि झ़ाले अवतार। त्यांनीं नाहीं करूनि 'छू मंतर'। मारिलें राक्षसां भूवर। युद्ध-व्यवहारचि केला पैं।।४५।। एवं श्रीसद्गुरुस्वामी। सतत शांत अंतर्यामीं। झिज़विती देह निजभक्तकामीं। परि व्यवहारदृष्टि राखिती।।४६।। मराठी इंग्रजी कर्नाटक। तेवीं हिंदी गीर्वाण आणिक। बहुत भाषा शिकले देख। उल्हासें हो ते पाहीं।।४७।। जिकडे तिकडे देती प्रवचनें। सकळां कळावें या हेतूनें। मराठी हिंदी कर्नाटक जेणें। कळेल त्यांसि तें बोले।।४८।। हे ज़ातीच़े सारस्वत। त्यांसीच़ उपयोग व्हावा येथ। ऐसा दुरभिमान नाहीं असत। चित्तीं त्यांच्या कदापिही।।४९।। कवणही ज़ात असो त्यांची। उत्तर देती प्रश्न करितांचि। ऐसी कनवाळू मूर्ति आमुची। काय वानूं हो पाहीं।।५०।। नाहीं धनाची अणुमात्र इच्छा। म्हणोनि राजा-रंक-हुषार-कच्चा। अथवा असो लफंगी-लुच्चा। सर्वही समान त्यांसी पैं।।५१।। राग द्वेष कवणावरी। नसे अणुमात्र निजअंतरीं। सर्वांभूतीं समान श्रीहरी। पाहती सर्वदा एकरूप।।५२।। निंदक वंदक भक्त अभक्त। सर्वही एकचि बघती निश्चित। गुण दोष कुणाच़े नाहीं बघत। शांत राहती सर्वदा।।५३।। परम सात्त्विक हृदय त्यांच़ें। म्हणोनि पावले ब्रह्मज्ञान साच़ें। त्यापरीच़

शब्दही वाचे। उठती शांतपणें हो पाहीं।।५४।। ज्याचें हृदय असे ज़ैसें। तैसेच शब्द उठती आपैसे। म्हणोनि ब्रह्मज्ञानी परियेसें। शांत अंतरीं समज़ावें।।५५।। यावरी येईल एक प्रश्न। कीं शांत सात्त्विक ज्यांचें मन। त्यांसी होय ब्रह्मज्ञान। तरी संशय एक असे।।५६।। कीं पांडुरंगाश्रम स्वामी। कडक होते ऐकिलें आम्हीं। अपराध करितां क्षोभती नेहमीं। तरी ते अज्ञचि कीं काय।।५७।। तरी ऐका सावधान। तेही पावले पूर्णज्ञान। हेतु जनांचें करावें कल्याण। म्हणोनि क्षोभत होते ते।।५८।। अंतरीं सात्त्विक परम शांत। बाह्यात्कारें क्षोभ दावित। आमुच्यापरी न ढळे चित्त। त्यांचें निश्चयें कदापिही।।५९।। प्रारब्धापरी होय वर्तन। एक शांत एक उग्र असोन। ज्ञान त्यांचें एकचि परिपूर्ण। अणुमात्र भिन्न नसती ते।।६०।। ज्यासी न होय ब्रह्मज्ञान। तोही कुणीएक शांतता धरोन। जनीं वर्ते प्रेमें करोन। परि अंतरीं त्यास ना शांति।।६१।। तळमळ वाटे वारंवार। चतुर न दावी जनांसी बाहेर। परि न होय तो ज्ञानी नर। कदापिही ज़ाणा तो।।६२।। चिंता लागली ज्याच्यापाठीं। त्यासी सात्त्विक न म्हणे ज्ञानी ओठीं। अज्ञ म्हणेल स्वार्थासाठीं। सात्त्विक शांत तो म्हणोनि।।६३।। एवं ज्ञानी ज़री बाह्यात्कारें। क्षोभला तरी अज्ञान नुरे। त्याच्या अंगीं, सांगतों निर्धारें। पूर्ण समाधान असे त्या।।६४।। म्हणोनि श्रीपांडुरंगाश्रम। शुद्ध सात्त्विक पूर्ण ब्रह्म। न धरितां अंतरीं अणुमात्र काम। उद्धार केला सकलांचा।।६५।। वरिवरी दाविला कोप। मानसीं आशीर्वाद दिधले खूप। सत्पुरुषांचें क्षोभस्वरूप। आशीर्वादचि ज़ाणावे।।६६।। ''क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः'' ऐसें। पुराणवचन असे खासें। माता बाळावरी कोपतसे।

तरी शुद्ध प्रेमचि अंतरीं।।६७।। महिमाचि त्यांची असे थोर। त्यांच्यापुढें काय आम्ही अज्ञ नर। सद्गुरूची इच्छा आम्ही पामर। कैसी ज़ाणूं शकों हो।।६८।। पांडुरंगाश्रम परम उग्र। आनंदाश्रम शांत समुद्र। ऐसें बोलणें हा अविचार। सत्य सत्य त्रिवाचा।।६९।। ज्यांच्या त्यांच्या प्रारब्धापरी। आणि प्रकृतिधर्मानुसारी। वर्तती ज्ञानी जगदंतरीं। कोणीही प्रतिबंध करूं न शके।।७०।। एवं सद्गुरुस्वामींचे। दोष पाहूं नये साचे। पांडुरंगाश्रम-आनंदाश्रम यांचें। एकचि अंतःस्वरूप।।७१।। त्यांसी यांसी नाहीं भेद। यावरी एक कथा प्रसिद्ध। सांगूं आतां व्हावें सावध। तुम्ही श्रोते सज्जन हो।।७२।। धारवाड प्रांत हुबळी-ग्रामीं। शिवकृष्णमंदिर ऐशा नामीं। देउळाज़वळी निष्कामी। विधवा बाई होती पैं।।७३।। तियेचें नाम अंबाबाई। गुलवाडी हें उपनाम पाहीं। परम भाविक श्रद्धाळू निश्चयी। शांतवृत्ति जियेची।।७४।। तीर्थ-क्षेत्र-व्रत-दानें। केलीं नाना उपोषणें। एवं सत्कार्यें परम प्रीतीनें। रात्रंदिन ती करीतसे।।७५।। ऐसें असतां एके दिनीं। बाई पहुडली असतां रजनीं। सुंदर स्वप्न देखिलें नयनीं। चमत्कारिक तें ऐका।।७६।। श्रीमत्पांडुरंगाश्रमस्वामी। आले परिवारासहित ग्रामीं। त्यांच्या अंगणीं उभे राहिले भूमीं। बोलिले भटजीज़वळी ते।।७७।। शिवकृष्णमंदिराच्या अंगणीं। आवळीचें झाड उगवलें असोनि। पार बांधावा त्या छान करोनि। शिळा रचोनि सुंदरशा।।७८।। ऐसें सांगा अंबाबाईसी। आणि प्रसाद ठेविला तिज़सी। देव्हाऱ्यामाजीं देवापाशीं। घेईं काढुनी सांगा तिला।।७९।। तेव्हां तिनें केलें नमन। आनंदलें तियेचें मन। आंत आली सत्वर धांवोन। तोंच ज़ाहली जागृत ती।।८०।। तैं लगबगें उठोनि गेली।

देवाज़वळी पाहूं लागली। तेथें पुडा देखिला ते वेळीं। विस्मित ज़ाहली निजमानसीं।।८१।। मग करोनि सत्वर स्नान। केलें सोवळें वस्त्र परिधान। उघडी पुडा हातीं धरोन। सांज़ोऱ्या होत्या त्यामाजीं।।८२।। विस्मित झ़ाली पाहतांक्षणीं। हरुष ज़ाहला अतितर स्वमनीं। वांटिला सकलांसि प्रेमेंकरोनि। पसरली वार्ता सर्वत्र।।८३।। असो ऐसा चमत्कार। ऐका दुसरें आश्चर्य थोर। पांडुरंगाश्रम-आनंदाश्रम गुरुवर। एकचि ऐसें दावियलें।।८४।। जेव्हां दिधल्या सांज़ोऱ्या येथें। तेचि दिनीं आनंदाश्रमस्वामीतें। मुर्डेश्वर-गांवी बोलविलें होतें। भिक्षेसी एका भक्तगृहीं।।८५।। तेव्हां तेथें सांज़ोऱ्या ज़ाण। केल्या होत्या हें कळलें मागून। यावरी समज़ावें एकचि म्हणोन। गुरु-शिष्य दोघेही।।८६।। असो एवं सद्गुरु-महिमान। अपारचि असे, हें आम्हांलागून। वारंवार येई कळून। परि तेथें लक्ष न आमुचें।।८७।। आतां आणिक एक ऐका। स्वामींचें सद्गुण-चरित्र देखा। आमुचें आयुष्य सर्व फुका। गेलें विषयसुख भोगितां।।८८।। म्हणोनि ऐकतां त्यांचे सद्गुण। तेथचि रमे आमुचें मन। सत्संगतीनें आत्मज्ञान। होय जनांसी निर्धारें।।८९।। परि सर्वही जनालागीं। सत्संगति न लाभे वेगीं। तैशियानें काय करावें जगीं। श्रवण करावें गुरुचरित्र।।९०।। ऐसें करितां वारंवार। सद्गुण कळती आम्हां सत्वर। आमुचेही मन होय तीव्र। परमार्थासी अधिकारी।।९१।। असो आतां परिसा सावध। सद्गुरु आनंदाश्रम सुखद। त्यांच्या हृदयीं सदा आनंद। नाहीं दुःख अणुमात्र।।९२।। परम औदार्य मानसीं थोर। नम्रपण असे अतितर। कवणाचेंही न दुखविती अंतर। कवण्याकाळीं पहा हो।।९३।। प्रवचन करतांही जनांचें मन। न दुखविती अणुमात्र चुकोन। स्वधर्माविरुद्ध न

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

बोलती वचन। युक्तीनें सांगती सूक्ष्म पहा।।९४।। खोल विचार केल्यावांचूनि। कवणही कार्य न करिती धरणीं। किती तीव्र बुद्धि म्हणुनी। वर्णवेना आम्हांसी।।९५।। जनांसी ज़ैसें केलियानें। बरें होईल तेंचि करणें। जनहितावांचुनी आणिक नेणे। कल्याणचि इच्छितसें।।९६।। भक्तजनांनीं अमुक करावें। ऐसें प्रार्थितां त्या स्वभावें।जेणें हितचि होय बरवें। तेंचि करिती प्रेमानें।।९७।। चैत्र शुद्ध पौर्णिमेसी। रथोत्सव होता परियेसीं। तो रहित केला निश्चयेंसी। काय कारण तें ऐका।।९८।। पूर्वीं होता रथोत्सव। लोकही सशक्त होते सर्व। आतां बघतां जगीं अपूर्व। अशक्त झ़ाले जन सारे।।९९।। नाना व्याधि उपाधि अनेक। म्हणोनि कार्यासी मन हें उत्सुक। न होय जनांचें निश्चयात्मक। पूर्वींच्यापरी ज़ाणा हो।।१००।। त्यामुळें रथोत्सवासी। ज़ातां अनेक कष्ट जनांसी। अन्नोदक न मिळे परियेसीं। योग्य वेळीं त्या समयीं।।१०१।। तैसें व्हावया काय कारण। शक्तिहीन झ़ाले जन। झ़डकरी न होती कामें हातोन। पूर्वींसारखीं नेमस्त।।१०२।। म्हणोनि होती कष्ट अनेक। तरीही कष्ट सोसुनी भाविक। येत होते निश्चयात्मक। प्रेमपूर्वक पहा हो।।१०३।। परंतु तितके करोनि सायास। परमार्थ न घडे त्यामाजीं खास। कीं तो असे वसंत ऋतूचा मास। पाणी न मिळे उपयोगा।।१०४।। उकडुनी अंगीं सुटे घाम। परस्थळामाजीं होती श्रम। तेव्हां कैंचें परमार्थप्रेम। उपज़ेल सांगा तुम्ही हो।।१०५।। ज़री झ़ालें कीर्तन प्रवचन। ऐकाया उत्सुक न होय मन। मुलें रडती आक्रंदोन। उकाडा होऊन अनिवार।।१०६।। तेवींच ज़ाणोनि भविष्यकाल। अन्नाचें दुर्भिक्ष्य बहु होईल। रेशनिंगचा काल येईल। दुःखद अतितर

लोकांसी।।१०७।। म्हणोनि रथोत्सव करूनि रहित। ठरविला 'साधन-सप्ताह' त्वरित। कीर्तन प्रवचन-जपादि यांत। होय परमार्थ-साधन पैं।।१०८।। नाताळीच्या सुटीमाजीं। पुरुषांसीही सवड सहजीं। ठेविला रथोत्सवाच्या ऐवजीं। साधन-सप्ताह उत्तम हा।।१०९।। तेणेंकरोनि जनांचें प्रेम। वाढुनी होतील ते निष्काम। मग पावे निजसुखधाम। सहज़ासहजीं हो ज़ाणा।।११०।। म्हणोनि रथोत्सव रहित करोनि। साधन-सप्ताह आरंभिला झणीं। जनांच्या हितास्तव स्वामींनीं। किती कल्पना योग्य ही।१११।। म्हणोनि येथें संशय कोणीं। घेऊं नये आपुल्या मनीं। कीं रथोत्सव होता तो काढुनी। टाकीलें हें योग्य नव्हें।।११२।। जनांनी योग्य विचार सुचवितां। मान्य होतसे सद्गुरुनाथा। अयोग्य ज़री कुणीही सांगतां। न होय मान्य कदापि त्यां।।११३।। आमुचे स्वामी सद्गुरुनाथ। काय सांगूं त्यांचें चित्त। प्रेमळ असती अत्यंत। न वर्णवे आमुचेनि।।११४।। त्यांचें प्रेम अपार ज़ाण। मी-तूं ऐसा वेगळा भाव न। सर्व वस्तूंमाजीं परिपूर्ण। भरे प्रेम तें अखंडचि।।११५।। पिंड-ब्रह्मांड साऱ्या ठिकाणीं। भरलें प्रेम तें चहूंकडोनि। आणि त्यांची तनु-मन-वाणी। प्रेमाची असे त्यामाजीं।।११६।। म्हणोनि त्यांच्या मुखांतुनी। जी निघे ती अमृतवाणी। यांत अनुमान न धरावा कोणीं। असत्य नव्हे कदापिही।।११७।। आतां दावूं सिद्ध करोनि। कीं सद्गुरुस्वामींची अमृतवाणी। प्रेम भरलें त्यामाजीं म्हणोनि। सत्य वचन आमुचें हें।।११८।। ऐका तुम्ही सावधान। कीं स्वामी आनंदाश्रम दयाघन। पावले शुद्ध निजात्मज्ञान। हें कथिलें मागील अध्यायीं।।११९।। ज़े असती ब्रह्मज्ञानी। ते केवळ प्रेमाची खाणी। न होय ज्ञान प्रेमावांचुनी। कदापिही कवणातें।।१२०।। नाना वेद मुखोद्गत।

परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

शास्त्रें पुराणें सांगती बहुत। परि भक्तिप्रेमावीण निश्चित। न होय प्राप्त ब्रह्मज्ञान।।१२१।। प्रेम आपुल्या स्वरूपीं मिळतां। तेथें आनंद मिळे चित्ता। तोचि ब्रह्मानंद तत्त्वतां। एकरूप होत असे।।१२२।। सागरापासुनी उपज़े लवण। येईल त्यांतील खारटपण। तैसें उठे निजस्वरूपांतून। प्रेम हें ज़ाण निश्चयेंसीं।।१२३।। समुद्राच़ा खारट स्वभाव। लवणामाजीं येई अपूर्व। कीं लवण हें समुद्राच़ेंचि सर्व। त्यापरीच़ तेंही असे पहा।।१२४।। तैसें असे ब्रह्मस्वरूप ज़ें। त्यांतुनीच़ प्रेम हें उपज़े। प्रेमांत ज़ो आनंद असिजे। तो ब्रह्मस्वरूपाच़ाचि।।१२५।। ब्रह्मस्वरूपीं भरला ज़ो आनंद। तोचि प्रेमांत येई समृद्ध। म्हणोनि प्रेमेंचि ब्रह्मानंद। प्राप्त होय निश्चयेंसीं।।१२६।। प्रेमामाजीं नसे कल्पना। 'मी-तूं' पणाची नाहीं भावना। केवळ आनंद मात्र ज़ाणा। हें कळे प्रपंचींही सर्वासीं।।१२७।। पहा आपुलें प्रेमाच़ें माणूस। अवचित देखतां होय हरुष। कल्पना न उद्भवे क्षणभरी त्यास। आनंदापुढें कांहींच़।।१२८।। परि तें आम्हां न कळे कांहीं। भेटीनेंचि आनंद होई। ऐसें म्हणतों आपण सर्वही। परि ना तैसें होय कदा।। १२९।। तो आनंद निजस्वरूपाच़ा। नव्हे भेटीच्या विषयसुखाच़ा। स्वरूपप्रेमाच़ाचि साचा। अज्ञानें न कळे आम्हांसी।।१३०।। आनंद नाहीं विषयामाजीं। आपुल्यांतचि असे सहजीं। विषय बघतां कल्पना ना दुजी। आनंद उमटे त्या समयीं।।१३१।। कल्पनाविरामींच़ आनंद। होत असे वेदांतसिद्ध। परि हा ठाउका नाहीं बोध। अज्ञजनालागी पैं।।१३२।। ''आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति''। हें वर्म गर्जतसे हो श्रुति। पत्नीवरी पत्नीसाठीं न प्रीति। आपणासाठींच़ प्रिय ती असे।।१३३।। तेवींच़ पतीवरी पत्नी करी प्रीति। ती पतीसाठीं न होय जगतीं।

आपणासाठींच प्रिय वाटे पति। सारांश आपणा आपण प्रिय।।१३४।। हें ज़ें आत्म्यावरील प्रेम। तें निर्निमित्त असे निःसीम। तें कदापि न बिघडे विषयासम। हा सिद्धांत ज़ाणावा।।१३५।। ''प्रियही अप्रिय होय घडीघडी। परि कदापि न ये निज नावडी''। आतां जी वाटे विषयाची गोडी। दुसऱ्या घडी ती विटतसे।।१३६।। परि आत्म्याची गोडी 'अवीट'। 'शाश्वत' आणि 'सहज़' नीट। विषयामाजीं आनंद दिसे ज़ो प्रगट। तो आत्म्याचाचि ज़ाणावा।।१३७।। तेव्हां विषयांत आनंद नाहीं। हें सहज़चि सिद्ध होई। परि आम्हां अज्ञांसी पाहीं। वाटे विषयांतचि आनंद।।१३८।। श्वान मुखीं धरोनि अस्थि। चाखीतसे परम प्रीतीं। तेव्हां रुधिराच्या धारा निघती। दांतांतुनी तयाच्या।।१३९।। परि तें समज़े हें ज़ें हाड। त्यांतुनी रक्त निघे भडभड। ऐसें समज़ुनी करी धडपड। खावयालागीं हाडचि पैं।।१४०।। आपुलेंचि रक्त हें त्या न कळे। हाडांतचि मज़लागीं तें मिळे। ऐसें समज़ुनी श्वान ते वेळे। न सोडी तें हाड पहा।।१४१।। तैसे आम्ही अज्ञजन। आनंद आपुलाचि हें न ज़ाणोन। विषयांमाजीं बुडतों आपण। त्यांतचि सुख मानूनियां।।१४२।। विचारें बघतां आपुल्याचि ठायीं। आनंद भरला असे पाहीं। म्हणोनि प्रेमानें ज़ो आनंद होई। तो निजस्वरूपाचा निश्चयें।।१४३।। साखर आणि गोडी। कोण याची वेगळीक पाडी। एकचि असे निमिष ना सोडी। गोडी साखरेलागीं पैं।।१४४।। तैसें प्रेम आणि आनंद यांची। वेगळीक न होय अणुमात्र साची। दोन्ही असती एकरूपचि। परिपूर्ण ब्रह्म हो ज़ाणा।।१४५।। तैसा तो आनंद साऱ्या ब्रह्मांडीं। भरला परिपूर्ण काय वदूं घडीघडी। ज़ो भोगी त्याची गोडी। तो होय तांतडी तें रूप।।१४६।। असो एवं ऐसें तें प्रेम।

स्वामींच्या अंगीं भरलें निःसीम। तनुमनवाणी यांत अनुपम। भरलें तें प्रेम घनदाट।।१४७।। तैशा त्या प्रेमामाझारीं। आनंदचि भरला निर्धारीं। म्हणोनि ती आनंदमूर्ति साजिरी। नामापरीच़ शोभतसे।।१४८।। ऐशा त्या मुखें निघे ज़ें वचन। तें अमृतचि गोड म्हणोन। हेंचि वाक्य सिद्ध करायालागून। इतुका पाल्हाळ कथियेला।।१४९।। परि तुम्हीं श्रोतेजनांनीं। क्षमा करावी बालकालागुनी। वेडेवांकुडे शब्द गाउनी। शिणविलें बहुतचि सकलांसी।।१५०।। परि सद्गुरुमातेच़े सद्गुण। त्यांत गोडी बहुतचि ज़ाण। म्हणोनि सकलांसी आनंद पूर्ण। होईल निश्चयें विश्वास हा।।१५१।। असो ऐशा अमृतवाणीतें। दवडूं नये आम्हीं परिसा तें। त्यांच़ें वचनचि मुख्य आम्हांतें। त्याहुनि श्रेष्ठ ना अन्य।।१५२।। गुरुवचनाहुनि श्रेष्ठ। अन्य नसे हें धरावें घट्ट। प्राण गेला तरी हा हट्ट। सोडूं नये कदाकाळीं।।१५३।। कवणही असो आपुलें कार्य। गुरुवाक्येंचि सिद्ध होय। प्रपंचीं परमार्थीं उपाय। आज्ञापालन हाचि असे।।१५४।। गुरुभक्ति हीचि एक। भक्तजनांसी मोक्षदायक। त्याहुनी कवणही साधन आणिक। नलगे अन्य गुरुभक्तां।।१५५।। ज़री ना केली आज्ञा पालन। काय उपयोग भक्ती करोन। येणेंकरोनि गुरूच़ा अपमान। करितों आम्हीं हें सिद्ध।।१५६।। सद्गुरूच़ा होतां अपमान। परमेश्वरासी न होय सहन। सहज़ लाभे नरक गहन। श्रुति-स्मृति हें सांगतसे।।१५७।। म्हणोनि स्वामी ज़ें सांगती वचन। त्यावरी न बोलावें आपण। त्यांची आज्ञा करावी पालन। त्यांतचि कल्याण आमुच़ें हो।।१५८।। आतां आणिक सद्गुण पाहीं। पुढील अध्यायीं बोलूं काहीं। सादर असावें आपण सर्वही। तुम्ही श्रोते सज्जन हो।।१५९।।

श्रीसद्गुरु आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ एकरूप ब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें एकपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१६०।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां गुरुभक्ति होय दृढतर। एकपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१६१।। अध्याय।।५१।। ओंव्या।।१६१।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा श्रीगुरुराया। तुझी लीला अगाध सदया। मज़सारिख्या अभक्ताकडूनियां। वदविलें चरित्र तूं पाहीं।।१।। अणुमात्र कां होईना वर्णन। वदविले सर्व आश्रमांचें सद्गुण। नसतां माझिया अंगीं ज्ञान। पार घातलें तूंचि बा।।२।। ऐसी तूं आमुची माउली। अज्ञ जनांसी आम्हां पावली। तुझी कृपारूप सावुली। पडे वरिवरी शीतल ती।।३।। ज़ैसें पार घातलें येथवरी। तैसाच ग्रंथ तूं पूर्ण करीं। अज़ुनी भय वाटे अंतरीं। कैसें पार पडेल हें।।४।। सकल कार्यां तूंचि एक। विघ्नहर्ता गणनायक। तुज़वांचोनि नाहीं आणिक। अन्य देवता दयाळा।।५।। असो आतां श्रोते हो सज्जन। आणिक ऐका स्वामींचे सद्गुण। अणुमात्रचि करूं वर्णन। गुरुकृपेंचि पहा हो।।६।। परम शांत हृदय त्यांचें। म्हणोनि शब्दही तैशिया मुखींचे। तेही शांतचि असती साचे। ऐकतां शांत मन होय।।७।। यावरी एक कथा सुंदर। सांगूं आता सविस्तर। चित्त करावें एकाग्र। उत्सुक होउनी ये समयीं।।८।। पहा आमुचे सद्गुरुनाथ। स्वामी आनंदाश्रम विख्यात। सुंदर प्रवचनें देती शांत। सकलांचें चित्त आकर्षिती।।९।। ऐसें असतां एकेकाळीं। शके अठराशें साठ यें वेळीं। बेंगळूर-ग्रामीं सद्गुरुमाउली। गेली होती प्रेमळ ती।।१०।। तेथील जनांनीं करितां आग्रह। संतुष्ट कराया भक्तसमूह। गेले प्रेमानें न धरितां संदेह। निजभक्त-प्रेम पाहुनियां।।११।। जेथें बोलाविती आपुले भक्त। तेथें अवश्य ज़ाती निश्चित। देह झिज़विती भक्तांस्तव अमित। नाहीं स्वार्थ त्यामाजीं।।१२।। प्रवचन देती अति उत्तम। ऐकतां जनांचें वाढे प्रेम। कां कीं वृत्ति त्यांची निष्काम। स्वार्थ अणुभरी

ना तेथें।।१३।। केवळ जनांचें व्हावें कल्याण। इतुकीच इच्छा धरोनि आपण। देह झिजविती रात्रंदिन। नाहीं संशय यामाजीं।।१४।। असो मग बेंगळूर या शहरीं। प्रवचनें झालीं ते अवसरीं। बहुत जन नर-नारी। येती ऐकाया धांवूनियां।।१५।। अहा काय सांगूं तें प्रवचन। ऐकतां जनांचें आनंदलें मन। प्रेमाश्रु वाहती नयनांतून। काय वर्णूं तें दृश्य।।१६।। तेव्हां तेथें त्या गांवांत। दोघे बंधु होते निश्चित। उपनाम त्यांचें असे 'तोंबत'। रामरावसुत ते पाहीं।।१७।। दोघेही मोठे अधिकारी असती। मठाचें नामही कधीं न घेती। स्वामींस पहावया येती। सहज एका मित्रासवें।।१८।। तये समयीं प्रवचनलाभ। ज़ाहला भाग्यें त्यांसी सुलभ। ऐकतांचि फुटला कोंब। गुरुप्रेमाचा तत्काळ।।१९।। मागील अध्यायीं बोलिलें वचन। कीं अमृतवाणी स्वामींची म्हणोन। त्यापरी मुखींचें बोल ऐकून। प्रेम उपज़लें त्यांसी हो।।२०।। असो मग त्या बंधुद्वयासी। बहुत अनुताप ज़ाहला मानसीं। ज़ातां दोघेही आपल्या गृहासी। बोलती एकमेकांप्रति तेव्हां।।२१।। म्हणती काय प्रेमळ मूर्ति। बहुत छान प्रवचन सांगती। आज़वरी नाहीं कळलें चित्तीं। इतुके शांत हे म्हणूनियां।।२२।। सहा वरुषांपासुनी आज़वरी। मठासी वर्गणी दिधली ना खरी। अर्पण करूं आतां तरी। ऐसा विचार चालविला।।२३।। मग ते दोघे गेले निज़ाया। उठोनियां आपुल्या ठाया। परि मनासी चैन न त्यांचिया। अपराध केला म्हणोनि।।२४।। ऐसे ते बंधुद्वय तेव्हां। निज़ल्या ठायीं करिती धांवा। म्हणती प्रभो श्रीगुरुदेवा। अपराधी आम्ही बहुतचि।।२५।। आज़वरी न कळली महिमा। म्हणोनि विसरलों तुझिया नामा। आतां करावी आम्हांसी क्षमा। श्रीगुरुनाथा कृपाघना।।२६।।

तूं साक्षात् वैकुंठवासी। भक्तांकारणें अवतरलासी। परि आम्हां अज्ञ जनांसी। वाटे मनुष्यचि तूं एक।।२७।। स्वामी म्हणजे कवणाचिया एका। मुलासी आणुनी बसविती देखा। ऐसीच़ कल्पना आमुचि ऐका। होती देवा आज़वरी।।२८।। आम्हां आणि तयांसी काय भेद। उगीच़ म्हणती श्रेष्ठ प्रसिद्ध। ऐसें वाटुनी देवा तव पद। नाहीं आठविलें अणुमात्र।।२९।। परि तूं आम्हांसि ना विसरला। म्हणुनी भेटलासी आम्हांला। प्रवचन सांगुनी ओढिलें बाळां। व्यर्थचि मरती म्हणोनियां।।३०।। बालक विसरतां निजमातेला। दावुनी त्यासी नाना खेळा। वळवी त्याचिया चित्ताला। आपुल्याकडे ती माय।।३१।। ऐसें करोनि करी रक्षण। निजबाळाच़ें माय ती ज़ाण। तैसा तूं सद्गुरु दयाघन। सांभाळिसी अज्ञातें।।३२।। प्रवचनरूपें लीला दावुनी। आमुच़ें मन घेतलें आकर्षुनी। उपकार तुझे कैसेनी। विसरावे सांगें गुरुराया।।३३।। निजपुत्राच़े अपराध पोटीं। घालुनी माय रक्षी संकटीं। तैसी तूं आम्हां मूर्ति गोमटी। धांवलीस रक्षाया निर्धारें।।३४।। स्वधर्माची सोडुनी सुलभ वाट। धरिली अधर्माची ती बिकट। तेंचि ओढवलें परम संकट। परि तूं धांवलासी तत्काळ।।३५।। ऐसी तूं आमुची सद्गुरुमाई। तव उपकारां सीमा नाहीं। कैसे होऊं तुझे उतराई। श्रीगुरुराया करुणाळा।।३६।। ऐसी करुणा भाकिली अपार। अश्रु नयनीं आले फार। चिंतीत असतां निद्रा अनिवार। लागली त्या दोघांसी।।३७।। दुसऱ्या दिवशीं उठतांक्षणीं। बंधुद्वय तोंबत हे झ्रणीं। सहा वरुषांची द्यावया वर्गणी। लागले तयारीस तेधवां।।३८।। मग होतां प्रवचन-समय। ज़ावया निघाले बंधुद्वय। घेउनी बाराशें रुपये। स्वामीसंनिधीं आले ते।।३९।। येऊनियां ऐसे प्रेमें तेथ। विनविती आपुल्या मित्राप्रत। गुरुदत्ता

तुज़वरी सोंपवीत। आमुचें कार्य करावें तूं।।४०।। तेव्हां गुरुदत्तराव बोले। अवश्य करूं सांगा ये वेळे। ऐसें बोलतां ते लडिवाळें। लागती कानीं त्याच्या पैं।।४१।। देउनी हातीं धनाची थैली। म्हणती ही अर्पा गुरुपदकमळीं। आणि विनंति आमुची त्या स्थळीं। सांगा सकल जनांसमक्ष।।४२।। ऐसें ऐकतां न लागतां क्षण। गुरुदत्तराव श्रीसंनिधीं ज़ावोन। बंधुद्वयांनीं सांगितलें ज़ें वचन। तेंचि बोले सभेमाजीं।।४३।। म्हणे स्वामिन् सद्गुरुराय। हे तोंबत बंधुद्वय। तोंबत रामराव यांचे तनय। करिती विनंती पदकमळीं।।४४।। धैर्य न त्यांसी बोलावया। म्हणोनि सांगविती मज़कडुनियां। तेंचि बोलतों आतां सदया। त्यांची विनंति संनिधीशीं।।४५।। म्हणती सद्गुरुस्वामी। इतुके काळपर्यंत आम्हीं। मठासी ज़ें करावें नेहमीं। तें कर्तव्यकर्म ना केलें।।४६।। आमुचें ऐसें बघोनि वर्तन। अन्यांसीही वर्ताया कारण। आम्ही झालों निश्चयें ज़ाण। याहुनी अपराध ना थोर।।४७।। ऐसा अपराध बोलावा उघड। सभेमाजीं सोडुनी भीड। ऐसी इच्छा असे दृढ। काय कारण तें सांगूं।।४८।। आमुच्यापरीच़ अन्य जन। विसरले ज़री गुरुपदा ज़ाण। तयांसीही पश्चात्ताप होऊन। शरण ज़ावोत श्रीचरणां।।४९।। आणि तनुमनधनादिक। अर्पावयासी निश्चयात्मक। प्रवृत्त होवोत सकळिक। ऐसी इच्छा आमुची हो।।५०।। दयाळा आमुच्या सद्गुरुराया। अपराध झाला आमुचा म्हणोनियां। पश्चात्ताप होय आमुच्या हृदया। अतितर देवा हो पाहीं।।५१।। तरी आतां सद्गुरुनाथा। सहा वरुषांची वर्गणी ताता। धन आपुल्या चरणीं आतां। अर्पितों ज़ाणा करुणाळा।।५२।। हे प्रभो सद्गुरुराया। आमुचा अपराध क्षमा करोनियां। कृपा करावी

बालकावरी या। अल्प सेवा स्वीकारावी।।५३।। आणि आम्हां अज्ञ बालकां। द्यावा आशीर्वाद देखा। रक्षण करावें म्हणोनि पादुकां। करितों प्रार्थना गुरुवर्या।।५४।। ऐशी प्रार्थना सद्गुरुसंनिधीं। निवेदिली गुरुदत्तरावानें आधीं। मग धनाची थैली गुरुपदीं। अर्पिली तोंबत बंधूंची।।५५।। तेव्हां ऐकुनी त्यांची प्रार्थना। स्मितमुखें बोलती सद्गुरु ज़ाणा। कृपादृष्टीनें बघुनी त्यांना। म्हणती तोंबत-बंधूंसी।।५६।। तुम्हीं अपराध केला म्हणोनि। विदितचि नाहीं आम्हांलागुनी। तुमचे वडील विश्वास ठेवूनि। होते मठावरी ऐकियलें।।५७।। असो आतां तुम्हीं तुमचें। कर्तव्यकर्म समज़ुनी साचें। स्वधर्में वर्तावें ऐसें वडिलांचें। मनें घेतलें पूर्वपुण्यें।।५८।। ओढिलें मनासी न लागतां क्षण। हें बघोनि आम्हां निश्चयेंकरोन। मनीं संतोष ज़ाहला पूर्ण। बंधुद्वयांनो पहा हो।।५९।। भवानीशंकर आतां तुमचें। कल्याण करील ज़ाणा साचें। ऐसा आशीर्वाद दिधला वाचे। परम प्रीतीनें त्या समयीं।।६०।। असो ऐसे हे बंधुद्वय। अद्यापिही सद्गुरुपाय। ध्याती सदा धरुनी निश्चय। धन्य जिणें त्यांचें पैं।।६१।। त्या बंधूंमाजीं एक। केशवराव नामें प्रमुख। त्यासी ओळखती सकळिक। बहुतकरोनि देशांत।।६२।। सद्गुरुस्वामी यांच्या संगें। येउनी कधीं कधीं व्याख्यान सांगे। स्थिरता-फंड व्हावा वेगें। ऐसा हेतु धरोनियां।।६३।। पहा कैसी स्वामींची शांति। प्रगटली येउनी यांच्या चित्तीं। तेवींच धरिली सद्गुरुमूर्ति। बंधुद्वयांनी हृदयीं हो।।६४।। असो एवं सद्गुरुनाथ। यांचें मन बहुत शांत। म्हणोनि त्यांचें प्रवचनही सतत। शांतचि होय निर्धारें।।६५।। तैशा त्या शांततेचे गुण। जनांनीं ऐकतां प्रवचन। येती त्यांच्या मानसीं धांवून। तत्काळ ज़ाणा प्रेमभरें।।६६।। जेव्हां शांतता

येई अंगीं। तेव्हां परमार्थीं मन ज़ाय वेगीं। मग कासया जन परमार्थहीन जगीं। ऐसा प्रश्न उद्धवेल।।६७।। तरी त्यांचें ऐका उत्तर। सत्त्वगुणासह शांतता थोर। करील ज्याच्या अंगी संचार। तोचि वळेल परमार्थीं।।६८।। जगीं कित्येक असती नर। प्रपंचीं शांत दिसती फार। परि त्यांत मिश्र असे रजोगुण चोर। न दिसे अन्यालागीं तो।।६९।। यापरी कथिलें मागील अध्यायीं। आणिक सांगावें नलगे कांहीं। एवं शुद्ध-सात्त्विक शांतता पाहीं। तीचि नेई परमार्थीं।।७०।। श्रीसद्गुरूंचें ऐकतां प्रवचन। सात्त्विक शांतता ये धांवोन। यावरी आणिक कराल प्रश्न। तुम्ही श्रोते जन सारे।।७१।। कीं सद्गुरुस्वामींचें प्रवचन। ऐकती जगीं अनेक जन। सकलांचेंही पूर्ण मन। कां न लागे परमार्थीं।।७२।। तरी परिसा त्याचें उत्तर। दृष्टांतासहित देऊं सत्वर। सकलही आपुलें चित्त एकाग्र। करोनि सावध बैसावें।।७३।। जेथें असे ओली भिंत। त्यावरी दगड मारितां बैसत। तीच कोरडी असतां तेथ। न बैसे दगड निश्चयेंसीं।।७४।। तैसें ज्याचें मन कोमळ। त्यासी प्रवचनाचें मिळे फळ। लागे मनासी तळमळ। परमार्थ केव्हां पावेन मी।।७५।। तेव्हां सहज़चि होय अनुताप। अनुतापें ज़ाय सकल पाप। मग सत्त्वगुण आपोआप। येत अंगीं तत्काळ।।७६।। ज्याचें हृदय असे कठिण। तेणें ऐकिलें ज़री प्रवचन। तरी न ज़ाय परमार्थीं मन। कधींकाळीं निश्चयें हो।।७७।। एवं सद्गुरुस्वामीराय। सात्त्विक शांत म्हणोनि हृदय। प्रवचनही तैसेंच होय। शांतरूपचि सहज़ेंसीं।।७८।। ती शांतता जनांच्या हृदयीं। कर्णद्वारें ज़ाय सर्वही। कैसी ती जनांच्या अंतरीं येई। तेंचि सांगूं गुरुकृपें।।७९।। उदकावरोनि येतां वारा। त्यांतील शीतलता घेऊनि ये त्वरा। तेणें उष्मा ज़ाऊनि सारा। सुख होय जनांसी।।८०।। ज़री आला

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

वारा शीतल। तरी कपाटें बंद करोनि सकळ। बैसतां न थांबे त्याची तळमळ। उकाड्यापासूनि कदापिही।।८१।। तैसें येथें सद्गुरु प्रसिद्ध। त्यांच्या मुखें निघती ज़े शब्द। ते शांतता घेऊनि शुद्ध। येऊनि पसरती च़ोहींकडे।।८२।। परि ज्याच़ें असे हृदय उघड। पापरूप मोडलें कवाड। तेथेंच़ ज़ाय धांवूनि दुडदुड। शांतता स्वामींची निश्चयेंसीं।।८३।। तेव्हां त्याच़ें मनही शांत। होऊनि घुसे परमार्थांत। त्यावीण न ज़ाय आपुलें चित्त। परमार्थीं तें कदापिही।।८४।। याचिकारणें ऐकावीं प्रवचनें। तेवींच़ सांगती ज़ें स्वामी प्रेमानें। जनांच़ें कल्याण व्हावें या योगानें। त्यावीण अन्य हेतु नसे।।८५।। एवं सद्गुरुस्वामीराय। जगाच़ें कल्याण करिती सदय। अन्य हेतु नाहीं हा निश्चय। इतुके कष्ट सोसावया।।८६।। साक्षात् वैकुंठवासी राम। अवतरे भक्तांच़े पुरवाया काम। आणि दूर कराया भवभ्रम। अज्ञ जनांच़ा हो ज़ाणा।।८७।। ज़ो भज़े कामना धरुनी। त्याची कामना पुरविती झ़णीं। यावरी कथा असती बहुत जनीं। नाहीं कथिल्या त्या येथें।।८८।। सकल कथाया गेलों ज़री। तरी ग्रंथ वाढेल भारी। एवं साक्षात् वैकुंठवासी श्रीहरी। नाहीं संशय यामाजीं।।८९।। तेवींच़ ज़ाणती आमुच़ें हृदय। याच़ा अनुभवेंचि होय निश्चय। तें सांगूं आतां कैसें काय। परिसा सावध चित्तानें।।९०।। एके काळीं सद्गुरुस्वामी। आले आमुच्या धारवाडग्रामीं। प्रवचन दिधले तेव्हां तें मी। ऐकाया गेलों ते समयी।।९१।। जेव्हां येऊनि बैसले सभेंत। श्रीस्वामी सद्गुरुनाथ। कांहीं वेळ राहिले स्वस्थ। शांत चित्तें तेधवां।।९२।। तेव्हां एक कल्पना मज़ला। आली काय ती सांगूं ये वेळां। सद्गुरुमूर्ति पाहुनी डोळां। वाटला आनंद मम हृदयीं।।९३।। आणि वाटलें यांच़ें प्रवचन। दोन-तीन वेळां ऐकिलें ज़ाण। परि नाहीं केला

श्रवण। वेदान्तविषय यांच्या मुखें।।९४।। हे कां न सांगती वेदान्तविषय। यांस सांगतां न ये कीं काय। अथवा वेदान्त न ज़ाणती सर्व समुदाय। म्हणोनि न सांगती कीं न कळे।।९५।। स्वधर्माविषयीं देती सुंदर। सूक्ष्म विचारें प्रवचनें थोर। परि वेदान्ताचे शब्द चार। ऐकावे प्रेमळ स्वामींचें।।९६।। ऐसी कल्पना हृदयीं माझ्या। येतांक्षणीं श्रीगुरुराजा। तत्परचि असे सकलही काज़ा। न्यूनता अणुमात्र नाहीं तेथें।।९७।। जेव्हां आरंभिलें प्रवचन द्याया। वेदान्तविषयचि बोलिले त्या समया। ऐकतां आनंद ज़ाहला माझिया। चित्तासि अनिवार हो ज़ाणा।।९८।। पहा माझी कल्पना कैसी। कळूनि आली श्रीगुरुरायांसी। अंतर्ज्ञान असे तयांसी। साक्षात् अवतार विष्णूचा तो।।९९।। आणिक त्यांची महिमा विशेष। माझ्या अनुभवाची खास। सांगतो आतां मी तुम्हांस। प्रेमळचित्तें परिसा हो।।१००।। हा असे आश्रम नवम। श्रीसद्गुरु-आनंदाश्रम। यांचें चरित्र लिहितां उत्तम। दाविली महिमा ती ऐका।।१०१।। एके दिनीं लिहितां ग्रंथ। विचार अणुमात्र न सुचे त्वरित। तेव्हां मनासी लागलें अत्यंत। कांहीं अपराध झाला कीं ।।१०२।। तैं केली प्रार्थना स्वामींसी। तीचि येथें लिहिली ते दिवशीं। तेंचि पुनरपि बोलूं परियेसीं। सद्गुरुमहिमा पावन ती।।१०३।। तुझ्या कृपेवीण सर्वथा। न उठे स्फूर्ति लिहाया ग्रंथा। म्हणोनि देवा येईं आतां। धांवोनि वेगें मम हृदयीं।।१०४।। ऐसें लिहितांक्षणीं एक। चमत्कार झाला निश्चयात्मक। घमघम सुवास आला सुरेख। काय सांगूं नवलाई।।१०५।। नसती सदनीं सुवासिक फुलें। अथवा पूजादि नाहीं ते वेळे। परिमळ द्रव्य नाहीं ठेविलें। नाहीं लाविल्या उदबत्त्या।।१०६।। आळीमाजीं कवण्याही ठायीं। सुवासिक पदार्थ अणुमात्र नाहीं। तेव्हां सद्गुरुमहिमाच ही पाहीं।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

नाहीं संशय यामाजीं।।१०७।। कीं देवा धांवुनी ये आतां। ऐसें म्हणतांचि आली गुरुमाता। सत्यचि हें दावाया तत्त्वतां। सुवास हीच़ खूण पहा।।१०८।। ऐसी बहुपरी अनेक वेळां। महिमा दाविली या निज डोळां। सर्वही विस्तार सांगाया मज़ला। नाहीं शक्ति ये समयीं।।१०९।। असो ऐसी सद्गुरुमाउली। आठवावी पावलोपावलीं। तरीच़ स्वरूपीं वृत्ति आपुली। स्थिर होईल क्षणमात्रें।।११०।। परमहंस-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ एकरूप ब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें द्विपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१११।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। द्विपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।११२।। अध्याय।।५२।। ओंव्या।।११२।।ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति द्विपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ जय जया जी सद्गुरुराया। तूं सर्व जगासी अधिष्ठान सदया। मग मज़ला कैसा सोडुनियां। राहसी सांग दयाळुवा।।१।। ऐसा तूं माझा सद्गुरु असतां। मीं कासया वृथा करावी चिंता। सकलही कर्ता करविता। तूंचि अससी निर्धारें।।२।। उगीच़ अहंता घेऊनि माथां। काल दवडिला अज्ञानें ताता। परि तूं बा धरोनि हाता। आणिलें मार्गीं अज्ञजनां।।३।। आणि दाविलें आपुलें स्वरूप। ज़ें जगीं भरलें अमूप। परि आड आलें पाप। तेणेंच़ न दिसे आम्हांसी।।४।। म्हणोनि लागतों शोधावयासी। जिकडे तिकडे धावतों दिन-निशीं। नाना व्रतें तीर्थयात्रेसी। प्रवर्तलों तरीही न मिळेचि।।५।। तेणें वाढला अभिमान थोर। म्यां तीर्थव्रतें केलीं अपार। न होय कदापि चित्त स्थिर। तव भक्तीवीण बा देवा।।६।। तुझ्या भक्तीवीण सर्वथा। अंतर्मुख वृत्ति न होय ताता। मग कैंच़ें समाधान चित्ता। होईल सांगा देवा हो।।७।। निजस्वरूपाच़ें न होतां दर्शन। मग कैंच़ें मनासी समाधान। एवं तव भक्ति केलियावीण। आत्मज्ञान न होय।।८।। तुझी भक्ति करितां ज़ाण। जगीं तूंचि दिससी संपूर्ण। सर्व जगाच़ें अधिष्ठान। इतुकें कळे निर्धारें।।९।। अधिष्ठानरूप तूंचि ताता। सकल कार्यासी तुझीच़ सत्ता। तेवींच़ जग हें नांदे तत्त्वतां। तुझिया सत्तें दयाघना।।१०।। यावरी येईल श्रोतयां प्रश्न। सद्गुरूचि सर्वां अधिष्ठान। त्याची सत्ता सकलां कारण। हें कैसें ओळखावें।।११।। तरी ऐका त्याच़ें उत्तर। सांगूं त्याच़ा अणुमात्र विचार। सद्गुरुकृपेंचि साचार। सावध असावें श्रोत्यांनीं।।१२।। सद्गुरु म्हणिजे केवल स्वरूपचि। ऐसी मागील अध्यायीं साची। महिमा वर्णिली त्यांची।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

सद्गुरुकृपेंचि पहा हो।।१३।। तरी आणिक बोलूं किंचित। सद्गुरूचि आधार आम्हांप्रत। ते असती परब्रह्म साक्षात। नाहीं संशय यामाजीं।।१४।। जेणें ज़ाणिलें निजस्वरूपासी। तो परब्रह्मचि होय परियेसीं। त्यावरीच़ जग हे निश्चयेंसीं। भासे ज़ाणा तुम्ही हो।।१५।। ज़ें असे जगाच़ें अस्तित्व। तेंचि अधिष्ठानस्वरूप नांव। नामरूपाविरहित सदैव। असे ज़ें तेंचि निजस्वरूप।।१६।। रज्जूवरी दिसे ज़ो सर्प। असत्य त्याच़ें नाम-रूप। परि अस्तित्वाच़ा न होय लोप। ज्ञान होतां निश्चयेंसीं।।१७।। पहा कैसें तें सांगूं आतां। रज्जूवरी सर्प भासतां। भयकंप होय चित्ता। मंदांधकारें करोनियां।।१८।। जेव्हां नेला दीप हस्तीं। ज़ाय सारी त्याची भीती। परि रज्जु तेथें आहे निश्चितीं। न होय लोप अस्तित्वाच़ा।।१९।। दीपें होतां रज्जुज्ञान। सर्पभ्रांति होय निरसन। परि रज्जूच़ें अस्तित्व-अधिष्ठान। नच ज़ाय सर्वथा।।२०।। तैसें येथें जग हें सारें। परब्रह्मावरी भासे निर्धारें। ज्ञानदिवा हातीं येतां त्वरें। मिथ्या होय नाम-रूप।।२१।। नाम-रूप त्यागितां सर्व। उरे केवळ मीचि देव। नच ज़ाय माझ़ें अस्तित्व। कधीं काळीं अणुमात्र।।२२।। जग हें मिथ्या म्हणोनि त्यागितां। उरे केवळ ब्रह्मचि तत्त्वतां। एवं अस्तित्व राहिलें नच ज़ाय सर्वथा। अधिष्ठान ब्रह्म याच़ें पैं।।२३।। सुवर्णामाजीं अलंकार । नाम-रूप आलें साचार। त्याच़ा त्याग केलियावर। उरे सुवर्ण एकचि पैं।।२४।। तैसें येथें केवल परब्रह्म। त्यांत जग हें रूप-नाम। तें त्यागितां उरे परम। ब्रह्मस्वरूप हेंचि पैं।।२५।। अलंकाराच़ा करितां त्याग। सुवर्ण आहे म्हणतों मग। तैसें त्यागितां नामरूप जग। उरे अस्तित्व एकचि।।२६।। अस्ति भाति प्रियरूप आत्मा। जगामाजीं दिसे आम्हां। पाहिलें ज़री रूपनामा। अस्ति भाति प्रियचि असे।।२७।। एवं सत्-चित्-आनंद।

हेंचि जगीं विलसे प्रसिद्ध। अज्ञानें आम्ही मतिमंद। म्हणतों 'जग हें सत्य असे'।।२८।। सच्चिदानंद ब्रह्म पूर्ण। जगीं असे ओतप्रोत भरून। त्याहुनी नसे पदार्थ अन्य। तेंचि आश्रय सकलांसी।।२९।। ऐसें तें स्वरूप श्रीसद्गुरूंचे। आश्रयस्थान सकलांचें। त्यावरीच जग हें साचें। कार्य होय निर्धारें।।३०।। सर्पासी रज्जु अधिष्ठान। तेवींच दिसे सर्प तो पूर्ण। त्यासी कवणें केलें नाहीं उत्पन्न। कल्पिला अज्ञानें आपणचि।।३१।। रज्जु नसतां सर्प ही कल्पना। कैसी उद्भवे उगीच आपणा। एवं सर्पकार्यासी रज्जूच ज़ाणा। कारण होय निश्चयेंसीं।।३२।। तैसें ब्रह्मचि जगासी कारण। जग हें कार्य दिसे ज़ाण। एवं सर्व कार्यासी मूळ कारण। ब्रह्मचि असे निर्धारें।।३३।। ऐसा तो परब्रह्म सद्गुरुनाथ। जगाचा सूत्रधार तोचि विख्यात। त्याच्या सत्तेवीण नाहीं होत। कवणही कार्य हो पाहीं।।३४।। ऐसा आमुचा सद्गुरुनाथ। अस्ति-भाति-प्रियरूप सत्य। नामरूप जग हें ज़ें दिसत। त्यांतचि भरला घनदाट।।३५।। म्हणोनि आमुची श्रीगुरुमाय। सकलांसी अधिष्ठान होय। तिज़सी भजतां अन्य उपाय। न लागे ब्रह्मज्ञानासी।।३६।। तैशा त्या गुरुवरा भज़ाया मन। उत्सुक व्हावयालागोन। काय उपाय योज़ावा आपण। तरी ऐकावें चरित्र पहा।।३७।। चरित्राचें करितां श्रवण पठण। चित्त शुद्ध होय ज़ाण। मग गुरुभक्तीसी अंतःकरण। प्रवृत्त होईल सहज़चि।।३८।। आतां परिसा सावधान। आनंदाश्रम दयाघन। यांचें आणिक महिमान। अणुमात्र बोलूं श्रोते हो।।३९।। भूत-भविष्य-वर्तमान। विदित असे त्यांलागून। न धरावा यांत अनुमान। सत्यचि ज़ाणा निर्धारें।।४०।। एके काळीं स्वामीराय। 'सातारा' नामक ग्रामीं

सदय। कांहीं दिन एकांतीं सुखमय। राहिले निवांत स्थळीं हो।।४१।। ऐसें असतां एके दिनीं। विठ्ठल सुब्राव भटजी यांनीं। गुंडिल नारायण यांलागुनी। लिहिलें पत्र ते समयीं।।४२।। कांहीं काज़ होतें म्हणोनि। पत्र लिहिलें तें गुंडिलांलागुनी। वाचिलें श्रीसंनिधीं ज़ावोनि। सुब्राव भटजी यांनीं पैं।।४३।। तें ऐकुनी स्वामीराज। स्मितमुखें बोलिले सहज़। म्हणती सुब्राया काय तूं आज़। लिहिलें ऐसें सांगें बा।।४४।। कीं गुंडिल यासी तूं लिहिलें। 'रावसाहेब' ऐसें म्हटलें। परि तो होईल ये वेळे। 'दिवाणबहादुर' बा पाहें।।४५।। म्हणोनि दिवाणबहादुर। ऐसें लिहावें साचार। हें वाक्य सत्य झालें सत्वर। ऐका चमत्कार श्रोते हो।।४६।। श्रीस्वामी सद्गुरु यांचें। वचन कदापि व्यर्थ न वचे। सत्यचि झालें वाक्य मुखींचें। परिसा प्रेमळ चित्तानें।।४७।। दुसऱ्या दिनींच आला हुकूम। गुंडिल नारायणांसी उत्तम। 'दिवाणबहादुर' पदवी नाम। पहा कैसी गुरुमहिमा।।४८।। आधींच कळलें स्वामींप्रती। म्हणोनि बोलिले ते निश्चितीं। अंतर्ज्ञानी ते असती। नाहीं संशय यामाजीं।।४९।। आतां म्हणाल तुम्ही आणिक। आम्हीही ज़ाऊं सकळिक। पुसूं भविष्य स्वामींसन्मुख। बघूं काय सांगती तें।।५०।। तरी तैसे खरे सत्पुरुष। कधींही ना सांगती भविष्य। त्यांची इच्छा न कळे कवणास। कैंच्या वेळीं काय असे।।५१।। ते न दाविती जनांसी अद्भुत। हें मागें कथिलें असे निश्चित। सहज़चि केव्हां तरी निघत। ओघासरशीं मुखांतुनी।।५२।। आम्हीं पुसतां सांगती ऐसा। नेम नाहीं त्यांचा सहसा। त्यांची इच्छा इतुकीच परियेसा। यावरी अन्य शब्दचि ना।।५३।। भविष्य सांगाया नव्हे अवतार। केवळ कराया जगदोद्धार। त्यामुळें न सांगती गुरुवर। भूतभविष्य कदापिही।।५४।।

असो यापरी अनेक घडती। नाना परि विचित्र संगती। सर्वही कथाया आमुची मती। नाहीं तीव्र हो पाहीं।।५५।। परि गुरुकृपें अणुमात्र कथिलें। आणिक एक कथा ये वेळे। संक्षिप्त सांगूं चित्त आपुलें। सावध ठेवुनी परिसा हो।।५६।। मुल्की-ग्रामीं एक शूद्र। नारायण नामें असे नर। तो होता सरकारी नोकर। प्रपंच करीत आनंदें।।५७।। ऐसें असतां एके काळीं। नारायणाची दैवगती फिरली। कामामाजीं चूक निवडिली। वरील हुद्देदारानें।।५८।। अन्याय नसतां त्याचा कांहीं। केला खटला त्यावरी पाहीं। काढिला कामावरुनी लवलाहीं। नारायणासी तेधवां।।५९।। तेव्हां तो झाला भयभीत भारी। काय करूं ऐशिया विचारीं। निमग्न असतां ग्रामांतरीं। होते भटजी सारस्वत।।६०।। त्यांसी याचा परिचय थोर। कळला वृत्तांत भटजींसी समग्र। तेव्हां बोले शूद्रासी तो नर। भिऊं नको तूं नारायणा।।६१।। म्हणे आनंदाश्रमस्वामी। आले आमुचे विठ्ठलग्रामीं। तेथें जाऊं आतां आम्ही। प्रार्थूं त्यांसी भक्तीनें।।६२।। ऐकतां आनंद जाहला चित्तीं। नारायण शूद्रासी निश्चितीं। तत्काळ उठला जावयाप्रती। विठ्ठल-ग्रामीं हो पाहीं।।६३।। मग ते दोघे गेले ग्रामासी। भेटले त्वरित श्रीस्वामींसीं। प्रार्थना केली बहुवसी। आणि करविली पाद्यपूजा।।६४।। घेउनी तीर्थ प्रसाद प्रेमानें। गेला आपुल्या ग्रामीं त्वरेनें। मनीं धरिली मूर्ति तयानें। श्रीस्वामींची ते समयीं।।६५।। आळवूं लागला आपुल्या मनीं। म्हणे प्रभो तूं प्रेमाची खाणी। रक्षीं देवा मज़लागोनी। भक्तवत्सला करुणाळा।।६६।। तुज़वांचोनि नसे बा कवण। कराया दीनजनांचें रक्षण। ये ये आतां बा धांवोन। बालकाज़वळी तूं माते।।६७।। यापरी आळविली श्रीगुरुमाय। आणि धरिले हृदयीं पाय। केला

सरकारीं योग्य उपाय। यश आलें त्यामाजीं।।६८।। जेणें ठरविला गुन्हेगार। तोचि ठरला अपराधी थोर। न होय अपराधी अणुमात्र। नारायण हा निश्चयेंसीं ।।६९।। पहा कैसी सद्गुरुमहिमा। काय सांगूं आतां तुम्हां। न कळे अज्ञांसी आम्हां। म्हणतो लटिकेंचि हें सारें।।७०।। लटिकें न होय कदापि ज़ाण। यांत न धरावा अनुमान। दृढभावें धरितां चरण। महिमा कळेल सहज़ पहा।।७१।। करितां सहवास कांहीं दिन। कळती त्यांचे सारे सद्गुण। आमुच्या अंगींही येती धांवून। सद्गुण त्यांचें हो पाहीं।।७२।। सत्संगति करितां खास। प्रपंचामाजीं सहज़चि बहुवस। वृत्ति आपुली होय उदास। तेणेंचि सद्गुण येती पहा।।७३।। सद्गुणप्राप्ति जयालागीं। तया समाधान ये अंगीं। म्हणोनि सत्संगति हीचि जगीं। परमार्थासी सुलभ पहा।।७४।। सद्गुरुसहवास करितां थोर। सहज़चि येती सद्विचार। कैसे तें सांगूं परिसा एकाग्र। तुम्ही सज्जन श्रोते हो।।७५।। सद्गुरुस्वामी यांच्या मुखींचे। सहज़चि शब्द ऐकिले साचे। तेही होती उपयोगाचे। व्यर्थ न होती ते शब्द।।७६।। त्यांच्या वाक्यामाजीं सुरेख। अर्थ भरला सद्विवेक। तो श्रवण करितां देख। विचार उपज़े तत्काळ।।७७।। हरएक वाक्यामाजीं त्यांच्या। सूक्ष्म अर्थ परमार्थाचा। परि चित्तीं न रिघे आमुच्या। मंदबुद्धि म्हणोनियां।।७८।। करितां सहवास वारंवार। सहज़चि कळे चित्ता समग्र। मग येई अंगीं विचार। परमार्थाचा हळू हळू।।७९।। असो ऐसी सद्गुरुमूर्ति। किती वानूं त्यांची कीर्ति। लिहितां न पुरे मेदिनी ती। दाविती लीला अगाध।।८०।। लीला काय ती सांगूं आणिक। इकडेचि चित्ता लावा सकळिक। साक्षात् भगवान् अवतार देख। नाहीं संशय यामाजीं।।८१।। सद्गुरुस्वामी आनंदाश्रम। यांनीं घेतां

चतुर्थाश्रम। कांहीं काळ लोटतां, उत्तम। अघटित वर्तलें तें ऐका।।८२।। विठ्ठल सुब्राव नामें एक। होता तेथें भटजी वैदिक। वेदमंत्र पढे तो सम्यक। मठामाजीं ते समयीं।।८३।। भक्तिप्रेम होतें अंगीं। म्हणे मनीं गुरूपदेश जगीं। असावा लागे मानवांलागीं। तरीच़ जन्म सफल पहा।।८४।। परि कवणाच़ा उपदेश घ्यावा। म्हणोनि प्रार्थी मानसीं देवा। आनंदाश्रम-स्वामीरावा। पुसतां उपदेश व्यर्थ पहा।।८५।। कीं आनंदाश्रमस्वामी। समपाठी आहों दोघे आम्ही। तेही मज़सम अज्ञानीच़ ऐसें मी। समज़तों यांत संशय ना।।८६।। तैशियांलागीं सद्गुरु करितां। शांति कैसी लाभेल चित्ता। परि अंतरीं विचारें बघतां। न ज़ाय मन अन्यस्थळीं।।८७।। तेव्हां न सुच़े कांहीं त्याप्रत। मग ज़ाऊनि एकांतीं बैसत। ध्यान करूं लागला त्वरित। उपदेशावीण आपणचि।।८८।। तेव्हां ज़ाहला चमत्कार। स्वामींची महिमा अपार। साक्षात् अवतरला श्रीधर। मग काय उणीवता तेथें हो।।८९।। ध्यान करूं लागतां लागतां। आनंदाश्रम स्वामी तत्त्वतां। दिसूं लागले ध्यानीं पहातां। प्रयत्नावीण आपुल्या पैं।।९०।। जेव्हां बैसे ध्यान कराया। तेव्हां दिसती स्वामी त्या ठाया। मग आश्चर्य वाटलें तया। सुब्रावभटजीलागीं पैं।।९१।। तेव्हां म्हणे निजमानसीं। महिमा अगाध निश्चयेंसीं। भक्तिप्रेम नसतां मज़सी। कां तूं दिससी गुरुनाथा।।९२।। काय तुझी अगाध लीला। न वर्णवे पहा ती मज़ला। तुज़ बाहती कीं 'भक्तवत्सला'। परि अभक्तवत्सल झालासि तूं।।९३।। मी ज़री तुज़ नाहीं भज़लों। तरी तूं प्रसन्न झालास कृपाळो। धिक् धिक् माझा अभिमान ज़ळो। क्षमा करावी गुरुराया।।९४।। इतुकें बोलुनी निजमानसीं। उठला तत्काळ प्रेमासरशीं। धांविन्नला

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

स्वामीपाशीं। घेतलें दर्शन आनंदें।।९५।। केला साष्टांग प्रणिपात। प्रेमपुरःसर प्रार्थना करीत। म्हणे स्वामिन् आतां मज़प्रत। क्षमा करावी गुरुराया।।९६।। संनिध असतांही गुरुराया। नाहीं ज़ाणिलें आपल्या पायां। 'समपाठी माझे' ऐसें कल्पूनियां। नाहीं घेतला उपदेश।।९७।। परि कराया लागलों ध्यान। तुज़ला न विचारितां ज़ाण। तरी तूं न सोडिसी मज़लागून। क्षणोक्षणीं तूंचि दिससी।।९८।। ध्यान करूं लागल्यापासुनी। ध्यानीं तूंचि दिससी येउनी। साक्षात् भगवान् अससी तूं म्हणुनी। कळली खूण मज़ आतां।।९९।। आतां उद्धरीं देवा दयाळा। तारीं तारीं अपराध्याला। क्षमा करीं आपुल्या बाळा। नच धिक्कारीं कृपाघना।।१००।। इतुकें बोलुनी घातलें दंडवत। अंगीं रोमांच उठले त्वरित। प्रेमाश्रु घळघळ वाहत। नयनांतुनी भटजीच्या।।१०१।। बोलवेना एकही शब्द। उभा राहिला कर ज़ोडूनि स्तब्ध। हृदयीं धरिले सद्गुरुपद। बहुप्रेमानें ते समयीं।।१०२।। तेव्हां बोलिले स्मितमुखेंकरुनी। आनंदाश्रमस्वामी सद्गुणी। काय सुब्राया तुझिया मनीं। घ्यावा उपदेश वाटे कीं।।१०३।। यावरी बोले सुब्राव भटजी। उपदेश द्यावा मज़ला स्वामीजी। उद्धरावें देवा आजि। शरण आलों तव चरणां।।१०४।। मग नमूनि सद्गुरुराजा। केली पहा पाद्यपूजा। उपदेश-मंत्र घेतला ओज़ा। प्रेमपुरःसर ते समयीं।।१०५।। तेव्हांपासुनी सुब्रावभटजींसी। विश्वास बैसला पूर्णत्वेंसीं। श्रीस्वामींची मूर्ति निजमानसीं। धरिली त्यांनीं प्रेमानें।।१०६।। स्वामी म्हणिजे देवचि ऐसी। भावना ज़डली त्यांच्या मानसीं। भक्तिप्रेम वाढलें बहुवसी। निस्सीम भक्त झ़ाले ते।।१०७।। पहा कैसी सद्गुरुमहिमा। लीला अगाध दाविली आम्हां।

ज्याला भक्ति नसे त्या इसमा। केला श्रेष्ठ भक्त पहा।।१०८।। आतां बघतां त्यांची भक्ति। वर्णूं न शके माझी मति। निष्कपट भज़े तो निश्चितीं। नाहीं संशय यामाजीं।।१०९।। म्हणोनि सद्गुरु-सहवास थोर। तेणेंच़ भक्ति वाढे अपार। अंगीं येती सद्विचार। गुरुकृपेंचि पहा हो।।११०।। ज़री न लाभे त्यांच़ा सहवास। तरी करावें रात्रंदिवस। सद्गुणश्रवण बहुवस। श्रीसद्गुरूंच़े निश्चयेंसीं।।१११।। आणिक ऐका पुढील अध्यायीं। सद्गुणी स्वामींची नवलाई। ऐकतां चित्त शांत होई। इतुकी महिमा श्रीगुरूंची।।११२।। परमहंस-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ सद्गुरु परब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें त्रिपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।११३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां चित्त होय एकाग्र। त्रिपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।११४।। अध्याय।।५३।। ओंव्या।।११४।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति त्रिपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीमदानंदाश्रमगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय देवा सद्गुरुराया। रक्षीं आम्हां बालकांसी या। नको उपेक्षूं बा सदया। ये ये धांवुनी दयाघना।।१।। तुज़ म्हणती पतितपावन। तरी कां न येसी धांवून। कवण उद्धरील तुज़वांचोन। न दिसे अन्य मज़लागीं।।२।। तुज़ सारे भक्त समान। न बघसी तूं त्यांचे गुण। हा सुज्ञ अथवा अज्ञ। नाहीं मानसीं तुज़ देवा।।३।। जेणें धरिला दृढ विश्वास। तोचि धरी तुझी कांस। नच होय चित्तीं उदास। कधीं काळीं तो पाहीं।।४।। ऐसियालागीं करिसी रक्षण। यांत नाहीं नवल ज़ाण। परि असे ज़ो भक्तिहीन। त्यासिही रक्षिसी तूं देवा।।५।। ऐसा तूं माझा सद्गुरुनाथ। किती पाहसी माझा अंत। आतां तरी धांव त्वरित। करीं समाप्त ग्रंथ हा।।६।। तुझ्या इच्छेवांचुनी स्फूर्ति। न येई सर्वथा माझ्या चित्तीं। तेवींच अज़ुनी ग्रंथसमाप्ति। न होय देवा गुरुराया।।७।। 'मी लिहितों' ऐसा अभिमान। धरोनि मनीं लिहितां ज़ाण। तरी ना होय लिहिणें हातून। न सुचे अणुमात्र निश्चयेंसीं।।८।। जेव्हां इच्छा होईल तुज़सी। तेव्हां लिहिणें होय सहज़ेंसीं। ऐसा अनुभव येई मज़सी। घडिघडी देवा गुरुराया।।९।। तुझ्या इच्छेवीण कार्य। कवणही असो तें न होय। यामाजीं श्रोते हो संशय। नका घेऊं अणुमात्र।।१०।। सद्गुरुमहिमा असे अपार। लिहाया मेदिनी न पुरे साचार। आणिक त्यांचे सद्गुण थोर। हेही वर्णितां न येती।।११।। असो आतां श्रोते हो सज्जन। ऐका आणिक त्यांचे सद्गुण। आनंदाश्रमस्वामी कृपाघन। यांचें वर्णन पुनरपि।।१२।। पुनःपुन्हां काय सांगावें। सद्गुण सकलांसी असती ठावे। तरीही अणुमात्र येथें वर्णावे। ऐसी इच्छा उद्भवली।।१३।। परम शांत त्यांची वृत्ति। परमार्थीं

अत्यंत प्रीति। काय सांगूं वक्तृत्वशक्ति। परमाश्चर्य होय जनां।।१४।। स्वधर्मासी धरोनि वेदान्त। युक्तीनें सांगती निश्चित। प्रवचन देती रुचिकर अत्यंत। आकर्षिती जनांसी परमार्थीं।।१५।। चित्तीं नाहीं धनाची आस। म्हणोनि सारे समान त्यांस। गरीब श्रीमंत भेद ना खास। करिती रक्षण सकलांचें।।१६।। जेथें पाचारिती भक्त। तेथें प्रेमें ज़ाती त्वरित। करावें आपुल्या भक्तांचें हित। हेंचि मानसीं तयांच्या।।१७।। भक्तहितावांचुनी आणिक। काज़चि नसे त्यांसी देख। पहा कैसें सांगूं सकळिक। लक्ष लावा इकडेचि।।१८।। साक्षात् अवतारचि ते ज़ाणा। आधींच त्यांच्या कळल्या खुणा। मागील अध्यायीं बहुत ठिकाणा। कथिलें असे विस्तारें।।१९।। तरीही आणिक बोलूं किंचित। अवतारिक स्वामी आमुचे निश्चित। कैसें तें ऐका एकाग्र चित्त। करोनि सज्जन श्रोते हो।।२०।। किती शांत हृदय त्यांचें। त्यापरी शांत शब्दही मुखींचे। एकही शब्द व्यर्थ न वचे। ऐशी अमोघ वाणी त्यांची हो।।२१।। बालपणापासोनि तीव्र वैराग्य। पांचही विषयांचा केला त्याग। प्राप्त असतां नाना भोग। उबग मानसीं ये त्यांच्या।।२२।। देह रक्षण करण्याइतुके। विषय भोगावे लागती निके। म्हणोनि तितुकेचि भोगूनी कौतुकें। करिती रक्षण देहाचें।।२३।। अकरा वरुषांचें असतां बाळ। लागली मनासी बहुत तळमळ। कधीं येईल सुकाळ। परमार्थाचा मज़लागीं।।२४।। जग हें असे अशाश्वत। ऐसें मानसीं धरी सतत। ज़ें सत्य असे तें मज़प्रत। प्राप्त व्हावें सत्वरी।।२५।। नको मज़ला प्रपंच दुःखद। करावा परमार्थचि सुखद। पावावें निजात्म-सुखपद। सद्गुरुकृपेंचि निर्धारें।।२६।। प्रपंचामाजीं राहतां आपण। परमार्थ करणें परम कठिण। नाना विघ्नें येती धांवून। मग कैंचा होय परमार्थ।।२७।।

म्हणोनि घेतां संन्यास आपण। परमार्थ लाभे न लगतां क्षण। होईल जनांचेंही कल्याण। सहज़चि ज़ाणा या हस्तें।।२८।। परि घ्यावया संन्यास मज़ला। मायबाप निश्चयें ये वेळां। आज्ञा न देती समक्ष आपुल्या। नाहीं संशय यामाजीं।।२९।। म्हणोनि सदा करिती विचार। सुख नाहीं प्रपंचीं अणुमात्र। हृदयीं धरिली मूर्ति सुंदर। पांडुरंगाश्रम-सद्गुरूंची।।३०।। आणि प्रार्थिती रात्रंदिन। निजमानसीं स्वामींसी आपण। म्हणती प्रभो तुज़वांचोन। कवण करील उद्धार मम।।३१।। नको लोटूं प्रपंचामाजीं। तूंचि रक्षावें मज़ला गुरुजी। पार घालिता यांतुनी आजि। तुज़वीण सर्वथा ना जगतीं।।३२।। यापरी करुणा भाकिती अंतरीं। करिती बाह्यात्कारें भूवरी। व्यवहार चोख, ब्रह्मचारी। स्वधर्मापरी ते समयीं।।३३।। ऐसें असतां आला योग। स्वामी पांडुरंगाश्रम मग। यांनीं दाविला परमार्थमार्ग। केला शिष्यस्वीकार झणीं।।३४।। भुकेल्यासी मिळतां अन्न। सहज़चि तृप्त होई मन। तृषाक्रांतासी मिळतां जीवन। सहज़चि आनंद हो तया।।३५।। तैसें आमुच्या सद्गुरुराया। आधींच तहान होती तया। कीं संन्यास घ्यावा स्वामीकडूनियां। हीचि चिंता होती पैं।।३६।। तेवींच शिष्यस्वीकारास्तव। अवश्य म्हणोनि करुणार्णव। अनुमान न करितां घेती धांव। गुरुआज्ञेपरी तत्काळ।।३७।। आणि घेउनी संन्यासाश्रम। पावले निजात्मज्ञान उत्तम। जनांसीही मार्ग सुगम। दाविला आपुला प्रेमानें।।३८।। त्रयोदश वरुषांपासून। बहुत कष्ट सोशिले आपण। कोणते कष्ट करूं कथन। अणुमात्र येथें आतां हो।।३९।। नाहीं वेळीं अन्नपान। मित आहार एक वेळ भोजन। तेरा वरुषांचें बाळ असोन। कैसे सोशिले कष्ट पहा।।४०।। मायबाप बंधु बहीण। यांचा मोह सारा सोडोन। कैसे

राहिले मठांत ज़ावोन। केवळ जगाच्या कल्याणा।।४१।। हरएक प्राणी विषयांमाजीं। लाडू करंज्या पुरी भाजी। यांतचि रमविती वृत्ति सहजीं। सदा सर्वदा आपुली हो।।४२।। हें सारें सोडुनी जगीं। स्वामी लागले परमार्थमार्गीं। आणि पांडुरंगाश्रम सद्गुरु वेगीं। धरिला हृदयीं अखंड तो।।४३।। कैंच़ा सद्गुरु कैंच़ा देव। मी माझें यांतचि गर्क सर्व। परि आपुली माउली अपूर्व। अवतरली आम्हांसी ताराया।।४४।। जगामाजीं अनेक जीव। तळमळती धरुनी देहोहं-भाव। म्हणोनि आली देवासी कणव। धांवली झडकरी भूतळीं ती।।४५।। आणि आपुली दाविली वाट। स्वधर्माची असे जी नीट। तेथूनि ज़ातां पोंच़ती थेट। निजस्वरूपासी हो ज़ाणा।।४६।। स्वधर्मकर्म सोडूनि आन। करूं ज़ातां नाना साधन। खालीं पडतील घसरून। नरकामाजीं निश्चयेंसीं।।४७।। संसार हाचि नरक घोर। तो ओलांडिल्यावांचुनी साचार। पावतील कैसा पैलतीर। मोक्ष त्यावीण न मिळे पहा।।४८।। कैसें तें ऐका सावधान। संसाररूप नदी ज़ाण। ही तरोनि ज़ावया आपण। काय करावें हें ऐका।।४९।। संसारनदीमाजीं आपण। स्वधर्मरूप सेतु बांधोन। ज़ावें सत्वर त्यावरोन। पोंच़े मग तो पैलतीरा।।५०।। चित्तशुद्धि हेंच़ ज़ाणा। पैलतीर असे आपणा। मग ध्यानादि मार्ग सज्जना। परम सुलभ होत असे।।५१।। तेव्हां ध्यानादि मार्ग क्रमोनी। ज़ाय आपुल्या सत्सुखस्थानीं। त्यामुळें स्वधर्म श्रेष्ठ म्हणोनी। सांगती ज्ञानी स्वानुभवें।।५२।। पहा कैसें सांगूं सकल। तुम्ही सावध होऊनी बैसाल। ऐशी आशा धरोनि समूळ। कथूं आतां परिसा हो।।५३।। 'देह मी' हेंचि एक पाप। हीचि संसारनदी भरली अमूप। ती तरावया स्वधर्मरूप। सेतु बांधावा मानवांनीं।।५४।। जप तप पूजा पारायणें।

नाना सत्कर्में करितां येणें। पापें नासोनि ज़ाती त्वरेनें। नाहीं संशय यामाजीं।।५५।। जप-पूजादि नाना सत्कर्में। हींचि येथें दगड माती नेमें। करितां करितां स्वधर्मनामें। सेतु सिद्ध होय खरा।।५६।। स्वधर्मानें आपण वर्तणें। हेंचि त्या वाटेनें ज़ाणें। मग सहज़चि घडे लंघणें। पापाची नदी पहा हो।।५७।। पापनदी ओलांडुनी ज़ातां। चित्तशुद्धि-तीर लागे हाता। मग ध्यानादि मार्ग सापडे तत्त्वतां। निजस्वरूपाच़ा तत्काळ।।५८।। ध्यानादिमार्ग सांपडल्यावरी। उशीर न लागे निर्धारीं। यामाजीं संशय अंतरीं। न धरावा अणुमात्र कोणींहीं।।५९।। 'मी ब्रह्म' ऐसें अनुसंधान। हाचि ध्यानादि मार्ग पूर्ण। दृढ होतां सहज़चि पूर्ण। ज्ञान परिपूर्ण होय पहा।।६०।। स्वधर्मकर्म केल्यावांचुनी। ध्यानादि ना घडे त्याच्या हातुनी। ध्यानादि मार्ग मिळतांक्षणीं। निजस्वरूपासी पोंच़े तो।।६१।। म्हणोनि स्वधर्म करावा आधीं। तेवींच़ प्रार्थिलें परमावधीं। आमुच्या पूर्वजीं महाबळेश्वरपदीं। कळवळोनि बहुवस।।६२।। कीं आम्हांस सद्गुरु लाभावे। ऐसें प्रार्थिलें जीवेंभावें। तेव्हां अवतरोनि सदाशिवें। वाढविली गुरुपरंपरा।।६३।। एवं स्वधर्मराज्य भूवरी। परमेश्वर अवतरोनि वरिवरी। च़ालवीत आला आज़वरी। जगदोद्धारास्तव ज़ाणा।।६४।। स्वधर्म शिकविती जनांलागुनी। त्यामुळे 'धर्मगुरु' म्हणती त्यांसी जनीं। स्वधर्मराज्य च़ालविलें त्यांनीं। म्हणतां दोष ना कांहीं।।६५।। 'स्वधर्म' याच़ें स्पष्टीकरण। आणिक थोडें करूं आपण। नातरी संशय श्रोत्यांलागून। येईल वरील वाक्यानें।।६६।। कीं सत्कर्में हीचि दगडमाती। घालुनी सेतु बांधावा निश्चितीं। ऐसें वरी कथिलें त्यावरती। प्रश्न उद्भवेल श्रोत्यांसी।।६७।। सत्कर्में कैसेनि स्वधर्म होय। तरी उत्तर त्याच़ें सांगूं निर्भय। फेडूं सारे

आतां संशय। ऐका सावध होवोनि।।६८।। जपपूजादि हें कर्म। ब्राह्मणें करावें हा नेम। ऐसा शास्त्रींच़ कथिला हा धर्म। नाहीं ख्रिश्चन-यवनांसी।।६९।। त्यांच़ा धर्म ज़ैसा असे। तैसेंच़ त्यांनीं वर्तावें आपैसें। आमुच्या धर्मापरी आम्ही साहसें। वागतां होई कल्याण।।७०।। मागें कथिलेंचि असे येविषीं। आणिक विस्तार कासयासी। एवं सर्व कर्मांगें आपैसीं।। असती स्वधर्माच़ें अंग पहा।।७१।। स्नान संध्या अनुष्ठानादि। नित्यकर्में करावीं पदोपदीं। पूजा उत्सव पालखी कधीं कधीं। धर्मकृत्येंचि हीं सारीं।।७२।। एवं धार्मिक कवणही कार्य। स्वधर्माच़ेंचि अंग होय। त्यांत न धरावा संशय। श्रोते हो तुम्हीं अणुमात्र।।७३।। असो एवं स्वधर्मराज्य। च़ालविण्यायोग्य सद्गुरुराज। तेचि हें शिकविती आम्हां आज़। स्वधर्माच़ें शिक्षण हो।।७४।। आपण करुनी स्वधर्मपालन। शिकवितातिं आम्हांलागून। देती आम्हां नियम घालून। स्वधर्माच़े ते ज़ाणा।।७५।। 'यथा राजा तथा प्रजा'। याच़ा अर्थ काय तो समज़ा। आपण नियम पाळुनी राजा। जनांसी आज्ञा करीतसे।।७६।। येथें 'नियम' जयासी बोलती। तेथें तयासी 'कायदा' म्हणती। त्यापरी राजा वागे निश्चितीं। व्यवहारामाजीं सर्वदा।।७७।। 'खून दंगा च़ोरीच़ा धंदा। करूं नयें' ऐसा कायदा। केला रायें आणिक तो कदा। न करी आपणही गुन्हा पैं।।७८।। तैसें येथें आमुच्या गुरुरायें। नियम घातला अधर्म करूं नयें। आपणही वर्ते तैसेंच़ पाहें। हे आहे विदित सकलांसी।।७९।। सरकारा जनांनीं द्यावा कर। हा जगीं ज़ैसा असे निर्धार। त्यापरी येथें सारस्वतीं समग्र। द्यावी वर्गणी मठासी।।८०।। आतां प्रश्न कराल थोर। सरकारा सकलही न देती कर। ज्यासी असे शेतादि घर। तेचि कर भरती हो।।८१।। त्याच़ें उत्तर ऐका आतां। येथेंही त्यापरीच़

देती तत्त्वतां। शेतादि येईल ज्याचे हाता। तोचि येथही देत असे।।८२।। प्रत्येकासी मिळे ज़ें उत्पन्न। ज़मीन व्यापार नोकरी करोन। तें श्रीगुरुकृपेवीण। न मिळे कवणा कांहींएक।।८३।। त्यांचेंच हें सारें वैभव। श्रीगुरुमहाराज यांचें अपूर्व। तोचि दाता त्राता सर्व। आम्हां भक्तां निश्चयेंसीं।।८४।। राजा करी प्रजेचें पालन। तैसे सद्गुरु पाळिती आम्हांलागून। कृपें करिती इहपर कल्याण। म्हणूनि वर्गणी देणें हें इष्ट।।८५।। आणिक ऐका सविस्तर। भक्तिप्रेम हेंचि थोर। ज़मीन आमुची साचार। म्हणोनि वर्गणी द्यावी पैं।।८६।। भक्तिप्रेम दृढ व्हावया। वर्गणी द्यावी सद्गुरुराया। तया पुण्येंकरोनियां। भक्तिप्रेम दृढ होय।।८७।। पुण्य अपार झालियावरी। चित्त शुद्ध होय झडकरी। तेव्हां शुद्ध भक्ति उपज़े अंतरीं। निष्काम प्रेमही लाभतसे।।८८।। मग होत असे आत्मज्ञान। यामाजीं नाहीं अनुमान। म्हणोनि भज़ावें मठासी आपण। द्यावी वर्गणी प्रेमानें।।८९।। जनांच्या संरक्षणाकरितां सरकार। घेतसे जनांकडोनि कर। तैसें येथें मठामाझार। वर्गणी द्यावी लागे पैं।।९०।। वर्गणी देतां होय कल्याण। आपुलेंच खरें निश्चयें पूर्ण। न घेती स्वामी आपण। कवडीही त्यांतील निर्धारें।।९१।। तेवीं वर्गणी न देती त्यांसी। ज़ुलूम न करिती द्यावीच ऐशी। अथवा न कोपती मानसीं। कल्याणचि इच्छिती जनांचें।।९२।। येथ करितील कुणीही प्रश्न। काय होय आमुचें कल्याण। तरी करोनि चित्त सावधान। अवधारा उत्तर याचें हो।।९३।। अमित कार्यें मठामाजीं। होत असती पहा सहजीं। तीं कासया करिती आजि। केवल जनांच्या कल्याणा।।९४।। लघु-महारुद्रादिअभिषेक। नवचंड्यादि हवनें अनेक। नानाविध उत्सव सुरेख। करिती अगणित सत्कर्में।।९५।।

ऐशीं अनंत कार्यें समस्त। होती लोककल्याणार्थ। त्यासी लागे पैसा बहुत। कैसें करावें ते समयीं।।९६।। ज़री ना दिधली वर्गणी आम्हीं। खर्च़ न उरे ऐशिया कामीं। म्हणाल पूर्वजें सोडिली भूमी। तया खर्च़ालागीं पैं।।९७।। ज़मीन सोडिली हें खचित। परि ते वेळीं जिन्नस बहुत। सवंग होते अत्यंत। विदित असे हें सकळांसी।।९८।। आतां वाढली महागाई बहुत। खर्च़ भागेल कैसा यांत। कार्यें करिती साङ्ग यथार्थ। न देतांही वर्गणी।।९९।। एवं जनांच्या कल्याणाकरितां। सकल कार्यें होती तत्त्वतां। जनांच़ें कल्याण काय तें आतां। सांगूं परिसा प्रेमळ हो।।१००।। जगामाजीं कष्ट अनेक। येतीं एकावरी एक। हें आम्हां दिसतसे च़ोख। सांगावें न लगे कवणासी।।१०१।। मठामाजीं पुण्यकर्में। घडती म्हणोनि जनांच्या नामें। पार घालितो बहु प्रेमें। भवानीशंकर जनांसी।।१०२।। ऐशिया पुण्यप्रभावें खचित। कष्ट जनांच़े हरती समस्त। असत्य नव्हे सांगतों यथार्थ। सत्य सत्य त्रिवाचा।।१०३।। देवासी करितां उत्सव थोर। आणि अभिषेक करितां निरंतर। यांत पुण्य काय सांगा सत्वर। ऐसें म्हणाल श्रोते हो।।१०४।। तरी ऐका उत्तर त्याच़ें। स्फुरविती ज़ें सद्गुरु आमुच़े। तेंचि बोलूं अणुमात्र साच़ें। उशीर न करितां आतां हो।।१०५।। देवासी न लगे कांहीं एक। तोचि कर्ता सर्वांच़ा देख। त्यासी काय देऊं आणिक। त्याच़ेंच़ त्याला देणें हें।।१०६।। आपुल्यासाठींच़ आपण करणें। कांहीं नाहीं त्यासी उणें। प्रेमासाठींच़ देणें घेणें। व्यवहारांतही ऐसेंचि।।१०७।। एकमेकां जेवावयासी। पाचारिती प्रेमासरशीं। अहेरादि करिती बहुवसीं। प्रेमास्तवचि प्रघात पहा।।१०८।। नातरी काय उणें म्हणोनि। जेवण अहेर आदिकरोनि। करिती उल्हासें सर्वत्र

धरणीं। कीं प्रेमेंचि एकमेकां।।१०९।। सर्व करणें प्रेमासाठीं। कीं एकमेकांची प्रीति मोठी। न समावे आपुल्या पोटीं। तेणेंच़ प्रघात पडला हा।।११०।। देणें घेणें होतां सहज़। आठव होय त्यांच़ा रोज़। तेणेंच़ पडला प्रघात आज़। जगीं नानाविध पहा तो।।१११।। तैसें येथ देवालागीं। नाना उपचार करिती जगीं। येणें प्रेम उद्भवे अंगीं। कैसें तें सांगूं आतां पैं।।११२।। बालका घालितां वस्त्रें भूषणें। बालक कांहीं त्यांसी नेणें। तरीही आम्ही परमप्रीतीनें। लेववुनी मानितों सुख सारें।।११३।। ऐसें कराया काय कारण। प्रेम हेंचि खचित ज़ाण। लेववितां वस्त्रें आभरण। अधिकचि वाढे प्रेम खरें।।११४।। बालका घालितां वस्त्रभूषण। सुंदर दिसे त्याच़ें वदन। तेव्हां घेई लगबगें चुंबन। हें लक्षण प्रेमाच़ें।।११५।। तैसे देवासी नाना उपचार। करितां पालखी उत्सव सुंदर। प्रेम वाढतसे अपार। आमुच़ें ज़ाणा सकलांच़ें।।११६।। प्रेम वाढतां होय आठव। घडिघडी देवाच़ा आम्हां सदैव। असत्य नव्हे सर्वथैव। अनुभवसिद्ध सकलां हें।।११७।। चार दिवस गेलिया मठासी। आनंद होय बहुत मानसीं। मग येतां आपुल्या ग्रामासी। घडिघडी आठव होय तयां।।११८।। उत्सव पालखी मंत्रघोष। तेंचि दृश्य दिसे विशेष। सुंदर मूर्ति नयनीं प्रत्यक्ष। दिसे ऐसा भास होय।।११९।। तेणेंकरूनी प्रेम वाढे। प्रेमेंचि परमार्थलाभ घडे। मग सहज़चि उद्धार पुढें। होय निर्धारें आमुच़ा हो।।१२०।। म्हणोनि ऐसे नाना उत्सव। ठेविले पूर्वजांनीं सर्व। त्याची उन्नति करावी, भाव। ठेवुनी अंतरीं आपण।।१२१।। नूतन ज़री न होय आम्हांस। पूर्वजीं ठेविले उत्सव बहुवस। त्यास्तवचि वर्गणी देतां दरमास। त्यांतचि तुष्टे प्रभुवर तो।।१२२।। असो आतां

मागें ज़ो घेतला। दृष्टांत तो तेथेंचि राहिला। सांगूं आतां तोचि भला। दृष्टांतासहित पूर्ण करूं।।१२३।। अहेरादि जगीं लोकां। करिती सकलही एकमेकां। ऐसें करितां आठव देखा। होय एकमेकां अंतरीं।।१२४।। कवणाही नाहीं येथें उणीवता। केवळ प्रेमासाठीं तत्त्वतां। तेणें आठव होय चित्ता। घडिघडी परस्परांत पहा।।१२५।। तैसी येथें उत्सवासाठीं। देतां वर्गणी उठाउठीं। देवही रक्षी आम्हां संकटीं। आठव चित्तीं धरोनियां।।१२६।। आम्हीं करितां त्याचें स्मरण। तोही आठवी आम्हांलागून। त्यासी होतां आठव ज़ाण। अगणित पुण्य पहा तें।।१२७।। हाचि असे वरील संशय। देवासी अभिषेकादि करितां काय। पुण्यप्राप्ति तेणें होय। तरी ऐका आतां सावधान।।१२८।। ज्यासी आवडे ज़ो ज़ो विषय। तोचि देतां त्या सुख होय। शंकरासी अभिषेक प्रिय। हें विदित असे सकलांसी।।१२९।। आतां म्हणाल उत्सव कासया। तरी तेंही असे प्रिय तया। त्यायोगें भक्तसमुदाया। आनंद फार होतसे।।१३०।। एवं देवालागीं असे ज़ें प्रिय। तेंचि करितां पुण्य होय। पूर्वजीं केलें यामाजीं काय। तो हेतु सारा सांगितला।।१३१।। काय हेतु कथिला म्हणाल। तरी उत्सवादि करितां सकल। आठव होय घडिघडी विमल। हें कथिलें असे आधींचि।।१३२।। आठवें वाढे प्रेम अमित। प्रेमें होय समाधान निश्चित। समाधानें होय प्राप्त। मोक्षपद मानवांसी।।१३३।। वरी कथिलें स्वधर्म श्रेष्ठ। हीचि मोक्षाची सुलभ वाट। म्हणोनि स्वधर्म-सत्कर्में करावीं चोखट। आम्हीं अज्ञ जनांनीं।।१३४।। दिवसभरी पोटासाठीं। कराव्या लागती नाना खटपटी। धर्मकर्में राहिलें पाठीं। उसंत न मिळे अणुमात्र।।१३५।। म्हणोनि देतां वर्गणी मठासी। तेथ सत्कर्में होताति बहुवसी। तेंचि पुण्य

आपुल्या गांठीसी। येत सहज़चि पहा हो।।१३६।। सकाम भजतां मिळे तें फल। निष्कामें होय मन हें निर्मल। मग ब्रह्मज्ञान प्राप्त होईल। सहज़चि ज़ाणा तुम्ही हो।।१३७।। म्हणोनि सद्गुरु आणि मठ। आम्हां अज्ञांसी दावाया वाट। स्वधर्माची केली सपाट। ज़ावया सच्चित्सुखधामा।।१३८।। एवं स्वामी सद्गुरुराज। स्वधर्म-राज्याचे महाराज। आम्हां सारस्वतांचें आज़। करिती रक्षण प्रेमानें।।१३९।। स्वधर्माऐसें राज्य आणिक। नसे जीवासी सुखदायक। त्या राज्यीं वास करितां सम्यक। निजात्मज्ञाना पावे तो।।१४०।। ज्या एका राज्यामाझारीं। सुखचि असे पहा निर्धारीं। कळूनि तेथें राहतां भारी। सुखचि होय तयासी।।१४१।। परि तेथें असावा सद्गुणी राजा। तरीच सुखासी पोंचेल प्रजा। नातरी जनांमाजीं समज़ा। धांगडधिंगा माज़ेल झणीं।।१४२।। तैसें येथें स्वधर्मराज्यावरी। सद्गुरुमहाराज नसले ज़री। तरी यथेष्टाचरण होउनी भारी। समाधान न मिळेल कल्पांतीं।।१४३।। म्हणोनि स्वधर्मरूप राज्यावरी। गुरुमहाराज असावे निर्धारीं। तेणेंच गुरुपरंपरा आज़वरी। वाढली ज़ाणा सुंदर ती।।१४४।। परंपरा वाढविल्याकारणें। स्वधर्मरक्षण झालें येणें। परंपरा वाढली स्वधर्मरक्षणें। एवं अन्योन्याश्रयें आनंदचि।।१४५।। यापरी स्वधर्मराज्य हें थोर। त्यावरी बैसे श्रीसद्गुरुवर। राजवाडा हाचि मठ सुंदर। रहावयासी गुरुराया।।१४६।। एवं आमुचे सद्गुरुराज। आनंदाश्रम नवम आज़। सकलही सोडुनी आपुलें काज़। आले धांवुनी भूतळीं।।१४७।। तरी आम्हीं करावें काय। धरावे आधीं त्यांचे पाय। तरीच जन्म सफल होय। सत्य सत्य त्रिवाचा।।१४८।। आणि ऐसे सद्गुरुराज। आम्हां अज्ञांसी लाभले आज़। पूर्वपुण्येंचि पहा सहज़।

ऐसें मनासी बोधावें।।१४९।। म्हणोनि ऐशी सद्गुरुमूर्ति। दीर्घायुषी होवो क्षितीं। ऐसें मागूं घडिघडी निश्चितीं। भवानीशंकर-संनिधीशीं।।१५०।। परमहंस-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ एकचि ब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें चतुःपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१५१।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। चतुःपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१५२।। अध्याय ५४।। ओंव्या १५२।। ॐ।। तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति चतुःपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीशिवानंदतीर्थस्वामीगुरुभ्यो नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।। ॐ।। जय जय देवा श्रीगुरुराया। शिवानंदतीर्थस्वामी सदया। व्यापक अससी तूं बा जगीं या। काय वर्णूं तुज़ला हो।।१।। जगामाजीं असे ज़ें 'अस्तित्व'। त्यांतचि वास करिसी तूं सदैव। आणि 'भाति' ज़ें कळणें अपूर्व। त्यामाजीं सुंदर विलससी।।२।। जी असे जगीं 'प्रीति'। त्यांतही तूंचि राहसी निश्चितीं। ऐशिया तुज़ला वर्णाया स्फूर्ति। येईल कैसी कोठून।।३।। ऐसा तूं माझा सच्चिदानंद। तुझी महिमा असेचि प्रसिद्ध। काय वर्णील हा मतिमंद। अगाध लीला तव पाहीं।।४।। तुज़माजीं नाहीं द्वैत। अससी तूं बा शंकर साक्षात। राहुनी माझ्या हृदया-आंत। वदवीं सद्गुण तूंचि बा।।५।। असो आतां श्रोते हो सज्जन। मागील अध्यायीं केलें निरूपण। स्वामी आनंदाश्रम दयाघन। यांचें वर्णन केलें पैं।।६।। एवं ऐसे आमुचे गुरुमहाराज। वर्णन केलें ज़ें त्यांचें सहज़। नऊही आश्रम एकरूप मज़। दिसताती ज़ाणा निःसंशय।।७।। तेवींच माझे गुरुवर्य। श्रीमत्परमहंस सदय। 'शिवानंदतीर्थ स्वामी' होय। नामाभिधान त्यांचें हो।।८।। अध्याय-समाप्तीच्या समयीं। शिवानंदतीर्थ सद्गुरुमाई। यांचा परिचय श्रोतयां पाहीं। करवितों कर्तव्यबुद्धीनें हो।।९।। आमुचे चित्रापुर मठाधीश। आणि शिवानंदतीर्थ परमहंस। सर्व एकरूप असती खास। अनुभवसिद्ध हें असे।।१०।। माझ्या मातेसी एकेकाळीं। स्वप्नामाजीं दिसले निजस्थळीं। स्वामी सर्व आले ज़वळी। नवही आश्रम तेधवां।।११।। तेवींच सद्गुरु शिवानंदतीर्थ। हेही आले त्यासमयींच तेथ। आद्य स्वामी परिज्ञानाश्रम बोलत। माझिया मातेज़वळी हो।।१२।। कीं सारे दहाही स्वामी। एकरूपचि आहों

आम्ही। न धरीं संशय अंतर्यामीं। ऐसें बोलिले प्रेमानें।।१३।। इतुकें बोलुनी झाले अदृश्य। ज़ागी होतां माता तियेस। आनंद ज़ाहला बहुवस। हें वेगळें सांगावें न लगेचि।।१४।। सांगती झाली स्वप्न अद्भुत। ऐकतां आनंदलें माझें चित्त। असत्य नव्हे स्वप्न निश्चित। एकरूप सकल खचित ते।।१५।। मज़ही ऐसे अनुभव अमित। आले निश्चयें सांगतों खचित। त्यांत एक परम अद्भुत। कथितों आतां परिसावें।।१६।। एके काळीं शिवानंदतीर्थ। यांच्या संनिध असतां मी, तेथ। माध्यान्हसमयीं सद्गुरुनाथ। विश्रांति घ्याया पहुडले।।१७।। तेव्हां मी ज़वळी बैसलों स्वस्थ। कांहीं एका कामानिमित्त। कल्पना आली मम हृदयांत। काय ती सांगूं ये समयीं।।१८।। कीं मज़ आतां चरित्र लिहाया। उसंतचि नसे अणुमात्र ये ठाया। अन्य काम धरिलें हातीं या। शिवानंदस्वामी यांचें हो।।१९।। वारंवार व्याधि मज़प्रत। त्यामुळें लिहाया नाहीं होत। व्याधि नसे विशेष प्रस्तुत। परि न मिळेल उसंत ये समयीं।।२०।। ग्रंथ न होतां पहा पूर्ण। क्षोभतील आनंदाश्रम गुरु पूर्ण। मज़वरी आतां निश्चयेंकरोन। ऐसी कल्पना मज़ आली।।२१।। मग पाहिलें वदन मनोहर। शिवानंदतीर्थ यांचें साचार। बघतां दिसले आनंदाश्रम गुरुवर। प्रत्यक्ष ज़ाणा हो पाहीं।।२२।। एक क्षणभरी स्तब्ध बैसुनी। बघतचि राहिलों न्याहाळोनी। तेव्हां आनंदाश्रम हेचि नयनीं। दिसूं लागले त्या ठायीं।।२३।। वारंवार पाहिलें वदन। तरी तैसेंचि दिसे ज़ाण। पुनरपि बघतां शिवानंद कृपाघन। हेचि निज़ले तेथ पहा।।२४।। तेव्हां आश्चर्य वाटलें बहुत। कळली खूण ती मज़प्रत। कीं आनंदाश्रम-शिवानंदतीर्थ। एकरूप ऐसें दावियलें।।२५।। असो आतां परिचय त्यांचा। करूनि देऊं श्रोत्यांसी साचा। कोण कोठील

सद्गुरु आमुचा। सांगूं आतां किंचित हो।।२६।। कारवार-ग्रामीं बाड या स्थानीं। पद्मनाभतीर्थस्वामी यांनीं। मठ बांधिला सुंदर करोनि। असे प्रख्यात तें स्थान।।२७।। ते बालसंन्यासी परम प्रख्यात। दत्तात्रेय- अवतार निश्चित। ब्रह्मनिष्ठ जीवन्मुक्त। परमहंस होते ते।।२८।। महिमा असे त्यांची अपार। तीव्रबुद्धि परम चतुर। ऐसे ते सद्गुरुवर। कारवारगांवीं होते पैं।।२९।। दत्तमूर्ति स्थापिली त्यांनीं। वेदान्त-प्रवचन दरदिनीं। भजन पालखी उत्सव आदिकरोनि। नानापरी ठेवियले।।३०।। ऐसे ते पद्मनाभतीर्थ। त्यांचे हे शिष्य प्रख्यात।'शिवानंदतीर्थ' नामें असत। जीवन्मुक्त पुण्यात्मे।।३१।। धारवाड-प्रांतीं बंकापुर। या गांवींचे देशस्थ ब्राह्मण थोर। साक्षात् कैलासींचा शंकर। दीक्षितवंशीं अवतरलासे।।३२।। त्यांचें अणुमात्र चरित्रकथन। कराया इच्छा उद्भवली म्हणोन। संक्षिप्त कथितों तुम्हांलागून। श्रोते सज्जन भाविक हो।।३३।। त्या बंकापुर-ग्रामांत थोर। होता एक विप्रवर। 'तीर्थदीक्षित' म्हणती त्या नर। परम भाविक सज्जन तो।।३४।। असे तो गीर्वाणभाषानिपुण। विद्या आणि विनय-संपन्न। तेवींच वाक्चातुर्य आणि सुशीलतादि गुण। असती अंगीं त्याच्या पैं।।३५।। संस्कृत पढण्या निरंतर। त्याच्याजवळी येती नर। प्रेमें शिकवी दीक्षित सत्वर। अतिनिर्लोभें सकलांसी।।३६।। साधु-संतांवरी विश्वास। म्हणोनि जाय करोनि साहस। कुणीही साधु भेटतां तयास। कधीं कधीं जाय त्यासंगें।।३७।। ऐसें असतां एके काळीं। तडस-ग्रामीं जाऊनि त्या स्थळीं। एका सत्पुरुषाजवळी। राहिला पहा तीर्थपति।।३८।। प्रेमपुरःसर निष्कामें दीक्षित। त्यांची सेवा करी बहुत। साधु होतां व्याधिग्रस्त। होता त्यांच्याजवळी हा।।३९।। दिवसेंदिवस होऊनि क्षीण। संनिध पातलें

तयाचें मरण। तेव्हां दीक्षित म्लानवदन। करोनि बैसला त्या समयीं।।४०।। तें बघोनि साधु त्याज़ला। म्हणे कासया चिंता तुज़ला। तुझ्याचि ग्रामीं अवतरेल आपुला। साक्षात् भगवान निश्चयेंसीं।।४१।। यावरी बोलती तीर्थ-दीक्षित। बंकापुरीं कुणीकडे अवतरत। परमात्मा साक्षात् भगवंत। कोणत्या गृहीं येईल हो।।४२।। यावरी साधु बोलती ऐक। तें मी आतां न सांगूं सकळिक। अनुभवेंचि तुज़ला देख। समज़ेल पुढती आपैसें।।४३।। अनायासें घडेल तुज़सी। सत्संगति निश्चयें आपैसी। इतुकें बोलूनी साधु परियेसीं। ज़ाहले समाधिस्थ तत्काळ।।४४।। मग गेले तीर्थदीक्षित। बंकापुरीं पोंचले त्वरित। कथिला निजकांतेसी वृत्तांत। साधूंचा आशीर्वाद ते समयीं।।४५।। तेव्हां गेले कांहीं दिन। कृष्णाबाई इज़लागोन। गर्भवती झाली ती पूर्ण। अगणित पुण्य तियेचें।।४६।। तीन अपत्यें होतीं आधीं। साधुवचन वृथा न होय कधीं। पुनरपि गर्भिणी होतां बुद्धि। झाली शांत तियेची।।४७।। गर्भापरी डोहाळे होती। गर्भ तो साक्षात् भगवान-मूर्ति। तेव्हां शांतता सहज़चि येई ती। मातेच्या अंगीं पहा हो।।४८।। असो बहुत विस्तार कासया। नऊ मास पूर्ण होऊनियां। प्रसवली कृष्णाताई अवनीं या। अवतरला साक्षात् सदाशिव।।४९।। सत्राशें ब्याण्णव शकांतरीं। प्रमोद संवत्सर बुधवारीं। आषाढ वद्य चतुर्दशी शिवरात्रीं। प्रदोषकाळीं प्रसवली।।५०।। ज़ाहलें सुंदर पुत्ररत्न। येई पहाया दीक्षित धांवोन। अंतरीं स्मरोनि साधूचें वचन। मुखकमळ न्याहाळी।।५१।। मुखावरी विलसे तेज। शांततेचें पहा सहज़। तीर्थदीक्षित म्हणे मी आज़। धन्य ज़ाहलों जगीं या।।५२।। मग होतां दिवस द्वादश। नामकरण केलें पुत्रास। 'शिव' ऐसें शोभे बहुवस। भोळा शंकरचि

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

तो ज़ाणा।।५३।। असो एवं हा गुरुराय। साक्षात् शंकरचि हा निश्चय। परम शांत सात्त्विक हृदय। अति कोमल त्यांचें पैं।।५४।। उपज़ल्यापासुनी शांत हृदय। ज़री लहान बालक होय। तरी वैराग्य-लक्षण दिसोनि येय। कैसें तें ऐका अणुमात्र।।५५।। तीन वरुषांचें बाळ असतां। सर्वही विषयीं वैराग्य चित्ता। जननीने खावया देतां। दे काढोनि अन्यासी।।५६।। सदनामाजीं मुलें बहुत। लहानमोठीं होतीं त्यांप्रत। रडतां खावयालागीं देत। आपुल्याज़वळील प्रेमानें।।५७।। माय देखोनि म्हणे बा शिवु। तुज़ नको कां रे खाऊ। किती बा तुझा शांत स्वभावु। कीं आपुलें देसी अन्यासी।।५८।। यावरी बोले हास्यवदनें। तो रडूनि म्हणतो कीं 'मज़ला हें उणें'। त्यासि देतांचि आनंदानें। राहीन मी गे निश्चयेंसीं।।५९।। पहा तीन वरुषांचें बाळ। हृदय त्याचें किती कोमल। न बघवे अन्यांची तळमळ। आपण कष्ट सोशीत ।।६०।। येणेंपरीच़ सर्वही विषयीं। अलिप्त राहती जन्मतः पाहीं। आणि देवाची भक्ति लवलाहीं। करूं लागले बहुत पहा।।६१।। पुराणश्रवण कीर्तन भजन। यांतचि रमती रात्रंदिन। कर्तव्यापरी घेतलें शिक्षण। परि नामस्मरणीं मन त्यांचें।।६२।। कानडी शाळेचे़ शिक्षक। होऊनि राहिले दिवस कित्येक। मन हें ठेविती निश्चयात्मक। सदा सर्वदा परमार्थीं।।६३।। वडिलांची आज्ञा शिरसा मान्य। म्हणूनि करोनि घेतलें लग्न। परि असती सदा मग्न। परमार्थींच़ ते पहा हो।।६४।। नागनूर या ग्रामामाझारीं। शिक्षक झ़ाले कांहीं काळवरी। नाम स्मरती अखंड अंतरीं। न विसंबिती क्षण एक।।६५।। करिती नित्यनेमें भजन। एकादशीसी हरिकीर्तन। येती ऐकाया बहुत जन। परम प्रीतीनें त्या समयीं।।६६।। न मिळती

कदापि जनांच्या संगीं। नच ज़ाती वाईट मार्गीं। अन्यासीही लाविती वेगीं। परमार्थासी लीलेनें।।६७।। ऐसें यांचें बघोनि वर्तन। देवचि हा ऐसें समज़ोन। विश्वास ठेविती तेथील जन। यांच्या चरणीं दिनरजनीं।।६८।। ऐसें असतां तेथें नजीक। होंबळ्ळी नामें क्षेत्र देख। तये ठायीं संन्यासी एक। आले अवचित पहा हो।।६९।। त्यांचें नांव 'पद्मनाभतीर्थ'। कारवारीं 'बाड मठ' ज्या म्हणत। त्यांनींच स्थापिला तो तेथ। असो पुढें परिसा हो।।७०।। तेथें गेले शिवानंदतीर्थ। आणि घेतलें दर्शन त्यांचें त्वरित। कांहीं दिवस राहुनी तेथ। माघारे आले नागनुरा।।७१।। लागला सद्गुरुचरणांचा ध्यास। कीं उपदेश कधीं मिळेल आपुल्यास। ऐसें हृदयीं रात्रंदिवस। चिंतिताती ते समयीं।।७२।। शिक्षकाचे असतां काम। कैसे जातील सोडुनी ग्राम। वाढूं लागलें अधिकचि प्रेम। गुरुचरणांचें हृदयीं हो।।७३।। कांहीं दिन लोटल्यावरी। पद्मनाभतीर्थ नुलवी-माझारीं। ज़ाऊनि राहिले ऐशा अवसरीं। कळला वृत्तांत यांना हो।।७४।। नागनुराहूनि मासनकट्टी। येथें बदली झाली उठाउठीं। तेव्हां लागली चिंता मोठी। शिवानंदस्वामींसी।।७५।। कीं आतां न मिळे गुरुचरण। वरीवरी न होय मज़ला दर्शन। नोकरी हेंचि विघ्न दारुण। परमार्थासी एक खरें।।७६।। ऐसें म्हणोनि केला विचार। लिहिला राजीनामा सत्वर। पाठविला मग तो लवकर। अधिकाऱ्यापाशीं हो ज़ाणा।।७७।। आणि गेले नुलवीमाझारीं। पद्मनाभतीर्थस्वामींस अंतरीं। धरोनि राहिले ते सत्वरीं। सेवा करीत त्यांची हो।।७८।। केली सेवा प्रेमें अपार। उपदेश घेतला श्रद्धापुरःसर। झालें ब्रह्मज्ञान तयां सत्वर। पावले जीवन्मुक्तदशा।।७९।। गुरुभक्ति अंगीं किती म्हणोनि। वर्णन कराया न पुरे

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

मेदिनी। संक्षिप्त बोलूं गुरुकृपेंचि झणीं। परिसा सावध श्रोते हो।।८०।। तेथुनी स्वामी पद्मनाभतीर्थ। कारवारीं ज़ाऊनि राहात। बांधिला मठ सुंदर तेथ। दत्तमूर्ति स्थापियली।।८१।। तेथें गेले त्यांच्यासंगें। शिवानंदही आपण वेगें। आप्तमोह सारूनि मागें। राहिले कांहीं काळवरी।।८२।। करिती सेवा रात्रंदिवस। बाड मठाचीं कामें बहुवस। उच्च नीच न बघतां साहस। करोनि कार्य करिती ते।।८३।। कवणही असो सद्गुरुसंनिध। त्यांचीही सेवा करिती बहुविध। न ठेवितां कवणाही शब्द। बहुप्रेमानें वागती ते।।८४।। सर्व जनांसी प्रेमपूर्वक। आप्तांपरी मानिती देख। ज़री त्यांची असे चूक। लक्ष न देती अणुमात्र।।८५।। सर्वांवरी समान दृष्टी। मत्सर द्वेष नाहीं पोटीं। कठोर वचन न बोलती ओठीं। कवणालागीं कदापिही।।८६।। सद्गुरुमूर्ति न विसरती। रात्रंदिवस सेवा करिती। निष्काम निर्लोभें झिज़विती। शरीर आपुलें निरंतर।।८७।। आज्ञेपरी करिती वर्तन। न चुकती कदापि त्यांत ज़ाण। ज़री ज़ाऊं लागला प्राण। आज्ञा नुल्लंघिती अणुमात्र।।८८।। ज्यासी असे गुरुभक्ति थोर। तो नुल्लंघी आज्ञेसी अणुमात्र। गुरुवीण त्यासी न दिसे भूवर। अन्य वस्तू श्रेष्ठ कधीं।।८९।। एवं करिती गुरुभक्ति अनिवार। नाहीं बैसती कदापि समोर। बोलतां सद्गुरूंचें वदन मनोहर। न बघतां मान वांकविती।।९०।। भयभक्ति नम्रता शांति। मृदुभाषण करिती प्रीतीं। कांहीं बोलतां प्रत्युत्तर न देती। कार्यावीण कदापिही।।९१।। बाष्कळ भाषण न करिती किंचित। सदा परमार्थीं लाविती चित्त। असो आतां बोलतां बहुत। ग्रंथ वाढेल अमित पहा।।९२।। झिज़विला देह गुरुकार्यासी। साधनअभ्यास करूनि बहुवसी। पोंचले जीवन्मुक्तदशेसी। हें कथिलेंचि वरी पहा।।९३।। साक्षात्

अवतार-पुरुष यांसी। पोंचावें नलगे ब्रह्मज्ञानासी। उगीच लीला दाविती जनांसी। कथिलें येविषीं मागेंही।।९४।। आणिक नलगे सांगावा विस्तार। ग्रंथ वाढेल तेणें फार। पुढती परिसा होऊनि एकाग्र। तुम्ही सज्जन आणिक हो।।९५।। गुरु-आज्ञेपरी पत्नीसहित। राहिले संनिध सेवा करीत। कांहीं दिन लोटल्यावरी ज़ात। गुरु-आज्ञेपरी ग्रामासी।।९६।। येणें ज़ाणें करिती कधीं कधीं। घातलें मन निःसीम गुरुपदीं। तेव्हां लागली हळुहळू व्याधि। पद्मनाभ स्वामींसी।।९७।। मग कांहीं काळ ज़ातां। पद्मनाभस्वामींनीं तत्त्वतां। बहुत व्याधिग्रस्त होतां। केलें काय तें ऐका हो।।९८।। पुढें जनांसी उपदेश कराया। सांप्रदाय अधिकार द्यावा ये समया। ऐसा विचार करूनियां। शिवानंदासी पाचारिलें।।९९।। कुंदगोळाज़वळी शिरूर-ग्रामीं। गेले होते पद्मनाभस्वामी। तेव्हां योजिलें अंतर्यामीं। द्यावा अधिकार यासीच।।१००।। तेव्हां बंकापुराहुनी त्वरेंसीं। बोलाविलें शिवानंदस्वामीसी। शिरूर नामक ग्रामापाशीं। येईं म्हणोनि आज्ञापिलें।।१०१।। तेव्हां आले शिवानंदतीर्थ। पत्नीसहित लगबगें धांवत। आनंद ज़ाहला चित्तीं अमित। परस्परांसी त्या समयीं।।१०२।। मग दिधला सकलां सन्मुख। सांप्रदाय-प्रवर्तक अधिकार चोख। 'शिवानंद' हे नाम सुरेख। घातलें आपणचि प्रेमानें।।१०३।। आधींचें नांव 'शिव' हें इतुकें। गुरूंनीं ठेविलें 'शिवानंद' नाम निकें। आणि सच्चिदानंद-स्वरूप कौतुकें। किताब दिधला पहा हो।।१०४।। स्वहस्तींची मुद्रिका सुंदर। घातली यांसी प्रेमानें सत्वर। आरती करविली शिष्यकरें साचार। आणि देवविला उपदेश।।१०५।। तेव्हांपासुनी जनांसी उपदेश। देऊं लागले प्रेमानें खास। महिमा वाढली त्यांची बहुवस।

अद्यापवरी पहा हो।।१०६।। सद्गुरुसेवा केली अपार। अवर्णनीय असे ती साचार। सांगों ज़ातां सविस्तर। ग्रंथ वाढेल ही भीति।।१०७।। त्यांची पत्नी गंगाबाई। हिनेंही केली सेवा सर्वही। एके दिनीं पद्मनाभ-गुरुमाई। काय बोलिले तें ऐका।।१०८।। गंगाबाई आतां तुज़ला। काय देऊं सांग वो मज़ला। तव सेवेनें तुष्टलों मी भला। सांग झडकरी ये वेळे।।१०९।। तेव्हां बोले गंगामाता। स्मितमुख करोनि म्हणे ताता। मागतें एकच़ चरणीं आतां। अन्य न मागूं तुज़पाशीं।।११०।। अहो देवा सद्गुरुराया। पतिदान द्या मज़ सदया। संन्यास घेतील ऐसें हृदया। भय वाटे मज़लागीं।।१११।। प्रपंचामाजीं परम उदास। तेवींच़ भीति वाटे बहुवस। इतुकीच़ माझी पुरवावी आस। न घ्यावा संन्यास पतिरायें।।११२।। तेव्हां बोलिले स्वामी आपण। भिऊं नको सर्वथा ज़ाण। खचितचि तूं मेलियाविण। नाहीं घेत संन्यास तो।।११३।। तूं मेलियावरी निश्चयेंसीं। संन्यास घेईल तेचि वरुषीं। संन्यासाच़ा योग त्यासी। असे पाहीं साध्वी गे।।११४।। त्यामुळें पत्नी असे तोंवरी। संन्यास न घेतांचि भूवरी। उद्धरिले बहुत नर-नारी। गुरु-आज्ञेपरी पहा हो।।११५।। गृहस्थाश्रम-धर्म असे कैसा। हें आपण करोनि साहसा। अन्यासि शिकविलें उत्तम परियेसा। यथाप्रकारें हो सर्व।।११६।। पत्नी मेलियावरी सत्वरी। घेतला संन्यास हरिहरा-माझारीं। 'शिवानंदतीर्थ' हेंचि नाम धरी। काय कारणें तें ऐका।।११७।। संन्यास घेतां आणिक एक। नामकरण व्हावें देख। परि यांसी शिवानंदचि सुरेख। पूर्वाश्रमींच़ें नांव असे।।११८।। कीं मायबापें 'शिवचि' ऐसें। नाम ठेविलें होतें खासें। 'शिवानंद' हें ठेविलें असे। पद्मनाभतीर्थ यांनीं हो।।११९।। सद्गुरूंनीं घातलें ज़ें नाम।

तें असे उत्तमाहूनि उत्तम। तें काढूं नये ऐसा नेम। म्हणोनि तेंचि ठेवियलें।।१२०।। 'तीर्थ' इतुकें परंपरा नाम। घातलें घेतां संन्यासाश्रम। 'शिवानंदतीर्थ' हेंचि उत्तम। दरेक अध्यायीं कथिलेंसे।।१२१।। माझ्या मोक्षगुरूचें नाम। याचें सहजचि मजला प्रेम। आणि धर्मगुरु आनंदाश्रम। हेंही प्रियचि मजलागीं।।१२२।। दोन्ही डोळे माझेचि म्हणोनि। दोहोंसी सारिखें रक्षावें जपोनी। तैसे आमुचे सद्गुरु दोन्ही। एकरूप असती माझेचि।।१२३।। म्हणोनि अध्यायाच्या शेवटीं। दोघांचें नाम बोलिलों ओठीं। त्यांची मजवरी कृपादृष्टी। त्यांनींच ग्रंथ वदविला।।१२४।। तेचि माझे ज्ञानचक्षु। त्यांनीच कथिला ग्रंथ विशेषु। निमित्तमात्र करोनि गुरुदासु। त्यांनींच केलें सारें हें।।१२५।। असो एवं दोन्ही गुरुवर। एकचि असती साचार। यांत संशय न घ्यावा अणुमात्र। सकल श्रोत्यांनीं पहा हो।।१२६।। यापरी आमुचे गुरुवर। शिवानंदतीर्थ-स्वामी साचार। यांचे सद्गुण असती अपार। शांतिसागर ते जाणा।।१२७।। स्वधर्मापरी करिती वर्तन। अंतरीं प्रेम भरलें पूर्ण। राजा-रंक सर्वही समान। सारें ब्रह्मचि बघती ते।।१२८।। एके काळीं होन्नावरासी। आनंदाश्रमस्वामी सहजेंसीं। आले असतां त्या समयासी। हेही होते त्या ग्रामीं।।१२९।। तेव्हां आम्हां सारस्वतांसी। बोलिले तुम्हीं निजमठासी। अवश्य जावें गुरुदर्शनासी। अंतरीं प्रेम धरोनियां।।१३०।। तुमच्या धर्मगुरूसी तुम्ही भजतां। संतोष होय आमुच्या चित्ता। ऐसें बोलुनी सारस्वत-भक्तां। पाठविलें स्वामींच्या संनिधीं।।१३१।। आणि आपणही घ्यावें दर्शन। म्हणोनि निघाले होते एक दिन। तेव्हां कुणीं सांगितलें येऊन। येथेंच भेट घ्यावी हो।।१३२।। कीं आतांचि जावया ग्रामांत। निघाले असती स्वामी खचित। आपुल्याच

द्वारावरुनी ते ज़ात। येथेंचि आपण भेटावें।।१३३।। इतुकें ऐकतांक्षणीं। भेटायासी प्रेमेंकरोनि। नारळ आरती घेऊनि। तिष्ठत राहती सडकेवरी।।१३४।। येतां पालखी श्रीस्वामींची। आरती करूनी प्रेमें साची। चरण वंदोनि गुरुमाय आमुची। आली फलमंत्राक्षता घेऊनियां।।१३५।। एवं आमचे मठाचे स्वामी। यांवरी प्रीति अंतर्यामीं। ठेवुनी अन्यांसी म्हणती तुम्ही। धरा प्रेम त्यां ठायीं।।१३६।। आतां हें चरित्र लिहाया। उत्तेजन मज़ला देऊनियां। लिहविला ग्रंथ मज़कडूनियां। प्रेमपूर्वक त्यांनीं हो।।१३७।। एवं त्यांचा हेतु इतका। ज़री आपुला उपदेश घेतला निका। तरीही तुम्ही विसरूं नका। निजगुरु-मठालागीं हो।।१३८।। आपल्या धर्मगुरूसी विसरतां। पाप लागे पहा समस्तां। त्यांच्या कृपेवीण तत्त्वतां। आमुची कृपा नच होय।।१३९।। ते व आम्ही एक असूं निश्चयें। त्यांसी विसरतां आम्हां न साहे। त्यांच्याचि प्रसादें आमुचें दर्शन हें। लाभलें खचित ना शंका।।१४०।। हाचि मुख्य हेतु त्यांचा। म्हणोनि सांगती तो आम्हां साचा। कीं धर्मगुरूंसही भज़ावें तुमच्या। मनःपूर्वक पहा हो।।१४१।। ऐसी माझी सद्गुरुमाय। शिवानंदस्वामी सदय। आणि आनंदाश्रम-गुरुवर्य। करिती ग्रंथ संपूर्ण पहा।।१४२।। आतां यावरी येईल प्रश्न। कीं आमुचे ज़ातीचे स्वामी असोन। कां ज़ावें अन्य स्थळीं आपण। आत्मज्ञानासाठीं हो।।१४३।। तरी ऐका त्याचें उत्तर। आत्मज्ञानासी करावा गुरुवर। त्यावीण न पावे कवणही नर। आत्मज्ञानातें निश्चयेंसी।।१४४।। ज़ैसा मुलीसी अमुकचि भ्रतार। ऐसें लिहिलें विधीनें साचार। तोचि तिला वरी निर्धार। अन्य न वरी कदापिही।।१४५।। तैसें येथें असे ज़ो साधक। त्याच्या लल्लाटीं 'नियत गुरु' सम्यक। विधीनें लिहिला असे ज़ो देख।

त्यासीच़ शरण ज़ाय तो।।१४६।। परि धर्मगुरु कुलदेव यांसी। विसरूं नये धरावें मानसीं। तरीच़ होय मोक्ष साधकासी। नाहीं संशय यामाजीं।।१४७।। दोन्ही पाय असती आपुले। एक तोडितां च़ालाया न ये च़ांगलें। तैसे दोन्ही श्रीगुरु वहिले। वंद्यचि असती आपणांसी।।१४८।। एकासी ज़री विसरे हें मन। तरी होय परमार्थ कठिण। यांत न धरावा अनुमान। सत्य सत्य त्रिवाचा।।१४९।। एवं आमुची श्रीगुरुमाय। शिवानंदतीर्थ स्वामी सदय। यांची महिमा अवर्णनीय। साक्षात् अवतार शंकराच़ा।।१५०।। कित्येक म्हणती अवतार दत्ताच़े। सर्वही देव एकचि साच़े। एवं अवतार परमेश्वराच़े। नाहीं संशय यामाजीं।।१५१।। म्हणोनि सांगूं येविषीं अणुमात्र। कीं शिवानंदस्वामी गुरुवर। यांनीं संन्यास घेतल्याउपर। बांधिला मठ हरिहर-ग्रामीं।।१५२।। भक्तजनांच्या विनंतीवरोनी। मठ बांधिला हरिहर-स्थानीं। शंकराचार्य शारदांबा आणि। दत्तात्रेय मूर्ति स्थापिल्या।।१५३।। कुंदगोळीं शारदा-शंकराचार्य। मूर्ति स्थापिल्या मठांत रमणीय। 'शारदा मठ' नाम देती गुरुवर्य। त्या मठासी पहा हो।।१५४।। हरिहर मठासी 'ॐ कार-मठ'। नाम ठेविलें परम श्रेष्ठ। असो सांगूं आतां स्पष्ट। महिमा त्यांची ये समयीं।।१५५।। हरिहर-ग्रामींच़ा एक ब्राह्मण। रघुनाथशास्त्री नामाभिधान। एकेकाळीं वाडीसी ज़ाऊन। राहिला कांहीं कालवरी।।१५६।। रहावें येथें एकान्तस्थळीं। ध्यानादि करोनि येवेळीं। काल घालवावा देवाज़वळी। एक वर्ष आनंदें।।१५७।। म्हणोनि राहिला कांहीं दिवस। श्रीक्षेत्र नरसोबावाडीस। तेव्हां दृष्टांत ज़ाहला तयास। काय तो ऐका सांगेन।।१५८।। स्वामी श्रीनृसिंहसरस्वती। म्हणती शास्त्री यासी ज़ा तूं निश्चितीं। हरिहर-मठासी स्वामी ज़े असती।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

तेचि मी ज़ाण निर्धारें।।१५९।। मग शास्त्री होतां जागृत। होय मानसीं परम विस्मित। तत्काळ गेला हरिहरा धांवत। सद्गुरूसंनिध प्रेमभरें।।१६०।। यापरीच़ ऐका आणिक। संन्यास घ्यावयाच्या समयीं देख। क्षेत्रस्थानें फिरावया सम्यक। गेले शिष्यांसमवेत।।१६१।। कालटी इत्यादी स्थळें फिरोनी। शिवानंद माउली सद्गुणी। कुरवपुरासी आली झणीं। प्रेमपुरःसर त्या समयीं।।१६२।। तेव्हां एक नवल वर्तलें। हेजीब रामू या नामें ते वेळे। यांच़ा एक भक्त तेथें लडिवाळें। राहिला होता एकांता।।१६३।। त्यासी पहांटे ब्राह्मीं-मुहूर्तीं। दृष्टांत झाला तो ऐकावा श्रोतीं। एकाग्र करोनि सावध मती। सांगूं आतां लवलाहें।।१६४।। कीं श्रीपादश्रीवल्लभ स्वामींनीं। आणि शिवानंदतीर्थ सद्गुरूंनीं। भेट दिधली पहा दोघांनीं। हेजीब रामूलागीं पैं।।१६५।। बैसले दोघे ज़वळी ज़वळी। शिवानंद श्रीपाद तये वेळीं। रामूसन्मुख बैसुनी न्याहाळी। श्रीपादवल्लभ प्रेमभरें।।१६६।। बोलिले सद्गुरु-श्रीपाद। कीं मीचि असें शिवानंद। माझ्याचि अवतार तो शुद्ध। सत्यवचन हें असे पहा।।१६७।। तेव्हां रामू होऊनि जागृत। ज़ाहला मानसीं परम विस्मित। तोंच़ आले शिवानंदतीर्थ। शिष्यांसमवेत त्या स्थळीं।।१६८।। रामूस होय परमानंद। म्हणे देवा गुरुराया तव पद। विसरलों मी मतिमंद। विदित न मज़ला दत्तचि तूं।।१६९।। ऐसें म्हणोनि घातलें दंडवत। महिमा अपार तुझी बा सत्य। प्रभो गुरुराया ऐसें म्हणत। कथिला वृत्तांत सकलांसी।।१७०।। अन्य बाईसी तेचि दिनीं। दृष्टांत झाला शिवानंदांनीं। काढविली पालखी ते दिनीं। हेंही सत्य झालें पैं।।१७१।। हेचि स्वप्नींच़े महाराज। पालखी काढविते झाले आज़। तेव्हां तिज़ला पडला उमज़। परम आश्चर्य तिज़

वाटे।।१७२।। एवं साक्षात् दत्तावतार। नाहीं यांत संशय अणुमात्र। वर्णितां महिमा ग्रंथ अपार। वाढेल हेंचि भय वाटे।।१७३।। म्हणोनि कथिलें किंचित महिमान। असती एकचि आमुचे दोन। शिवानंद- आनंद सद्गुरु दयाघन। नाहीं संशय यामाजीं।।१७४।। त्यांसी आतां करोनि नमन। करूं सारा ग्रंथ संपूर्ण। दोघे एकरूपचि परिपूर्ण। परब्रह्म परमात्मा।।१७५।। असो आज़वरी नवही आश्रम। यांचें चरित्र वर्णिलें सुगम। पुढील अध्यायीं बोलूं उत्तम। श्रीगुरुपरंपरा-भजन पहा।।१७६।। परमहंस-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ केवळ परब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें पंचपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१७७।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। पंचपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१७८।। अध्याय।।५५।। ओंव्या।। १७८।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति पंचपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीगुरुपरंपरायै नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। परिज्ञानाश्रम श्रीगुरु शंकर। परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु।। केशव वामन कृष्ण पांडुरंग। आनंदाश्रम कल्पतरु।।ॐ।।ॐ।।ॐ।। जयजया जी सद्गुरुराया। नवही आश्रमां तुमच्या पायां। आणि आमुच्या श्रीगुरु सदया। करितों नमन आतां मी।।१।। गुरुपरंपरेसी करोनि वंदन। करूं आतां ग्रंथ संपूर्ण। एक एक अक्षरेंकरोन। स्तुति करूंया आपण हो।।२।।

परिज्ञानाश्रम-श्रीगुरुराया। त्वां अवतरुनी धरणीं या। सारस्वतांसी दिधलें आश्रया।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३।।

रिता ठाव तुज़वांचोनी। नाहीं निश्चयें साऱ्या त्रिभुवनीं। आलासि भक्तांस्तव सगुण होउनी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४।।

ज्ञानदान करावयालागीं। महादेवचि तूं आलासि हो जगीं। रूप धरोनि संन्यासी योगी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।५।।

नाम तुझें हो गोड रुचिकर। वदतां चित्तीं आनंद थोर। महिमा तुझी असे अपार।
ऐशिया तुज़ला नमन असो।।६।।

श्रमलासि बहुत भक्तांसाठीं। घडिघडी रक्षिलें तयां संकटीं। ठेविली पूर्ण कृपादृष्टी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।७।।

मठ स्थापुनी भंडिकेरीसी। राहिलासी जन उद्धरावयासी। परंपरा वाढली तव कृपेसरशी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।८।।

श्रीगुरुनाथा तूं भक्तमेळा। सकाम निष्काम सांभाळिला। नाहीं स्वार्थ अणुमात्र आपुला।
ऐशिया तुज़ला नमन असो।।९।।

गुह्य ज़ें निजात्मज्ञान। तेंही दिधलें सद्भक्तांलागून। न करवे देवा माझ़ेनि वर्णन।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१०।।

रुसला ज़री भक्त तुज़वरी। तूं न क्षोभसी अणुमात्र त्यावरी। अधिकचि प्रेम करिसी निर्धारीं।
ऐशिया तुज़ला नमन असो।।११।।

शंकराश्रमा श्रीगुरुनाथा। तूंचि सर्व जगाचा त्राता। तूंचि सर्व कर्ता करविता।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१२।।

करितां तुझी स्तुति बापा। चुकती जन्ममरणांच्या खेपा। दाविला जना मार्ग सोपा।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१३।।

रमविलें कैसें भक्तांचें मन। गुरुप्रेमांत क्षणेंच ओढोन। लोहचुंबकापरी तूं ज़ाण।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१४।।

परिज्ञानाश्रम तृतीय आश्रमा। अगाध असे तुझी महिमा। वर्णवेना अज्ञां आम्हां।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१५।।

रिपु सहाही क्षणेंचि दवडुनी। भवभय तोडिसी भक्तांचें तूं झ़णीं। काय तुझी अगाध करणी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१६।।

ज्ञानामृत पाज़ुनी सकलां। दाविलें लगबगें निजस्वरूप डोळां। भोगविला स्वानंदसुखसोहळा।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१७।।

नामस्मरण करितां तुझें बा। मोक्ष सन्मुख राहे उभा। काय वर्णावी नामाची शोभा।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१८।।

श्रवण करितां तुझे सद्गुण। दुर्गुण नासती आमुचे संपूर्ण। अगाध महिमा तुझी ज़ाण।
ऐशिया तुज़ला नमन असो।।१९।।

मनीं चिंतितां तुझी मूर्ती। अणुमात्र चिंता न ये चित्तीं। तूं मी एक होय निश्चितीं।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२०।।

शंकराश्रमा चतुर्थ गुरुवरा। तूंचि सर्व जनांसी आसरा। होउनी,भार वाहिला सारा।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२१।।

करुणासागरचि तूं एक। समानचि तुज़ला सकळिक। भेद नसे राजारंक।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२२।।

रवि दे प्रकाश सर्वां समान। तैसी तव कृपा सदा प्रसन्न। ना बघसी भक्ताभक्त म्हणोन।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२३।।

सकाम निष्काम दोन्ही भक्तांसी। सारखाचि तूं प्रसन्न होसी। एवं सर्व समान तुज़सी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२४।।

दर्शन घेतां तुझें देवा। नासे सारा प्रपंच-ठेवा। चित्त शुद्ध होय तेव्हां।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२५।।

'गुरुराज मी' ऐसा अभिमान। नसे तुज़ला अणुमात्र ज़ाण। सारें ब्रह्मचि तुज़लागोन।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२६।।

रुदन करितां बालकें माय। लगबगेंचि धांवुनी ज़ाय। तैसा तूं धांवलासि रक्षाया सदय।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२७।।

केशवाश्रमा सद्गुरुराया। उद्धरिलें सकलां येउनी अवनीं या। देह झिज़विला भक्तांस्तव सदया।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२८।।

शरण ज़ो येई त्यासि न दवडिसी। परमार्थाची गोडी लाविसी। उबग नसतां घडिघडी बोधिसी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।२९।।

वर्णाश्रमविहित कर्म। शिकविलें देवा सर्वां उत्तम। किती शुद्ध तुझें प्रेम।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३०।।

वामनाश्रमा श्रीसद्गुरुवरा। दाविला सुमार्ग जनांसी तूं खरा। सीमा नाहीं तव उपकारा।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३१।।

महिमा असे तुझी अपार। कैशी वर्णूं मी अज्ञ पामर। कर्ता करविता तूंचि साचार।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३२।।

प रि ज्ञा ना श्र म शं क र स द्गु रु

नसे तुज़ला मानावमान। निंदा स्तुति दोन्ही समान। निजानंदीं सदा मग्न।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३३।।

कृष्णाश्रम सद्गुरु माउली। सद्भक्तांसी निश्चयें पावली। नानापरी लीला दाविली।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३४।।

षट् संपत्ति तुझिया चरणीं। लोळती आपणचि स्वयें येउनी। साऱ्या सद्गुणांची खाणी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३५।।

नच करिसी तूं कवणावरी द्वेष। अथवा प्रीति नाहीं विशेष। ऐसा तूं ब्रह्मचि निर्विशेष।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३६।।

पांडुरंगाश्रमा श्रीगुरुराजा। अवतरलासि तूं भक्तकाज़ा। साक्षात् दत्तात्रेयचि माझा।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३७।।

डुरकाळ्या घालुनी मीपणाच्या। विषय सेवाया धांवतों साऱ्या। ज्ञानखड्गें नाश करिसी अहंपणाऱ्या।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३८।।

रंगलासी निजप्रेमामाझारीं। सर्वत्र बघसी ब्रह्मचि निर्धारीं। परि अतिदक्ष स्वधर्मव्यवहारीं।
ऐशिया तुज़ला नमन असो।।३९।।

गर्व न धरिसी अणुमात्र अंतरीं। शांत हृदय तुझें असे भारी। सकलां आधार तूंचि भूवरी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४०।।

आनंदाश्रम श्रीगुरु सदया। आलासि जना उद्धरावया। देह झिज़विसी भक्तकार्या।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४१।।

नंदकुमर श्रीकृष्णचि आला। चित्रापुर-ग्रामीं अवतरला। स्वलीलेनें भक्तसमूह आकळिला।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४२।।

दाविला सन्मार्ग निजभक्तांसी। लोभ न धरितां अणुमात्र मानसीं। प्रवचनद्वारें सकलां बोधिसी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४३।।

श्रद्धासंपन्न केलें जनांसी। प्रवचनबळानें आपुल्या परियेसीं। प्रेमेंचि जनांचें मन आकर्षिसी।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४४।।

मन हें तुझें किती कोमल। न दुखविसी कवणातें तूं दयाळ। युक्तीनें लाविसी सुमार्गीं सकळ।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४५।।

करिसी धर्मजागृति सत्वर। आळस नाहीं तुज़ अणुमात्र। सर्वां सांवरिसी वारंवार।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४६।।

लक्ष देउनी सारा समाज। समदृष्टि ठेवुनी सकलांवरि सहज़। करिसी रक्षण देवा आज़।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४७।।

परिस-संगें लोह होय सुवर्ण। तैसा तूं निजभक्तांलागुन। सहवास करितां होय ज्ञान।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४८।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकरसद्गुरु

तदाकार होतसे मन हें। तुझें नाम घेतां पाहें। महिमा अपार तुझी गुरुमाये।
ऐशिया तुज़ला नमन असो।।४९।।
रूप पाहतां तुझें सुंदर। आणिक नच येती विचार। 'मी ब्रह्म' ऐसा होय निर्धार।
ऐशिया तुज़ला नमन असो।।५०।।
ऐसे तुम्ही गुरुमहाराज। नऊ आश्रम झाले आज़। केलें आम्हां भक्तांचें काज़। अति उत्साहें हो पाहीं।।५१।। नवरत्नांचा सुंदर हार। कंठीं धरितां प्रेमपुरःसर। मुखावरी तेज अपार। विलसे निश्चयें श्रोते हो।।५२।। कैसें पहा तुम्ही आतां। नऊही आश्रम एकचि तत्त्वतां। नऊ रत्नें आलीं हातां। परम प्रेमळ हो पाहीं।।५३।। ज़े झाले आठही आश्रम। नवव्या आश्रमीं तेंचि प्रेम। भरलें पूर्ण तेथें उत्तम। नाहीं संशय यामाजीं।।५४।। साखरेच्या बाहुल्या अनेक। त्यांसी नाना रंगरूप देख। परि गोडी त्या सर्वांची एक। न होय वेगळिक कदापिही।।५५।। तैसें आठही आश्रमांचें प्रेम। एकचि असे शुद्ध परम। आतां ज़े आनंदाश्रम। त्यांतही तेंचि प्रेम वसे।।५६।। त्यांची मूर्ति बघतां उत्तम। सर्वही येती त्यांत आश्रम। एवं सर्वांचें एकचि प्रेम। सत्य सत्य त्रिवाचा।।५७।। नऊ आश्रमांचीं नवरत्नें सुंदर। त्यांचा आनंदाश्रम सुकुमार हार। घालितां कंठीं मनोहर। आणिक कांहीं नलगेचि।।५८।। कंठीं म्हणिजे हृदयीं धरावे। श्रीमदानंदाश्रम भावें। ऐसें करितां निजसुख पावे। अविलंबेंसीं हो पाहीं।।५९।। नऊही आमुच्या मठाचे स्वामी। ब्रह्मज्ञानी अंतर्यामीं। म्हणोनि त्यांसी म्हणतों आम्ही। नऊ रत्नें हीं सुंदर पैं।।६०।। सर्व मिळोनि एकचि हार। 'रत्नांचा हार' म्हणती त्या नर।

तैसे नऊ आश्रम नऊ रत्नें थोर। त्यांचा हार ऐका हो।।६१।। नऊ आश्रम मिळोनि एक। आनंदाश्रम हार सुरेख। एवं नवरत्नांचा निश्चयात्मक। आनंदाश्रमचि हार पहा।।६२।। नऊ रत्नें पृथक् पृथक्। गुंफितां सुवर्णीं हार एक। सर्वांची कांति देख। एकचि दिसे निश्चयेंसीं।।६३।। तैसे नऊही आश्रम। रत्नें हींचि वेगळीं उत्तम। ज्ञानसुवर्णीं गुंफितां नाम। आनंदाश्रम एकचि हार दिसे।।६४।। हृदयीं विश्वास धरितां दृढतर। पोंचती निश्चयें श्रीसद्गुरुवर। सकाम निष्काम भक्तां साचार। पार घालिती सकलांसी।।६५।। असो ऐसी सद्गुरुमाउली। किती शांत सांगूं ये वेळीं। कांहीं दिवस राहतां ज़वळी। कळे सहज़चि सकलांसी।।६६।। इतुका भार घेउनी कैसे। करिती जनांचा उद्धार साहसें। काय उद्धार केला असे। सावध चित्तें परिसा हो।।६७।। साऱ्या मठाचा भार वाहती। केवळ जनांच्या कल्याणासाठीं। त्याहुनी आन कांहीं नेणती। आमुचे गुरुराज निश्चयेंसीं।।६८।। जगाचें कल्याण करावयासी। अवतार घेतला निश्चयेंसीं। संशय नाहीं ये विषयीं। प्रत्यक्ष बघतों आपण पैं।।६९।। मागें कथिलें बहुत ठिकाणां। मठ हा केवळ जनकल्याणा। यांत स्वामी सद्गुरुराणा। यांचा स्वार्थ ना कांहीं।।७०।। कुणीही म्हणेल कासया मठ। कीं भटजींचें भराया पोट। आम्हीं सोसुनी नाना कष्ट। द्यावी कासया वर्गणी ती।।७१।। तरी ऐका त्याचें उत्तर। श्रोते हो करोनि चित्त एकाग्र। आम्हांस्तव भटजी -मठ-गुरुवर। करितां विचार सहज़ कळे।।७२।। भटजी कासया ठेविले तेथ। आमुच्या पूर्वजीं सांगा त्वरित। देवाचा विनियोग व्हावा समस्त। हाचि हेतु त्यांचा पैं ।।७३।। नाना उत्सव रुद्राभिषेक। हे घडावे दिन नित्य सकळिक। भटजीवांचुनी निश्चयात्मक। कार्यें सहसा न घडती हीं।।७४।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

तेवींच भटजी पूर्वजीं ठेविले। आमुच्यास्तवचि निश्चयें सगळे। नातरी भटजी आपापुलें। भरती पोट अन्य स्थळीं।।७५।। आपुलें पोट भरावयासी। अनेक धंदे असती जनांसी। परि ते सोडोनि मठापाशीं। रहावें लागे लोकांस्तव।।७६।। अन्यांपरीच भटजी निश्चयें। धंदे नोकरी करोनि स्वयें। पोट भरतील नाना उपायें। याहुनी होतील बहुत सुखी।।७७।। पहा कैसें तें सांगूं ऐका। होत श्रीमंत अन्य उपायें देखा। व्यापार धंदा करितां निका। कधीं तरी होय श्रीमंत तो।।७८।। अथवा गेला नोकरीवरी। तेथेंही पगार वाढे वरिवरी। मग तो श्रीमंत होय निर्धारीं। हें बघतों आम्हीं अवनीं या।।७९।। सकलही ज़री श्रीमंत न होती। कुणी कुणी श्रीमंत असती। नोकरी अथवा अन्य रीतीं। होती पहा श्रीमंत।।८०।। परि येथें मठामाझारीं। नाहीं पगार- वाढ वरिवरी। मग कैंची श्रीमंती त्यां तरी। येईल सांगा कोठूनि ती।।८१।। एवं येथें आमुच्या मठासी। राहतां श्रीमंती न ये भटजींसी। हें बघतों आपण दिननिशीं। उघड्या डोळ्यांनीं ज़ाणा हो।।८२।। म्हणोनि आमुच्यासाठींच भटजी। राहती सदा मठामाजीं। आपुला स्वार्थ सोडुनी सहजीं। नाहीं संशय यामाजीं।।८३।। दावा एकही भटजी श्रीमंत। कष्ट न करितां कोण असे त्यांत। एवं भटजींस दोष देतां निश्चित। पापचि लागे आम्हांसी।।८४।। ज़री आलें म्हातारपण। तरी त्यांनीं कष्टावें आपण। म्हणोनि भटजी आम्हांस्तव ज़ाण। राहती धार्मिक बुद्धीनें।।८५।। ज़री भटजी गेले इथें तिथें। वैदिक वृत्ति त्यजूनि पहा ते। तरी धर्मकर्में समस्तें। बुडालीं असतीं सारीं हो।।८६।। मग कैंचे स्वामी कैंचा मठ। झाली नसती त्यांची भेट। सारांश- भटजींचे उपकार उत्कृष्ट। न विसंबावे कदापिही।।८७।। भटजीवरोनि आमुचा मठ।

ऊर्जितस्थितीस आलासे स्पष्ट। आणिक बोलावें न लगे श्रेष्ठ। भटजी सारे म्हणोनियां।।८८।। एवं भटजींवरोनि सद्गुरुचरण। लाभले आम्हां जनांलागून। म्हणोनि दोष न द्यावा आपण। भटजींलागीं सर्वथा।।८९।। त्यांसी देतां दोष आपण। स्वामींसीच़ तो लागे ज़ाण। यामाजीं न धरा अनुमान। श्रोते हो तुम्ही अणुमात्र।।९०।। ते ज़े स्वामींची करिती सेवा। प्रेमपूर्वक धरोनि भावा। आणि सत्कर्में पूजादि करिती देवा। निष्काम मनें प्रेमभरें।।९१।। आमुच्या मठाच्या भटजींसारिखी। निरिच्छ वृत्ति न मिळे त्रैलोकीं। कवणापाशीं न मागती कीं। दक्षिणाही सर्वथा।।९२।। कुणीही स्त्रिया भटजींकडुनी। करविती पादपूजा संनिधानीं। दक्षिणा द्यावी भटजींलागुनी। तरीच़ पुण्य लागे तयां।।९३।। परि भोळ्या-भाबड्यांसी। नसे विदित कित्येकांसी। म्हणूनि न देतां दक्षिणा परियेसीं। करविती पूजा कांहीं जन।।९४।। परि मठाच्या भटजींलागुनी। अणुमात्र स्वार्थ नाहीं म्हणुनी। दक्षिणेवीण पूजा करुनी। प्रेमपूर्वक देती ते ।।९५।। इतुकी त्यांची निःस्वार्थ वृत्ति। अंगीं असे निष्काम भक्ति। वर्णन कराया माझी मति। मंद अतितर हो पाहीं।।९६।। धन्य धन्य मठांतील भटजी। तैसेंच़ आचारी नौकर आजि। राहती ज़े ज़े मठामाजीं। विपुल पुण्य त्यांच़ें पैं।।९७।। भाग्यवान त्यांच्यासमान। नाहीं साऱ्या त्रिभुवनीं कवण। ज़े पाहती त्यांच़े चरण। तेही धन्य होती पहा।।९८।। म्हणोनि भटजींस द्यावा मान। यथाशक्ति दक्षिणा देऊन। आणि करावें सद्भावें नमन। भक्तिपूर्वक तयांसी।।९९।। श्रीकृष्णसंगें गोपाळ। रामासंगें वानरदळ। तैसे भटजी आमुच्या स्वामींज़वळ। शोभती प्रेमळ भक्त खरे।।१००।। तेचि श्रीस्वामींच़ें रक्षण। करिती मातेपरी ज़ाण। त्यांच़े

उपकार अगणित म्हणोन। न विसरावें भटजींसी।।१०१।। भक्तांची सेवा करितां आपण। पाप सारें ज़ाय नासोन। कसलीही सेवा कराया लाज़ न। धरावी चित्तीं अणुमात्र।।१०२।। ज़री प्रसंग पडला एकवेळ। भांडीं धुणीं त्यांचीं समूळ। कामें करावीं निर्लोभें सकळ। तेव्हांचि तुष्टेल भगवंत।।१०३।। एवं भटजी हे स्वामींचे भक्त। दोष न द्यावा सर्वथा त्यांप्रत। इतुकीच प्रार्थना तुम्हांप्रत। माझ्या सारस्वत-मायबापां।।१०४।। ऐशियांसी देतां दोष। त्याहुनी पाप अन्य ना विशेष। स्तवन केलिया आम्हांस। लाभेल पुण्य अमित पहा।।१०५।। पुण्य कैंचें ज़री म्हणाल। तरी पहा सेवेचें फल। आम्हांसी अणुमात्र लाभेल। स्तवितां सेवितां तयांसी।।१०६।। मठासी देतां द्रव्य विपुल। विशेष पुण्य आम्हां लाभेल। भटजींची सेवा आमुची होईल। नाहीं संशय यामाजीं।।१०७।। म्हणोनि मठासी वर्गणी अथवा। स्थिरता-फंडासी पैसा द्यावा। पुण्य पदरीं पडेल तेव्हां। आम्हां सारस्वत जनांच्या।।१०८।। तेवींच तोंबत बंधुद्वय। आणि हट्टंगडी शंकरराय। झटती वारंवार पाहोनि समय। मठाची उन्नति व्हावया।।१०९।। जेथें तेथें वर्गणीसाठीं। नेमिली पहा त्यांनीं कमिटी। हातीं कार्य घेतलें उठाउठीं। आपुल्या मठाचें प्रेमभरें।।११०।। पांडुरंगाश्रम मुक्त झालियावरी। कांहीं कारणास्तव लोकांनीं खरी। वर्गणी न देतां योग्य अवसरीं। बहुत वरुषें घालविलीं।।१११।। वर्गणी ज़री नाहीं दिधली। मठाचा खर्च न राहे मुळीं। सहज़चि कर्ज़ त्या वेळीं। झालें बहुत मठाप्रति।।११२।। तये समयीं मंगेशभट्ट। शुक्लभटजी नामें श्रेष्ठ। भोळे भाविक निष्कपट। होते ज़ाणा प्रेमळ ते।।११३।। श्रुतिस्मृत्युक्त नित्यकर्में। मठामाजीं व्हावीं जीं नेमें। लोप होऊं न देतां प्रेमें। करविलीं त्यांनीं न चुकतां।।११४।।

रथोत्सवादि नैमित्तिक। तींही कर्में करविलीं सकळिक। होता जागृत सदसद्विवेक। आपुल्या मंगेशभटजींचा।।११५।। तेवींच त्यांनीं लोकापवादा। न जुमानितां, सद्गुरुपदा। स्मरुनी केलीं सत्कर्में सदा। निर्भयचित्तें प्रेमभरें।।११६।। मठासी कर्ज होतां अपार। जनांचा गैरसमज झाला थोर। कीं मंगेशभटजी मणेगार। यांचाचि दोष हा सारा।।११७।। झाला घोटाळा समजुतीचा। साऱ्या जनांच्या मनाचा। परि विचार करितां दिसेल साचा। नाहीं भटजींचा अपराध।।११८।। खचितचि आमुचे मंगेशभटजी। जरी नसते मठामाजीं। तरी सत्कर्माचा आजि। लोप झाला असता हो।।११९।। लोकापवादा न भितां आपण। कार्यें केलीं धरोनि अभिमान। न बघती गृहस्थ जरी ढुंकोन। तरीही भार वाहिला तो।।१२०।। पहा जनांनीं न देतां वर्गणी। कार्यें सारीं करावीं तीं झणीं। तेव्हां कर्ज न करितां कुणीं। कैसीं कार्यें करावीं तीं।।१२१।। मठासी कर्ज झालें म्हणोन। मंगेश शुक्ल भटजींस आपण। दोष सर्वथा न द्यावा जाण। निरपराधी ते असती पैं।।१२२।। होते ते परम संभावित। हें वेगळें सांगावें नलगे येथ। त्यांचे सद्गुण असती ज्यां विदित। त्यांसीच कळे हें सारें।।१२३।। त्यांचें स्मरण करावें घडीघडी। इतुकी त्यांच्या संगतीची गोडी। कैसी म्हणाल तरी तांतडी। ऐका सावध सांगतों।।१२४।। जरी घेतला नसता त्यांनीं भार। मठाची अवनति होती थोर। श्रीस्वामीही निश्चयें दूर। गेले असते तीर्थाटना।।१२५।। मठामाजीं न होतां सत्कर्में। कैसे राहतील स्वामी प्रेमें। तेव्हां 'क्लब-मित्रसमाज' या नामें। प्रसिद्ध झाला असता मठ।।१२६।। म्हणोनि शुक्ल मंगेश भटजी। यांचे उपकार बहुत असती आजि। आभार मानावे जगामाजीं।

फेडाया नच होय आमुचेनि।।१२७।। असो आतां कराया वर्णन। मंदमतीसी मज़लागोन। कैंसें कळेल सांगा आपण। श्रोते तुम्ही सज्जन हो।।१२८।। माझा बंधु अण्णाजी आणि। वडील मंगेशभट्ट यांनीं। सुचविलें होतें मज़लागोनि। कीं लिहावे सद्गुण त्यांचे हे।।१२९।। परि नाहीं लिहिलें कांहीं। शुक्ल- मंगेशभटजीचें पाहीं। कीं मज़ला आठव नाहीं। पडली भूल मज़प्रति।।१३०।। ग्रंथ समाप्त होउनी बहुत। वरुषें झालीं असती खचित। पुनरपि नक्कल करावया समस्त। नाना विघ्नें आलीं हो।।१३१।। ग्रंथ पडला तैसाचि खालीं। लिहिणें न होय निश्चयें मुळीं। तेव्हां मज़ला वेळोवेळीं। वाटे कां येती विघ्नें हीं।।१३२।। तईं अवचित आठवलें मज़ला। कीं शुक्ल-मंगेशभटजी यांज़ला। विसरलों मी ये वेळां। म्हणूनी विघ्नें येती पैं।।१३३।। तेव्हां केली प्रार्थना गुरुवर-। पांडुरंगाश्रमस्वामींसी सत्वर। लिहितों त्यांचें सद्गुण थोर। करवीं ग्रंथ सफलचि हा।।१३४।। तेव्हांपासोनि पुनरपि लिहावया। स्फूर्ति उद्भवली हृदयीं माझिया। सद्गुरुइच्छा असे कैशिया-। परीची पहा श्रोते हो।।१३५।। असो हट्टंगडी[१], तोंबत[२] आदिकरोनि। यांनींही शिरीं भार घेवोनि। पुनरपि सुरू केली वर्गणी। फेडिलें कर्ज़ शीघ्र पहा।।१३६।। त्यांचेही उपकार अगणित। झाले आमुच्यावरी शाश्वत। तेवींच स्वामी लाभले आम्हांप्रत। पूर्वपुण्य हें आमुचें कीं।।१३७।। तैशा लोकां आम्हीं स्मरावें। स्मरोनि आपणही तैसेंच झटावें। तरीच सार्थक होईल बरवें। ज़ाणा आपुल्या जन्माचें।।१३८।। एवं आमुचें कल्याण व्हावया। स्वामी-मठाची उन्नति करावया। पुढें सरसावें धांवूनियां। तरीच कार्य

१. हट्टंगडी शंकरराव २. तोंबत केशवराव

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

साधेल।।१३९।। कल्याण काय होय यांत। हें मागें ज़ईंतईं कथिलें बहुत। आणिक सांगावें न लागे येथ। ग्रंथ वाढेल येणेंचि।।१४०।। एवं मठ हा आमुच्यासाठीं। आणि सद्गुरुमूर्ति गोमटी। तीचि रक्षी आम्हां संकटीं। ठेवावा दृढभाव तच्चरणीं।।१४१।। असो आतां मठ आणि श्रीस्वामी। सदा ध्यावे अंतर्यामीं। तेणेंचि इहपर सुखासी आम्ही। पोंचूं सायास न करितां।।१४२।। तेचि आम्हां अज्ञ जनांसी। भार घालितां निश्चयेंसीं। सकल कार्यांत आम्हांसी। रक्षिती निश्चयें ज़ाणा हो।।१४३।। परिसा लहानसी एक कथा। श्रीस्वामीचि आम्हां रक्षिता। कैसें तेंचि सांगूं आतां। सद्गुरुकृपें अणुमात्र।।१४४।। येचि वर्षीं मार्गशीर्षमासीं। शके अठराशें सदसष्ट वरुषीं। साधन-सप्ताह समयासी। रक्षिलें जनांसी तें ऐका।।१४५।। सप्ताहासी प्रेमेंकरून। देशोदेशींचे येती जन। धरोनि हृदयीं श्रीगुरुचरण। उत्सुकतेनें बहुतचि।।१४६।। कासरकोडापासुनी शिरालीं। मोटार जनांसी घेउनी आली। येतां संनिध ग्रामाज़वळी। काय वर्तलें पहा हो।।१४७।। एक कोस असतां गांव। मोटारीचें चाक अपूर्व। टुणुक् करोनि घेई धांव। वांकली मोटार तत्काळ।।१४८।। उडालें चाक पडलें धरणीं। मोटार तैसीच थबके स्थिरावुनी। पहा कैसी विचित्र करणी। आनंदाश्रम-सद्गुरूंची।।१४९।। ज़री उडालें चाक थोर। तरी पडली नाहीं मोटार। एकीकडे वांकली अणुमात्र। जेव्हां गेलें चाक त्याठायीं।।१५०।। पहा कैसी सद्गुरुमहिमा। न कळे ती अज्ञांसी आम्हां। कैंचीही न लागे उपमा। वर्णूं न शकों आम्ही ती।।१५१।। नातरी चाक ज़ातां उडोनि। मोटार कैसी न पडली धरणीं। अणुमात्र धक्का लागतांक्षणीं। पडे मोटार निश्चयेंसीं।।१५२।। सद्गुरुमठासी येती जन। साधनसप्ताहाकारण।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

सद्गुरूचि आला धांवून। कराया रक्षण भक्तांचें।।१५३।। म्हणोनि सद्गुरुमहिमा अगाध। भार घालुनी धरितां गुरुपद। तोचि रक्षी हें असे सिद्ध। निजभक्तांसी प्रेमानें।।१५४।। असो आज़वरी कथिलें चरित्र। सद्गुरुकृपेंचि परम पवित्र। नातरी मी अज्ञ पामर। काय ग्रंथ रचितों पैं।।१५५।। जितुकें वर्णन करावें ऐसी। इच्छा ज़ाहली श्रीगुरूंच्या मानसीं। तितुकेंचि करविलें सहज़ेंसीं। मज़ला निमित्त करोनियां।।१५६।। कर्ता करविता सद्गुरुनाथ। आम्ही मानव काय करीत। त्यांच्या इच्छेपरीच़ होत। सकल कार्य पहा हो।।१५७।। आमुच्या मनीं असे अनेक। परि सारेंच़ न मिळे सुरेख। सद्गुरुइच्छेवीण सम्यक। न होय कार्य कोणतेंही।।१५८।। निजभक्तांच्या कल्याणावांचुनी। ते न इच्छिती आन मनीं। ते ज़ें करिती कार्य धरणीं। तें हितार्थचि भक्तांच्या।।१५९।। म्हणोनि सद्गुरु आपुल्यालागीं। ज़ैसें ठेविती तैसें जगीं। त्यांतचि समाधान मानावें वेगीं। खिन्न न व्हावें अणुमात्र।।१६०।। ''अमुकें करितां प्रार्थना गुरूची। पुरविली कामना सारी त्याची। पावला तत्काळ त्याला धांवतचि। मीं काय पाप केलें पैं।।१६१।। मी इतुकें प्रार्थितों दिननिशीं। तरी कां न पावे मज़सी''। ऐसें बोलणें अपराध परियेसीं। सत्य ज़ाणा हो आमुच़ा।।१६२।। आम्हीं मानसीं धरावें दृढ। सद्गुरुमाउली प्रेमळ गोड। सर्वांच़ें सारिखें पुरवी कोड। भेद नाहीं त्यां अणुमात्र।।१६३।। ज़री न पुरवी मनोरथ। तरी तेणें हितचि होय निश्चित। अहित कदापि न करीत। कवणाच़ेंही निर्धारें।।१६४।। म्हणोनि सद्गुरु ज़ैसें ठेविती। त्यांतचि हित असे निश्चितीं। ऐसें समज़ोनि रहावें चित्तीं। अति शांत समाधानें।।१६५।। सद्गुरु हेचि आम्हांसी। तारक असती निश्चयेंसीं। शरण ज़ावें सद्भावें त्यांसी। मानावमान न धरितां।।१६६।। सद्गुरुमहिमा

असे अपार। वर्णितां उबग न ये अणुमात्र। त्यांचे गुण गोड पवित्र। तेव्हां कैंचा वीट पहा।।१६७।। सद्गुरु हा परिपूर्ण देव। त्यावीण नाहीं रिता ठाव। तोचि भरला जगीं सर्व। तीर्थक्षेत्रीं देवालयीं।।१६८।। त्यांच्या सत्तेवीण सर्वथा। पानही न हाले तत्त्वतां। सारा व्यवहार त्यांच्या हातां। कर्ता करविता तेचि पैं।।१६९।। त्यांच्या इच्छेपरीच होय। इच्छाच त्यांची आनंदमय। म्हणोनि ते जें करिती कार्य। आनंदचि असे त्यामाजीं।।१७०।। तेवींच सद्गुरु जैसें ठेविती। त्यांत आनंद मानावा निश्चितीं। सकाम निष्काम दोघांसी तारिती। नका धरूं शंका अणुमात्र।।१७१।। म्हणोनि जावें त्यांसी शरण। दृढतर त्यांचे धरावे चरण। तेणेंचि चुके जन्म-मरण। न धरा अनुमान यामाजीं।।१७२।। परमहंस आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ साक्षात् परब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें षट्पंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१७३।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां पापें नासती थोर। षट्पंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१७४।। अध्याय ।।५६।। ओंव्या ।।१७४।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति षट्पंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

।।श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्यै नमः।। श्रीगुरुपरंपरायै नमः।। श्रीभवानीशंकराय नमः।।ॐ।। जय जय सद्गुरो करुणासागरा। देईं तूंचि चित्तासी थारा। पूर्ण करीं तूंचि गुरुवरा। ग्रंथ सारा हा पाहीं।।१।। ज़री माझे अपराध अगणित। तरी तूं देवा रक्षीं मज़प्रत। तुज़वांचोनि अन्य ना निश्चित। उद्धरावया गुरुराया।।२।। आज़वरी जन्म वायां गेला। मी कोण हें विदित ना मज़ला। 'देह मी' ऐसा भाव हा भला। दृढतर वसला मम हृदयीं।।३।। तव कृपेवीण सर्वथा। नच ज़ाय देह-ममता। धांव धांव तरी आतां। कृपा करीं बाळावरी।।४।। तुज़ म्हणती भक्तवत्सल। तरी कां बा इतुका वेळ। ये ये झडकरी धांवुनी वेल्हाळ। हृदयीं माझ्या तूं देवा।।५।। तूंचि वास करितां हृदयीं। मग उणीवता नाहीं कांहीं। परिपूर्ण ज्ञान होय पाहीं। अगाध महिमा तव बापा।।६।। असो आतां श्रोते हो सज्जन। नऊही आश्रमांचें चरित्रकथन। ऐकिलें तुम्हीं प्रेमेंकरोन। एकाग्र मनें पहा हो।।७।। या साऱ्या कथा ऐकतां। अनुमान न वाटूं द्या चित्ता। कीं ह्या साऱ्या कथिल्या कथा। सत्य कीं असत्य म्हणोनियां।।८।। असत्य नव्हती कदापि ज़ाणा। अवतार-पुरुषचि श्रीसद्गुरुराणा। मग काय वर्णूं मी त्यांना। सहज़चि महिमा प्रगट असे।।९।। सद्गुरुइतुकी प्रेमळ जगांत। अन्य वस्तु नाहीं निश्चित। पहा पहा हो त्यांचें चित्त। कैसें शांत रात्रंदिन।।१०।। शांत चित्त म्हणोनि त्यांचें। बोलती ज़ें वैखरी-वाचे। असत्य न होय कधींही साचें। वाक्य निश्चयें हो पाहीं।।११।। [१]यावरी बेचाळ अध्यायामाझारीं। मंगेशभट्ट हट्टंगडी यांची अंतुरी। माझी माता राधा ही खरी।

१ हा सगळा विषय पुस्तक पूर्ण होऊन संशोधनास देतांना गेल्या वर्षीं लिहिला आहे.

यांसी दिधला आशीर्वाद।।१२।। तेणेंचि अद्याप माझी माता। सौभाग्यानें नांदे तत्त्वतां। ऐसें कथिलें होतें आतां। पुढती ऐका अणुमात्र।।१३।। कीं माझी माता राधाबाई। त्यानंतर शिवाधीन झाली पाहीं। म्हणूनि बेचाळिसाव्या अध्यायांत ही। वार्ता नाहीं कथियेली।।१४।। परि आतां सांगतों सत्य। सौभाग्यें गेली ती परलोकांत। वचन न होय असत्य। पांडुरंगाश्रमस्वामींचें।।१५।। एवं श्रीस्वामींच्या वचनें। निवर्तली मम माता सौभाग्यानें। गुरुकृपा असतां मग काय उणें। महिमा अपार त्यांची हो।।१६।। बेचाळिसाव्या अध्यायीं कथा लिहिली। तेव्हां माझी माता होती म्हणाली। कीं ही कथा ज़री तूं लिहिली। भीति वाटते मम जीवा।।१७।। कीं माझें आयुष्य किती म्हणोनि। कैसें कळेल तुज़लागोनि। ज़री बहुत वर्षें उरलें ज़गोनि। स्वामींस दोष देतील जन।।१८।। अर्थात् तिचा हेतु इतका। ज़री न मेल्यें सौभाग्यें देखा। स्वामींचें वाक्य गेलें फुका। ऐसें जन म्हणतील।।१९।। म्हणोनि ही कथा सविस्तर। लिहूं नको तूं सांगतें विचार। तेव्हां बोलिले वडील निर्धार। भिऊं नको तूं सर्वथा।।२०।। अन्यथा न होय स्वामींचें वचन। तूं ज़ाशील सौभाग्यें पूर्ण। भय नाहीं लिहाया ज़ाण। आशीर्वाद सत्य पहा।।२१।। असो खचितचि आशीर्वाद। खरा झाला स्वामींचा प्रसिद्ध। सांगाया होय परमानंद। मज़लागीं हो ज़ाणावें।।२२।। शके अठराशें सदसष्टामाजीं ज़ाणा। सौभाग्यानें पावली मरणा। पिता मंगेश अण्णाजी भट्ट यांना। मरण आलें चौऱ्याहत्तरीं।।२३।। एवं स्वामींचें वचनचि सत्य। झालें असें सांगावें न लागत। अखंड सौभाग्य हेंही प्राप्त। झालें आशीर्वादेंचि त्यांच्या।।२४।। सहासष्ट वर्षें होतां पूर्ण। गेली राधाबाई आपण। एवं अखंड

सौभाग्य पावून। गेली निघोन परलोकीं।।२५।। होती दृढतर भक्ति तिज़ला। सद्गुरुस्वामींच्या चरणकमलां। तिच्याच़ इच्छेनें ग्रंथ रचियेला। आभार तियेच़े अमित पहा।।२६।। तेवींच़ माझ़ा पिता हट्टंगडी। मंगेश अण्णाजी भट्ट याची आवडी। लिही लवकरी म्हणोनि घडीघडी। सांगत होता मज़लागीं।।२७।। परि दोघांच्याही हयातींत। ग्रंथ नाहीं झ़ाला समाप्त। याच़ा खेद वाटे बहुत। सांगावया मज़लागीं।।२८।। तैसाच़ माझ़ा बंधु अण्णाजी यानें। लिहावयासी सुच़विलें आग्रहानें। तेणेंच़ मी उत्सुक मनानें। आरंभिलें हें कार्य।।२९।। असो आतां नऊही आश्रम। यांच़ें चरित्रकथन उत्तम। ज़री संक्षिप्त तरीही प्रेम। न होय संक्षिप्त कदापि तें।।३०।। मज़ नाहीं तीव्र बुद्धि। अथवा भक्तिप्रेमाची वृद्धि। नाहीं माझ्या अंगीं, गुरुपदीं। दृढ विश्वासही नसे तो।।३१।। हें नव्हे वरपांगीं बोलणें। खचितचि मज़ला भक्तिप्रेम उणें। सद्गुरूची इच्छा तोचि ज़ाणे। कीं कधीं देईल दृढभक्ति।।३२।। तेव्हां कैंच़ा ग्रंथ सुरेख। होय सांगा मज़कडूनि देख। परि सद्गुरुकृपेंचि निश्चयात्मक। झ़ाला ग्रंथ पूर्ण खरा।।३३।। भावहीन बुद्धिहीन। ऐसा मी एक पामर अज्ञ। ऐशियालागीं गुरुकृपा कोठून। होईल सांगा श्रोते हो।।३४।। परि आमुच्या मातापित्यांच्या। भक्तिसी पावला श्रीगुरु साच़ा। पुरवावयासी हेतु त्यांच़ा। करविला ग्रंथ मज़कडुनी।।३५।। आणि माझ़िया बंधूनेंही। आग्रहें सांगितलें ग्रंथ तूं लिही। तेव्हां उत्सुकता आली लवलाहीं। मज़लागींही त्या समयीं।।३६।। आणि त्याच़ समयीं आमुच़े स्वामी। आनंदाश्रम धारवाड-ग्रामीं। आले होते तेव्हांचि मीं। लिहावया आरंभ केला पैं।।३७।। कर्मधर्मसंयोगें ज़ाण। स्वामी सद्गुरु दयाघन। प्रारंभ-समयींच़

आले असोन। दाविला ग्रंथ झाला तितुका।।३८।। माझा बंधु अण्णाजी यानें। ग्रंथ हातीं देऊनि तो म्हणे। प्रसाद द्यावा आपुल्या हस्तानें। मग बोलाविलें मज़लागीं।।३९।। सद्गुरुहस्तींचा प्रसाद। ग्रंथासहित घेतला प्रसिद्ध। तेव्हां ज़ाहला मज़ आनंद। वाढली उत्सुकता लिहावया।।४०।। म्हणोनि त्यांच्याचि कृपें ग्रंथ। झाला समाप्त हा निश्चित। सद्गुरुमहिमा अगाध असत। यामाजीं संशय ना कांहीं।।४१।। कर्ता करविता एक गुरुवर। मी काय करितों अज्ञ पामर। म्हणोनि तुम्ही श्रोते हो समग्र। अवधारा हा ग्रंथ प्रेमभरें।।४२।। ज़री अबद्ध सुबद्ध कथिलें। तरी त्यांत गुरुप्रेमचि भरलें। ऐसें ज़ाणुनी तुम्हीं आपुलें। चित्त लावावें येथेंचि।।४३।। झाले अध्याय सप्तपंचाशत। नऊ आश्रमांचें प्रेम तयांत। एकचि असुनी रूप नाम मिथ्य। ज़ाणा तुम्ही सारें हें।।४४।। आम्हां सारस्वतांचे सद्गुरू। करिती आम्हां पैलपारू। सांगती सकलां स्वधर्मविचारू। केवीं उपकारू विसरावा।।४५।। सर्वही इंद्रियें त्यांच्या भजनीं। लावावीं आम्हीं रात्रंदिनीं। तेणें पापें भस्म होऊनि। चित्त शुद्ध होय पहा।।४६।। ज़री न होय सर्व करावया। तरी चरित्र श्रवण केलिया। अथवा पठण करितां तया। चित्तशुद्धीस उशीर नसे।।४७।। करितां चरित्र श्रवण पठण। इच्छा असे ती होय पूर्ण। नाहीं यामाजीं अनुमान। धरावा विश्वास निजहृदयीं।।४८।। श्रीस्वामींची अगाध महिमा। किती सांगूं आतां तुम्हां। अधिक न वर्णवे आम्हां। अज्ञ पामरां पहा ती।।४९।। सकल अध्यायांचें सार। आठवूं पुनरपि अणुमात्र। तेव्हां हृदयीं ठसेल चरित्र। गुरुपरंपरेचें पहा हो।।५०।। प्रथमाध्यायीं मंगलाचरण। सर्व आश्रमांसी केलें वंदन। आणिक आमुचे कुलदेव मिळोन। सद्गुरुस्मरण केलें पैं।।५१।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

द्वितीय अध्यायीं नगर-संस्थानीं। आमुच्या जनांसी सद्गुरु नसे म्हणोनी। राजा क्षोभला तेव्हां भक्तांनीं। प्रार्थिला बहुवस महाबळेश्वर।।५२।। ईश्वर-पार्वती संवाद होऊनि। शंकर धांवला वेगें धरणीं। हेचि कथा सविस्तर कथोनि। तृतीयाध्याय संपविला।।५३।। चतुर्थाध्यायीं महादेव। परिज्ञानाश्रम घेऊनि नांव। सद्गुरु आला पाहुनी भाव। नगरसंस्थानीं प्रयाण करी।।५४।। पंचमाध्यायीं शृंगेरीं प्रयाण। देवीचें तेज घे आकर्षोन। शृंगेरी-स्वामी तेज घे मागोन। आणि संमतिपत्र देती पहा।।५५।। षष्ठाध्यायीं शंकराश्रमांसीं। शिष्य करोनियां परियेसीं। स्वधर्म स्थापुनी उद्धरिलें जनांसी। बांधिला मठ गोकर्णीं।।५६।। सप्तमाध्यायीं झालें कथन। निजभक्तांसी बोध करोन। घेतली समाधि परिज्ञानाश्रमांनीं आपण। झालें दुःख भक्तजनां।।५७।। शंकराश्रमस्वामी यांनीं। बंकीकोड्ल- ग्रामीं ज़ावोनि। दिधलें दर्शन भक्तांलागोनि। अष्टमाध्यायीं हीचि कथा।।५८।। नवमाध्यायीं केला बोध। ज़ो आधीं होता निंदक बद्ध। आणिक कथा असे शुद्ध। दरिद्रिया केला श्रीमंत।।५९।। कथिलें दहाव्या अध्यायामाजीं। शंकराश्रमस्वामी द्वितीय गुरुजी। ज़ाती आनंदें समाधि-शेजीं। चित्रापुर-ग्रामांत।।६०।। एकादशाध्यायीं समाधीवरती। मृत्तिकालिंग करूनि स्थापिती। तें भंग कराया निश्चितीं। अधिकारी प्रयत्न करिती महा।।६१।। पाणी घालूनि पुष्कळ पाहिलें। परि तें नाहीं विरघळलें। रक्त ओकूनियां ते मेले। ऐसी महिमा सद्गुरूंची।।६२।। द्वादशाध्यायीं परिज्ञानाश्रम। तृतीय स्वामी झाले उत्तम। सावकारकांतेसी वांचविलें परम। कृपासामर्थ्यें करूनियां।।६३।। लक्ष्मणनामें अभक्तासी। भेट होतां प्रेम उपज़े मानसीं। शरण गेला

गुरुचरणासी। बोधिलें त्रयोदशीं गुरूंनीं त्या।।६४।। जनांसी करितां बोध उत्तम। श्रीस्वामी परिज्ञानाश्रम। करोनि शिष्य-स्वीकार, निजधाम। गांठिती चतुर्दश अध्यायीं।।६५।। अनुष्ठानसमयीं शंकराश्रम। दंडावरी ज्वर ठेविती उत्तम। बोध करिती धरूनि प्रेम। शिष्य-स्वीकार पंचदशीं।।६६।। सोळाव्या अध्यायीं केलें वर्णन। वडे न भाज़ती विस्तव असोन। स्वामींस पेज़ न वाढिल्याकारण। क्षोभ झ़ाला शंकराच़ा।।६७।। पेज़ न वाढिल्याकारण। भक्तांनीं क्षमा मागितली ज़ाण। बोधूनि केलें समाधान। स्वामींनीं सप्तदश-अध्यायीं।।६८।। नरसोबावाडीच्या पुजाऱ्यासी। स्वप्न झ़ालें मी असें मल्लापुरासी। ज़ातां तेथें तुज़ आणि तव पुत्रासी। बरें होईल वदती अष्टादशांत।।६९।। मल्लापुर-समाधि उघडिती। बिल्वदळें ताजींच़ तेथें दिसती। पांडुरंगाश्रम कुमठ्यांत घंटा घेती। स्वप्नापरी एकोणिसांत।।७०।। सात वरुषांच़ें एक बाळ। वाचा नसतां करी तळमळ। त्यासी दिधली वाचा प्रेमळ। विसाव्यामध्यें केशवाश्रमें।।७१।। स्वप्नीं तेल च़ोळूनि त्वरा। केला एक गरीब भक्त बरा। आणि शिष्य-स्वीकार खरा। केला एकवीस- अध्यायीं।।७२।। कृष्णाश्रममूर्ति श्रेष्ठ। ऐसें बालपणीं कथिलें भविष्य स्पष्ट। वामनाश्रम स्वामींनीं शिष्य-पाट। दिधला बाविसाव्यामाजीं।।७३।। तेविसाव्यांत वामनाश्रमगुरूंनीं। समाधि घेतली देवीसि प्रार्थुनी। हीच़ महिमा वर्णन करूनि। संपविला अध्याय गुरुकृपें।।७४।। रामराव लाभादाय। खटला होतां वाटलें त्या भय। वामनाश्रम गुरुमाय। पावली त्यास चोविसावीं।।७५।। मुल्कीग्रामीं देऊळ बांधाया। कृष्णाश्रमांसी घालावया पाया। बोलाविलें तेव्हां मनापासूनियां। बोधिलें जनांस पंचविसीं।।७६।। सव्विसाव्यांत सद्गुण-वर्णन।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

नागरकट्टी दुर्गप्पय्यालागून। दिधली सप्तशती कराया पारायण। झालें कल्याण त्याचें पैं।।७७।। पांडुरंगाश्रम शिष्य झाले। कंठी पाहिजे म्हणोनि बैसले। शिष्याचे लाड पुरविले। बहुप्रेमानें सत्ताविसीं।।७८।। पांडुरंगाश्रम-शिष्यप्रेमास्तव। ठेविला चैत्रमासीं रथोत्सव। हीचि कथा कथिली अपूर्व। अट्ठाविसाव्या अध्यायीं।।७९।। बाज़ारकारीं केली निंदा। बाज़ारा अग्नि लागला तदा। शांत होय शरण ज़ातां गुरुपदा। कृष्णाश्रमसमाधि एकोणतिशीं।।८०।। श्रीपांडुरंगाश्रम यांचा अवतार। केल्या सगुणलीला अपार। गुरुआज्ञेपरी वर्तले निरंतर। तिसाव्यांत ही कथा।।८१।। स्वामींचें वाक्य सत्य होय शीघ्र। आणि शिराली खेडें केलें शहर। केवळ लोकहितासी समग्र। हेंचि कथिलें एकतिशीं।।८२।। बैंदूर मंगेश यावरी द्वेषें। खटला केला परियेसें। श्रीस्वामींच्या कृपाकटाक्षें। पार पडला बत्तिसांत।।८३।। तेहतीस-अध्यायीं हासगणी कुळकर्णी। हिंडला साऱ्या क्षेत्रस्थानीं। समाधान न मिळे मग स्वामींनीं। भेट देऊनि उद्धरिला।।८४।। चौतिसावे अध्यायीं एक। सावकार-सुता ज़गविलें देख। बोध केला त्यासी अनेक। श्रीस्वामी-गुरुरायें।।८५।। गणपत रामजी माने। यांची नोकरी गेली ज़ाणें। स्वामीसी प्रार्थितां मिळाली त्वरेनें। नोकरी पुनरपि पस्तिसावीं।।८६।। गोकर्ण शंकर यासी स्वामींनीं। आपण उपदेश न देतां झणीं। अन्यांच्या जपें मुक्त केला तत्क्षणीं। वाक्यमहिमा छत्तिसांत।।८७।। मंगेश भट्ट यांची कन्या। इज़सी सन्निपात झाला तो हटेना। गुरुवाक्यें काढा पाजितां ज़ाणा। ज़गली ही कथा सदतिसांत।।८८।। कुंदापुरींचा सावकार कामत। त्यावरी मिठाचा आरोप येत। स्वामींसी शरण ज़ातां त्वरित। रक्षिलें त्या अडतिशीं।।८९।।

एकोणचाळीस-अध्यायीं कथन। दुग्गप्पाशेट्टीचा हरिला अभिमान। पुनरपि घोडा गेला घेऊन। शरण जाऊन स्वामींसी।।९०।। 'अल्लीशा' नामें एक यवन। त्यावरी आलें संकट दारुण। रक्षिला त्याचा भाव बघोन। चाळिसाव्या अध्यायीं।।९१।। अल्लीशावरी पुनरपि संकट। ओढवतां रक्षी सद्गुरुनाथ। तोचि अंतीं स्वामींसी स्मरत। प्राण सोडी एकेचाळिसीं।।९२।। श्रीस्वामींच्या आशीर्वचनें। राधा राहिली सौभाग्यानें। आणि अभक्तासी दत्तदरुशनें। ओढिला प्रेमबळें बेचाळिसीं।।९३।। स्वामी पांडुरंगाश्रम झाले क्षीण। शिष्य- स्वीकारा प्रार्थिती जन। सद्गुरु म्हणती न करूं आपण। ही कथा त्रेचाळिसाव्यांत।।९४।। चव्वेचाळिसांत सद्गुरुस्वामींसी। दृष्टांत होतां पाचारूनी जनांसी। शिष्यस्वीकार-सिद्धता करा वेगेंसी। ऐसें प्रेमें आज्ञापिलें।।९५।। शिष्य-स्वीकार केला त्वरें। 'आनंदाश्रम' नाम ठेविलें बरें। पांडुरंगाश्रमस्वामी गुरुवरें। घेतली समाधि पंचेचाळिसीं।।९६।। जगीं स्वधर्म रक्षायाकारण। अवतार घेई रमारमण। हीच कथा सुलक्षण। शेचाळिसीं कथियेली।।९७।। सत्तेचाळीस अध्यायामाजीं। जगीं अवतरले भक्तकाजीं। 'आनंदाश्रम' नाम हें सहजीं। घेऊनि लीला दावियली।।९८।। बहुत श्रमें विद्याभ्यास। केला संस्कृतादि भाषांचा बहुवस। स्वामी-आनंदाश्रमें निश्चयास। धरूनि, ही कथा अठ्ठेचाळिसीं।।९९।। एकांतवास करावा म्हणोन। जाती स्वामी ग्राम सोडोन। प्रार्थुनी आणिती भक्तजन। हेंचि वर्णन एकोणपन्नाशीं।।१००।। हरिद्वार-हृषिकेशादि क्षेत्र-। यात्रा करिती परम पवित्र। कृष्णाचार्य-स्वामींकडोनि स्वतंत्र। केलें श्रवण पन्नासांत।।१०१।। गुलवाडी अंबाबाईसी भले। पांडुरंगाश्रम आनंदाश्रम स्वप्नीं भेटले। एकरूपचि आपण ऐसें दाविलें। महिमान आपुलें

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

एकावन्नीं।।१०२।। तोंबत बंधुद्वय यांना। अनुताप झाला ऐकतां प्रवचना। शरण गेले सद्गुरुचरणा। ही कथा बावन्नांत।।१०३।। 'नारायण' शूद्र एक भक्त। खटल्यांतुनी केला मुक्त। आणि सुब्राय भटजी यांप्रत। भक्ति उपज़ली त्रेपन्नीं।।१०४।। मठ स्वामी आमुच्यास्तव। म्हणोनि वर्गणी द्यावी जनांनीं सर्व। हेंचि कथिलें अपूर्व। चौपन्नाव्या अध्यायीं।।१०५।। आमुचे सद्गुरु शिवानंदतीर्थ। यांचे वर्णिले सद्गुण किंचित। अवतरले ते साक्षात् दत्त। ऐसी कथा पंचावन्नीं।।१०६।। नऊ आश्रमांसी केलें नमन। साधन-सप्ताहसमयीं रक्षिले जन। आणि भटजींचें केलें वर्णन। छप्पन्नाव्या अध्यायीं।।१०७।। माझी माता सौभाग्यें निवर्तली। स्वामींच्या आशीर्वादें भली। आणिक सकल अध्यायांचें सार समूळीं। सत्तावन्नीं काढिलें।।१०८।। असो आतां ऐसें हें चरित्र। प्रेमळ समूळ परम पवित्र। ऐकतां पढतां जन समग्र। इच्छित पावतील निश्चयें।।१०९।। करितां सप्ताह याचा खचित। सकलाभीष्टें लाभतील त्वरित। करितां पारायण दिन नित्य। दारिद्र्य फिटेल त्यांचें।।११०।। स्त्रिया, मुलें आणि शूद्र। सकलांसी असे याचा अधिकार। गुरुभक्तीच असे पवित्र। करावें पठन प्रेमानें।।१११।। ज़री असे भक्तिहीन। तरी पढतां होय तो पावन। भक्ति उपज़े, नको अनुमान। असावा निश्चय दृढतर तो।।११२।। शिरालीग्रामीं मठामाझारीं। सप्ताह करावा प्रेमें निर्धारीं। तेणें अधिकचि पुण्य पदरीं। पडेल निश्चयें ज़ाणा हो।।११३।। मठासी ज़ावया न होय अनुकूल। त्यानें जेथें असे आपुलें स्थल। तेथेंचि स्मरूनि गुरुपदकमल। करितां सप्ताह पुण्य मिळे।।११४।। सप्ताह करणें कवणे रीतीं। हेंचि कथितों धरावें चित्तीं। त्यापरी करावें निश्चितीं। प्रेमपूर्वक श्रोते हो।।११५।। प्रथम दिवशीं अध्याय आठ।

सतरा वाचावे द्वितीय दिवशीं नीट। सत्तावीस अध्यायपर्यंत। तृतीय दिनीं वाचावे।।११६।। छत्तीस वाचावे चतुर्थ दिवशीं। पांचवे दिनीं चव्वेचाळ परियेसीं। एकावन्न अध्याय निश्चयेंसीं। वाचावे सहाव्या दिवशीं हो।।११७।। सत्तावन्न अध्याय आतां। सातव्या दिनीं प्रेमानें वाचितां। सप्ताह संपूर्ण होय तत्त्वतां। गुरुपरंपराचरित्राचा।।११८।। असो आतां आणिक काय। नाहीं उरला पहा संशय। एवं हें ऐकतां पठतां होय। समाधान चित्तासी।।११९।। न धरोनि कामना पढे जो नर। त्यासी फल मिळेल पैं सत्वर। निष्कामिकांसी आत्मज्ञान शीघ्र। होईल विश्वासें पढतां पैं।।१२०।। यामाजीं नका धरूं संशय। कीं पुण्यप्राप्ति कासयानें होय। तरी ऐका धरा निश्चय। सद्गुरूचि हो पुण्यपुरुष।।१२१।। सद्गुरु-गुणगान ऐकतां पाप। नासुनी, पुण्यचि उरे अमूप। कैसें तें कळे आपोआप। विचार करितां आपणासी।।१२२।। तरी आतां बोलूं किंचित। कीं सद्गुरूंचे गुण ऐकतां अद्भुत। त्याचेंच मनन होय सतत। तेव्हां आनंदे मन आपुलें।।१२३।। तैसेंचि मन हें परम शुद्ध। होऊनि संसारीं न वाटे खेद। खेद सुटतां जाय भेद। मग परम शांति चित्तासी।।१२४।। संसारी जनांसी जेथें भेद। तेथेंचि मनासी होय खेद। खेद हाचि किल्मिष प्रसिद्ध। मनासी जाणा निश्चयें।।१२५।। तेणेंचि अन्यांचे दोष अखंड। दिसती मनासी ते प्रचंड। यामाजींच आयुष्य उदंड। व्यर्थ जातसे पहा हो।।१२६।। एवं अन्यांचें दोष पाहणें। हेंचि एक पाप मनानें। माथीं घेतलें अहंपणें। चरित्र ऐकतां तें जाय।।१२७।। पाप जातां पुण्योदय होत। तेव्हां चित्तशुद्धि होय त्वरित। चित्तशुद्धि होतां निश्चित। ब्रह्मज्ञान पावतसे।।१२८।। एवं करितां चरित्रपठण। सात्त्विक वृत्ति होय जाण।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

हेंचि एक समज़ावें पुण्य। त्याहूनि अन्य नाहीं हो।।१२९।। असो एवं चरित्रकथन। करविलें गुरुरायें मज़कडोन। त्यांनींच़ पार घातलें ज़ाण। नाहीं संशय यामाजीं।।१३०।। मीं नाहीं रचिला ग्रंथ। गुरुनाथें मज़ला करूनि निमित्त। वदविलें मज़कडुनी समस्त। सत्य सत्य त्रिवाचा।।१३१।। पहा कैसें तें सांगूं आतां। प्रारंभ करोनि या ग्रंथा। चार वर्षें झालीं तत्त्वतां। झाला समाप्त या वर्षीं।।१३२।। मी बळेंचि बैसें लिहायासी। तरी कांहीं न स्फुरे मम चित्तासी। सद्गुरुकृपेवांचूनि कैसी। कृति होय ही सांगा हो।।१३३।। कांहीं वेळां सहज़चि स्फुरे। आपैसे अध्याय होती बरे। अणुमात्र सायास न करितां त्वरें। कार्य होऊं लागे पैं।।१३४।। तात्पर्य- ग्रंथा लागला ज़ो उशीर। तो गुरुइच्छेपरीच़ साचार। त्यांनींच़ रचिला ग्रंथ सविस्तर। निमित्त करोनि मज़लागीं।।१३५।। मज़ नाहीं विद्या कवणही। बुद्धि चातुर्य अणुमात्र पाहीं। म्हणोनि लिहिलें त्यांनींच़ लवलाहीं। नाहीं संशय यामाजी।।१३६।। म्हणोनि आमुच़े सद्गुरुदेव। तेचि कर्ते करविते सर्व। वदनीं वदतां त्यांच़ें नाव। तुटे बंधन हें सारें।।१३७।। म्हणोनि ऐसा हा ग्रंथ प्रेमळ। पठण करितां नासे तळमळ। अभीष्ट प्राप्त होय सकळ। निःसंशय ज़ाणा हो।।१३८।। सकामाची कामना होय पूर्ण। निष्काम पावे आत्मज्ञान। ऐसे आमुच़े स्वामी कृपाघन। महिमा अगणित त्यांची पैं।।१३९।। दुर्जन हीन दीन अभक्त। ऐकतां वाचितां तरती समस्त। इतुकी महिमा त्यांची निश्चित। वर्णितां न पुरे मेदिनी।।१४०।। धरोनि दृढतर विश्वास चरणीं। मूर्ति धरावी अंतःकरणीं। लावावी तनु-मन-वाणी। त्यांच्या भजनीं रात्रंदिन।।१४१।। तेव्हां तोचि घालील पार। घालावा विश्वासें त्यावरी भार। करणें नलगे आणिक विचार। गुरुभक्तिवीण अन्य जनां।।१४२।।

असो आतां सकल आश्रमांसी। नमितों घेऊनि आपुल्या नामासी। आणि माझ्या सद्गुरुनाथासी। नमितों आतां सद्भावें।।१४३।। तेवींच माझी कुलदेवी। शांतादुर्गा परम लाघवी। तिज़ला वंदन करितों, शमवीं। माझिया चित्ता करुणाळे।।१४४।। शके अठराशें अडसष्ट। 'व्यय'नाम संवत्सर उत्कृष्ट। चैत्र शुद्ध रामनवमी श्रेष्ठ। बुधवारीं ग्रंथ केला संपूर्ण।।१४५।। परमहंस-आनंदाश्रम। शिवानंदतीर्थ साक्षात् परब्रह्म। यांच्या कृपाप्रसादें सप्तपंचाशत्तम। अध्याय गुरुदासें संपविला।।१४६।। स्वस्ति श्रीचित्रापुर-। गुरुपरंपराचरित्र सुंदर। ऐकतां मोक्षचि लाभे साचार। सप्तपंचाशत्तमाध्याय रसाळ हा।।१४७।। अध्याय ।।५७।। ओंव्या १४७।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति सप्तपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

तूं सर्वांगलेई सन्यासी जाव्नु आस्सूक फाव् आस्स.
सर्वांगलेई गुरु जाव्नु आस्सूक फाव् आस्स. सर्वां-
गलेई महाधिपति जाव्नु आस्सूक फाव् आस्स.
जाव्नाशिं देना, हीं श्रेंचीयां विशेषणं हांव तुका
दीना. हांव तुका सन्यासी म्हणां...., हांव तुका
गुरु म्हणां....., हांव तुका महाधिपति म्हणां.....
हांव इतलेंss म्हणतां.....तूं मजलोssचि. तूं स्वामी....
हांव तुजलोंssचि. तुका काया वाचा मनाने मजले
नमन.

तुजलोचि
[illegible]

परमपूज्य परिज्ञानाश्रम (तृतीय) स्वामिजींची संजीवनी समाधि, कार्ला

श्रीदुर्गापरमेश्वरी मन्दिर, कार्ला मठ

प्रथम वंदन श्रीगणेशासी। तैसेंची माता सरस्वतीसी। कुलस्वामिनी जगदंबेसी। अत्यादरें वंदन।।१।। वंदन माझें भवानीशंकरासी। भक्तरक्षक श्रीमहांगिरीशासी। आणिक वंदितें महालक्ष्मीसी। नत मस्तक होवोनि।।२।। नमन सद्गुरु आनंदाश्रमांसी। आणिक माझिया सिद्धारुढांसी। नमिते श्रीगुरुंच्या परंपरेसी। लीन होवोनी चरणीं।।३।। आतां वंदितें परिज्ञानाश्रमा। तयां पाहतां आनंद आम्हां। जन सौख्यासी नुरली सीमा। लाभोनियां तयातें।।४।। नऊ गुरुंना नवरत्नांची। परंपरेला रत्नहाराची। मागिल अध्यायीं उपमा साची। दिधली गुरुदासानें।।५।। परिज्ञानाश्रम शिष्य लहान। रत्नजडित पदकासमान। रत्नहारीं त्या शोभती ज़ाण। परंपरेमाजीं साजिरें।।६।। करितें मातापित्यांसी वंदना। तैसेचि सासूश्वशुरांस ज़ाणा। फिटों ना शके तयांच्या ऋणा। पूर्व पुण्यें लाभलीं।।७।। येथवरी करविलें चरित्र लेखन। माझिया जेष्ठची भगिनीकडोन। ज़ाहले अध्याय सत्तावन्न पूर्ण। सकळिकांच्या कृपेनें।।८।। तैसीच़ द्यावी मज़ला स्फूर्ती। गाईन मीही श्रीगुरु कीर्ति। कर ज़ोडोनी तुम्हां प्रार्थी। मंदमती मी पामर।।९।। देवोनियां मज़ला सुबुद्धी। करवावी ती ग्रंथवृद्धी। तेणें होईल कार्यसिद्धि। आशीर्वचनें तुमचिया।।१०।। च़ालेल कैसी माझी झ़रणी। तुमच्या कृपेवांच़ोनी। काठीविना च़ालोनी। ज़ाय कैसा जन्मांध।।११।। म्हणोनी सकलांसी माझी प्रार्थना। उत्स्फूर्त करावें मज़ लेखना। करा मज़वरी तुम्ही करुणा। प्रेमभावें सकलही।।१२।। शेवटीं नमितें श्रोते सज्जन। ऐका चित्तें सावधान। अध्याय असे हा परि नूतन। लिहावयासी घेतला।।१३।। एक रात्रीं भासे मज़ला। कीं गुरुंनीं आदेश दिधला। घेई आतां लिहावयाला। नूतन अध्याय सत्वरीं।।१४।। येथवरी लिहिली सुरम्य कथा। वर्णियेली नऊ गुरुगाथा

दशम ज़ाणे उरली आतां। श्रीपरिज्ञानाश्रमांची।।१५।। ज़ाहला असे शिष्यस्वीकार। सोहळा तो अपूर्व फार। लिही बाई त्याचें सार। ऐसी आज्ञा ज़ाहली।।१६।। शिरसावंद्य ती मानियली। गुरुंची आज्ञा ऐकियली। लेखनासी सुरुवात केली। ऐका श्रोते प्रेमळ।।१७।। जय जयाजी स्वामीराया। आनंदाश्रम श्रीसद्गुरु सदया। शरण आलें मी तव पायां। वरद हस्ता शिरीं ठेवा।।१८।। नाहीं केली कधीं भक्ती। कैंची मिळावी मग मज़ मुक्ती। परि ऐकोनी तव मुखोक्ती। मनःशांती लाभली।।१९।। भवार्णवीं मी बुडालें खास। विसरोनियां निजरूपास। आधार द्यावा बुडत्यास। तव कृपेचा तरावया।।२०।। आतां माझें हेंची मागणें। कर ज़ोडोनी तव पदीं ज़ाणे। कीं मम हस्तें कथा लिहविणें। स्फुर्ती मज़ला देवोनी।।२१।। कृपा असावी मज़वरी ताता। आरंभ करितें लिहिण्यासी कथा। ऐका प्रेमळ श्रोते आतां। चित्त करोनी एकाग्र।।२२।। कथा आहे सुरस सुंदर। ऐकावी हो तुम्ही सादर। निवारण होतील चिंता पार। लाभेल शांती मानसा।।२३।। चित्रापुरींचा पवित्र मठ। असे सारस्वतांचें धर्मपीठ। बहु मानिती धर्मनिष्ठ। अत्यादरें करोनियां।।२४।। करावयासी धर्मरक्षणा। लावोनी तयांचे प्राण पणा। गुरुपरंपरा झ़टली ज़ाणा। आज़वरी बहुतची।।२५।। परिज्ञानाश्रम आदी करोन। दशम गुरुंचें दशक पूर्ण। सारस्वतांचे पूर्व पुण्य। म्हणोनियां तें लाभलें।।२६।। करोनियां सद्धर्म जागृती। संत सद्गुरु जन उद्धरिती। विस्तारोनि शिकविती। मर्म सनातन धर्माचें।।२७।। ऐशा दिव्य परंपरेचे। नवम गुरु ज़े असती आमुचे। आनंदाश्रम नाम तयांचे। महाज्ञानी थोर ते।।२८।। असती आतां मठाधिपती। लोककल्याणास्तव झ़टती। करोनियां शिष्यस्वीकृती। मठ परंपरा रक्षिती।।२९।। बुडालों आम्ही

मोहांधकारीं। परि तिमिरातें गुरु नाश करी। दिव्य प्रकाश तोची पसरी। ज्ञानदीप लावोनी।।३०।। संसारांत आमुचें लक्ष। तोच आम्हां मूढां मोक्ष। परि स्वामी निरपेक्ष। मार्ग आम्हां दाविती।।३१।। गुरु असे ज्ञातीचें भूषण। जगीं नसे गुरुवीण। अन्य दुजेंची वरदान। पूज्य होय सकलांसी।।३२।। सद्गुरु आमुचा माता पिता। तोचि रक्षितो आम्हां सर्वथा। गुरुविना कवणाही अन्यथा। आत्मज्ञान लाभेना।।३३।। दुस्तर असे भवसागरू। भक्तीरूपी उभें तारूं। सद्गुरु तो कर्णधारू। निवृत्ती तटासी नेतसे ।।३४।। कलियुगीं नरदेह प्राप्ती। अति दुर्लभ ती श्रीगुरुभक्ती। पुण्यें लाभे सत्संगती। ब्रह्मादिकां जी दुर्लभ।।३५।। ऐसी ही सुखप्राप्ती। मृत्युलोकीं देव वांछिती। नाथ वर्णिती भागवतीं। गुरुमाहात्म्य ऐसें तें।।३६।। माता जैसी बालकाला। तैसे सद्गुरु प्रिय शिष्याला। सदा संभाळिती तयाला। प्रेमामृत पाजोनी।।३७।। दुखविती ना तयाच्या भावना। परि रुजविती सद्भावना। पूर्ण करिती मन कामना। वात्सल्यातें स्वीकारुनी।।३८।। शिष्य जरी असे अज्ञ। त्यासी करिती स्थितप्रज्ञ। करिती तयासी सर्वज्ञ। दशेंद्रियांसी जिंकवुनीं।।३९।। काया, वाचा आणिक मन। कैसे आवरावे दृढ धरोन। तुटों न द्यावें अनुसंधान। प्रेमें शिकविती शिष्यासी।।४०।। जीव परमात्मा दोन्ही एक। श्रुती वचनें सांगती चोख। ऐक्य भोगणें परमात्म सुख। विज्ञान सम्यक त्या नांव।।४१।। षड्रिपूंसी जिंकविती। अहंकारातें भस्म करिती। कर्म अकर्म तया बोधिती। निजात्म दर्शन करवोनी।।४२।। ऐसें श्रीआनंदाश्रम स्वामी करिती। प्रिय शिष्यासी सिद्ध बनविती। भक्तांसाठीं ऐसा उजळिती। गुरुपरंपरादीप उज्ज्वल।।४३।। गुरुशिष्यांची गोड ही कथा। निवारील ती भवभय चिंता। सावध करोनि तुमच्या चित्ता। ऐका श्रोते हो

पुढती।।४४।। आज़ ऐसाचि काळ पातला। जगीं धन दौलतीं मान चढला। देव धर्म आणिक गुरुला। मानिती ना निःशंक।।४५।। मानिती ना ते शास्त्र वेद। वृथा चाले वितंडवाद। संत सज्जनांचा सुबोध। नास्तिकांसी पटेना।।४६।। नास्तिकवादी पटवून देती। देव नसे कीं खचित जगतीं। उदय पावे मानव म्हणती। स्वबुद्धीच्या आधारें।।४७।। मानिती ना वर्णाश्रम धर्म। नाहीं उरलें क्रियाकर्म। श्रद्धा भक्ती यांचे मर्म। नुमगे हो कवणासी।।४८।। ज़ाणोनी या परिस्थितीसी। विचार पडला स्वामीजींसी। पाहिजे का सारस्वत ज्ञातीसी। धर्मपीठ जागृत।।४९।। ज़री न मानिती धर्मासी। कोण पूजील मठासी। कासया पाहिजे गुरु यांसी। संदेह वाटे गुरु मानसा।।५०।। श्रीमत् आनंदाश्रम श्रीसद्गुरु। करिती अंतरीं दीर्घ विचारू। करावा का शिष्यस्वीकारू। ऐशा दुर्घट समयासी।।५१।। परि घडली विचित्र घटना। देवोनियां दिव्य प्रेरणा। उद्युक्त केलें लोकांना। श्रीभवानीशंकरें।।५२।। श्रीभवानीशंकराचें मनांत। आला असे दुज़ाची हेत। कीं गुरुपंरपरेचें व्रत। ऐसें अखंड चालवावें।।५३।। उत्स्फूर्त करी जनमनासी। देवोनियां आशीर्वचनासी। उभी राहिली पाठीसीं। गुरुपरंपरा महान ती।।५४।। ध्यास लागतसे लोकांना। शिष्यासाठी करिती याचना। श्रीमत् आनंदाश्रम स्वामींना। पेंच पडला मानसीं।।५५।। एका मागोन एक येती। स्वामीलागीं एकच पुसती। होईल केधवां शिष्यस्वीकृती। द्यावें आश्वासन आम्हां।।५६।। पाहोनि या जनउत्साहा। आनंदले स्वामी अहा। परमेश्वराचा खेळ पहा। कैसा असे अघटित।।५७।। मग श्रीआनंदाश्रम गुरुवर। शोधूं लागले शिष्य सत्वर। दृष्टी पुढें तो येई रवीन्द्र। सान सद्भक्त तयांचा।।५८।। आणोनी तयाची कुंडली। महाशास्त्र्यांस दाखविली।

जन्मपत्रिका सुंदर ज़मली। सकल गुणें जी युक्त।।५९।। आतां ऐका रवीन्द्र कोण। शुक्ल कुलाचा असे पुत्र सुज़ाण। पिता तयाचा शंकरनारायण। माता शांताबाई असे।।६०।। नाम वेदमूर्ती शुक्ल लक्ष्मण जयांचें। पितामह ते रवीन्द्राचे। परमार्थ साधनीं चित्त आजीचें। नाम जियेचें असे कमला।।६१।। शके अठराशें एकोणसत्तरांत। पवित्र चित्रापुर ग्रामांत। ज्येष्ठमासीं कृष्णपक्षांत। रवीन्द्र बाळ जन्मला।।६२।। होतें सर्वजित नाम संवत्सर। एकादशीचा दोन प्रहर। होता मंगल रविचा वार। ठेविलें रवीन्द्र नाम तया।।६३।। बाळ होता सुकुमार। तेजःपुंज ती काया सुंदर। सरल नासिका नयन मनोहर। गुलाब फुललें ज़णुं गालीं।।६४।। शुक्लेंदु सारिखें बाळ वाढलें। आरोग्यें बहु पुष्ट ज़ाहलें। जननीचें मानस धालें। पाहोनियां बालमूर्ति।।६५।। बाळ झाला मोठा आतां। चार वरुषांचा तो पुरता। रोज़ नेई रवीन्द्राची माता। देवदर्शनासाठीं तया।।६६।। मठ असे तैं घराज़वळीं। पूजा कीर्तन वेळोवेळी। भजन चाले सांज़ सकाळीं। बाळ श्रवण करीतसे।।६७।। नित्य प्रातःकालीं ज़ाई। हस्तीं घेवोनी मोगरा ज़ुई। भावें वाही प्रभूपायीं। लीन होवोनी चरणीं।।६८।। वंदन करी भवानीशंकरासी। आणिक समस्त समाधींसी। नमित आनंदाश्रम सद्गुरुंसी। उपहारातें देवोनियां।।६९।। मग प्रसादासी ग्रहण करणें। गुरुदर्शनाविना नाहींच खाणें। नित्य नेम तयाचा ज़ाणें। कधींच न पडे अंतर।।७०।। स्वामींना ज़री उशीर ज़ाहला। बाळ उपाशी तैसा राहिला। एक ग्रासही कधीं न स्पर्शिला। स्वामीविना बालकें।।७१।। पहा कैसा तो मनसंयम। कठीण असे हा नित्यनियम। भक्ती असेची अप्रतिम। सानुल्या त्या रवीन्द्राची।।७२।। इतर बालकांची असे रीती। खाऊ पाहतां उडी घालिती। ग्रास हातींचा कोणा न देती। बाल स्वभाव

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

हा असे।।७३।। परि हें बालक असे आगळें। इतरांहुनी भासे वेगळें। मुखावरी त्या तेज झळाळे। अपूर्व त्यागबुद्धीचें।।७४।। ऐसी निष्ठा स्वामीचरणीं। मग्न व्हावें कीर्तन पुराणीं। नित्य शिकतसे सुश्लोक गाणीं। बहुत स्तोत्रें पाठ तया।।७५।। सदा सायंकाळी ज़ावें। दीपनमस्कार पाहावे। पुष्प तुळशीचे हार वाहावे। स्वामीजींच्या कंठी तेणें।।७६।। प्रसाद म्हणोनी ग्रहण करावे। स्वयेंची गळां घालोन घ्यावे। आज़ोबांशी हट्ट धरावे। पाद्यपूजा करा माझी।।७७।।सांगा तेधवां कवणासी ठावें। कीं त्या पायांची सद्गुरुसवें। पूजा होईल जीवेंभावें। भविष्यकाली इयेरीती।।७८।। ऐसा होता रवीन्द्र बालक। बाळपणापासोन मोठा साधक। धन्य धन्य तयाचे पालक। पूर्व पुण्य महानची।।७९।। रामायण आणि महाभारत। गुरुपरंपरेच्या कथा समस्त। अत्यादरें तो सदा ऐकत। रवीन्द्र बाळ चिमुकला।।८०।। रात्रीं ज़ाई पुराणाला। निद्रेची न पर्वा तयाला। स्वामी सांगती ज़ाई बाळा। नीज़ ज़ावोनी गृहाप्रती।।८१।। छे छे म्हणे रवीन्द्रबाळ। निद्रेची न ज़ाहली वेळ। आवडीचा तयाचा खेळ। पुराण श्रवण हाची असे।।८२।। ऐसें चाललें बाळपण। भोवतीं पवित्र वातावरण। गृहामाजी असे धार्मिक वळण। शुद्ध संस्कार तयावरी।।८३।। माता तयाची असे सोज्ज्वळ। नामा सारखी शांत प्रेमळ। सात्विक त्यागी पिता निर्मळ। आज़ा आजी भाविक।।८४।। पांच वरुषें बाळा ज़ाहलीं। मुंबापुरीं सकळही आलीं। वाकोल्यामाजी तये वेळीं। गृह करिती राहावया।।८५।। पोद्दार विद्यालयामाजीं। शिक्षण घेई रवीन्द्र सहजीं। होता तृतीय वर्गामाजीं। बुद्धी तयाची बहु तीव्र।।८६।। अध्ययनीं तया अत्यंत आवडी। खेळांतही बहु गोडी। विद्यालयी तो मित्र ज़ोडी। अध्यापकांचा लाडका।।८७।। वाचेचा असे बहु रसाळ। मनाचाही

अति मवाळ। अंतःकरणीं अत्यंत प्रेमळ। प्रिय असे तो सकलांसी।।८८।। अष्ट वरुषांचा बाळ होतां। विचार करिती मातापिता। कीं सत्वरची करावें आतां। मौंजीबंधन रवीन्द्राचे।।८९।। सकल सिद्धता त्वरें करिती। चित्रापुरी ती मुंज बांधिती। समस्त आप्तही गृहीं जमती। थाट काय तो पुसावा।।९०।। होते ग्रीष्म ऋतूचे दिवस। मल्लापुरीं असे स्वामींचा वास। परि येती शिरालीस। मौंजीबंधनासाठी या।।९१।। बटूस आशीर्वाद दिधला। धन्य ऐसा बाळ जाहला। पूज्य हस्तें प्रसाद लाभला। रवीन्द्रासी ते समयीं।।९२।। जाहली तेधवां एक गंमत। शिखा ठेवणें कोणा न संमत। परि धरिला भलता हेत। रवीन्द्राने तेधवां।।९३।। शिखेविना कसा करणें। श्रीशंकरासी अभिषेक जाणे। धर्मबाह्य हें ऐसें वर्तणें। कधिं न करी मी सर्वथा।।९४।। ऐसा केला दृढ निश्चय। रवीन्द्राने पाहा निर्भय। शिखा ठेवोनियां जाय। मठाप्रती पूजेसी।।९५।। जधीं परतला मुंबापुरी। पाहोनी हांसती शिखा ती शिरीं। मित्र बोलती नानापरी। पर्वा न करी रवीन्द्र।।९६।। म्हणे ऐशा निंदेस भिवोन। करावें का मी अयोग्य वर्तन। होई सत्वरी केश वर्धन। चिंता नसावी तुम्हांतें।।९७।। नित्य करी संध्यावंदन। आणिक गायत्रीचें ध्यान। देवादिकांचे पूजन। सद्भावें तो करितसे।।९८।। असतां ऐसे चालले दिवस। पहा एकदां माटुंग्यास। आनंदाश्रम येती खास। भक्तजनांच्या आग्रहें।।९९।। उत्सवाची यादी जाहली। गीता स्पर्धा होती ठेविली। बालकांनी सिद्धता केली। गीता पठनासाठी तैं।।१००।। रवीन्द्र असे त्या माजीं एक। पुढे ऐका तुम्ही कवतुक। सहा दिवसांतची चोख। द्वादशाध्याय पाठ करी।।१०१।। गावोनी गीता उत्तम जाणे। स्पर्धा जिंकिली रवीन्द्राने। प्रशंसा करी एकमुखानें। जनसमूह जो जमला।।१०२।। बाळ असे

अज़ुनी लहान। गीता बोले थोरां समान। गहिंवरले आनंदघन। सद्गुरूराज प्रेमळ।।१०३।। आतां पुढती गोष्ट ऐका। सांताक्रुझ ग्रामी देखा। येवोन देती संतोष लोकां। आनन्दाश्रम स्वामीजी।।१०४।। तेथें चाले नित्य प्रवचन। पूजा आणिक भजन कीर्तन। स्वामी शमविती सकलांची तहान। बोधामृत पाज़ोनी।।१०५।। लोक पूजिती गुरुंचे पाद। तयां लागला श्रीगुरुछंद। रवीन्द्राचा थोर आनंद। गगनामाजीं मावेना।।१०६।। शाळा सुटते कधीं म्हणावें। सद्गुरुप्रती धावोनि ज़ावें। तयां सन्निधीं तल्लीन व्हावें। भान नुरावें धामाचें।।१०७।। गुरुंवरी ऐसी भक्ती। देवधर्मावरी प्रीती। नित्य ज़ाहल्याविना आरती। गृहा रवीन्द्र ज़ाईना।।१०८।। ज़री घडतां कांहीं चूक। माता म्हणे रवीन्द्रा ऐक। मान्य करीं तुझी चूक। क्षमा आमुची मागोनी।।१०९।। रवींद्र म्हणे कदापि नाहीं। पडेन मीं श्रीगुरुंच्या पायीं। पाय कधींही धरणार नाहीं। इतरांचे मी सर्वथा।।११०।। तेधवां म्हणती हट्टी बाळ। आज़ उमज़े तयाचें मूळ। गुरुप्रेमाचें तें खूळ। रवीन्द्रासी लागलें।।१११।। ऐशा वर्तती बहुत कथा। ग्रंथ विस्तार होईल सांगतां। परि सांगती भविष्य वार्ता। कीं बाळ होईल महात्मा।।११२।। एकोणिसशें अठ्ठावन सालान्तीं। मुंबापुरी स्वामिजी येती। निवास तयांचा दंतोपचाराप्रती। ज़ाहला असे ते स्थळीं।।११३।। जेधवां कळली वार्ता ऐसी। शुक्ल शंकरनारायणासी। येती स्वामिजींच्या दर्शनासी। निवासस्थानीं तयांच्या।।११४।। शंकरनारायणाचें मन निवालें। अंतःकरणीं भाव उमलले। नयन तयाचे आर्द्र ज़ाहले। गुरुमूर्ती पाहोनी।।११५।। ज़वळी तयासीं बोलविती। प्रसादासी आमंत्रिती। सहकुटुंब यावें म्हणती। आनंदाश्रम श्रीसद्गुरु।।११६।। दुसरे दिवशीं रविवारीं। भोजनासी येती सारीं।

भगिनी वल्लभी आणि दुसरीं। शुक्ल कुळींचे प्रमुख ते।।११७।। सद्गुरुंनी त्या समयासी। अनुग्रह दिधला शांताबाईंसी। त्रयोदशाक्षरी मंत्र तियेसी। उपदेशिला पवित्र।।११८।। द्वितीय प्रहरू जधीं उलटला। इष्ट समूहही समस्त ज़मला। स्वामीं भोवतीं सादर बैसला। त्यांचिया आज्ञे करोनियां।।११९।। सद्गुरु करिती परमार्थ कथन। उकलोनि सांगती विषय गहन। म्हणती असे नरदेह पावन। सार्थक करा जन्माचें।।१२०।। शतजन्मींच्या पूर्वपुण्यें। नरदेह दुर्लभ प्राप्त होणें। याची जन्मीं परमार्थ साधणें। कर्तव्य असे मानवाचें।।१२१।। सदा करावी भगवद्भक्ति। तीच देईल तुम्हां शांती। तेणेंची लाभेल जीवन्मुक्ती। भगवत् प्राप्ती तेणेंची।।१२२।। करा अंतरी हरिस्मरण। श्रवण करावें हरिकीर्तन। जिव्हें करावें हरिगुण गान। नयनीं पाहावें हरिसी।।१२३।। सद्गुरु माय आनंदाश्रम। दावी ऐसें भक्तिमहात्म्य। मार्ग सोपा म्हणती परम। नवविधा भक्तीचा ।।१२४।। त्यजोनियां परि देहाभिमान। ज़ोडावा श्रीसच्चिदानंदघन। वासनारहित होवोन। आत्मचिंतन करावें।।१२५।। सकल भूतांचिये देहीं। वसे नित्य परमात्मा पाहीं। तयाविण दुज़ें कांहीं। त्रैलोक्यीहीं नसेची।।१२६।। प्रपंच करावा बहु सुंदर। आतिथ्यीं राहावें सदा तत्पर। परि न विसरा तुम्ही प्रभुवर। नित्यकर्में करितांना।।१२७।। कर्में करोनी व्हावें अकर्ता। देहीं असोनी विदेहता। ज़ाळावी ती समूळ अहंता। विवेक अंगी बाणवावा।।१२८।। ऐसें पाजिती बोधामृत। पिवोनि होती श्रोते तृप्त। ज़ाहलें मानस अत्यंत शांत। गुरुवचनातें ऐकोनीं।।१२९।। मग वंदिती गुरुंना सकळ। उभा असे तेथें ज़वळ। रवीन्द्राचा पिता प्रेमळ। पाचारिती त्याज़ला।।१३०।। शंकरनारायणास स्वामी पुसती। सन्निध उभी असे शांती। शुक्ल

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

कुलांतील प्रमुख व्यक्ती। कर ज़ोडोनी ऐकती।।१३१।। सुपुत्र तुमचा रवीसमान। द्यावा आम्हां शिष्य म्हणोन। ऐकोनियां हें सद्गुरुवचन। विस्मित समस्त ज़ाहले।।१३२।। तीन दिवसांनी कळवा पाहीं। उपरी न बोलले सद्गुरु कांहीं। खूण पटली उभयतांनाहीं। काय अंतरीं चालले।।१३३।। परि न करिती अधिक विचार। माता पितरें रवीचीं उदार। शिरसावंद्य वचन थोर। श्रीगुरुंचें मानिती।।१३४।। देती उभयतां अनुमोदना। धन्य शंकरनारायणा। धन्य शांताबाई ज़ाणा। धन्य धन्य कुल तयांचें।।१३५।। ऐका आतां श्रोते प्रेमळ। पुढील कथा अति रसाळ। न लावी मी बहु पाल्हाळ। ऐका ऐका लवलाहें।।१३६।। आशीर्वाद गुरुंचा घेती। परतोनियां गृहासी ज़ाती। विचार करी रात्री शांती। निद्रा न ये तियेसी।।१३७।। रवीन्द्र आमुचा पुत्र ज्येष्ठ। आहे खरा बहु श्रेष्ठ। घ्यावे की परि इतुके कष्ट। धर्मपीठा कारणें।।१३८।। स्वामीपदावरि आरूढ। होणें आहे अति अवघड। रवीन्द्र बाळ माझा हूड। साधेल कां तें बाळाला।।१३९।। धर्मगुरुंचा अधिकारू। आहे ज़री अत्यंत थोरू। कर्तव्यें ना करील पारू। बाळ मठाधिपतींची।।१४०।। रवी माझा असे लहान। करील कैसें सकळही सहन। संन्यासाश्रम महा कठीण। देह दंडण विधियुक्त।।१४१।। ज़री केला दृढ निश्चय। तळमळे ती मनीं माय। विपरीत घडे कैसें काय। दुःख ज़ाहलें अनिवार।।१४२।। निज़ला असे रवीन्द्र ज़वळी। निष्पाप कोमल ती मूर्ति सावळी। शांती तयाचें मुख न्याहाळी। चुंबीतसे प्रेमानें।।१४३।। चिंतातूर ती ज़ाहली माय। रडे मोकलूनि धाय। व्याकुळली ज़ेवीं गाय। वासरासाठीं तियेच्या।।१४४।। विचार करोनि रडतां रडतां। निद्राधीन ज़ाहली माता। भवानीशंकर जगन्नियंता। येई तियेचे स्वप्नांत।।१४५।। कर ज़ोडोनि उभी

असे। दिव्य प्रकाश ती पाहतसे। तेजोराशी तिज़ला दिसे। भगवान शंकर प्रगटले।।१४६।। उभा रवीन्द्रा ज़वळी ज़ाणा। असे साक्षात् कैलासराणा। बाळ वंदी दिव्य चरणां। माथां अभय हस्त ठेवियला।।१४७।। विस्मित होवोनि माता पाहे। नयनीं घळघळां नीर वाहे। अंतःकरणीं ज़ाहली आहे। सद्गदित माउली।।१४८।। भिऊ नको बाई व्यर्थ। तुझा पुत्र असे महासमर्थ। ज़ाणोनि घेई पूर्ण अर्थ। श्रीगुरुंच्या वचनांचा।।१४९।। ऐसे बोलती उमापती। मातेलागीं धीर देती। अर्पण करीं पुत्र म्हणती। धर्मासाठी निर्भयें।।१५०।। बोलोनियां ऐसें वचन। अदृश्य ज़ाहले उमारमण। उठली शांती खडबडोन। स्वप्न सांगे पतीसी।।१५१।। घडलें ज़ें समग्र कांहीं। निवेदिलें तें गुरुंना पाहीं। आशीर्वाद येणें मागोनि घेई। शांताबाई तेधवां।।१५२।। व्हावें धर्मपीठाचें संरक्षण। तैसेंचि व्हावें धर्माचरण। युक्त तें घडो रवीन्द्राकडोन। हेंचि मागणें गुरुचरणीं।।१५३।। पति पत्नी भावें उभयतां। शरण ज़ाती सद्गुरुनाथा। कुमार अर्पिला म्हणती ताता। तव पायीं या दिनीं।।१५४।। पाय गुरुंचे धरोन बोलती। निरसावी आमुची मोहवृत्ती। सामर्थ्य देईज़े आम्हांप्रती। पुत्रविरह साहावया।।१५५।। ऐकोनिया आनंदली। आनंदाश्रम श्रीगुरुमाउली। म्हणती देवें कृपा केली। तोचि देईल धैर्य तुम्हां।।१५६।। गुप्त ठेवा परि समग्र। म्हणती ते शांतिसागर। नको या गोष्टीचा उच्चार। एधवांच जनांमाजीं।।१५७।। ऐसा श्रीआनंदाश्रमांनीं। सच्छिष्य घेतला निवडोनी। ज़ैसा अर्जुनास श्रीकृष्णांनीं। धर्म जागृती करावया।।१५८।। ज्ञातीमाजी असती अनेक। विद्वान सुंदर चतुर बालक। परि स्वामी निवडिती चोख। रवीन्द्रासी त्यांमाजीं।।१५९।। पाहोनियां पात्रापात्रता। शिष्य निवडिला सद्गुरुनीं तत्त्वतां।

भविष्य कालींचा धर्मनेता। हंसक्षीर न्यायें बा।।१६०।। पातला ऐसाची श्रावण मास। बहर आला वृक्ष लतिकांस। सृष्टीदेवी नटली खास। साज़ पाचूंचा लेवोनी।।१६१।। विविध रंगी पुष्पें फुलती। हरित तृणांकुर तैसे डोलती। मंजुळ गीतें द्विजगण गाती। चैतन्य येई चराचरा।।१६२।। ऐशा मंगल समयासी। रवीन्द्र ज़ाई गोकर्णासी। त्या ठायींच चातुर्मासीं। निवास स्वामींचा होता।।१६३।। श्रीगुरुंसी शिष्य भेटला। हार तेणें कंठीं वाहिला। गुरुसंन्निधीं उभा ठेला। सद्भावें युक्त होवोनी।।१६४।। कीं गाय भेटे निज वत्सास। कीं हरिणीसी चुकलें पाडस। उचंबळले हर्षोल्हास। उभयतांचे अंतरीं।।१६५।। चार दिवस तो तेथें राहिला। सेवेमाजीं मग्न ज़ाहला। पवित्र गीता दिधली तयाला। गुरुप्रसाद म्हणोनी।।१६६।। तृप्त होवोनियां मानसीं। रवीन्द्र गेला चित्रापुरासी। उत्सव चाले अहर्निशीं। गोकुळाष्टमीचा ते स्थळीं।।१६७।। अष्टमीच्या मंगल दिवशीं। बैसला होता आज़ोबांपाशीं। महत्त्वाचा प्रश्न रवीन्द्रासी। पुसियेला पितामहें।।१६८।। अरे रवीन्द्रा ऐक सत्वर। कीं स्वामींचा असे विचार। करावा का तव स्वीकार। पट्टशिष्य म्हणोनियां।।१६९।। आहे कारे तुझी अनुमती। शिष्य व्हावया स्वामींप्रती। लाभेल तुज़ला सत्संगती।रात्रंदिन प्रिय सद्गुरुंची।।१७०।। पितामह ऐसें पौत्रास बोलती। सांगती तया गुरुंची महती। मातापित्यांचा विचार कळविती। रवीन्द्रासी तेधवां।।१७१।। रवीन्द्र बोलला हांसोन। आनंदें मी करीन मान्य। ज़री असे का अनुमोदन। मातापित्यांचें याज़ला।।१७२।। ऐकोनि द्रवलें सारें गेह। गहिंवरले पितामह। अनावर ज़ाहला मोह। ज़वळी घेती रवीन्द्रासी।।१७३।। ज़ाणोनी गुरुंचा थोर विचारू। कीं होईल त्वरें शिष्यस्वीकारू। संतोष ज़ाहला अपरंपारू। रवीन्द्रासी

ऐकोनी।।१७४।। ऐसी आनंदाची वार्ता। राहेल का ती गुप्तचि आतां। पसरली पैं बोलतां बोलतां। समीरासम वेगानें।।१७५।। ज्ञातीस वाटे आनंद चित्तीं। रवीन्द्राचिया गृहास ज़ाती। कौतुकें तया अवलोकिती। उत्सुक होवोनी मानसीं।।१७६।। पाहोनियां वाटे आदर। शिष्य चिमुकला सुकुमार। जयाचें मुखकमल सुंदर। इंदुबिंबा सम भासे।।१७७।। कोणी बोलविती भोजनासी। निमंत्रिती उपहारासी। देती कोणी अहेरासी। रवीन्द्रासी प्रेमानें।।१७८।। ऐसें चाले कोडकौतुक। रवीन्द्र बाळाचिये अनेक। लाभे सकलां अत्यंत सुख। वर्णावया मी असमर्थ।।१७९।। शिष्यस्वामींची कथा सोज्ज्वळ। सांगावयासी पैं ती सकळ। मज़ मूढेला नसेचि बळ। क्षमा करावी सकळिकीं।।१८०।। असो आतां पुढील अध्यायीं। आनंदाश्रम सद्गुरुमाई। निज अंकावरी शिष्य घेई। अपूर्व सोहळा तो असे।।१८१।। यावरी सांगूं पुढें विवरण। अध्याय संपवू परि येथोन। उपरि ऐका गोड निरूपण। परम रसाळ असे ज़ें।।१८२।। नागरकट्टी शांताबाईनें। ज़री लिहिलें स्वहस्तानें। परि लिहविलें परमात्म्यानें। स्फूर्ति तिज़ला देवोनी।।१८३।। श्रीसद्गुरुची कृपा ज़ाहली। म्हणोनि तियेची लेखणी चालली। काव्य रचना तैसी घडली। परम गुरुचिया कृपेची।।१८४।। श्रीगुरुपरंपरा चरित्र सुंदर। ऐकतां नासती पापें थोर। जयांत शिष्याचें शैशव समग्र। अष्टपंचाशत्तमोध्याय गोड हा।।१८५।। अध्याय ।।५८।। ओंव्या १८५।। ॐ तत्सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति अष्टपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः।।

प रि ज्ञा ना श्र म शं क र स द्गु रु

नमो नमो श्रीपरिज्ञानाश्रमा। परम दयाघना आनंदाश्रमा। गाऊं मंगल तुमचिया नामा। अहर्निश अंतरीं।।१।। जयजयाजी परिज्ञानाश्रमा। हे शिष्यवृंदाच्या सुखधामा। भक्तकामकल्पद्रुमा। आनंदाश्रमा नमन तुम्हां।।२।। श्री सद्गुरु श्रीमदानंदाश्रम। भासे वेद शास्त्रांचें धाम। मनासी वाटे बहु आराम। गुरुद्वयांसी देखतां।।३।। नमो नमो श्रीस्वामीराया। आनंदाश्रम श्रीसद्गुरु सदया। भक्तवृंदासी ताराया। बहुत कष्ट साहले।।४।। करुणासिंधु सद्गुरुमूर्ती। जनमनासी ओळखती। प्रेम तयांचें संपादिती। अलौकिक वर्तनें।।५।। स्निग्ध प्रेमळ ती गुरुमाउली। भक्तजनांची असे साउली। ज्ञाती समस्त उद्धरिली। ज्ञानामृत पाज़ोनी।।६।। नमन ऐशा श्रीगुरुदेवा। आम्हां लाभला अपूर्व ठेवा। तव कृपेचा प्रसाद द्यावा। अपंग दीन या दासीला।।७।। असो आतां श्रोते प्रेमळ। मागील अध्यायीं तुम्ही सकळ। ऐकिली कथा बहु रसाळ। रवीन्द्राच्या शैशवाची।।८।। ऐका सादर पुढें आतां। सावधान करोनि चित्ता। शिष्यस्वीकाराची कथा। आहे बहु गोड ती।।९।। महात्यागी शंकरनारायणें। शिष्यस्वीकारा कारणें। पुत्र अर्पिला गुरुपदीं ज़ाणें। मोह माया आवरोनी।।१०।। रवीन्द्र झाला महाप्रसिद्ध। ज्ञातीमाजींही अनेक सुबुद्ध। ऐकोनि होती हतबुद्ध। कुमाराच्या रम्य कथा।।११।। ऐकोनियां रवींद्राची कीर्ती। पाहावयासी अधीर होती। आनंदोर्मी उचंबळती। जनमानसीं त्यासमयीं।।१२।। तेणें पाठशाळा त्यजिली ज़ाणा। दुःख वाटे अध्यापकांना। हुरहुर लागे तयांच्या मना। चतुर छात्रा कारणें।।१३।। शिक्षक तयाच्या गृहीं येती। रवीन्द्राच्या पित्यासी पुसती। पैशाकारणें का हो काढिती। शाळेंतोनि पुत्रासी।।१४।। आम्ही देऊं गुरु

दक्षिणा। पूर्ण करा पैं तयाच्या शिक्षणा। शिक्षक विनविती तेचि क्षणा। रवीन्द्राच्या पित्यासी।।१५।। जेव्हां कळली समूळ वार्ता। अभिमान वाटे तयांच्या चित्ता। अभिवादिती वाटोनि धन्यता। परतोनि ज़ाती गृहासी।।१६।। रवीन्द्राचें वय लहान। खेळ खेळे बालकांसमान। जननी होई बहू खिन्न। वृत्ती तयाची पाहोनी।।१७।। करितां अत्यंत हूडपणा। शांती म्हणे रवीस ज़ाणा। होशील केधवां तूं शहाणा। चिंता मज़ला वाटते।।१८।। कृष्णासाठीं यशोदेनें। व्रत आरंभिलें संकष्टिचें ज़ाणें। तूंही तैसें मम कारणें। व्रत आचरीं चतुर्थीचें।।१९।। ऐसें विनोदें बोले बाळ। दंगा चाले सांज़सकाळ। ज़मवोनियां बाळगोपाळ। विविध खेळ खेळती।।२०।। भिऊं नको वृथा आई। जधीं ठेविती सद्गुरुमाई। कृपाहस्तासी माझिये डोई। नेटकें होईल बाळ म्हणे।।२१।। ऐसा गुरुंवरी विश्वास। मार्ग दाविती तेची खास। धीर ऐसा प्रिय शिष्यास। जाज्वल्य ती गुरुभक्ती।।२२।। पूर्वसिद्धता आरंभिली। संसारबंधनें तुटूं लागलीं। महत्क्रांती घडूं लागली। रवीन्द्राच्या जीवनीं।।२३।। स्थायी समिती भरे मठांत। सभासद ते म्हणती निश्चित। मुंबापुरींच करणें उचित। शिष्यस्वीकारोत्सव।।२४।। समाज सकळही ज़ोमें उठला। जनसागर तो उचंबळला। बहु प्रेमानें प्रवृत्त ज़ाहला। उत्सव कार्यालागीं की।।२५।। ग्रामोग्रामीं सभा भरविती। उत्सवाचा विचार करिती। ठायींठायीं निधी ज़मविती। शिष्यस्वीकारा कारणें।।२६।। धर्मसेवक ते ग्रामीं हिंडती। घरोघरीं ते जेधवां ज़ाती। धन उचलोनी तयां देती। अत्यादरें सकळ जन।।२७।। सक्ती कोणी केली नाहीं। विनासायास ज़मोनी राही। सहस्त्रावधी निधी पाहीं। अहा कैसी गुरुलीला।।२८।। लोकांस ज़ाहला

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

अत्यानंदू। विसरोनिया आपपर भेदू। झ़टे समस्त भक्त वृंदू। अत्युत्साहें ज़ाणा पैं।।२९।। चित्रापुरामाजीं वैदिक ज़मती। मंगलदिन ते पंचांगी पाहती। कार्यक्रमातें प्रसिद्ध करिती। धार्मिक विधानांच़े कीं।।३०।। शके अठराशें एक्याऐंशी। विलंबी संवत्सर असे त्या वरुषीं। माघ वद्य सप्तमी दिवशीं। शुभ मुहूर्त निवडिला।।३१।। कार्यक्रमातें नियोजिलें। ग्रामोग्रामीं पाठविलें। भक्तगण ते अधीर ज़ाहले। पर्वकाल साधाया।।३२।। सारस्वतांनीं सज़वियली जी। ऐशा तालमकीच्या वाडीमाजी। येती आनंदाश्रम स्वामिजी। मंगलोत्सवा कारणें।।३३।। उत्सवासी ज़ाहला आरंभ। घडला न कधीं ऐसा समारंभ। सपर्ण उभे कर्दळी स्तंभ। स्वागताप्रती वाडींत।।३४।। च़हुंबाज़ोनी लोक येती। आबालवृद्ध तैं एकत्र होती। दशसहस्रावरि जन ज़मती। मुंबापुरीं ते समयीं।।३५।। दूरस्थ ऐसे आप्त भेटले। जिवलग मैत्रिणी मित्र मिळाले। कैक वरूषें ज़ें ना ज़मलें। घडलें उत्सव निमित्तें या।।३६।। शके अठराशें एक्याऐंशीं। पवित्र ऐशा माघमासीं। होती त्या दिनीं शुद्ध चतुर्दशी। आगमन ज़ाहलें गुरुंच़ें।।३७।। जैजैकार हरूषें केला। दर्शन घडलें समस्तांला। नमस्कारिती सकळही गुरुला। स्वागत ज़ाहलें यथोचित।।३८।। शुभ्र पायघड्या भक्त पसरितीं। तयांवरोनी स्वामी च़ालती। आम्रपर्णांची तोरणें शोभती। पुष्पवृष्टी करिताती।।३९।। विविधरंगी सुंदर वेदिका। पर्णपुष्पें सज़विली देखा। बहु शोभती सुरम्य मेखा। सद्गुरु बैसती उच्चासनीं।।४०।। किलपाडी गुरुदत्त मुख्याध्यक्ष। अग्रपूजा करिती प्रत्यक्ष। राहोनियां अत्यंत दक्ष। जन समस्त पाहती।।४१।। सहस्रावधीं तैं भक्त ज़मती। आतुरले ते भेटी प्रती। धूळभेटीस प्रेमें घेती। श्रीफल समर्पण

करोनी।।४२।। महापूजा अवलोकिती। मग ज़ाहली मंगलारती। तीर्थ प्रसाद ग्रहण करीती। लीन होवोनी गुरुचरणीं।।४३।। रात्रीं दीपनमस्कार भजन। पूजा आरती अष्टावधान। च़ाले गंभीर वेद गायन। नित्य नियमानुसार तें।।४४।। तदनंतर दिवस तीन। च़ाले गायत्री पुरश्चरण। तैसेंचि च़ाले रुद्रानुष्ठान। धार्मिक विधान सर्वही।।४५।। मन वाचा आणिक शरीर। व्हावे तयांवरी शुद्ध संस्कार। संन्यास दिक्षेच़ा अधिकार। तेणें प्राप्त होई बटुला।।४६।। म्हणोनी शुद्धीकरण केले। कृच्छ्र प्रायश्चित्त घेतलें। तीन दिवस उपोषण ज़ाहलें। दिधलीं पवित्र गोदानें।।४७।। चित्रापुरींच़े वैदिक ज़मले। यथाविधी संस्कार ज़ाहले। फडकेशास्त्री खास आले। काशी क्षेत्राहुनि ज़ाणा।।४८।। पारंगत ज़े वेदादिशास्त्रीं। नाम जयांच़ें हळदीपूरशास्त्री। वद्य चतुर्थीच्या गुरुवासरीं। अध्यक्षासवें ते निघाले।।४९।। सभासदांच्या समवेत येती। बटूच्या गृहीं सकलही ज़मती। यथोचित तैं स्वागत करिती। माता पितरें रवीन्द्राचीं।।५०।। तदनंतर बटुसी पाचारिलें। प्राशनासी दुग्ध दिधलें। पंचारतीनें ओवाळिलें। मंगल तिलक लावोनी।।५१।। रवीन्द्राची सात्त्विक माता। शांत ठेवोनियां चित्ता। आवरोनियां सारी ममता। स्वहस्तें करी विधानें।।५२।। दुग्धीं माया ज़णुं विरघळली। आरतीनें ममता ज़ाळिली। वैराग्यवृत्ती ज़णुं बाणविली। मंगल तिलकें तिच्या मनीं।।५३।। मातेज़वळी उभा होता। शशिकांत नामें कनिष्ठ भ्राता। दुःख वाटे तयाच्या चित्ता। नयनांतुनी जल वाहे।।५४।। दोघे बंधु आलिंगिती। परस्परांना प्रेमें भेटती। भांडण रात्रींच़े विसरती। पाहताती स्नेहभरें।।५५।। आई ज़वळी निज़णार कोण। दोघे म्हणती मी मी ज़ाण। ऐसें ज़ाहलें रात्रीं भांडण। निज़ण्यापायीं

दोघांचें।।५६।। शशी म्हणे मी निज़णार। कोण आला तूं रे थोर। रवी म्हणे मी नसणार। उद्या येथें निज़ावया।।५७।। नीज़ तूंच रे आई ज़वळी। उद्यां पासोनी सांज़ सकाळीं। मी न येई तये वेळीं। केवळ आजि निज़तों मी।।५८।। ऐकोनियां द्रवली माता। दोहों बाज़ूंनीं दोन्हीं सुतां। घेवोनियां करी ममता। वर्षाव घडे प्रेमाचा।।५९।। पुसे आई रवीन्द्राला। सांग इच्छा तुझी बाळा। कांहीं नलगे आई मज़ला। रवीन्द्र बोले हांसोन।।६०।। केवळ वाटतें बाळ पाहावें। मुके तयाचे प्रेमें घ्यावे। तया मांडीवरि निज़वावें। तुझ्या उदरी ज़ें वसे।।६१।। पाहूं वाटतें सानुल्या भावा। आणोनि तयासी मज़ला दावा। रवीन्द्र तयाचें नाम ठेवा। जेधवां जन्मा येईल।।६२।। वार्ता ऐसी बोलतां बोलतां। निद्रा लागली दोन्ही सुतां। व्यथित ज़ाहली परि माता। अंतःकरण उचंबळे।।६३।। दुःखाचे पूर लोटले। हृदयाचे ज़णुं बांध फुटले। नयनांतुनी वाहू लागले। अश्रु ज़ाहले अनावर।।६४।। पुत्रालागीं कवटाळोनी। चुंबन घेई दुःखित जननी। धैर्य भक्ति ईशचरणीं। प्रार्थितसे देवाला।।६५।। म्हणे देवा भवानीशंकरा। प्रभो रक्षावे माझ्या कुमारा। पुत्रविरहाचे दुःख उमावरा। साहावयासी सामर्थ्य दे।।६६।। असो आतां पुढती ऐका। निरोप देती एकमेकां। बटू चालला गृहांतुनि देखा। वास्तू ज़ाहली सद्गदित।।६७।। कुलदेवासी प्रार्थियलें। मग बटूनें सकलां वंदिलें। युक्त तयांसी अहेर दिधले। आशीर्वाद घेवोनी।।६८।। मंगलवाद्यें मधुर वाज़ती। गंभीर स्वरें शंखनाद होती। वाज़त गाज़त बटूस नेती। तालमकीच्या वाडींत।।६९।। जेधवां तेथें बटू पातला। सीमा नुरली आनंदाला। जैजैकार तयाचा केला। भक्तजनांनीं आदरें।।७०।। कुंकुमोदकें ओवाळिलें। पुष्पहारा ते कंठीं वाहिले।

वेदघोषें दुमदुमलें। प्रसन्न वातावरण तैं।।७१।। करविलें तयासी देवदर्शन। मग नेलें स्वामीसन्निध ज़ाण। नम्रभावें करोन नमन। बटू पाहे प्रेमभरें।।७२।। धरोनी हस्ता तया आणिलें। बहुमानानें स्वागत केलें। वेदिकेवरी बैसविलें। दर्शनासाठीं तयासीं।।७३।। सज़विली होती सुंदर वेदिका। च़हूबाज़ोनी पुष्पवाटिका। विविध रंगी दीप मालिका। सुरम्य भंवती झ़ळकती।।७४।। ज़ाईज़ुईच्या माला शोभती। हरित पर्णे शोभा खुलविली। पुष्प गुच्छही संगे विराजती। सुगंध पसरिती च़ोहिंकडे।।७५।। बटू दिसे शोभायमान। कसिला पितांबर कांसे छान। वरि भरज़री उपवसन। कंठीं आभरण सुवर्णाच़ें।।७६।। ज़णुं भासलें कीं श्रीकृष्ण। आले साक्षात भूवरी ज़ाण। अवलोकिती समस्त जन। भान हरपलें तयांच़े।।७७।। कोणी म्हणती किती सुंदर। दृष्ट काढावी खरोखर। कोणी वानिती त्याग अपार। बटूच्या माता पित्यांच़ा।।७८।। संतोषले भक्तजन। घेवोनियां शिष्यदर्शन। कित्येक दिवसांची तहान। आज़ शमली पूर्णत्वें।।७९।। मग पालखींत बैसविती। बटुस गौरवें मिरविती। पालखी फिरे वाडी भोंवती। मंगलवाद्यां समवेत।।८०।। पेढे वाटिले समस्तांसी। गोड केलें जनमुखासी। पाहोनियां तृप्त मानसीं। मंगलोत्सव साजिरा।।८१।। अहो प्रेमळांनो ऐका। समय न दवडी मी फुका। वाटेल तुम्हांसी कवतुका। पुढील वार्ता ऐकोनी।।८२।। मुंबापुरीच़ें उपनगर। नाम तयाच़ें असे दादर। तेथील शिवाजी पार्क मनोहर। प्रसिद्ध असे ग्रामीं कीं।।८३।। शृंगारिला तैं मंडप सुंदर। नाम दिधलें पांडुरंगाश्रमनगर। तेची स्थळीं शिष्यस्वीकार। सोहळा अपूर्व ज़ाहला।।८४।। नगर दिसें बहु सुरेख। पर्णपुष्पेंयुक्त लता अनेक। वरी झ़ळकती

विद्युत्दीपक। विविध रंगी पताकाही।।८५।। अष्टद्वारें मंडपाचीं। नामें जयांसी अष्टगुरुंचीं। शोभा वाढविती नगराची। हरित वर्ण कर्दळी।।८६।। वेदिके मागे ॐकार चक्र। तेजोराशी फिरे गरगर। विद्युत् दीप ते गोलाकार। दिव्य प्रकाश पसरिती।।८७।। पर्ण तोरणें द्वारीं शोभती। पुष्पमालिका सुरम्य लोंबती। नयन मनोहर कमलाकृती। लक्ष वेधोनी घेतसे।।८८।। दीप उज़ळले नगराभंवतीं। येतां ज़ातां लोक पाहती। छायाचित्रें अनेक घेती। चलचित्रपटही सुरेख।।८९।। अंतर्भागीं योजना उत्तम होती। स्वयंसेवक ते सदा झ़टती। अविश्रांतची सहाय करिती। कार्यवाहक समितीचे़।।९०।। बैठक व्यवस्था बहु सुरेख। मार्गदर्शन अत्यंत चो़ख। भोजनालय होतें ठीक। मंडपाच्या बाहेरी।।९१।। ध्वनिक्षेपक तेथे बोलती। महत्त्वाची वार्ता कळविती। होतें प्रथमोपचारा प्रती। शुश्रुषालय सुसिद्ध।।९२।। पादत्राणासीं स्थान वेगळें। रक्षक होते तेथें निराळे। नाहीं हरवलें एकही तयांमुळें। सहस्त्रावधी राशी माजीं।।९३।। थक्क ज़ाहली समस्त जनता। पाहोनी सेवकांची तत्परता। तैसेंचि तयांची कार्यकुशलता। कैसी वानावी कळे ना।।९४।। मंगल पंचमीच्या प्रातःकाळीं। मठपरिवारादिक मंडळी। भव्य मंडपीं येवोन ज़मली। पूर्वसिद्धता करावया।।९५।। पुष्पालंकृत गाडी माजीं। येती आनंदाश्रम स्वामीजी। जयघोष केला मंडपामाजीं। शिष्यवृंदे उच्च स्वरें।।९६।। सप्तसुरांनीं संगीत गाइलें। नभिं सनईचे़ स्वर निनादले। प्रसन्न वातावरण ज़ाहलें। मंगलवाद्यें ऐकोनी।।९७।। विद्वान वेदाचार्य गणेश। प्रार्थिती भावें भवानीशंकरास। आयुरारोग्य गुरुद्वयांस। मागोन घेती प्रभू ज़वळीं।।९८।। म्हणती देवा भवानीशंकरा। समस्तांवरी अनुग्रह करा। पार पाडी कृपासागरा।

शिष्यस्वीकारोत्सव।।९९।। शिष्यांसी सामर्थ्य देवोन। करावें मठाचें संरक्षण। संस्थानाचें अनुशासन। व्हावें युक्त तयां हस्तें।।१००।। श्रीशंकरा पार्वतीरमणा। वंदन तुमच्या पवित्र चरणा। सारस्वतांच्या कल्याणा। कृपा प्रसाद देइज़े।।१०१।। ऐसी मंगल प्रार्थना ज़ाहली। वेदोक्त पुष्पें भावें वाहिलीं। नारिकेलादी फळें समर्पिलीं। भवानीशंकराच्या चरणीं।।१०२।। तदनंतर आरंभ ज़ाहला। अष्ट श्राद्धांदिक कार्याला। क्षौर वपनादिक कर्माला। दिक्षांगेंहीं समस्त ।।१०३।। मग करिती स्वस्तिवाचन। नंतर नांदी समाराधन। ब्रह्मयज्ञही सक्तु प्राशन। ब्रह्मान्वाधान पवित्र।।१०४।। रात्रीं मंत्रजागर ज़ाहलें। ऋचा आणिक उपनिषद गाइलें। वेदघोषें पुनीत केलें। वैदिकांनीं सभागृह।।१०५।। उगवला सप्तमीचा दिवस। पवित्र वाटे सारस्वतांस। अत्युत्साहें दादरास। उषःकालीं धावती।।१०६।। समस्त उठती भल्या पहांटे। स्नान उरकितीं लहान मोठे। दीपावलीचा सण ज़णुं वाटे। सकलांसी त्या दिनीं।।१०७।। अधीर ज़ाहली सारी जनता। वेध लागले तयांच्या चित्ता। नयन ज़ाहले आतुर आतां। बटु दर्शन घ्यावया।।१०८।। पूर्व विधानें समस्त करोनी। केलें सागरस्नान बटूंनीं। कौपिनादी ग्रहण करोनी। मंडपीं ते परतले।।१०९।। देखोनिया कुमारासी। दुःख दाटलें जनमानसीं। धार लागली नयनांसी। प्रिय जनांच्या ते क्षणीं।।११०।। करिती ज़री प्रतिक्षा जन। परि ज़ाहलें हृदय विदीर्ण। कुमाराचे वय लहान। पाहोनि कंठ दाटला।।१११।। म्हणती केवढा मनःसंयम। परित्यागिलें प्रियजनधाम। आणिक ज़ोडी संतसमागम। पावन ज़ाहला कुमार।।११२।। ज्ञातीमाजींल मुलांमुलींनी। शिक्षण घ्यावे यापासोनी। ठेवावा बा सतत तो मनीं।

आदर्श शिष्यस्वामींचा।।११३।। ऐसा विचार प्रेक्षकीं चालला। बटू ते क्षणीं सज्ज जाहला। गुरु उपदेश घ्यावयाला। आत्मोन्नतीच्या पथावरी।।११४।। मंत्र घोषें नभ दुमदुमलें। मंगलमय सर्वत्र जाहलें। वेदिकेवरी बटू चढले। अनिमिष नेत्रें पाहती।।११५।। अंगी शोभे काषायवसन। हस्तीं दंड कमंडलू सान। मूर्ती भासली शोभायमान। तेज मुखींचे झळाळें।।११६।। भस्म चर्चिलें विशाल भाळीं। रुद्राक्षांचा हार तो गळीं। इतरत्र कोठें लक्ष ना मुळीं। गुरुठायीं निमग्न।।११७।। गरूड मुद्रा करोनी जाणा। बटू वंदिती श्रीगुरुचरणा। मनोभावें करित प्रार्थना। उद्धार आमुचा करावा।।११८।। त्रैलोक्याचें बंधन तोडोनी। शरण गेला श्रीगुरुलागोनी। वरदहस्ता शिरीं ठेवोनी। दिधली संन्यास दिक्षा ही।।११९।। पवित्र समयही सन्निध येत। मीन लग्नाचा मंगल मुहूर्त। श्रीमत् आनंदाश्रम अंकी घेत। प्रिय शिष्यासी प्रेमानें।।१२०।। पूर्वाभिमुख होवोनि। प्रणवोपदेश दिधला गुरुंनीं। चतुर्वेदांचा अर्थ सांगोनी। केला शिष्यस्वीकार।।१२१।। 'परिज्ञानाश्रम' नाम ठेवियलें। भक्तवृंदासी जाहीर केलें। जैजैकारें नगर दुमदुमलें। परंपरेच्या नामघोषें।।१२२।। धन्य जाहली बटूची सुमाता। धन्य तयाचा सुपूज्य पिता। खचित जाहली सुफलित आतां। पूर्वजन्मींची पुण्याई।।१२३।। विरक्त त्यागी सुशील आई। स्वप्रेमाची आहुती देई। वात्सल्य ओतिलें श्रीगुरुपायीं। चारी मुक्ति साधावया।।१२४।। त्याग तयांचा अत्यंत थोर। ऋण तयांचे असे अपार। पडेल कधीं ना तयाचा विसर। सारस्वतांसी निश्चित।।१२५।। आतां चालली पाद्यपूजा। शिष्य स्वामी करिती पूजा। भावे वंदिती श्रीगुरुराजा। कौतुकें प्रेक्षक पाहती।।१२६।। यावरी बैसती श्रीसन्निधी। मग

महासंस्थांचे प्रतिनिधी। पूजन करिती यथाविधी। गुरुद्वयांच्या पायांचें।।१२७।। भाविक नागरकट्टी कुलाचा। सन्मान असे प्रथम पुजेचा। पूजा करिती काया वाचा। ज्येष्ठ प्रतिनिधी कुलाचे।।१२८।। गुरुद्वय बैसले वेदिकेवरी। विस्मित जाहली जनता सारी। वाटे आला स्वर्ग भूवरी। शिव विष्णूसी घेवोनी।।१२९।। कीं एकनाथ जनार्दन मुनी। कीं श्रीकृष्णची सांदीपनी। अवतरले का पुन्हां अवनीं। रामदास कल्याण।।१३०।। असो, आनंदाश्रम उभे राहती। ज्ञानबोध सभेला करिती। धर्मपालन करा म्हणती। श्रुती वचनें सांगोनी।।१३१।। धर्मपालनें चित्तशुद्धि। विकास पावे जीवबुद्धि। ध्यानधारणें आत्मसिद्धी। लाभतसे मानवा।।१३२।। सद्धर्म नाशितो पापांसी। उद्धरितो तो सकळिकांसी। नका विसरूं धर्माचारासी। ब्राह्मण्य तैसें रक्षावें।।१३३।। आत्मज्ञानासाठीं धर्म। धर्मासाठीं पाहिजे कर्म। निजात्मदर्शनाचें हें वर्म। जाणोनि घ्या, गुरु म्हणती।।१३४।। प्रवृत्ति निवृत्तीचा अर्थ काय। उकलोनी सांगे सद्गुरुमाय। म्हणती ठेवा मनीं ध्येय। आत्मस्वरूप ज्ञानाचें।।१३५।। जधीं यम पुसति नचिकेतासी। कीं श्रेय पाहिजे का निश्रेय तुजसी। मागोन घेई निश्रेयासी। नचिकेत यमराजा पासोनी।।१३६।। प्रवृत्ति धर्मांचें ऐसें श्रेय। कीं समाजाचा सर्वोदय। तेणें मानवाचा हो अभ्युदय। कल्याण होई सकलांचें।।१३७।। निश्रेयस् असे निवृत्ति धर्म। कीं करावें निष्काम कर्म। सत् चित् आनंदाचें मर्म। विस्तारोनी सांगती।।१३८।। बदलला असे आतां काळ। लोकांसि न मिळे बहुत वेळ। क्रिया कर्मे पूर्ण सकळ। साधती ना करावया।।१३९।। परि करावें संध्यावंदन। आणि गायत्रींचे ध्यान। नियमित करावें अध्यात्मवाचन। तेणें लाभे

आत्मोन्नती।।१४०।। जयांनीं केलें लालनपोषण। स्वर्गीय मातापितरें स्वजन। करावें तयांचें पुण्यस्मरण। श्राद्धादिक करोनियां।।१४१।। ज़री होतील धर्मकार्ये। विवाहादिक शुभकार्ये। उदरनिर्वाह या व्यवसायें। वैदिक पुरोहित करितील।।१४२।। गुरुपीठ पाहिजे धर्मरक्षणा। पीठा कारणें वैदिक ज़ाणा। तयांसी मिळावी युक्त दक्षिणा। भूषण तेची मठाचे।।१४३।। समाजसेवा करावी ज़ाणा। मनीं सर्वदा सुविचार आणा। सतत असो द्या एकची बाणा। धर्मरक्षण हाच कीं।।१४४।। नष्ट करितां सद्धर्मासी। काय राहे तुमच्यापाशीं। दिसतील तुम्हां पशूंच्या राशी। समाजामाजीं हें सत्य।।१४५।। धर्माचरण ज़री ना नीट। तरेल कैसें हें धर्मपीठ। मग कासयासी श्रीगुरुमठ। नाटक वाटेल उत्सव हा।।१४६।। म्हणोनी करावें धर्मपालन। करावें सदा सद्वर्तन। शुद्ध असावें आचरण। आत्मोद्धार तेणें हो।।१४७।। ज्ञानबोधामृत ऐसें संपलें। मग स्वामींनीं कर ज़ोडिले। परमात्म्यासी भावें प्रार्थिलें। अभिष्ट वांछले सकलां प्रती।।१४८।। सभागृह होतें निःशब्द। शांत ज़ाहला भक्तवृंद। वंदिती ते गुरुपादारविंद। नत मस्तक होवोनी।।१४९।। श्री आनंदाश्रम सद्गुरुवर। भासे शांतीचें ज़णुं आगर। आशीर्वाद देती कृपासागर। वेदोक्त अक्षता घालोनी।।१५०।। तितुक्यांत पातले स्वयंसेवक। सज्ज होती कार्यवाहक। सहाय करिती भक्त अनेक। अल्पोपहार द्यावया।।१५१।। श्रीगुरुंचें नाम जयांवरी। सुबक ऐशा कागदपात्रीं। सांज़ा केळीं आणिक जहांगिरी। प्रसाद म्हणोनी वांटिली।।१५२।। मधुर पेयांची शीतलता। वर्णू कैसी कळेना आतां। परि झ़ाली तृप्त जनता। शीत पेयें पिवोनी।।१५३।। तितुक्यांत ज़ाहला शंखनाद। सुस्वरें म्हणती वैदिक वेद। पसरला

चहुंकडे सौगंध। सुवासिक धुपाचा।।१५४।। महापूजेला आरंभ झाला। कैसा वर्णू तो सुंदर सोहळा। सुचेना या मंदमतीला। शब्द ज़ाहले मूकची।।१५५।। मध्यंतरी करिती भजन। गोड गाणीं गाती ज़मोन। कीर्तन करिती कुणी भक्तजन। आणिक स्त्रिया भाविक।।१५६।। सायंकाळी श्रोते ज़मले। श्रीस्वामीजी पुन्हां बोलले। अत्युत्तम तें प्रवचन ज़ाहलें। सनातन धर्मावरी।।१५७।। व्याख्यान देती गुरुदत्त किलपाडी। तैसेंचि श्रीपादराव हेम्माडी। ऐकतां आली बहू गोडी। सुंदर व्याख्यानीं तयांच्या।।१५८।। येणें त्या पवित्र दिवशीं। उत्सव चाले अहर्निशी। मध्यरात्रीच्या सुमारासी। महोत्सव हा संपला।।१५९।। ऐसा हा अपूर्व सोहळा। याचि देहीं याची डोळां। अवलोकुनी समाज सगळा। परतोनी गेला गृहासी।।१६०।। दुसरे दिवशीं महासंतर्पण। आले भोजनासी ब्राह्मण। यथोचित दक्षिणा देवोन। तृप्त केले वैदिक।।१६१।। दशसहस्रावरी जन ज़मले। आनंदामृत आकंठ प्याले। पाहोनियां ते सुखावले। मंगलोत्सव साजिरा।।१६२।। म्हणती चित्रापुर सारस्वत। समाज असे बहु सुसंस्कृत। परि न तयांच्या इतिहासांत। घडलें ऐसें अपूर्व।।१६३।। सहस्त्रावधी लोक ज़मती। सद्गुरुंवरी प्रेम दाविती। श्रद्धा भक्तिची ये प्रचिती। काय यासी म्हणावें।।१६४।। परमात्म्याचें अस्तित्व भासे। धर्मशिथिलता मुळीं ना दिसे। महोत्सव हा बळें देतसे। नास्तिकांसी आवाहन।।१६५।। कोण म्हणे ही उत्सवप्रियता। कोणा वाटे अंधानुकरणता। होईल का परि कार्यसिद्धता। केवळ मानव प्रयत्नें।।१६६।। कोण घडवितो महत्कृतींसी। शक्ती कैंची येई तयांसी। मानवही का करील ऐसी। अतर्क्य करणी या जगतीं।।१६७।। छी छी नोहे, प्रभुची रचना। प्रेरित करितो

तोची सर्वांना। म्हणोनि घडती विविधची घटना। जगतामाजीं अगम्य।।१६८।। तैसीच प्रभूनें कृपा केली। श्रीगुरुपरंपरा प्रसन्न ज़ाहली। आणिक तपस्या फळास आली। पूर्वजांची पवित्र।।१६९।। म्हणोनियां ज़ाहली कार्यसिद्धी। उत्सव घडविला यथाविधी। धावोनी आला तो कृपानिधी। भक्तांसि सहाय करावया।।१७०।। म्हणोनि प्रभुवरासी नमन माझें। तवपदीं हें मम मानस रिझे। संसाराचे भव्य ओझें। वाहवेना मज़ आतां।।१७१।। प्रभो देवा भवानीशंकरा। दयाघना दे तवपदीं थारा। करुणानिधी मज़ला उद्धरा। शरण आलें तव पायीं।।१७२।। मन असे माझें अति चंचल। स्थिर करावें आहे अचपळ। तसेंचि वाढे षड्रिपुंचे बळ। भवसागरीं बुडालें।।१७३।। काय करावें काहीं सुचेना। मज़वरि देवा कृपा कराना। अनुताप दग्धा करी याचना। तव पायांसीं हीच कीं।।१७४।। कानीं ऐकावें गुरुचें वर्णन। नेत्रीं पाहावें सद्गुरु स्वरूप पूर्ण। वाणी गावो गुरु गुणगान। हस्तें व्हावी गुरुपूजा।।१७५।। चालत ज़ाया गुरुदर्शनासी। पाय न उरले माझ्यापाशीं। अंतःकरणीं परि अहर्निशीं। गुरुस्मरण घडावें।।१७६।। आणिक माझें एक मागणें। दीर्घायुष्य गुरुद्वयांस देणे। तयांच्याच हस्तें आम्हां तारणें। भवार्णवांतुनि दुस्तर।।१७७।। सदा वसावी श्रीगुरुभक्ती। आणिक श्रद्धा मठावरती। ऐसीच होवो धर्मजागृती। सदैव आमुच्या ज्ञातिमाजी।।१७८।। सर्वत्र करी मंगलमय। वृत्ती होवो निरामय। आतां संपवूं अध्याय। वंदोनिया समस्तांसी।।१७९।। येथवरि केलें कथानिरूपणा। श्रेय तयाचें असे श्रीगुरुंना। चुकलें तें ममही ज़ाणा। क्षमा करावी सकळिकीं।।१८०।। लिहिलें ज़ें एथें पाही। तयामाजि माझें कांहींच नाहीं। श्रीसद्गुरुंची सकळ कृपा ही।

नाम मात्र शांतेचे।।१८१।। सागरांतोनी जळ घेतलें। परतोनी तयासी समर्पण केलें। तैसेंचि ज़ें गुरुकडोन लाभलें। अर्पितसे मी गुरुचरणीं।।१८२।। श्रीगुरुपरंपराचरित्र थोर। वाचोनि येती मनीं सुविचार। ज्यात वर्णिला शिष्यस्वीकार। नवपंचाशत्तमाध्याय गोड हा।।१८३।। अध्याय ।।५९।। ओंव्या १८३।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति नवपंचाशत्तमोध्यायः समाप्तः।।

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

ॐ गौरीनंदना श्रीगणेशा। विघ्नहर्त्या जय जगदीशा। नयन मनोहर विद्याधीशा। साष्टांग नमन तव चरणी।।१।। नमस्ते श्री महासरस्वती। जगत्‌जननी भगवती। लिहिण्या मज़ द्यावी स्फूर्ती। ज्ञानमाळेत विविधाक्षरे गुंफुनी।।२।। नमन श्री देवी महाकालीसी। नमन श्री माता महालक्ष्मीसी। नमन श्री महालसा नारायणीसी। श्री शांतादुर्गेसी नमन माझे।।३।। नमन श्रीभवानीशंकरासी। नमन श्री दुर्गापरमेश्वरीसी। नमन सकळ कुलदेवतांसी। गुरुपरंपरेसी प्रणाम माझा।।४।। मागील अध्यायी कथिले। नागरकट्टी शांताबाईने चांगले। वर्णन शिष्यस्वीकाराचे भले। नवपंचाशत्तमाध्यायी।।५।। आता परिसावे भक्त जनांनी। शांत चित्ते सावध होऊनी। पुढील वर्तमान शब्द सुमनांनी। कथिते गुरुप्रेरणेपरि।।६।। शिष्यस्वीकाराच्या काहीं दिन उपरान्त। प्रयाण केले गुरुद्वयांनी शिरालीत। केला सत्कार वाज़त गाज़त। सकल चित्रापुर ग्रामस्थांनी।।७।। गुढ्या तोरणे उभारिली द्वारी। वैदिक मंडळी मंत्रघोष करी। येता सद्गुरुद्वयांची स्वारी। अर्पियली आरती पुष्पें ग्रामस्थांनी।।८।। आले मंत्रघोषाच्या जल्लोषात। स्वामी आनंद-परिज्ञानाश्रम मठांत। केला प्रेमे साष्टांग प्रणिपात। शिष्यस्वामींनी पांच समाधींसी।।९।। व्यवस्था संस्कृत विद्यार्जनाची। केली स्वामी आनंदाश्रमांनी शिष्याची। विविध विषय शिकविण्यासी। नेमिले शीघ्र मठाचार्य।।१०।। गीता उपनिषद् ब्रह्मसूत्र भाष्यात। लाभले नैपुण्य तेराव्या वयात। वेदमूर्ती बैंदूर शिवानंद निष्णात। नेमिला अध्यापनार्थ स्वामींनी।।११।। प्रथमतः वरील विषय अध्यापनासी। वेदमूर्ती हळदीपूर गणेशशास्त्रींसी। आचार्य म्हणूनी नेमिले त्या समयासी। स्वामी आनंदाश्रमांनी।।१२।। कांही कारणान्वये त्या काळी। आचार्य विद्यार्थ्याची मनोधारा न जुळली।

त्यास्तव दिधले कार्य समूळी। बैंदुर शिवानंद वेदमूर्तीसी।।१३।। गीर्वाण भाषेंतील कांही प्रश्न। क्लिष्ट परि महत्त्वपूर्ण। समज़ावती स्वामी आनंदाश्रम दयाघन। शिष्यस्वामींनी शंका विचारता।।१४।। शिष्यस्वामींची प्रतिभा भारी। नसे सतत अध्ययन तिज़ ज़रूरी। ज़ाणती गुरु आनंदाश्रम अंतरी। तीक्ष्ण ग्रहणशक्ती शिष्यस्वामींची।।१५।। विद्यार्जनासंगे साधना। करावी लागे शिष्य परिज्ञानाश्रमांना। येती अनुभवा भावदशा नाना। साधनेमाजी शिष्यस्वामींसी।।१६।। विविधानुभव येती ध्यानात। घडती योगप्रकार क्षणात। विस्मये वेढीले शिष्यांच़े चित्त। अनाकलनीय अनुभवांनी।।१७।। चित्तदशांसी महत्त्व न देता। करावी साधना संपूर्णतः। बीजाक्षरार्थ स्मरूनी ध्यान करिता। प्रगती होई आपैसे।।१८।। वदती ऐसे स्वामी आनंदाश्रम महान। परमप्रिय स्वशिष्यालागोन। उपदेश साधकासी हा महत्त्वपूर्ण। असे अध्यात्ममार्गावरी।।१९।। असत्य रोचक कथा रच़ूनी। हितचिंतक कथिती जनांलागोनी। अपकीर्ती अनुभवली शिष्यस्वामींनी। कोवळ्या बालवयात।।२०।। ऐशा या बिकट स्थितीत। लाभला एकमेव आधार खचित। प्रेमळ सद्गुरु आनंदाश्रमांच़ा निश्चित। अखिल मठ परिसरात।।२१।। ज़ाहले व्यथित अंतर्यामी। श्री परिज्ञानाश्रम शिष्यस्वामी। करिती सांत्वन आनंदाश्रम स्वामी। धैर्य देऊनी प्रेमभरे।।२२।। एके दिनी स्वामी आनंदाश्रमांसी। हितचिंतक म्हणे सायंकाळ समयासी। शिष्यस्वामी खेळती मुलांपाशी। सर्वांसमक्ष आंगणी।।२३।। साधना अध्ययनी रुची घेता। लाभ होईल शिष्यांसी संपूर्णतः। अध्ययनी दुर्लक्ष त्यांनी करिता। दोष येईल व्यर्थ शिष्यांसी।।२४।। ऐकूनी वदती सद्गुरु महान। परमहंस आनंदाश्रम दयाघन। परिसावे ते लक्ष देऊन।

भाविक सज्जन श्रोतेहो।।२५।। वय शिष्याचे लहान ज़री। बुद्धि साठाची हे तूं ध्यानी धरी। शिष्यस्वामींची चिंता तूं ना करी। असता आम्ही समर्थ।।२६।। सर्वही ज्ञान वसे जयाच्या ठायी। तो हा परिज्ञान लवलाही। शिष्य प्रगतीची चिंता गुरुसी राही। ज़ाणावे हे तूं अंतरी।।२७।। सांभाळावा त्वां आपुला संसार। करण्या शिष्यस्वामींचा उद्धार। शिरी घेतला आम्ही भार। त्याचे गुरु आम्ही हे तूं स्मरी।।२८।। त्वरित क्षमा मागितली त्या व्यक्तीने। क्षमा केली स्वामींनी प्रेमाने। दोष व्यर्थ देता त्या असामीने। तळमळले अंतरी सद्गुरु।।२९।। गुरु ज़ाणती शिष्यांचा नित्यनेम। श्री आनंदाश्रमांचे त्यावरी बहु प्रेम। शिष्यांचे सर्वतोपरी कुशल क्षेम। ज़ाणती सद्गुरु सर्वदा।।३०।। स्वामी आनंदाश्रम महान। अंतर्ज्ञानी सदा प्रसन्न। कर्तव्यदक्षतेचे मूर्तिमंत प्रमाण। त्यांसी ज्ञात सारे सत्य।।३१।। शिक्षक शिकवी पाठशालेत। ज़ाणे विद्यार्थ्याची बुद्धी समस्त। काय वर्णावी सद्गुरुशक्ती अनंत। या विशाल ब्रह्मांडी।।३२।। गुरुतत्त्व म्हणजे ते काय। परिसा सज्जनहो देऊनी अवधान। गुरुचि पिता बंधु सखा माय। विश्व जयाचे माया स्वरूप।।३३।। सद्गुरु नव्हे केवळ मार्गदर्शक। गुरु ज़ाणे अन्तर्बाह्य सम्यक। शिष्याचे भूत वर्तमान भविष्यादिक। ज़ाणे अन्तर्ज्ञानाने।।३४।। सद्गुरु असे सर्वज्ञ सर्वव्यापक। सर्व शक्तिशाली भवरोगहारक। क्षमाशील सहिष्णु भवतारक। या मायामय विश्वांतरी।।३५।। मूळ गुरुतत्त्व म्हणती जयासी। ते त्या अनादि अनंत विश्वंभरासी। निर्गुण निराकार ब्रह्मतत्त्वासी। अणुरेणुंत भरियेले ज़े।।३६।। द्वैतरूपी हे माया जगत। निर्मिले ज्या परमात्म्याने खचित। तेंची हे जगत निश्चित। प्रतिबिंब विश्वंभर सद्गुरुंचे।।३७।। प्रकृती पुरुष रूपे ह्या जगतात। साक्षीभावे राही सद्गुरु अंतरात। केवळ

सगुण रूपात नव्हे सीमित। सद्गुरु या ब्रह्मांडी।।३८।। चराचर ब्रह्मांड व्यापूनी सकळ। उरे ज़े अंतिम तत्त्व निर्मळ। म्हणती त्यासीच़ सद्गुरु प्रेमळ। वसे ज़ो सदैव निजानंदे।।३९।। अज्ञान सुज्ञान वसे जयात। असे हे ज्ञानरूप गुरुतत्त्व जगतात। ज्ञान असे सदैव स्वयंप्रकाशित। परि अज्ञान ते तमोकारक।।४०।। या दोन्हीच़ा सुरम्य संगम। म्हणजेची मायामय ब्रह्मांड उत्तम। अंधार अथवा प्रकाशाच़ा उगम। ज़ाणे कोणी ना बुद्धीद्वारा।।४१।। ज्ञान आनंद शांतिरूप सद्गुरु। अवतरे सदेह देण्या भक्तां आधारू। या तिन्ही भावांच़ा एकरूप संकरू। होई साक्षीभावात।।४२।। साक्षीभाव हा अहंतत्त्व शुद्ध। अहंतत्त्व म्हणजे नव्हे गर्व अशुद्ध। आनंद शांती प्रेम भावही विशुद्ध। नसे किंचितही त्या ठायी।।४३।। स्थूल सूक्ष्म संचयित गतिमान। पशुपक्षी वृक्ष लतिका पाषाण। स्त्री पुरुष थोर लहान। वसे सर्वांत हा ईश्वर सद्गुरु।।४४।। भवसागरी तारण्यासी भक्ता। सगुणरूपे प्रगटूनी हा त्राता। बीजाक्षर मंत्र देऊनी हा दाता। दावी निजात्म स्वरूप भक्तासी।।४५।। सदेह गुरु ज़ो दिसे अंमळु। असे तो ज़णु आरसा केवळु। परमात्मा असे जगत्पाळु। वसे अंतर्यामी निजात्म गुरुरूपे।।४६।। भक्त हाती असतां घागर। शोधितसे जल सर्वत्र जगभर। तृष्णेने त्रस्त होता शरीर। व्यथित होई अज्ञानाने।।४७।। ज्ञानरूप सद्गुरु सदेह। दावी भक्तांसी निःसंदेह। शोधिसी ज़े सत्य जगभर। वसे ते तुझ्याची अंतरी।।४८।। परमात्मा म्हणूनी भक्त ध्यायी जयास। वसे स्वअंतरी हा विश्वास। सद्गुरु दावी अनुभवे सत्य खास। अंतर्बाह्य एकरूपत्व।।४९।। जीवाच़ा देहभाव तोडण्यास्तव। देई गुरु सुखदुःखाच़े अनुभव। जेणे मी देह नव्हे हा भाव। उपज़े शिष्य चिंत्तांतरी।।५०।। बीजाक्षररूपी बीज पेरूनी। अनुभवरूपे ज्ञानान्न देऊनी।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

भक्तोद्धारार्थ सदेह प्रगटूनी। हे कार्य करी सद्गुरु।।५१।। परि मनोनिग्रह व स्वप्रयत्नाने। करावी जप ध्यान अनुष्ठाने। मानस चंचलत्व निरसे तेणे। आणिक लाभे चित्तशुद्धी।।५२।। चित्त शून्यात स्थिर होता क्षणी। सदेह गुरु करी बोलावणी। म्हणे मार्गक्रमण करावे झणी। अंतर्शून्याकांशी एकट्याने।।५३।। तदनंतर आत्मरूप सद्गुरु। देऊनी सदसद्विवेकाचा आधारु। संगे स्वानुभवाचा आधार खंबीरु। देऊनी उद्धरी सद्भक्ता।।५४।। अनादी सद्गुरुची भाषा मौन। बहिर्जगात शिकवी स्वानुभवातून। अंतरी विविध भावदशा दावून। देई सम्यक ज्ञान।।५५।। हे सर्व कथिण्याचे प्रयोजन। की सदेह गुरु हाची विश्वंभर महान। शिष्याचे हित सर्वार्थे समजून। मार्गदर्शन भक्तां सदा करी।।५६।। तेवीच विद्या आणि अध्यात्म। श्री परिज्ञानाश्रमांची उन्नती सुगम। जाणती स्वामी आनंदाश्रम। नलगे त्यासी काही सांगणे।।५७।। खंबीर गुरुपरंपरा पाठीराखी पूर्ण। धर्मपीठाधिकार ज्यांचा संपूर्ण। समर्थ सद्गुरु असता आपण कोण। हितचिंतक, सांगा भाविकहो।।५८।। असो आता ऐकावे निरुपण। वर्णिते पुढील चरित्रकथन। परिसावे भक्तीभावे स्मरुन। विश्वंभर श्री भवानीशंकरासी।।५९।। ध्यान अनुष्ठान अध्ययनाची। नित्यकर्मे जीं महत्त्वाची। करिती शिष्यस्वामी नित्याची। पाहुनी संतोषले सद्गुरु।।६०।। वय वरुषे चौदा असता। शिष्यस्वामी अनुष्ठानासी बैसता। अद्वितीय घटना घडली प्रत्यक्षात। त्याविषयी परिसावे।।६१।। विश्वांची सृजन-शक्तीस्वामिनी। राजराजेश्वरी ऐश्वर्यदायिनी। प्रसन्नवदना जगदंबा भवानी। प्रगटली श्री परिज्ञानाश्रमांसमोरी।।६२।। जाहले स्वामी तेजभारे अनुकंपित। नेत्र जाहले विस्मये प्रदीप्त। जगदंबा ठेवी स्वामीशिरी हस्त। देह भारावला परिपूर्ण।।६३।। देऊनी क्षणैक

दर्शन। अंतर्धान पावली आदिशक्ती चिरंतन। आनंदे व्यापले मन परिपूर्ण। शिष्य परिज्ञानाश्रमांचे।।६४।। सद्गुरु आनंदाश्रमांसमीप ज़ाऊन। कथिला वृत्तान्त संपूर्ण। धरिले सद्गुरुंचे दिव्य चरण। अनन्य भक्तिभावे।।६५।। ऐकता वृत्तान्त अभिनवपूर्ण। आनंदले स्वामी आनंदाश्रम दयाघन। वदती सद्गुरु स्वशिष्या लागोन। श्रवण करा भाविकहो।।६६।। तूं असशी शक्तीउपासक। राजराजेश्वरीचा अमूल्य पूजक। सृजनशक्ती ती ब्रह्मांड स्थापक। करील कृपा तुज़वरी।।६७।। प्रवृत्तीधर्म घडवी माता। शिकवी समाजात सुसंस्कृतता। शिकविण्या आचारसंहिता। स्थापावी एक संस्था।।६८।। प्रवृत्ती धर्माची माता प्रतिक। देऊनी श्री दुर्गापरमेश्वरी नामक। दे तिज़सी स्वतंत्र स्थानक। प्रतिष्ठापूनी प्रेमे तिज़सी।।६९।। तदउपरान्त शिष्यस्वामींनी वाहिले। सर्वस्व अध्यात्मसाधनेत आपुले। क्षणोक्षणी प्रयाण चालले। अध्यात्म पथावरी गुरुकृपाबळे।।७०।। गुरुकृपे साध्य ज़ाहली अभिनव। मन एकाग्रता उग्र साधनेस्तव। विविध सिद्धींचा ज़ाहला उद्भव। स्वामी परिज्ञानाश्रमांमाजी।।७१।। सिद्धीयोगे उदी कुंकुम पुष्पे निर्मिली। सद्गुरु चरणी अर्पिली। भक्तिभावे गुरुचरणे वंदिली। स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।७२।। प्रार्थिले शिष्यांनी सद्गुरु प्रति। आपुल्या कृपे झ़ाली सिद्धीप्राप्ती। मानसपूजेची ही सुफळे निश्चिती। अर्पितो मी भक्तीभावे।।७३।। विजयोत्साह दाटता सत्वरी। चित्त नर्तन करी अंतरी। परि ही भावदशा ना बरी। ज़ाणती स्वामी आनंदाश्रम।।७४।। कर्तुत्वाच्या आनंदोल्हासाने। गाठले शिखर श्री परिज्ञानाश्रम मनाने। परि सूक्ष्मातिसूक्ष्म गर्वाने। वेढीले शिष्यस्वामींसी।।७५।। आनंदाश्रम स्वामी वदती शिष्यासी। नच उपयुक्त सिद्धीफळे आम्हांसी। भूलू नये सिद्धी प्रलोभनांसी। संन्याशाने सन्मार्गावरी।।७६।।

सिद्धी देते असीम कीर्ती। परि नच व्हावे वश तिज़ जगती। ध्यान ठेवावे सतत चित्ती। अध्यात्म स्वरूप ज़ाणण्या।।७७।। शुभाशीष बाळा देतो तुज़सी। उद्धरशील तूं अनेक भक्तांसी। आमच्यापेक्षा अधिक लाभोत तुज़सी। सद्भक्त जगतामाजी।।७८।। सद्गुरु उपदेश श्रवण करिता क्षणी। गर्व निमाला झ़णी। नच केला पुनश्च स्वामींनी। सिद्धीप्रयोग ऐसा।।७९।। आनंदाश्रम स्वामी वदतांना स्पष्ट। उपस्थित होते कांही जन श्रेष्ठ। त्यास्तव इतुकेची बोलुनी स्पष्ट। पूर्ण केले संभाषण।।८०।। कांही अधीर असंतोषी जनांनी। वार्ता पसरविली शीघ्र जनी। सिद्धी उपयोग केला शिष्यस्वामींनी। ऐशापरी सर्वत्र।।८१।। टीकेची कृष्णरंगी अंगुली। लाभली प्रगतीपथावर च़ांगली। सहज़ साक्ष जनांसी मिळाली। त्यांच्या अध्यात्म प्रगतीची।।८२।। सन पासष्टामाझ़ारी। भक्तगण मिळूनी समाजांतरी। आयोजिला सुवर्णमहोत्सव सत्वरी। मुंबई शिराली बेंगळूर ग्रामी।।८३।। सुवर्णाक्षरांनी लिहावा ऐसा इतिहास। घडविला स्वामी आनंदाश्रमांनी खास। ह्याच़ा अनुभव असे भक्तांस। स्वामी मठाधिपती असता।।८४।। स्वामी आनंदाश्रमांनी केल्या सुधारणा। उद्धरिले असंख्य दुःखितांना। त्या विषयी कथिते भक्तांना। परिसावे शांत चित्ते।।८५।। आंतरब्राह्मण ज़ातीय विवाहास। दिली अनुमती समाजास। गुरुहस्ते तीर्थोदक घेण्यास। विधवा स्त्रियांसी अनुमोदिले।।८६।। परदेशी सारस्वतांवरील निर्बंध। त्यजित केले सर्व बंध। संपविला वितंडवाद सबंध। एकजूट सारस्वतांत केली।।८७।। गरीब पुनरूज्जीवनार्थ वाहिले। जीवन सर्व आपुले। संस्कृत गुरुकुल स्थापिले। विद्यार्जनाकारणे मठान्तरी।।८८।। होमियोपथी औषधालय मोफत। समृद्ध ग्रंथालय स्थापिले शिरालीत।

विनामूल्य पठण अध्ययनार्थ सतत। केली व्यवस्था चित्रापुरान्तरी।।८९।। केले सर्व समाधी पुनरूज्जीवन। कैक वस्तूंचे नूतनीकरण। दिले स्त्रीशिक्षणास्तव प्रोत्साहन। सारस्वत समाजामाजी।।९०।। बांधियले विश्रामगृह नूतन। विद्युतदीपयुक्त संपन्न। स्त्रीचे संसारांत महत्त्व परिपूर्ण। कथिले जे शास्त्राधारित।।९१।। लग्न मुंज आदी कार्यांसी। अल्पखर्चिक रीतीने करण्यासी। उपदेशिले स्वामींनी जनांसी। वारंवार आशीर्वचनांतूनी।।९२।। पाचशे एकाहत्तर आशीर्वचनें। दिधली स्वामींनी प्रेमाने। कोंकणी मराठी कन्नड हिंदी भाषेने। उपदेशिले वेळोवेळी।।९३।। उपस्थित असता सभेत। असंख्य संस्कृत विद्वान समस्त। स्वामी आनंदाश्रमांनी संस्कृतात। दिधली आशीर्वचनें।।९४।। विस्मये वेढिले विद्वानांसी। पाहता स्वामींच्या संस्कृत प्राविण्यासी। धन्य म्हणती मानसी। पाहूनी स्वामींचे संस्कृत प्रभुत्व।।९५।। मंगळूर गोकर्ण ग्रामी। बेंगळूरात जनता संस्कृतप्रेमी। वदले श्री आनंदाश्रम स्वामी। सहजतेने गीर्वाण भाषेंत।।९६।। वेदान्त, उपनिषद, भगवद्गीता। भक्ती, ज्ञान, योग महत्ता। ब्रह्मसूत्र, अद्वैत सिद्धान्त परिपूर्णता। कथिली श्री आनंदाश्रमांनी।।९७।। साधावी वैदिक व मठाची उन्नती। निष्ठा ठेवा परमात्म्याप्रति। मानवता धर्म पाळावा जगती। ऐसा बहुमूल्य संदेश दिधला।।९८।। गुरुपरंपरा नामावली जुनी। आद्य परिज्ञानाश्रमांच्या पूर्वीची संशोधूनी। इतिहासाचा आधार घेऊनी। लिहिली स्वामी आनंदाश्रमांनी।।९९।। जयांच्या स्मरणमात्रे लाभे मनःशांति। दग्ध होती पापें अन् अशांती। निरसती विघ्ने व्याधी जीवनान्ती। त्या श्री आनंदाश्रमांसी कैसे वर्णावे।।१००।। आतां कथिते पुढील निरुपण। सुवर्ण महोत्सव संक्षिप्त वर्णन। भक्तांनी केले समारंभ आयोजन।

मुंबई शिवाजी-उद्यानात।।१०१।। पाहूनी भक्तांचे प्रेम। संतोषले परमहंस आनंदाश्रम। जनांचे सर्वतोपरी क्षेम। पाहिले स्वयंसेवकांनी संतोषाने।।१०२।। या सुवर्ण महोत्सवात महान। दिधले शिष्यस्वामींनी आशीर्वचन। श्री आनंदाश्रमांसी साष्टांगे वंदून। शिष्यस्वीकारानंतर प्रथमतः।।१०३।। स्वामी आनंदाश्रम ओहळले चित्ती। पाहुनी शिष्याची प्रतिभा अन् भक्ती। ज़ाहली असीम आनंद प्राप्ती। भक्तजनांच्या हृदयांतरी।।१०४।। तदनंतर दिधले आशीर्वचन। स्वामी आनंदाश्रमांनी पावन। धन्य ज़ाहले भक्तजन। ऐकता सद्गुरुवाणी।।१०५।। सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ। शतचंडी होम ज़ाहला सार्थ। जन आले द्विसहस्र। शिराली चित्रापुर मठात।।१०६।। वैशाख शुद्ध चतुर्दशीसी। आरंभिले शतचंडी यागासी। स्थापूनी दुर्गामूर्ती सुंदरशी। अलंकारयुक्त शृंगारिली।।१०७।। वैशाख वद्य तृतीयेसी। संपूर्ण करुनी या शतचंडी यागासी। दुज़े दिनी वैशाख संकष्टीसी। दुर्वा होम आरंभिला।।१०८।। श्रीगणेशमूर्ती सुंदर। स्थापियली देवीच्या मांडीवर। दोन्ही मूर्ती त्या मनोहर। शोभती यज्ञशाळेमाजी।।१०९।। वैदिक करिती मंत्रघोष। आळविती गणपतिअथर्वशीर्ष। तुटले भक्तांचे विघ्नपाश। पूज्य सद्गुरुद्वय दर्शने।।११०।। वैशाख वद्य पंचमी दिनी। श्री देवी गणपती मूर्ती विसर्जन करूनी। श्री शंकर मूर्ती प्रस्थापूनी। आरंभिले रूद्रानुष्ठान।।१११।। पाचशे लघुरुद्रांसहित। महारुद्रोत्सव ज़ाहला समाप्त। चाले अन्नसंतर्पण सतत। सुवर्ण महोत्सवात शिरालीत।।११२।। वैशाख वद्य अष्टमीसी। कनकाभिषेक केला त्या समयासी। बैसवूनी स्वामी आनंदाश्रमांसी। अर्पिली सुवर्ण पुष्पे।।११३।। 'लक्ष्मीसूक्त' गाती वैदिक। पाहती कौतुके जन भाविक। कनक पुष्पे ती सुबक। ढळती सरसर

शिरावरूनी।।११४।। सुवर्ण महोत्सव ज़ाहला बेंगळूर ग्रामी। ज़मले असंख्य गुरुप्रेमी। संचरती ज़णू आनंदधामी। पाहता सद्गुरु द्वयासी।।११५।। आता ऐकावे पुढील कथन। धन्य ज़ाहले गुरु-शिष्य जीवन। स्वामी परिज्ञानाश्रमां ज़ाहले ब्रह्मज्ञान। सद्गुरु आनंदाश्रम कृपे।।११६।। सोनियाच़ा दिन उगवला। एकोणीसशे सहासष्ट गुरुपौर्णिमेला। निजस्वरूप स्वयंप्रकाश प्रगटला। स्वामी परिज्ञानाश्रम ध्यानावस्थेत।।११७।। ज़ाहले 'अहं ब्रह्मास्मि' स्फुरण। ओझरे हर्षानंद चित्तांतून। वाहती झरझर अश्रू नयनांतून। पाहुनी विशाल सत्स्वरूप।।११८।। जिकडे पाहे तिकडे। स्थूल सूक्ष्म च़ोहीकडे। सर्वत्र प्रतिबिंब आपुले सापडे। स्वामी परिज्ञानाश्रमांसी।।११९।। कंपित ज़ाहली काया मनोहर। वंदिले श्री आनंदाश्रमचरण सुंदर। मुखी पसरली प्रसन्नता मधुर। शब्द नच सुच़ती बोलावया।।१२०।। सद्गदित ज़ाहले गुरुवर। पाहती तृप्ततेने शिष्यासी सुंदर। अंतर्ज्ञानी आनंदाश्रम गुरुवर। संतोषले होता शिष्यासी सत्स्वरुप ज्ञान।।१२१।। मौन भाषा एकमेकांची। साक्षी बनली गुरुशिष्य मिलनाची। आत्मा परमात्मा एकरूपत्वाची। अनुभूती उपभोगिली।।१२२।। आनंदी आनंद ज़ाहला सकळ। गुरु न्याहाळती शिष्यमुख कोमल। परि गुपित राखिले हे वृत्त निर्मळ। स्वामी आनंदाश्रमांनी।।१२३।। निवास असता शिराली मठात। हस्तक्षेप मुळी न करता कार्यात। शिकले मठ व्यवस्थापन समस्त। गुरुंकडूनी चतुरतेने शिष्यस्वामी।।१२४।। शिष्यस्वामींनी प्रार्थिले श्री आनंदाश्रमांसी। श्रावण वद्य अष्टमीसी। अर्पितो मम एका विनंतीसी। आपुल्या पूज्य गुरु चरणी।।१२५।। अभय देऊनी स्वशिष्यासी। सद्गुरु आनंदाश्रम म्हणती त्यासी। तव इच्छित असे ज़े मानसी। सांगावे निःसंकोचपणे आम्हां।।१२६।। शिष्यस्वामी वदती

गुरुचरणांत। आज़वरी असे प्रघात समाजात। माता न येई पुत्रा समक्ष प्रत्यक्षात। संन्यास दीक्षा स्वीकारता।।१२७।। मायबाप मज़सी आपणची पहिले। बाळासम आज़वरी सांभाळिले। जन्मदात्या मातेने प्रेमे पाळिले। अकरा वर्षांपर्यंत।।१२८।। उल्लंघुनी ही विपरीत रीत। आपुली आज्ञा मिळता खचित। मातेचे पुरवू आम्ही इच्छित। आम्हां भेटण्यासी।।१२९।। पुत्रभाव वसे ज़री तिच्या मनात। नच राहिला आमुच्या चित्तात। अन्य जनांपरि जीवनात। करीन सांभाळ जन्मदात्यांचा।।१३०।। जेधवा त्यांसी होईल इच्छा भेटण्यासी। अथवा आमच्या संगे राहण्याची। अनुमती मिळता त्यास्तव तुमची। अंमलात आणीन रीत ही।।१३१।। दुजी विनंती परिज्ञानाश्रमांची। श्रवणे मिटे शंका मनीची। ज्ञात होता त्या विषयी सत्यची। स्वामी परिज्ञानाश्रम विषयी।।१३२।। म्हणती श्री परिज्ञानाश्रम श्री सद्गुरुंसी। ''अंतिम ध्येय प्राप्त झाले आम्हांसी। ब्रह्मज्ञानाचे मार्ग अनेक निश्चयेसी। असती या जगी।।१३३।। ते सर्व हाताळण्यासी। द्यावी अनुमती आम्हांसी। स्वानुभवे ज़ाणण्या प्रत्येक पंथासी। वर्तूनी त्या पंथापरी''।।१३४।। दोन्ही विनविण्यांसी तत्क्षणी। दिली मान्यता श्री आनंदाश्रमांनी। ज़ाहला आनंद श्री परिज्ञानाश्रम मनीं। मिळता सद्गुरुंची अनुज्ञा।।१३५।। आता ऐकावे पुढील निरुपण। स्वामी आनंदाश्रमांची काया पावन। शनै शनै ज़ाहली क्षीण। चातुर्मासांत शके १८८८ माझारी।।१३६।। भाद्रपद शुद्ध तृतीयेसी। पराभव नाम संवत्सरासी। स्वामी आनंदाश्रम महानिर्वाणासी। निघाले सोळा सप्टेंबर रोजी।।१३७।। दीर्घस्वरे आळवला ॐकार। आसमंत ज़ाहला तदाकार। ऐकता गुरुमुखी नाद ॐकार। धाविन्नले शिष्यस्वामी गुरुचरणी।।१३८।। पवित्र गंगाजल घेऊनी हाती।

गुरुमुखांत तत्क्षणी अर्पिती। दुःखाश्रू नेत्रांतुनी वाहती। स्वामी परिज्ञानाश्रमांच्या।।१३९।। दुःखद वार्ता येता सर्वत्र। जन धावले दर्शनार्थ शिरालीत। बेंगळूर मठातूनी चित्रापुर मठात। आणिली काया कार्यकर्त्यांनी।।१४०।। जन हळहळती मनांतून। आठवूनी सद्गुरुमूर्ती महान। दुःखार्णवी बुडाले जन। महानिर्वाणी ज़ाता स्वामी आनंदाश्रमांनी।।१४१।। समाधी स्थानी बैसवुनी काया पद्मासनस्थ। शिष्यस्वामींनी केले विधी समस्त। वैदिकांनी मंत्रघोषाच्या जल्लोषात। केले विधी षोडषोपचारे।।१४२।। स्थापिले शिवलिंग त्यावरी। मृत्तिकेचे एक वर्षभरी। तदनंतर शिलालिंग समाधीवरी। स्थापिले प्राणप्रतिष्ठा करुनी।।१४३।। श्रीकृष्णाची मूर्ती स्थापिली। शिवलिंगाच्या पाठी चांगली। दहीपोह्याचा नैवेद्य भक्त मंडळी। आज़ही अर्पिती समाधीसी।।१४४।। स्वामी पांडुरंगाश्रमसमाधी बाज़ूस। दिधली समाधी व्यवस्था खास। चित्रापुर जन्मग्राम खास। स्वामी आनंदाश्रमांचे।।१४५।। स्वामी आनंदाश्रमांसी वंदूनी। अर्पिते षष्ट्याध्याय गुरुचरणी। स्वामी परिज्ञानाश्रमांसी मनीं स्मरूनी। करिते अध्याय संपूर्ण।।१४६।। अध्याय।।६०।। ओंव्या ।।१४६।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति षष्ट्याध्यायः समाप्तः।।

श्रीगणेशाय नमः। श्रीमहाकाल्यै नमः। श्री महालक्ष्म्यै नमः। श्रीमहासरस्वत्यै नमः। श्री भवानीशंकराय नमः।।१।। सर्व कुलदेवतांसी वंदन। श्री दुर्गापरमेश्वरीसी नमन। सकल गुरुपरंपरेसी वंदून। कथिते पुढील निरुपण।।२।। श्री आनंदाश्रमांनी समाधी घेता। कार्यरत ज़ाहले टीकाकार संपूर्णतः। स्वामी परिज्ञानाश्रमांची आध्यात्मिक परिपक्वता। विषयी वाद उमटला।।३।। न घेता स्वयें पूर्ण अध्यात्मानुभव। काहींनी केला प्रश्न उद्भव। त्यास्तव विषण्णतेचा प्रादुर्भाव। ज़ाहला अल्प जनमानसीं।।४।। स्वामींवरी आला विपरीत काळ। ज़ाहले अंतरी स्वामी व्याकुळ। अपप्रचारा आला सुकाळ। विपर्यासार्थ स्थिती उद्भवली।।५।। काय करावे कोठे ज़ावे। सत्य केवी भक्तां सांगावे। मठोन्नतीस कसे साधावे। चिंतीती स्वामी परिज्ञानाश्रम।।६।। मानसी आले दडपण। दुर्दैवे लाभले विपर्यासाचे आभूषण। ज़ाहले जीणे कठीण। तन मन त्रस्त ज़ाहले।।७।। दिली आरोग्यवृद्धी कारणे। वैद्यांनी एनट्रूयीन एस् इंजेक्शने। परि प्रारब्धांशी झगडणे। असाध्य केवळ मानवा।।८।। अनारोग्ये वेढले अधिक। श्री परिज्ञानाश्रम कायेसी सात्विक। मधुमेह रक्तदाब आदिक। व्याधींनी ग्रासली काया।।९।। नूतन कार्य हाती घ्यावे। त्यात विघ्न नवरूपे यावे। ह्या मायाशक्तीसी काय म्हणावे। सांगा भाविक सज्जनहो।।१०।। दृश्य विघ्नांव्यतिरिक्त। आली विविध विघ्ने खचित। करणी जारण मारणादी प्रयोग विपरित। ज़ाहले श्रीस्वामींवरी।।११।। बारा ऑक्टोबर सदुसष्टला। विजयादशमी सुमुहूर्ताला। ज़ाहला धर्म पट्टाभिषेक सोहळा। स्वामी परिज्ञानाश्रमांचा।।१२।। मठाधिपत्य सूत्रे घेऊनी हाती। अवलोकिती मठाची आर्थिक स्थिती। मनी योजूनी मठोन्नती।

चिंतिती मानसी श्रीपरिज्ञानाश्रम।।१३।। परि सुदैवाने सोडिला हात। सहकार्य उणे पडले कार्यात। विचार विनिमयास्तव प्रत्यक्षात। राही समय उणा कार्यकर्त्यांसी।।१४।। सकल रिती नियमांचा करिता अभ्यास। ध्यानी आले श्रीस्वामीजींस। प्रचलित कामकाज़ नियमांस। बदलणे ज़रूरी असे।।१५।। चिंतिती स्वामी परिज्ञानाश्रम। की बदलता संचलित नियम। होईल जनमानसी संभ्रम। अनाहूतपणे समाजामाजी।।१६।। पुरोगामी अन् प्रतिगामी जनांत। उद्भवेल वैचारिक द्वंद्व समाजात। सामान्य असामी ह्या वितंडवादात। होईल किंकर्तव्यमूढ।।१७।। लोकनिंदेस आम्ही भ्यावे। तरी मठोन्नतिस कसे साधावे। साधले सु-इप्सित बरवे। सहकार्य मिळता कार्यकर्त्यांचे।।१८।। ज़ाणण्या ज़माखर्चाचा मेळ। अभ्यासिले हिशोब सकळ। उपाय शोधिला दुर्मिळ। तो परीसावा सज्जनहो।।१९।। नित्य पूजा सेवेंत येती। शेकडो नारळ मठाप्रति। परि त्या श्रीफळांन्वये आर्थिक प्राप्ती। नच होई मठासी।।२०।। ह्यास्तव पाहूनी आर्थिक निगमागम। योजिला उपाय सुगम। चार आणे प्रति श्रीफळ ठेवूनी दाम। करावी विक्री मठान्वये।।२१।। मठांत श्रीफळ मिळे स्वस्त। मंडईतील किंमती होत्या जास्त। खरेदी करिती सकल ग्रामस्थ। संतोषाने मठांतूनी।।२२।। धनप्राप्ती ज़ाहली मठासी। नच रूचले नवनियम प्रतिगाम्यांसी। ह्यास्तव पूर्ण सहकार्य स्वामींसी। नच लाभले कार्यामाजी।।२३।। ज़ाहला अपप्रचार अमित। भक्तजन ज़ाहले संभ्रमित। कथिण्या जनांसी सत्य घटित। लिहिले पत्र कन्नड भाषेत।।२४।। देऊनी पत्रासी नाव 'प्रबुद्ध परिज्ञान'। दिधले सत्याधारित स्पष्टीकरण। सुबुद्ध सारस्वत समाजालागोन। स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।२५।। नंतर त्या पत्राचे

इंग्रजी रूपान्तर। केले मुंबई शिष्यवृंदाने नंतर। ज्या निमित्ते ज़ाहला जनजागर। ऐकूनी सद्गुरु मानस।।२६।। मठ व समाजाच्या प्रेमापोटी। रचिली उन्नतिची बीजें गोमटी। परि विपर्यास तो उठाउठी। घेई असंतोषाचे रूप।।२७।। समाजकार्ये ती सुरेख। होती सहकार्यानेची अनेक। निमाला स्वार्थापोटी विवेक। काही जनमानसी।।२८।। दाविता सद्गुरुंवरी अविश्वास। मनाई केली स्वामींनी पादपूजेस। ''नको हा मान-सन्मान आम्हांस''। म्हणती स्वामी परिज्ञानाश्रम।।२९।। देव तो भावाचा भूकेला। त्यासी कासया व्याप सगळा। सद्गुरुरूपी अलख निरंजन प्रेमळा। नच काहीं उणे जगी।।३०।। सद्गुरुंसी हवे भक्ती प्रेम। अविरत विश्वास अनुपम। साशंक चित्ते पूजिता अवमान। होई सद्गुरुंचा निश्चये।।३१।। प्रथम पाद्यपूजा स्वीकारिली। स्वामींनी बाहत्तर साली। आयोजिला समारंभ ज्यावेळी। कॅनरा सारस्वत असोसिएशनने।।३२।। ह्या उत्कृष्ट समारंभात। गोकर्ण पर्तगाळी मठाधीशांसमवेत। केली गुरुद्वयांची पाद्यपूजा साद्यंत। चिक्रमने श्रीपादाने।।३३।। सहकार्य देण्यास्तव प्रत्यक्षात। केले नालकूर श्रीपादासी उद्युक्त। स्वामी आनंदाश्रमांनी देऊनी दर्शन साक्षात। या गुरुभक्तासी।।३४।। सहकार्य भक्तांचे लाभता। आनंद ज़ाहला स्वामींच्या चित्ता। मठोन्नतीने वेग घेतला आता। स्वामी परिज्ञानाश्रमकृपे।।३५।। सुदैव पुनश्च आले द्वारी। विविध सत्कार्ये करुनी मठासी तारी। गुरुपरंपरेचीच कृपा ही सारी। यामाजी न घ्यावा संशय।।३६।। ज्याकारणे मठ ज़ाहला प्रगत। कथिते त्याचा आढावा शब्दात। ऐकता तृप्ती लाभे चित्तात। परिसा सत्कार्य स्वामींचे।।३७।। अलवेकोडी कँब्रे मळ्यात। पेरविली बीजें फळभाज्यांची त्यात। पीक आले

घसघशीत। हिरवळ पसरली चोहीकडे।।३८।। लावियले बँग्रे समुद्र किनारी। उत्तम माड सत्वरी। दाविल्या गोड पाण्याच्या विहीरी। समुद्र किनारी अडीच फूटावरी।।३९।। वृद्धिंगत ज़ाहले उत्पन्न। ज़ाहला मठ स्वायत्त संपन्न। समृद्ध ज़ाहले मठ व्यवस्थापन। अल्प कालावधी माजी।।४०।। दीन होतकरू विद्यार्थी साहाय्यार्थ। संस्कृत विद्या उत्तेजनार्थ। विद्यार्थी सर्वांगीण विकासार्थ। दिधल्या अनेक शिष्यवृत्त्या।।४१।। संस्कृत विद्यापीठ स्थापनार्थ। उद्दिष्ट ठेवूनी मनी यथार्थ। सूचित केले समाजात समर्थ। विज्ञापन देऊनी मासिकात।।४२।। परि विद्यार्थी एकही नच मिळाला। संस्कृत विद्यापीठ स्थापनेला। स्वप्न विरले त्याची समयाला। स्वामी परिज्ञानाश्रम मनीचे।।४३।। धर्म विज्ञान शास्त्राचा साधूनी समन्वय। भक्तां द्यावे चिरंतन अभय। ग्रामस्थांसी करुनी निर्भय। साधावी चित्रापुर ग्राम समृद्धी।।४४।। ह्यास्तव भेटूनी स्वयें मठ परिवारास। अन सकल ग्रामस्थांस। ज़ाणिले सर्वांच्या हृद्गतास। स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।४५।। या विषयीचे उदाहरण। परिसा ज़े हृदयद्रावक पूर्ण। निर्णय घेतला महत्त्वपूर्ण। स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।४६।। एक दुःखी इसाई स्त्री ग्रामस्थ। आली श्री भवानीशंकर दर्शनार्थ। विधर्मीय म्हणूनी प्रवेशार्थ। अनुमति तिज़ ना मिळाली।।४७।। स्वामींनी पाहूनी दीन स्त्रीसी। पुसिले कारण रुदनाचे तिज़सी। 'काय कारणे येथ बैसलीसी। व्यथित होऊनी अंतरी'।।४८।। इसाई स्त्री म्हणे स्वामींसी। 'शस्त्रक्रियेस्तव निघाले इस्पितळासी। मम आरोग्यास्तव प्रार्थिण्यासी। आले मी येथे भक्तीभावे।।४९।। परि मी विधर्मीय असुनी। कसे प्रवेशावे मठालागोनी। प्रार्थण्यासी श्री भवानीशंकर चरणी। ज़ो मज़ येशुसम भासे।।५०।। परि वाटे

ज़ाहला अपशकुन। नच ज़ाहले प्रभुदर्शन। सुरक्षित घरी परतोन। येईन का ऐसे वाटे मनीं'।।५१।। ऐकता तियेचे प्रांजळ भाषण। आणिक तिची श्रद्धा पाहून। द्रवले करुणेने निर्मळ मन। स्वामी परिज्ञानाश्रमांचे।।५२।। वदती स्वामी त्या स्त्रीसी। यावे प्रभुदर्शनार्थ मठासी। भक्तीभावे स्मरून श्री भवानीशंकरासी। घ्यावा आशिषरूपी प्रसाद।।५३।। स्वयें नेऊनी तिज़सी मठात। दिधला प्रसाद आशिषयुक्त। येशु अवतरला खचित। ऐसे वाटे तिज़ अंतरी।।५४।। हा साक्षात् श्रीभवानीशंकर। अथवा सगुण येशु साकार। ज़णू परमात्मा जगदाधार। आला स्वामी परिज्ञानाश्रमरूपे।।५५।। मानवधर्म ज़ो महान। तोची सकळ धर्मांचे अधिष्ठान। मानवतेचे ज़ो ज़ाणे महिमान। तो ज़ाणे सर्व धर्मांचें सार।।५६।। निर्गुण अद्वैत तत्त्वापायी। नच राही भेद हिंदु इसाई। परमात्मा वसे सर्वांठायी। फक्त मानवताधर्म मानती स्वामी।।५७।। आता ऐकावे महिमान। इंग्रजी व इलेक्ट्रॉनिक्सचे अध्ययन। अल्पकाळांत तीक्ष्ण बुद्धीने ज़ाण। स्वामींनी केले तज्ञान्वये।।५८।। स्वामी पांडुरंगाश्रम प्रसादीत। पंचवटी करावी सुशोभित। कार्यान्वित करावा प्रांत खचित। जनकल्याण साधण्यासी।।५९।। हा उद्देश ठेवूनी मनात। बांधविली नूतन इमारत। रक्तचाचणी प्रयोगशाळा प्रस्थापित। केली प्रयत्नशील राहूनी।।६०।। केली गणेश मूर्ती तेथे स्थापित। आसमंत केला सुशोभित। रंगीबेरंगी पुष्पलतिकांसहित। दोनशे निवडुंग लावियले।।६१।। बांधियले एक मृगवन। पाळियला व्याघ्र-बछडा लहान। संवर्धिले अश्व श्वान। प्रेमभरे त्यांसी संरक्षूनी।।६२।। उपयुक्त यंत्र तपमानदर्शक। प्रस्थापिले पंचवटीवरी सुरेख। काज़ू आम्रफळे वृक्ष अनेक। लावियले

आसमंतात।।६३।। चित्रापुर ग्राम लहान। संपर्क जगाशी साधणे कठीण। घेतले बिनतारायंत्रणेचे शिक्षण। स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।६४।। स्वयें बिनतारायंत्रे निर्मिली। व्यवस्था समयसूचक भोंग्याची केली। मासिक प्राप्ती वैदिकांची वाढविली। सुधारुनी वेतन श्रेणी।।६५।। ज़ातिधर्म निर्बंध तोडूनी। मानवता धर्म ध्यानी धरूनी। प्रगत भविष्यकाळ अनुरोधूनी। मठ-प्रवेशार्थ सर्वां मान्यता दिली।।६६।। सकल कामगारांसी करण्या समर्थ। सुखसोयी दिधल्या यथार्थ। दिधल्या मुलांच्या अध्ययनार्थ। शिष्यवृत्त्या अनेक।।६७।। स्थापूनी पुरातन मूर्ती-संग्रहालय। दिधला दुर्लक्षित मूर्तींना न्याय। कथिण्या मूर्तींचे नाम रूप आशय। नियुक्त केला मार्गदर्शक।।६८।। चित्रापूर यंग मेन्स असोसिएशन नामें। स्थापून एक संस्था प्रेमे। उत्तेजिण्या बाल-तरूणांसी सप्रेमे। केली व्यवस्था परिपूर्ण।।६९।। देऊनी 'आनंदाश्रय' नाम। वृद्ध- निवासार्थ पुण्यमय सुखधाम। वृद्धापकाळी भजण्या प्रभुनाम। बांधियले मठाज़वळी।।७०।। जनांनी धर्म- वर्ण-भेद विसरुनी। समत्व भाव ठेवावा मनी। धर्म सांस्कृतिक प्रोत्साहनार्थ स्वामींनी। केला पुनश्च रथोत्सव प्रारंभ।।७१।। चित्रापुर रथोत्सव वर्णन। गुरुदासे कथिले चरित्रात संपूर्ण। त्यास्तव आध्यात्मिक गूढार्थ निरूपण। करिते गुरुकृपेने।।७२।। अंतर्जगातील मार्ग सुगम। दावी ज़ो सत्स्वरूप उत्तम। सामान्य चक्षूंसी पथ तो अनुपम। नच दिसे कदापि जीवनी।।७३।। मानवी काया महत्त्वपूर्ण। अंशरूपी ब्रह्मांडाची प्रतिकृती पूर्ण। चंद्र सूर्यादी ग्रह तारे महान। वसती तेथे गुप्तरूपे।।७४।। गुदद्वारा पासूनी शिरापर्यंत। असती मुख्य सप्तचक्रे येथ। हाची अध्यात्म मार्ग सुपंथ। जेथ चित्-शक्ती प्रयाण करी।।७५।। रथास मुख्य चक्रे

चार। अंतर्भागी दोन चक्रे साकार। कलश बिंदू सूक्ष्म अतितर। ज़ाणावा सातव्या चक्रापरी।।७६।। पंचज्ञानेंद्रिये पंचकर्मेंद्रिये उत्तम। रथ पायऱ्या सर्वोत्तम। मनोनिग्रह सदसद्विवेक अनुपम। हेंची द्विरज्जू रथाचे।।७७।। रथचक्रासमोरी असती फळे। तीच़ कर्म-अकर्मांची सुफळे। कर्म-वेष्टीत जीवन सगळे। साधक पार करी प्रयत्न बळे।।७८।। भक्ति विश्वास धरूनी चित्तात। हृदयी परमात्म्यासी स्मरत। ठेविता ही तनु अध्यात्मी रत। अध्यात्म-सुपंथी च़ाले साधक।।७९।। बीजाक्षरयुक्त गुरुमंत्र सबळ। स्मरता अर्थ ज़ाणूनी सांज़ सकाळ। लाभूनी सत्वर गुरुकृपा बळ। साधक चक्रभेद करी।।८०।। प्रथम चक्र ते मूलाधार। द्वितीय स्वाधिष्ठान चक्र साकार। तृतीय मणिपूर चक्र घेई आकार। नाभीदल परिसरान्तरी।।८१।। अनंत सद्गुरु निराकार। अंतरी देई भक्ता विवेकाधार। प्रयत्नबळे साधक करिता संचार। पोहोचे अनाहत चक्रे हृदयी।।८२।। ह्या चक्रातूनी करिता पथक्रमण। दिसे त्रिवेणी संगम महान। ईडा पिंगला एकरूप होऊन। मिसळती मुख्य सुषुम्ने माजी।।८३।। ज्ञानशक्ती महासरस्वती। गुप्तरूपे करी प्रयाण निश्चिती। हंसरूपे साधक ज़गे जगती। योग्यायोग्य पाहुनी।।८४।। प्रेमभक्तीच़ा होई विलास। हृदयमंदिरात खास। जेथे कृष्णरूपी सद्गुरु निवास। राही सदा सर्वदा।।८५।। तेथुनी करिता साधक प्रयाण। करी विशुद्ध चक्रभेदन। प्राण वाही ज़ो गुप्त रूपातून। ज्ञान होई त्याचे साधकासी।।८६।। शक्ती प्रयाण करी आज्ञाचक्रात। शिवशक्तीच्या मीलन बिंदूत। सप्तदल पातालादी विश्व पताकांत। वास करी चित्शक्ती।।८७।। ही द्वैताची परम सीमा। दावी सद्गुरु कृपेच़ा मधुरिमा। ऋिद्धी सिद्धीच्या निगमागमा। ज़ाणे

साधक चित्तांतरी।।८८।। संपते द्वैतविश्व येथे समस्त। चित्त राही सदा प्रफुल्लित। परि निर्गुण निर्विकार अद्वैत। नच भासे या स्थानी।।८९।। विश्वंभर सद्गुरु कृपेविना। असाध्य मार्गक्रमण भक्तांना। सप्तमचक्री मस्तकी प्रवेशताना। लागे अनन्य शरणागती।।९०।। कळस रथाचा अनुपम। सहस्रार चक्र मूळ धाम। जेथ वसे श्री भवानीशंकर परब्रह्म। निजानंदीरत साक्षीभावे।।९१।। हेची ज्ञानशक्तीचे मूळधाम। परम शांत मनोरम। आनंद ज्ञान शांतिसंगम। होई ह्या चक्री मस्तकांतरी।।९२।। येथवरी रथाचा गुढार्थ कथिला। जो स्वामींनी उपदेशिला। आता आरंभिते निरुपणाला। पुढे ऐकावे सज्जनहो।।९३।। होई सायंकाळी 'अभिनव' संमेलन। आयोजिले स्वामींनी महान। बौद्धिक, वैचारिक आदान प्रदान। होई ह्या संमेलना कारणे।।९४।। संस्कृती,धर्म,ज्ञान,विज्ञान। विविध विषयांतील येतील तज्ञ। सर्वसामान्य भाविक सुज्ञ। लुटती श्रवणसुख अलौकिक।।९५।। करूनही इतुके सत्कार्य। लाभली टीकास्त्रे अनिवार्य। जेणें व्यथित ज़ाहले गुरुवर्य। किंकर्तव्य स्थिती होऊनी।।९६।। केले वाराणसीस प्रयाण स्वामींनी। संस्कृत विद्यापीठांत अध्ययन करूनी। सहज़तेने उत्तीर्ण होऊनी। परतले चित्रापुरामाजी।।९७।। अध्ययनी नव्हते कधीच ध्यान। अध्ययन राहिले अपूर्ण। ऐसा टीकास्त्रांचा शर तीक्ष्ण। वेधिला टीकाकार धनुर्धारींनी।।९८।। मानवी अहंकारास म्हणावे काय। करावा कोणी जगीं न्याय। थोपवावा कसा अन्याय। या घोर कलियुगामाजी।।९९।। कांही बुद्धिजीवी सुधारकांनी। नानाविध आरोप करुनी। दावा पोलिस व कोर्टात केला झणी। कांही विपर्यासापायी।।१००।। मानवी अहंकार तो धुंद। कोर्टात ज़ाऊनी बैसता स्वच्छंद।

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

संभ्रमित ज़ाहला समाज सबंध। पाहुनी हे अघटित कृत्य।।१०१।। सर्व समाजस्थिती पाहूनी। चित्त वाहीले परमाणू संशोधनी। ज्या विषयी लिहिले आम्ही समज़ावूनी। मागील अध्यायामाजी।।१०२।। सद्गुरुंची घेऊनी अनुमती। ज़ोडीली स्वामींनी पूर्णशक्ती। विविध प्रयोग करण्या अध्यात्म जगती। अनेक धर्मपंथांपरी।।१०३।। ह्या संशोधनासी लागे एकान्त। परि दुर्मिळ मिळणे एकान्त शांत। तरीही धरुनी निग्रह मनांत। ज़ोपासले व्रत संशोधन।।१०४।। वदती आपुलकीने भक्तांपाशी। प्रेमे सांभाळूनी त्यांसी। ऐकूनी भक्तांच्या शंकाकुशंकांसी। निरसती समस्या भक्तांच्या।।१०५।। सामान्यांपरी बोलती सर्वांशी। परि अंतरी दृष्टी ज़डली परमाणूशी। परमाणूंत प्रवेशली दृष्टी ज़शी। तसे भासती अधिक सामान्यांपरी।।१०६।। कधी बैसुनी ज़ाती तूर्यावस्थेत। स्वर बदले कधी क्षणात। बोलती अर्थपूर्ण संदेशात। कधी राहती शून्यावस्थेंतरी।।१०७।। कधी नाच़ती आनंदाने। गीत गाती कधी प्रेमाने। वागती कधी उग्र तपस्व्याप्रमाणें। बुडती कधी पठणांत।।१०८।। याच़ा आला अनुभव भक्तांसी। या विषयी नच संशय मज़सी। परि षड्रिपुंनी ग्रासले मानवासी। कोण प्रयत्न करी ज़ाणण्याच़ा।।१०९।। करिता सद्गुरुंवरी अनन्य भक्ती। वृद्धिंगत होई विश्वास चित्ती। सहज़तेने होई चित्तशुद्धी। भक्त वर्तता सद्गुरु आज्ञेपरी।।११०।। प्रगटले परब्रह्म प्रत्यक्षात। आमुच्या चित्रापुर सारस्वतात। आला परमात्मा तारण्या विश्वात। समाजोद्धारा कारणे।।१११।। आम्ही म्हणवितो सुशिक्षित सज्जन। अहंकारे मदोन्मत्त होऊन। नच ज़ाणिले सद्गुरु रूप महान। स्वामी परिज्ञानाश्रमांच़े।।११२।। प्रशांत ज्ञानी सद्गुरु दयाघन। श्री परिज्ञानाश्रम महान। याच़े परिसावे उदाहरण। शांत

सावध चित्ते भाविकहो।।११३।। विचारी भक्त स्वामींसी। आपुले अगम्य वर्तन ना उमगे जनांसी। ज्या कारणे उद्‌भवल्या जनमानसी। शंकाकुशंका अनेक।।११४।। तेणेच़ निर्मिले वितंडवाद। पुरोगामी प्रतिगामी मतभेद। प्रतिद्वंद्वींच़ा संशय वेध। नेई विरोधकां कोणत्या गतीसी।।११५।। ऐसे ऐकता प्रसन्न वदने वदले। त्या भक्तासी स्वामीजी भले। बहुमुल्य संदेशासी उपदेशिले। श्रवण मनन करा श्रोतेहो।।११६।। इतुक्या अनंत स्वरूपात। कोण विरोधी कोण भक्त। क्षणभंगूर हे नश्वर जीवित। खेळ सारा श्री भवानीशंकराच़ा।।११७।। सकल जीव सृष्टीत राही। अनंत निर्विकार परमात्मा पाही। सगुणरूपे भज़ती त्यासीही। मानव स्थलकाल गुणानुरूप।।११८।। जगदंबेच़े एकपात्री प्रयोग अनेक। च़ालती ब्रह्मांडपटावरी सुरेख। तीच़ ब्रह्मा तीच़ ब्रह्माणी एक। नाव-रूप कल्पनातीत जी।।११९।। तीचि ब्रह्मा विष्णु महेश। तीचि ॐकार स्वरूप गणेश। अल्ला बुद्ध महावीर ईश। तीच़ विश्वंभर सद्गुरुमाऊली।।१२०।। जगी अनंत संत झ़टले। परि तिच़े स्वरूप गूढ कोणा ना कळले। तिज़विषयी करूनी तर्क थकले। सारे बुद्धीवादी।।१२१।। आम्ही च़ालतो योग्य मार्गावरी। जगदंबा माझ़ा हात धरी। वाहिले आम्ही सर्वस्व तिज़वरी। साक्षी राही आम्हा सद्गुरु रूपे।।१२२।। अजातशत्रू आम्ही जीवनान्तरी। ज़री भासे मी कांहीस शत्रूपरी। आमुच़ा किंचितही रोष नसे त्यांवरी। कळकळ त्यांची मठाप्रति।।१२३।। आमुच्यावरी ज़री श्रद्धा त्यांना नसली। असे गुरुमठावरी प्रीत च़ांगली। नाहीतर असती घरी बसली। स्वस्थ आरामांत।।१२४।। श्रद्धा भक्ती मठावरी त्यांची। देई शक्ती त्यांसी विरोधाची। नाहीतर इतुके कष्ट झ़ेलण्याची। त्यांसी गरज़ ती

काय?।।१२५।। वैचारिक मतभेद अनेक। वसती घरोघरी प्रत्येक। परि वैचारिक मनोमिलनांचे सुख। असे अगत्याचे समाजांत।।१२६।। जयांसी नसे आम्हावरी विश्वास। त्यांवरी नसे आम्हा रोष। असे आमच्या प्रारब्धाचा दोष। लाभला आम्हा दुर्दैवे।।१२७।। मतैक्ये समाजाची होईल प्रगती। साधेल विक्रमी उत्क्रांती। सारस्वतांत वर्तेल परमशांती। गुरुपरंपरा कृपाप्रसादाने।।१२८।। भक्तीची असती अनेक रूपे। शास्त्रांत कथिली नऊ मुख्य रूपे। नटली जी सात्त्विक स्वरूपे। उदाहरणे याची अनंत।।१२९।। 'विरोधक' ऐसे म्हणती ज्यांसी। स्वीकारिले त्यांनी विरोधभक्तीसी। विकल्पयुक्त त्यांच्या मानसी। होई आपैसे प्रभुस्मरण।।१३०।। अशा प्रकारची विरोधभक्ती। मागितली अनेकांनी जन्मजन्मांती। रावण कुंभकर्ण हिरण्यकश्यपूची भक्ती। असे उदाहरण याचे।।१३१।। सुख येता जीवनी। विसरती मित्रभावासी मनी। परि सुखदुःख येता दोन्ही। कोणीही नच विसरे शत्रूंसी।।१३२।। विरोधभक्तीची महती। नसे उणी मुळीच या जगती। अनवधानाने ध्यास लागे गुरुप्रति। त्याचेही मोल नच उणे।।१३३।। निंदकाचे घर असावे शेजारी। वदती तुकारामादी मंडळी खरी। त्यांच्या योगे वाढे जागरूकता भारी। महत्त्वपूर्ण जी अध्यात्मी।।१३४।। विरोधभक्ती लागता प्रभुचरणी। दुश्वासरूपे ही प्रभुस्मरणी। मिळे त्यांसीही फळ झणी। पाहा सज्जनहो विरोधाचे फळ।।१३५।। सुयोग्य समय येता। कळे त्यांसी आपुली चूक समूळतः। सत्य असत्याची ज्ञाण होता। पश्चात्ताप होतो अंतरी।।१३६।। पश्चात्ताप देई संताप। भवतापे जळे सर्व पाप। पापे निरसता येई शरण आपोआप। पोहोचे ज्ञानमार्गावरी।।१३७।। सर्वश्रेष्ठ असे पराभक्ती। प्रभुचरणी वसे

अनन्य प्रीती। हंसक्षीर न्याये वर्तूनी जगती। स्वीकारी प्राप्त ज़े प्रभुकृपे।।१३८।। ज़े सुखदुःख प्राप्त जीवनी। तेंची भगवत् प्रसाद मानूनी। त्यातील पूर्ण मर्म ज़ाणूनी। रत राही प्रभुस्मरणी।।१३९।। ज़े होई ते भल्यासाठी। ऐसा विश्वास ठेवूनी पोटी। करी सर्व कर्मे गोमटी। राजहंसाचे हे प्रतिक।।१४०।। विविध पशुवृत्ती वेगळ्या। तेवीच मानवी मनोवृत्ती आगळ्या। प्रीतीमाजीही असती सगळ्या। सिंह, हत्ती, मंडूक, बगळ्यापरी वृत्ती।।१४१।। हिंदीत 'बगुलाभगत' म्हणती जयासी। ज़ो लक्षी सदैव भक्षासी। काय म्हणशी ऐशा भक्तासी। लक्ष ज्याचे स्वार्थावरी।।१४२।। असमर्थ राही चिखल खास। गढूळ करण्यासी कमलपत्रास। ऐशा श्रेष्ठ कमल पुष्पास। सेवन करी भृंग प्रेमे।।१४३।। येऊनी गुरुचरणी अधूनमधून। गुरुप्रेम- मध सेवी भक्तीतून। सर्वही कर्मे सुभट करून। राही जगी भ्रमरापरी।।१४४।। मंडूक राही सतत कमलापाशी। परि ना ज़ाणे कमल श्रेष्ठतेसी। भक्षी स्वार्थ अहंकार मानसी। मंडूकापरी भक्तास काय म्हणशी।।१४५।। गजापरी बलाढ्य बुद्धिमान। तन मन धनाने शक्तीमान। राखूनी स्वयें स्वाभिमान। स्मरी सद्गुरायांसी अंतरंगी।।१४६।। परम सात्त्विक सेवाभावी। गुरुचरणी विनम्र, सुस्वभावी। हाकेसरशी निःस्वार्थपणे धावी। गुरुआज्ञा झेलण्यासी।।१४७।। स्वामी वदती भक्तांसी। 'विरोधक' म्हणती जन ज्यांसी। ते दुःश्वासरूपे स्मरती मानसी। तेही पाहता नच थोडके।।१४८।। सिंहापरी निंदक गर्जना करी। धैर्याने सर्वांचा सामना करी। जागरूकतेने पाठपुरावा करी। स्मरी गुरुंसी विरोधात।।१४९।। स्वामी मग वदती भक्तांसी। आतां सांगावे कुणी आम्हासी। भक्त विरोधक या तुलनेसी। कैसे मानावे आम्ही।।१५०।।

ऐसे विविध रूपांत पाहिले भक्त। आम्ही आमुच्या जीवनात। पाहतो आम्ही सारे जीवनमुक्त। अद्वैत दृष्टीने पाहता।।१५१।। मम जीवनरूपी नाट्यात। परमेश्वरे वेंचिली जी पात्रे विश्वात। मुक्तहस्ते करिती जीवनात। आपापुली कार्ये।।१५२।। म्हणती श्री परिज्ञानाश्रम प्रेमळ। सारा ऋणानुबंधाचा खेळ। ज़ोवरी जीवन तोवरी मेळ। संपते सर्वही ऋण ओसरता।।१५३।। सहिष्णुता विनयशीलता। जागरूकता धर्म- तत्परायणता। ज्ञान विज्ञान आनंद एकरूपता। याचे प्रतिक श्री परिज्ञानाश्रम।।१५४।। इतुके करूनी चरित्र कथन। करिते एकषष्ट्यध्याय संपूर्ण। अर्पिते श्री परिज्ञानाश्रम चरणी भावपूर्ण। स्मरूनी त्यांसी हृदयांतरी।।१५५।। अध्याय।।६१।। ओंव्या।।१५५।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति एकषष्ट्यध्यायः समाप्तः।।

श्री विघ्नहर्त्या धूम्रवर्णा। लंबोदरा शूर्पकर्णा। राजीवलोचन गौरवर्णा। वंदिते श्रीगणेशा तव चरणी।।१।। शृंगेरीनिवासिनी शारदांबे। विद्यादात्री-जगदंबे। हंसगमने सुमुखी नितंबे। धाव पाव झडकरी।।२।। स्वामी परिज्ञानाश्रम चरित्र लिहिण्या। दे माते शब्दमौक्तिकांना। सत्यघटित चरित्र कथिताना। राही अखंड मम संगे।।३।। करिते गुरुपरंपरेसी नमन। सर्व कुलदेवतांसी वंदन। वंदूनी श्रीभवानीशंकर चरण। नमिते श्रीदुर्गापरमेश्वरीसी।।४।। आता परिसा गुरुचरित्र सत्वरी। भ्रमण करिती स्वामी भारतान्तरी। केले प्रयाण तीर्थक्षेत्रान्तरी। काही भक्तजनांसंगे।।५।। पर्यटनसमयी स्वामींसी भारतात। भेटले अनेक नामवंत संत। कथिते पावन नावे ग्रंथांत। परिसा सज्जन भाविकहो।।६।। बालपणी भेटले श्री नित्यानंद स्वामी। ज़े सदा शांत अंतर्यामी। श्री शृंगेरी मठाधीश स्वामी। तसेची कर्मयोगी श्री दत्ता बाळ।।७।। कांचीकामकोटीतीर्थ मठाधीश। जगद्गुरु शंकराचार्य विशेष। संगे असता श्री आनंदाश्रम ईश। भेटले स्वामींसी।।८।। प्रसिद्ध काननगड तालुक्यामाजी। रामनगर येथील पूज्य माताजी। सहस्रावधी जन भज़ती आजि। विविध स्थळी त्यांसी जगान्तरी।।९।। माताजींनी प्रतिपाळिला सुगम। 'आनंदाश्रम' नामक आश्रम। निर्मिला स्वामी रामदासांनी अनुपम। स्वकष्टे प्रयत्नांतरी।।१०।। सन बाहत्तरामाजी। श्री परिज्ञानाश्रम येता आश्रमात सहजी। रामनगरच्या पूज्य माताजी। करिती साष्टांग दंडवत।।११।। स्वामींचे आरोग्य विचलित होता। आदेशले माताजींनी सद्भक्तां। की सद्गुरुंच्या आरोग्याकरिता। ज़पावा शिवपंचाक्षरी मंत्र।।१२।। पाच़ कोटी जप भक्तीने। ज़पावा मनापासून प्रेमाने। हेतु स्वामींचे

आरोग्य संवर्धनाकारणे। ऐसे वदती माताजी।।१३।। दुज़ा हेतु माताजींच़ा। की उद्धार व्हावा भक्तांच़ा। मन एकाग्रता साधण्याच़ा। हा तरणोपाय असे।।१४।। तसेची श्री सच्चिदानंद स्वामी। सांप्रत रामनगरच़े स्वामी। सदा आनंदी अंतर्यामी। भेटले श्री परिज्ञानाश्रमांस।।१५।। श्री 'करपात्री' नामे संन्यासी काशीत। श्री सत्यसाईबाबा बेंगळूरात। काशी मठाधीश सुधींद्रतीर्थ। भेटले अनेकदा स्वामींसी।।१६।। कवळे मठाधीश गोमंतकात। श्री सच्चिदानंद सरस्वती स्वामी समवेत। राहिले काही दिन मठात। कवळे येथे श्री परिज्ञानाश्रम स्वामी।।१७।। गोकर्ण पर्तगाळी मठाधीश। श्रीविद्याधिराजतीर्थ वडेर विशेष। तसेंची धर्मस्थळ मठाधीश। श्री वीरेंद्र हेगडे यांसी।।१८।। श्री पूज्य गगनगिरी महाराज। श्रीपूज्य पाच़लेगांवकर महाराज। श्री गुळवणी महाराज। आणिक अनेक संत सज्जन।।१९।। 'तिथल' येथील श्रीसाई संस्थान स्वामी। सदा शांत अंतर्यामी। सांप्रत निवास त्यांच़ा तिथल ग्रामी। गुजरात राज्यामाजी।।२०।। भेटले ते श्री परिज्ञानाश्रमांसी। करिता हरिद्वार ग्रामी पर्यटनासी। 'प्रभुजी' नामे ओळखती त्यांसी। भक्तगण सारे सर्वत्र।।२१।। कन्याकुमारी ते बदरीकेदार। सर्व तीर्थक्षेत्रे मनोहर। निसर्ग सौंदर्य सुंदर। पाहूनी आनंदले श्रीपरिज्ञानाश्रम।।२२।। सन शहात्तरामाझ़ारी। स्वामी परिज्ञानाश्रमांची स्वारी। प्रयाण करी शिवानंदाश्रमांतरी। हृषीकेश येथे निवासार्थ।।२३।। खार मठात असता। भागवत ग्रंथ उपदेशिला भक्तां। सुलभ शब्दांनी संपूर्णतः। शंकासमाधान केले भक्तांच़े।।२४।। बोधसार नरहरी आचार्य लिखित। उपदेशिले भक्तांसी बेंगळूरात। आनंद ज़ाहला भक्तां अमित। श्रवण करिता गुरुवाणी।।२५।। दशम गुरु चित्रापुर-

मठाधीश। पूज्य परिज्ञानाश्रम ईश। निघाले परदेश भ्रमणार्थ विशेष। काही भक्तजनांसंगे।।२६।। दोन जून एकोणीसशे एकोणऐंशी रोजी। श्री परिज्ञानाश्रम स्वामीजी। संगे श्री भवानीशंकर मूर्ती सहजी। घेऊनी निघाले परदेशी।।२७।। हा ऐतिहासिक दिन। चित्रापुर सारस्वतांसी महत्त्वपूर्ण। प्रथमतः चित्रापुर मठाधीश महान। निघाले विदेश पर्यटनार्थ।।२८।। आपुल्या परदेश दौऱ्यात। स्वामींनी पर्यटन केले अमेरिकेत। कॅनडा युरोप राष्ट्रात। इंग्लंड फ्रान्स इटली स्वित्झर्लंड येथे।।२९।। न्यूयॉर्क गणपती मंदिरात। उपदेशिले उपनिषद् मराठीत। जन ज़ाहले विस्मयचकित। स्वामींचे वाक्चातुर्य ज्ञान पाहूनी।।३०।। उपनिषद् विषयी कथिताना। स्वामी उपदेशिती भक्तजनांना। जीवनी मानवाने ज़गताना। केवळ बहिर्सुखास्तव झ्ट्ट नये।।३१।। प्रकृतीची विविधरूपे घेऊनी। आलो आम्ही सारे जन्म घेवोनी। जन्माचे मूळ प्रयोजन ज़ाणूनी। ज़ाणावे आपुले आत्मरूप।।३२।। परब्रह्म निर्विकार परमात्म्यासी। सर्व चराचरांत पाहण्यासी। प्राणिमात्र वस्तूत शोधण्यासी। प्रयत्न करावे सातत्याने।।३३।। वेदोक्त भाषा कठीण। उपनिषद् सांगती सुलभ शब्दांतून। सर्वांत सरळ सोपी महत्त्वपूर्ण। भाषा असे कठोपनिषदाची।।३४।। उपनिषद् सांगति आत्मज्ञान। आत्मरूप ज़ाणण्याचे प्रयोजन। की जन्ममृत्यूतूनी मुक्ती ज़ाण। हेची मुख्य ध्येय ठेवावे।।३५।। आत्मज्ञान ही ऐसी स्थिती। प्राप्तीनंतर न ढळे कल्पान्ती। त्यातूनी दूर ज़ाण्याची इच्छा चित्ती। नच उद्भवे कदापि।।३६।। श्रेय व प्रेय हे द्विपंथ। येती प्रत्येक मानवी जीवनात। आत्मज्ञानाप्रति नेई श्रेयपंथ। परमात्म रूप दावूनी।।३७।। बहिर्जगातील सुख अशाश्वत। शोधे प्रेय पथिक जीवनात। अंती सर्वही

गमावून खचित। सापडे जीवन चक्रव्यूहात।।३८।। श्रेय दावी निवृत्ती मार्ग। प्रेय दावी प्रवृत्ती मार्ग। अक्षय अनंत परमात्म मार्ग। सापडे श्रेय मार्गियांसी।।३९।। ध्येयाप्रति दृढ निश्चयी राहूनी। मन सदा स्थिर राखूनी। अंतरी सदा शांती पाळूनी। ज़ो वर्ते जीवनी।।४०।। त्यासी श्रेयमार्गी ज़ाणावा। कथारूपांत ब्रह्मतत्त्व आढावा। कथिला कठोपनिषदातून बरवा। ऐसे वदती स्वामी।।४१।। श्रेय म्हणजे आत्मतत्त्व। अनंत शक्ती सर्वव्याप्त। आदि अंत रहित। राही सदैव अस्ति रूपे।।४२।। दशेंद्रिये देती ज्ञान देहांत। बहिर्जगाविषयी खचित। मन श्रेष्ठ त्याहूनी निश्चित। देई वस्तुची ज़ाण।।४३।। मनापेक्षा श्रेष्ठ बुद्धी राही। बुद्धीहूनी श्रेष्ठ जीवात्मा पाही। जीवात्म्यापेक्षाही श्रेष्ठ राही। हे अनंत ब्रह्मांड।।४४।। हे ब्रह्मांड रचियेता विश्वंभर। परमपुरूष जगदाधार। सर्वज्ञ निर्गुण निराकार। त्याहूनी श्रेष्ठ नसे कांही।।४५।। इंद्रियांपासूनी प्राप्त ज़े सुख। त्याच़ा उपभोगी तो जीवात्मा एक। राही प्रशांत निद्रावस्थेत शुष्क। सत्स्वरुप संबंधांत जीवात्मा।।४६।। इंद्रिये अंतर्मुख करुनी। पाहावे सत्स्वरूपासी अंतर्चक्षूंनी। आत्मा हाची परमात्मा ज़ाणूनी। ज़ावे श्रेय मार्गावरी।।४७।। देह व आत्मा विषयी कथिती। स्वामी उपस्थित भक्तांप्रती। संक्षिप्तरूपे लिहिते ग्रंथी। परिसा सज्जन भाविकहो।।४८।। देह हा असे रथ। आत्मरूप परमात्मा वसे त्यात। बुद्धी ही सारथी निष्णात। ज़ाणे सर्व विवेक दृष्टीने।।४९।। मन असे बुद्धिच़ा लगाम। जेणे बुद्धी आवरी इंद्रिये सक्षम। सदसद्बुद्धीन्वये ज़ाणावे उत्तम। निजात्मस्वरूप प्रत्येकाने।।५०।। हे कठोपनिषदातील सार। अत्यंत संक्षिप्तरूपे करूनी शब्दाकार। लिहूनी मोज़के वाक्प्रचार। कथिले स्वामींच्या

आशीर्वचनांतूनी।।५१।। या व्यतिरिक्त अनेक विषय। कथूनी त्यातील आशय। स्वामी परिज्ञानाश्रम निरामय। वदती भक्तांसी परदेशी।।५२।। श्रद्धामयोयं पुरुषः विषयी आशीर्वचन। दिधले हिंदी भाषेतून महत्त्वपूर्ण। योगवासिष्ठ ग्रंथ महान। कथिला स्वामींनी 'थंडर बे' कॅनडात।।५३।। मायामोहातूनी मुक्त व्हावया। ज्या दश पायऱ्या लिहिल्या। श्रीवसिष्ठांनी श्रीरामा कथिल्या। त्या परिसा संक्षिप्तरूपे।।५४।। 'अनासक्त' राहावे संसारी। 'जगत् मिथ्या' भाव राखावा अंतरी। 'वासनापाश' तोडावे चित्तांतरी। 'आत्ममनन' करावे नित्य।।५५।। करावे नित्य 'शुद्ध निरुपण'। सर्व कार्यें करावी 'आत्मार्चन'। अष्टम पायरी 'आत्म निरुपण'। जेथ देहभाव न वसे अंतरी।।५६।। नववी 'जीवनमुक्त' अवस्था। देही राहूनही नच राही देहास्था। द्वैत दृष्टीची चंचलावस्था। नच राही तेथे अंतरी।।५७।। दशम पायरी 'निर्वाण'। शब्दांत सांगणे जी अवस्था कठीण। केवळ स्वानुभवाने पूर्ण। ज्ञाण होई अद्वितीय स्थितीची।।५८।। ह्या दश पायऱ्या उपदेशून। ऋषी वसिष्ठ कथिती सहजतापूर्ण। करण्यासी साधन चतुष्टय अवलंबन। त्या विषयी परिसा भाविकहो।।५९।। सदसद्विवेकबुद्धी, अनासक्ती। मुमुक्षुत्व, षट्गुण संपत्ति। अशी ही साधन चतुष्ट्ये निश्चिती। पाळावी मानवाने।।६०।। मन बुद्धी अहंकार संयमन। ध्येयपूर्तीस्तव प्रयत्न संपूर्ण। सहनशीलता, इंद्रियदमन। सात्त्विक समाधान अन् श्रद्धा।।६१।। ही षट्गुण संपत्ति। कथिती स्वामी परिज्ञानाश्रम, भक्तांप्रती। लाभेल शाश्वत सुख निश्चिती। आचरिता हे नियम जीवनी।।६२।। इतुके कथुनी स्वामी वदती। भक्तीत असे अद्वितीय शक्ती। भक्तीयोगे होई ज्ञान प्राप्ती। भक्तासी जीवनान्तरी।।६३।।

गुरुमंत्र ज़पावा श्रद्धायुक्त। ज़ाणून योग्य अर्थ खचित। तेणे प्राप्त होते आत्मज्ञान निश्चित। वदती स्वामी परिज्ञानाश्रम।।६४।। विज्ञान विषयी अनेक प्रश्न। पुसिले भक्तांनी स्वामींसी महान। अध्यात्म, विज्ञानविषयी महत्त्वपूर्ण। चर्चा करिती भक्त स्वामीसंगे।।६५।। रुद्राक्ष, अजपाजप। स्वस्तिक, शाळिग्राम स्वरूप। गीता, उपनिषद्, ब्रह्मसूत्र साररूप। आणिक विविध साधना।।६६।। पाणिनी लिखित संस्कृत व्याकरण। 'वेदान्तिकसत्य' महत्त्वपूर्ण। आधुनिक पदार्थविज्ञान। तसेच़ इलेक्ट्रॉनिक शास्त्र।।६७।। ज्ञान विज्ञान परस्पर संबंध गहन। कोंकणी परिभाषा महत्त्वपूर्ण। श्वान व पशु संवर्धन। तसेची स्वादपूर्ण सारस्वत स्वयंपाक।।६८।। ऐशा नाना विषयी संभाषण। ऐकूनी ज़ाहले विस्मित जन। स्वामींची तीक्ष्ण बुद्धी अवलोकून। धन्य म्हणती भक्त सारे।।६९।। चातुर्मासामाजी नित्य। नरहरी आचार्यकृत 'बोधसार' स्तुत्य। कोंकणी व संस्कृतातूनी नित्य। उपदेशिती भक्तांसी।।७०।। जन्माष्टमीच्या शुभदिनी। पूज्य परिज्ञानाश्रम स्वामींनी। 'भक्ती रसायन' विषयी आशीर्वचन देऊनी। आशिष दिला श्रोत्यांसी।।७१।। नित्य होई पूजा पठण। रात्रौ होई पवित्र अष्टावधान। भजन, आशीर्वचन, गुरुदर्शन। याच़ा लाभ घेती जन।।७२।। भक्तांनी दिधले कॅनडात। 'मानपत्र' प्रेमे स्वामींप्रत। केले भक्तीभावे सन्मानित। सारस्वत भक्तवृंदातर्फे।।७३।। आले भक्त बहुसंख्य। अमेरिकन, भारतीय नागरिक। श्रवणार्थ आशीर्वचन सुरेख। स्वामी परिज्ञानाश्रमांच़े।।७४।। लंडन येथे स्वामी येता। सहर्ष सत्कार भक्तांनी करिता। आनंदले स्वामी पाहता। भक्तांच़ा उत्साह असीम भक्ती प्रेम।।७५।। तेथील पर्यटन व्यवस्था। भक्तांनी आयोजिली संपूर्णतः।

फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड पाहता। संतोषले मनी स्वामीजी।।७६।। परदेशी यशस्वी दौरा करून। भक्तांसंगे परतले स्वामी दयाघन। श्री भवानीशंकर मूर्तीसहित पावन। तीस सप्टेंबर एकोणीसशे एकोणऐंशीसी।।७७।। भारतांत आम्ही विचारिला प्रश्न एक। ज़री म्हणावे जग मायामय सम्यक। सृष्टी दिसे जी नयनी सुरेख। ती वसे कोणत्या रितीने।।७८।। श्रवण करा स्वामींचे उत्तर महान। दावी विज्ञानज्ञानाची ज़ाण। स्वामींच्या चातुर्य प्रतिभेचे लक्षण। दिसे उत्तरातूनी।।७९।। भक्तांस स्वामी वदती। इच्छा उद्भवता परमात्मचित्ती। शक्ती प्रसवली जगती। दोन्ही असती एक रूप।।८०।। नादब्रह्माच्या पटावरी। पंचमहाभूते निर्मिली सारी। अणू घेऊनी विविध प्रमाणांतरी। निर्मिले विश्व त्यातूनी।।८१।। विविध अणूंच्या विविध युती। ज़णू पदार्थापरी भासती। प्रोटॉन न्यूट्रॉन इलेक्ट्रॉन जगती। ओविले अक्षांश रेखांश रूपे।।८२।। या विविधाणूंचा समन्वय। पाहता येई जगताचा प्रत्यय। परि मूळ लाइफट्रॉन करी कार्यान्वय। या साऱ्या अणूंसी।।८३।। याचा उगम अंत अगम्य कुणासी। नच उमगेल प्रयत्नान्तीही शास्त्रज्ञांसी। जेथूनी मिळे जीवन अणूंसी। असे अलौकिक निसर्गसृष्टी।।८४।। परमाणु शोध लागला शास्त्रज्ञांसी। तरी मूळ नकळे कुणासी। अथवा त्याच्या स्वरूप लक्षणासी। या विशाल मायामय ब्रह्मांडी।।८५।। पदार्थाचा संहार होणे। म्हणजेची अणूंचे विघटन होणे। अखंडित शक्ति स्त्रोत खुंटणे। हाची त्याचा अर्थ असे।।८६।। वस्तू, काया विघटन होता। मिळे प्रतितत्त्व पंचमहाभूतात संपूर्णतः। परमात्म्याची इच्छा मिटता। मिसळती पंचमहाभूते सत् स्वरूपांतरी।।८७।। असे ऐकावे निरूपण। श्री परिज्ञानाश्रमांविषयी महान।

काय वर्तले परतता मायदेशात पावन। त्या विषयी सत्यघटित।।८८।। पुनश्च येता मायदेशात। भक्तांनी सन्मानिले स्वामींस येथ। परि विजयी ज़ाहले दुर्दैव परत। असत्य वार्ता समाजांत पसरल्या।।८९।। परदेश वास्तव्य संबंधांत। अपप्रचार ज़ाहला अमित। विपर्यासाने वेढीले निश्चित। काही जनांसी सबळपणे।।९०।। यावरी क्षणभरी होऊनी व्यथित। प्रार्थिती स्वामी मनांत। सद्गुरु आनंदाश्रमांसी त्वरित। परिसावे त्या विषयी।।९१।। ''सद्गुरु तुम्ही दिले धर्मपीठ स्तुत्य। ज्या कारणे लाभले मठाधिपत्य। पसरल्या सर्वत्र वार्ता असत्य। माज़ला कल्लोळ समाजात।।९२।। मठाधिपत्याच़ा सन्मान खचित। नच इच्छिला आम्ही निश्चित। अधिकार तुम्हांकडोन प्राप्त। तरी आज्ञा आता मज़ द्यावी''।।९३।। ऐसे मनोमनी प्रार्थूनी। गेले विराम कक्षेत निघूनी। वचनापरी श्री आनंदाश्रमांनी। दिली अनुज्ञा मठाधिपत्य त्यागार्थ।।९४।। लाभता अनुज्ञा सद्गुरुंची। त्यजिली सूत्रे मठाधिपत्याची। केली स्वामींनी घोषणा त्याची। चित्रापुर सारस्वत समाजांत।।९५।। बळेंची घेऊनी स्वाक्षरी पत्रात। कांहींनी भाग पाडिले खचित। कानगोष्टी ऐशा ज़ाहल्या निर्मित। चित्रापुर सारस्वतांमाजी।।९६।। स्वयें सूत्रे त्यजिली स्वामींनी। अथवा जबरदस्ती केली कांही जनांनी। हा प्रश्न ज़री वेढे भक्तमनी। तरी एक वार्ता सत्य असे।।९७।। ''आम्ही सद्गुरु प्रेरणेपरी। त्यजितो मठाधिपत्य सूत्रे सारी''। घोषित केले स्वामींनी सत्वरी। योग्य समयी भक्तांसी।।९८।। हे असे सत्य त्रिवार। स्वामींच़े आशीर्वचन ज्याच़ा आधार। कलहाच़े मूळ संशय साकार। आणिक पुरोगामी प्रतिगामी द्वंद्व।।९९।। अंतर्यामी प्रशांत सोज्वळ। पूज्य परिज्ञानाश्रम प्रेमळ। भाव पाहती भक्तांच़ा अंमळ।

त्यजूनी मठाधिपत्य सूत्रे।।१००।। भक्त आले दर्शनार्थ। विनविण्या सद्गुरुमूर्ती समर्थ। प्रार्थिती श्री परिज्ञानाश्रमांसी सार्थ।'नच त्यजावे मठाधिपत्य'।।१०१।। तोषले भक्त-प्रार्थना ऐकून। परि न स्वीकारिला मठाधिपत्य मान। 'सद्गुरु आज्ञा आम्हा प्रमाण'। वदती स्वामी परिज्ञानाश्रम।।१०२।। ''आज्ञा सद्गुरुंची उल्लंघून। कदापि न वर्तेन जीवन संपूर्ण। आज्ञा मिळाल्यासी पुनश्च परिपूर्ण। स्वीकारु मठाधिपत्य।।१०३।। त्यजिले ज़री मठाधिपत्य सार्थ। नच सोडू आम्ही परमार्थ। भक्तजीवन करण्या कृतार्थ। झटेन निश्चये जीवनी।।१०४।। असू आम्ही सामान्य संन्याशी। विश्वंभर उभा आमुच्या पाठीशी। किं कारणे भ्यावे कुणासी। विश्वची सारे घर माझे''।।१०५।। करिता त्याग मठाधिपत्याचा। हक्क नसे मठांत राहण्याचा। प्रश्न गहन वादाचा। उद्भवला जनमानसी।।१०६।। ऐशिया कठीण स्थितीत। मुंबईतील खार आनंदाश्रम मठांत। व असंख्य भक्तांच्या गृहांत। राहिले काही काळवरी।।१०७।। सन एक्याऐंशी प्रारंभात। लोणावळा बांगरवाडी येथ। स्वामीजी राहिले निवांत। भक्त रमेश कर्णिक गृही।।१०८।। रम्य परिसर लोणावळ्याचा। आवडे स्वामींस साचा। बांधावा आश्रम येथे आमुचा। ऐसे चिंतिती स्वामी।।१०९।। श्री देवी एकवीरेच्या डोंगर पायथ्यावर। मुंबई पुणे हमरस्त्यावर। कार्ला ग्रामी सत्वर। विक्रये घेतली भूमी आश्रमार्थ।।११०।। येथ नच संपला वाद। उद्भवला नूतन वाद। हक्क होती सर्व बाद। त्यजता मठाधिपत्य एकवार।।१११।। पुनश्च सूत्रे मठाधिपत्याची। कां द्यावी स्वामींसी महत्त्वाची। ऐशापरी गहन वादाची। वैचारिक शृंखला उपज़ली।।११२।। द्वंद्वयुक्त या शृंखलेने। द्विखंड निर्मिले सहज़तेने। मानवी तीव्र अहंकाराने।

विभागिले चित्रापुर सारस्वतांसी।।११३।। षड्रिपूंचा करुनी चित्ती अंगिकार। प्रत्येक म्हणे मीच शुद्धसाचार। विषण्णतेने स्वीकारिला सर्वाधिकार। चित्रापूर सारस्वतांतरी।।११४।। वादी प्रतिवाद्यांच्या द्वंद्वात। स्वामी सापडले विवंचनेत। बाल तरुण वृद्ध समस्त। ज़ाहले संभ्रमित चित्तांत।।११५।। ऐशिया विपरित संकटकाळी। भक्तोद्धारार्थ स्वामींनी समुळी। समर्पिले सर्वस्व सदाकाळी। जनसेवे कारणे।।११६।। ऐहिक प्रश्न घेऊनी आले। अगणित भाविक भक्त चांगले। सकल विघ्ने निरसुनी उद्धरिले। स्वामींनी स्वभक्तांसी।।११७।। केली गरज़वंतांसी मदत। उद्धरिले अगण्य भक्त। संकटी शीघ्र धावुनी खचित। रक्षिले तिन्ही त्रिकाळी।।११८।। कित्येकांसी दिधले सदेह दर्शन। दृष्टान्ताने केले शंका समाधान। केली सर्व विघ्ने दहन। आपुल्या कृपाबळे।।११९।। दिधले अनेकांसी जीवनदान। अनारोग्य अस्वास्थ्य निरसिले पूर्ण। तारिले साधकांसी भवरोगांतूनी। दावुनिया मोक्षपंथा।।१२०।। स्वामींच्या अद्वितीय कृपेचे उदाहरण। परिसा ज़े महत्त्वपूर्ण। दावी तपोबलाचे महिमान। स्वामी परिज्ञानाश्रमांच्या।।१२१।। एका भक्तावरी आले विपरीत कष्ट। व्याधी विघ्नरूपे अरिष्ट। परि नच वदे तो भक्त श्रेष्ठ। कोणासही आपुली चिंता।।१२२।। एकदा मध्यान्ही पावणे-तीन वाज़ता। प्रगटले स्वामी प्रत्यक्षतः। भक्त स्वस्थ बैसला असता। स्वगृही मुंबापुरी माजी।।१२३।। स्वामी होते तेव्हा बेंगळूरात। प्रगटुनी म्हणती भक्ताप्रत। ‘‘ ज़ाणतो आम्ही तव कष्ट समस्त। चिंता मुळी करु नये।।१२४।। तव मन आवरी समूळ। नच विचलित होऊ दे कदाकाळ। श्री भवानीशंकर तो निर्मळ। रक्षील तव कुटुंबासी सर्वदा।।१२५।। विश्वंभरावरी तव विश्वास। कदापि न ज़ाईल

फुका खास। धरी हा दृढ आत्मविश्वास। तव अंतरी तो सदा वसे''।।१२६।। बोलूनी इतुके क्षणात। अंतर्धान पावले प्रत्यक्षात। भांबावला भक्त मनात। म्हणे 'नच स्पर्शिले गुरुचरण'।।१२७।। सदेह गुरु साकार प्रगटले। मज़ मूढासी नच स्मरले। की गुरुचरण वंदावे यावेळे। चिंती भक्त तो मनीं।।१२८।। परिसावे दुज़े उदाहरण। प्रार्थनापत्र धाडी सारस्वत सज्जन। की ''मम मातेचे मानस संतुलन। बिघडले अचानकपणे।।१२९।। वैद्यांनी केले नाना उपाय। तरी वंदितो आपुले चरणद्वय। देऊनी आम्हा आता अभय। तारी सद्गुरु दयाघना''।।१३०।। इतुकेची लिहूनी प्रार्थनापत्र। धाडिले भक्तिभावे पवित्र। वदिले नच कदापि जनां अन्यत्र। कोणासी गृहांतरी।।१३१।। प्रत्युत्तर स्वामींचे आले। श्री भवानीशंकर प्रसादासहित भले। की ''पूर्ववत आरोग्य लाभेल यावेळे। श्री भवानीशंकरकृपे तव मातेसी।।१३२।। गुरु आनंदाश्रमांनी दिधला। तव मातेसी शिवपंचाक्षरी मंत्र भला। तो स्मरणे तिने संपूर्ण सोडिला। सुरु करावा तो पूर्ववत।।१३३।। दरम्यानच्या काळी तिज़सी। द्यावे योग्य औषधोपचारासी। भगवत् कृपे लाभेल तिज़सी। पूर्ववत मनःशांति''।।१३४।। लाभता स्वामींचा आशीष परिपूर्ण। पूर्ववत ज़ाहले आरोग्य संपूर्ण। स्मरु लागली भक्तीभावपूर्ण। शिवपंचाक्षरी जप श्रेष्ठ।।१३५।। या विषयी विचारा स्वमानसी। कीं ज्ञात कैसे ज़ाहले स्वामींसी। भक्ताच्या विघ्न विषयासी। ज़े अज्ञात स्वयें भक्ता।।१३६।। श्री आनंदाश्रमांनी दिला उपदेश। कैसे स्वामींसी कळले विशेष। कसे प्रगटले सदेह विशेष। विचार करा सज्जनहो।।१३७।। भक्तोद्धारक श्री परिज्ञानाश्रम गुरु। यांचा तपोबल अविष्कारु। दावी अद्वितीय अगम्य स्वरूपाकारु। सदेह

सद्गुरुरूपे।।१३८।। स्वामींची कृपा असीम। योजिले ज़री कथिण्या संपूर्ण जन्म। तरी अपुरा पडेल हा जन्म। शब्दांत वर्णावयासी।।१३९।। ज़ाती धर्म भेदाविण सर्वांसी। उद्धरिले अभय देऊनी त्यांसी। आस्तिक नास्तिक सर्व जनांसी। प्रेमभावे प्रतिपाळिले।।१४०।। दीन होतकरु विद्यार्थ्यांसी। देऊनी धन स्वनिधीतून शिक्षणासी। अध्ययन संपूर्ण करण्यासी। दिधले प्रोत्साहन प्रेमभरे।।१४१।। लाभली ऐच्छिक नोकरी अनेकांसी। मिळाली रोगमुक्ती रुग्णांसी। ज़ाहली संतानप्राप्ती निपुत्रिकांसी। स्वामी परिज्ञानाश्रम भक्तां।।१४२।। आर्थिक संकट समयासी। धैर्य देऊनी दुःखितांसी। उन्नति पथावर आणूनी भक्तांसी। केले सुखी समृद्ध।।१४३।। तन मन दुर्बलांस्तव विरार येथे। स्थापिली संस्था प्रेमे तेथे। पुनरूज्जीवन कार्य आरंभिले सर्वार्थे। तन मन दुर्बलांसाठी।।१४४।। 'श्री परिज्ञानाश्रम एज्युकेशन ॲण्ड वोकेशनल सेण्टर'। नामासहित मनोहर। व्यवस्थापन योजूनी सुंदर। आरंभिले सत्कार्य।।१४५।। दुर्दैवी दुबळ्यांस्तव। असावी एक संस्था अभिनव। 'शांत सुखदा' नामक संस्था कार्यास्तव। निर्मिण्या योजिले स्वामींनी।।१४६।। निरक्षरांसी करण्या साक्षर। लघु उद्योगां उत्तेजिण्या सत्वर। योज़ूनी खेडोपाडी शिबिर। औषधोपचार संस्था करी।।१४७।। धार्मिक कार्यास्तव उत्तेजन दिधले। युवापिढीसी स्वामींनी चांगले। दत्तजयंती उत्सवार्थ आज्ञापिले। स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।१४८।। ऑल इंडीया चित्रापूर सारस्वत यूथ्स असोसिएशन'। ही संस्था करुनी स्थापन। तालमकी वाडीतील तरूण। साज़रा करिती दत्तजयंती सोहळा।।१४९।। प्रथम वर्षी कनकाभिषेक। केला सुवर्ण पुष्पांचा अभिषेक। मंत्रघोषात स्वामींवरी सुरेख। दत्तजयंती उत्सवात।।१५०।। द्वितीय वर्षी शतचंडी

होम। आदिशक्तीसी आवाहन परम। यथोचित विधीयुक्त सुगम। ज़ाहला स्वामींच्या उपस्थितीत।।१५१।। तृतीय वर्षी महारुद्राभिषेक। महारुद्र आळविती वैदिक। भक्तीभावे ज़मले भाविक। पाहण्या अनुपम सोहळा।।१५२।। अंतिम दिनी अन्नसंतर्पण। सर्व भक्तगणांसी भोजन। पालखी उत्सव महान। होई दत्तजयंती उत्सवात।।१५३।। स्वामींनी करिता महानिर्वाण। पादुका पूजिती भक्तगण। कार्ल्याहूनी पदयात्रा करून। आणिती प्रेमे पादुकांसी।।१५४।। धर्म संस्कृती विज्ञान। जनसेवा, मानवता अध्यात्म ज्ञान। एकरूपतेचा धागा अद्वैत ज्ञान। दाविले स्वामींनी भक्तांसी।।१५५।। द्वैतातील अद्वैत सत्य। अद्वैतातील द्वैत ज़े भासे नित्य। उपदेश व वर्तनातूनी समन्वय स्तुत्य। दाविला स्वामींनी।।१५६।। इतुके करुनी शब्दांकन। स्वामी परिज्ञानाश्रमांसी वंदून। अर्पिते गुरुचरणी भावपूर्ण। द्विषष्ट्यध्याय पवित्र हा।।१५७।। अध्याय।।६२।। ओंव्या ।।१५७।। ॐ तत्सत्-श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति द्विषष्ट्यध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर
परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

विघ्नहर्ता तूं सुखकर्ता। ॐकाररूपी ब्रह्मांड विधाता। शिवनंदन गौरीसुता। साष्टांग प्रणिपात तव चरणी।।१।। श्री महासरस्वतीसी नमन। श्री महाकाली महालक्ष्मीसी वंदन। श्री भवानीशंकर पूजिते चरण। वंदन श्री दुर्गापरमेश्वरीसी।।२।। नमन श्री स्वामी परिज्ञानाश्रमांसी। प्रणाम सकल गुरुपरंपरेसी। नमन सकल संत सज्जनांसी। आता परिसा पुढील वर्तमान।।३।। स्थापूनिया 'ज्ञानानंद आश्रम' कार्ल्यांत। सन एकोणिसशे पंच्याऐंशीत। आले निवासार्थ स्वामी तेथ। काही भक्त सहकाऱ्यांसंगे।।४।। 'श्री दुर्गापरमेश्वरी' प्रतिष्ठापना योजुनी। स्वामींनी मनी संकल्प करुनी। 'ध्यानमंदिरा'स्तव भूमिपूजन करुनी। आरंभिले मंदिर स्थापना कार्य।।५।। करण्या 'श्री दुर्गापरमेश्वरी' स्थापना। स्वामी आनंदाश्रमांनी कथिले स्वामींना। शिष्यस्वामी चौदा वर्षाचेअसताना। हे कथिले पूर्वाध्यायी।।६।। स्वामी आनंदाश्रम आदेशिती कार्य। ते संपूर्ण विचारान्ती होय। यामाजी नच धरावा संशय। भक्तांनी कदापि निजांतरी।।७।। 'श्री दुर्गापरमेश्वरी' नाम। देण्याचे मुख्य कारण परम। योजिले सद्गुरुंनी उत्तम। त्या विषयी परिसा सज्जनहो।।८।। श्रीवल्ली हे मूळ नाम। शिराली ग्रामाचे होते परम। श्री देवीचे पुण्यमय धाम। असे कथितो पूर्वेतिहास।।९।। अध्यात्म ज्ञानाचे स्थान परम। आनंदाचे परम धाम। शक्तीस्रोत वाहतो उत्तम। सहा स्वामींच्या समाधीरूपे।।१०।। पूर्वी नगर राज्याच्या काळी। भूमि नांगरते वेळी। श्री दुर्गापरमेश्वरी मूर्ती समुळी। गावली रामय्या नाम व्यक्तीसी।।११।। या नागरकट्टी कुटुंबिय गृहस्थाने। रामय्या नाम मूळ पुरुषाने। सुबक मंदिर बांधूनी प्रेमाने। स्थापिले बडुकुळी येथे।।१२।। विनियोगास्तव कांही ज़मीन। अर्पिली मंदिरास्तव महान। मुलकी येथील अर्चक आणून। आरंभिले पूजा विधीसी

।।१३।। याच़ नागरकट्टी भूमी परिसरात। वसे चित्रापुर मठ समस्त। या विषयी गुरुदासे कथिले चरित्रात। परिसा पुढील निरुपण।।१४।। चित्रापुर मठ परिसरात। आणावी सारस्वत मंदिरे समस्त। ऐसे स्वामी पांडुरंगाश्रमांनी मनांत। योजिले त्याकाळी।।१५।। स्थळेकरकारांच़े श्री शांतादुर्गा मंदिर। हरिदासकारांच़े श्रीकृष्णमंदिर। श्री दत्तात्रय पवित्र मंदिर। आणिले चित्रापुरामाजी।।१६।। पुरातन काळी होती प्रचलित। कौल लावण्याची प्रथा मंदिरात। प्रमुख निर्णय करण्यापूर्वी प्रस्थापित। संलग्न मंदिर दैवताच़ा।।१७।। 'श्री दुर्गापरमेश्वरी' मूर्ती स्थलांतरासी। लाविता कौल मूर्तीसी। नकारार्थी उत्तर लाभले स्वामींसी। चित्रापुरांत स्थापिण्यासी।।१८।। या 'श्री दुर्गापरमेश्वरी'च़े महत्त्व विशेष। अत्यंत पुरातन मंदिर शेष। चित्रापुर मठाच़ाही नव्हता लवलेश। त्याही पूर्वीच़े मंदिर हे।।१९।। रचिण्यापूर्वी शिवगंगा सरोवर। वनभोजनादी विधी सुंदर। होती मंदिर परिसरांत सत्वर। श्री स्वामी पांडुरंगाश्रम काळी।।२०।। समय कालानुरूप आपण। विसरलो जगदंबेच़े मूळस्थान। जगदंबा प्रवृत्ती धर्माच़े प्रमाण। त्यास्तव स्वतंत्र स्थानक दिधले।।२१।। प्रवृत्ती धर्म संवर्धनार्थ। करुनी 'श्री ट्रस्ट' संस्था सार्थ। निर्मिली श्री परिज्ञानाश्रमांनी समर्थ। 'जनकल्याणा' कारणे।।२२।। सांप्रत असे जी दिव्य मूर्ती। अंतरी देई सत्कार्या स्फूर्ती। श्री दुर्गापरमेश्वरी जाज्वल्य कीर्ती। प्रतिष्ठापिली जी कार्ल्यांत।।२३।। ही मूर्ती सुबक परिपूर्ण। कोणी दिली तिज़सी आणून। त्या विषयी महिमान। श्रवण करा भाविकहो।।२४।। स्वामी परिज्ञानाश्रम इच्छेपरी। शिरूर विजयानंद-गिरिजादांपत्याने सत्वरी। मूर्ती 'श्री दुर्गापरमेश्वरी' सुंदरी। दिली शुभ्र संगमरवराची।।२५।। गुरुकृपा भजन मंडळी नावाने।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

अर्पूनी अन्य भक्तांसंगे प्रेमाने। वंदिले स्वामींस भक्तीने। खार आनंदाश्रम मठांत त्र्याहत्तरांत।।२६।। परि देण्या तिज़ स्वतंत्र स्थानक। नच आला योग शुभकारक। घेतली कार्ल्यात मुंबई नजिक। ज़ागा देवी प्रतिष्ठापनेसी।।२७।। जल तृप्त करी तृष्णिक। घटापरी घेई रूप अनेक। रंग लाभे त्यापरी दिसे सुरेख। जल, प्रेमी भाविक मनापरी।।२८।। जलाच़ा गुण शितलता। तृष्णा शमवूनी देई प्रसन्नता। सर्व रूप रंगी समरसता। प्रवाहशील काळापरी।।२९।। तेवीच़ निर्गुण निर्विकार परमात्मा एक। तृप्त करी भक्तांसी भाविक। भक्त इच्छेनुरूप रंग आकार सम्यक। घेई सगुण रूपांत।।३०।। सर्वज्ञ सर्वशक्तीमान परमात्मा साकार। व्यापी सर्व चराचर। म्हणा त्यासी श्री भवानीशंकर। अथवा श्री दुर्गापरमेश्वरी।।३१।। भक्ताच्या भक्तीभावापरी। पोहोच़े प्रभु सगुणरूपे सत्वरी। भवार्णवी भक्तासी तारी। तृप्त करुनी भक्ता मानसी।।३२।। चित्रापुर सारस्वत गुरुंनी परिपूर्ण। दाविला ज़ो मानव धर्म उत्तम। त्याच़े करुनी जीवनी आचरण। ज़गूया आपण समत्वभावे।।३३।। आता कथिते चरित्र। श्री परिज्ञानाश्रमांच़े परम पवित्र। त्या काळच्या प्राप्त स्थितीच़े चित्र। पाहा सज्जनांनो एकाग्रतेने।।३४।। समाजात माज़ली दुफळी। ती हळूहळू वृद्धिंगत ज़ाहली। निराशा सर्वत्र उमटली। अशक्य ज़ाहले सुसूत्रीकरण।।३५।। स्वामी ज़ाहले दुःखी अंतर्यामी। पाहता गर्ववेष्टित मानव निकामी। बहुसंख्य ज़ाहले स्वार्थी वित्तप्रेमी। डळमळला विश्वास गुरुंवरी।।३६।। पंधरा जून एकोणीसशे एक्याण्णव रोजी। खार मठांत वदती स्वामीजी। आपुल्या आशीर्वचनामाजी।उपस्थित भक्तजनांसी।।३७।। ‘ आमुच्या कारणे ज़री माज़ली दुफळी। समाज एकतेची घडी विस्कटली। तरी आम्ही तयार या वेळी। विदेही होण्या सत्वरी।।३८।।

सदेह शक्य तितुके मार्गक्रमण। अध्यात्मांत ज़ाहले पूर्ण। कां सांभाळावा देह विनाकारण। चिंतिती मनी श्री परिज्ञानाश्रम।।३९।। महानिर्वाणही नच ज़ावे व्यर्थ। कळावा जनांसी जीवनार्थ। ज्ञात व्हावी सद्गुरु महिमा सार्थ। यास्तव केला निश्चय मनी।।४०।। लागता माणिक मर्कटाच्या हाती। पाषाण समज़ूनी त्यजे निश्चिती। अमूल्य रत्नाचे मूल्य चित्ती। मर्कटासी न कळे।।४१।। सद्गुरु होता कष्टी। देवही नच तारी संकटी। जगान्तरी केवळ भक्तप्रेमापोटी। जन्म घेई विश्वंभर सद्गुरु।।४२।। कळावे आम्हा सद्गुरु मोल। समाज सुसूत्रीकरण व्हावे सखोल। शाश्वत ज्ञानाची जिज्ञासा अमोल। ज़ाणवावी चित्रापुर सारस्वतांसी।।४३।। यास्तव केला एकवार इशारा। संपवा मतभेदाचा पसारा। समाज एकत्र येऊ द्या सारा। आम्ही असू इच्छामरणी।।४४।। ऐकता स्तब्ध ज़ाहले भक्त। व्यथित ज़ाहले चित्तात। प्रार्थिले भक्तांनी गुरुचरणांत। सोडूनी न ज़ावे आम्हासी।।४५।। कंठ दाटला भक्तांचा क्षणात। अश्रू दाटले नयनांत। चिंतेने वेढीले भक्त हृदयात। ऐकूनी सद्गुरुवचन।।४६।। देऊनी आपुल्या भक्तांसी धीर। स्वामी राहिले मनी खंबीर। वदती कांही भाविकांसी स्वामी सत्त्वधीर। त्या समयी ते परिसावे।।४७।। आमच्या मनाज़ोगा शिष्य ज़री हवा। सुयोग्य गुरुपरंपरापीठासी बरवा। ज़री सर्वार्थ परिपूर्ण सद्गुरु हवा। करावी प्रार्थना श्री भवानीशंकरासी।।४८।। तदनंतर राहूनी कार्ल्यात। प्रयाण केले स्वामींनी बेंगळूरात। राहिले नायंपल्ली भालचंद्र गृहात। काही काळवरी।।४९।। काही दिवसाउपरान्त। आले स्वामी गोमंतकात। श्री मंगेश- शांतादुर्गा दर्शनार्थ। गेले मंदिरांतरी।।५०।। श्री परिव्राजकाचार्य पूज्य मठाधिपती। स्वामी श्री सच्चिदानंद सरस्वती। श्री स्वामी

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

परिज्ञानाश्रमांस आमंत्रिती। स्वप्रतिनिधी धाडूनी।।५१।। स्वीकारूनी कवळे मठाधीशांचे आमंत्रण। स्वामी भक्तांसंगे गेले मठालागोन। दोन्ही तेजःपुंज परिपूर्ण। भेटले एकमेकांसी प्रेमभरे।।५२।। तेथूनी आले स्वामी चित्रापुरात। सकल समाधी दर्शनार्थ। क्षणैक राहिले स्तब्ध पाहात। स्वामी आनंदाश्रम समाधी सन्मुख।।५३।। कांही क्षण निश्चल राहूनी। पाहिले समाधीस मनसोक्त नयनीं। वाहती विमलांबुधारा चक्षूंतूनी। कंठ भरियला गुरुस्मरणे।।५४।। शीघ्र पुसुनी ती आसवे। निघाले परतण्यासी बरवे। घेती दर्शन भक्तीभावे। कांही भक्त स्वामी परिज्ञानाश्रमांचे।।५५।। तदनंतर येऊनी कार्ल्यात। निवास केला ज्ञानानंद आश्रमांत। वदती कांही उपस्थितांसी तेथ। हातीचे घड्याळ पाहूनी।।५६।। माझ्या या घड्याळात। दिसे मज़ शून्य फक्त। काही नच दिसे येथ। या समयासी मज़सी।।५७।। ज्ञानियांची भाषा सूचक। विलीन करितो काया सात्त्विक। शीघ्र मिसळेन अनंतात व्यापक। ऐशापरी सुचविले भक्तांसी।।५८।। तशीच एक दूजी घटना। कथिते आता भाविक भक्तांना। स्वामी बैसले आश्रमी असताना। घडली जी त्या समयी।।५९।। प्रबुद्ध प्रशांत श्री परिज्ञानाश्रम। करिती सर्वांवरी बहु प्रेम। निसर्ग पशुपक्षी मानवावरी प्रेम। करिती समत्वभावे जीवनी।।६०।। मृत्तिकेत लोळूनी पूर्णपणे। झेपावले स्वामींपाशी लडिवाळपणे। पाळीव श्वान त्यांचे प्रेमाने। चाटू लागले कर्णानजिक।।६१।। म्हणती आश्रमवासियांसी। श्री परिज्ञानाश्रम त्या समयासी। नच मारावे या श्वानासी। दिधला उत्तम संदेश मज़ त्याने।।६२।। सांगे श्वान माझिया कर्णी। मृत्तिकेत लोळूनी आलो मी प्राणी। आला सुयोग्य समय देण्या मिसळुनी। मृत्तिकेत मृण्मयकाया।।६३।। बोलावूनी नंतर कंत्राटदारासी। वदती श्री परिज्ञानाश्रम

त्यासी। समाधीस्तव ज़ागा सोडावी या स्थानासी। भविष्यकाळ अनुरोधूनी।।६४।। देवी मूर्तीपेक्षा उंच़ जास्त। नसावा कधी च़ौथरा समस्त। देवी प्रतिष्ठापना स्थान दावूनी प्रशस्त। वदले स्वामी परिज्ञानाश्रम।।६५।। राहूनी दोन दिन ज्ञानानंद आश्रमात। निघाले स्वामी पुण्यात। पुण्याहूनी थेट बेंगळूरात। निवासार्थ भक्तगृही।।६६।। निवास असता बेंगळूरात। बैसले तासवरी प्रशांतावस्थेत। स्वामी आनंदाश्रमांच्या पवित्र कक्षेत। सद्गुरु आसनासमोरी।।६७।। एकोणतीस ऑगस्ट एकोणीसशे एक्याण्णव दिनी। उच्च स्वरें ॐ कार उच्चारुनी। पहाटे सात वाज़ता स्वामींनी। केली काया अनंती लीन।।६८।। करण्यापूर्वी महानिर्वाण। केली हृदय दुखावल्याची खूण। धाविन्नले वैद्य परिपूर्ण। उपचारार्थ सद्गुरूंपाशी।।६९।। दुःखी ज़ाहले भक्त सकळ। अंतर्यामी स्मरूनी सद्गुरु प्रेमळ। माज़ली भक्तमनिं खळबळ। येता निरोप मुंबईत।।७०।। पोरकी ज़ाहली चित्रापुर सारस्वत ज़ात। सद्गुरु मायबापाविण समस्त। भवसागरी मार्गदर्शनार्थ। नच राहिला सद्गुरु स्वज्ञातीमाजी।।७१।। सहस्रावधी आला जनसमुदाय। घेण्यासी अंतिम दर्शन पुण्यमय। पाहता सद्गुरुमूर्ती चिन्मय। नेत्र पाणावले भक्तांच़ें।।७२।। आणिता काया खार मठात। बेंगळूरापासूनी विमानात। जन आले दर्शनार्थ। रात्री असंख्य गृहागृहातूनी।।७३।। दुजे दिनी कार्ला ज्ञानानंद आश्रमात। नेली पवित्र काया पद्मासनस्थ। बैसवुनी काया आश्रमात। केले स्नानादी सर्व विधी।।७४।। समाधीस्तव ज़ागा खोदूनी। बैसविली काया समाधी स्थानी। वाहिली श्रद्धांजली भक्तांनी। तुळस बेलपत्र पुष्पे अर्पूनी।।७५।। लवण कर्पूर आच्छादूनी समस्त। नवग्रह अंगठी घालूनी अंगुलीत। रुद्राक्ष घातले कंठात। स्वामी परिज्ञानाश्रमांच्या।।७६।। शंखाने करुनी खूण

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

शिरात। बैसविला शाळिग्राम गंधवेष्टीत तेथ। करुनी विधियुक्त मंत्रोच्चारण समस्त। दाविली कर्पूर आणिक पंचारती।।७७।। संपूर्ण केला विधी महत्त्वपूर्ण। भक्तांचा कंठ आला दाटून। दुःखाश्रू वाहती नेत्रांतून। वेष्टिता काया मृत्तिकेने।।७८।। केली गुप्तरूपे देवांनी पुष्पवृष्टी। दिङ्मूढ ज़ाहली पुनित सृष्टी। करुनी कायेवरी पर्जन्यवृष्टी। वरुण देवाने वाहिली श्रद्धांजली।।७९।। पर्जन्यवृष्टी संपता सत्वर। धावूनी आला गगनी दिनकर। स्पर्शिले सूर्यरश्मींनी चरण दृढतर। स्तंभित ज़ाहली वसुंधरा।।८०।। दर्शन भक्तांनी घेतल्यावरी। मृतिका घालूनी चोहोबाज़ूंनी सत्वरी। स्थापिले मृतिका लिंग त्यावरी। सद्गुरु नामघोष करूनी।।८१।। समाधी घेता सद्गुरुंनी साकार। पडली वैचारिक द्वंद्वावरी कुठार। करु लागले जन जागरुकतेने विचार। समाजातील दुफळीविषयी।।८२।। खुंटले वादी-प्रतिवाद्यांचे मतभेद। मूक ज़ाहले गहन वाद। प्रेमे दिला जनांनी प्रतिसाद। कार्यकर्त्या भक्तगणांसी।।८३।। ध्यान मंदिर स्थापना कार्य घेई वेग। आला देवी प्रतिष्ठापना सुयोग। शिवलिंग प्राणप्रतिष्ठा संयोग। आला स्वामींच्या समाधीवरी।।८४।। चोवीस फेब्रुवारी त्र्याण्णवपासूनी। सर्व विधी करण्या मुंबईतूनी। ज़मले वैदिक विविध स्थळांतूनी। कार्ला आश्रमामाजी।।८५।। स्वयंसेवक उत्साहपूर्ण। पोहोचले करण्या व्यवस्थापन। आहार निवासाची व्यवस्था संपूर्ण। ज़ाहली यथोचित कार्ल्यात।।८६।। सहस्रावधी जन आले आश्रमात। बालक तरुण वृद्ध समस्त। नच पडली त्रुटी किंचित। कुठल्याही व्यवस्थेमाजी।।८७।। वास्तुशांति नवग्रह याग। राक्षोघ्न आवाहन याग। देवी प्रतिष्ठापना याग। तसेची शतचंडी यज्ञ।।८८।। श्री दुर्गापरमेश्वरी मूर्ती नेऊनी। श्री एकवीरा मंदिर पायथ्याशी भक्तांनी। वाज़त गाज़त नाचत

मिरवूनी। आणिली विजयोल्हासे।।८९।। फाल्गुन शुद्ध पंचमीसी। भृगुवासर अंगिरा संवत्सरासी। प्रतिष्ठापिले श्री दुर्गापरमेश्वरीसी। ध्यान मंदिरी कार्ला ग्रामी।।९०।। शिवलिंग प्रतिष्ठापना सोहळा। ज़ाहला तीन मार्च त्र्याण्णवला। फाल्गुन शुद्ध दशमीला। शिलेचे शिवलिंग प्रतिष्ठापिले।।९१।। अहोरात्र श्रमूनी स्वयंसेवकांनी। मृतिका लिंग अलगद उचलूनी। मृतिका हस्ते बाज़ूस सारूनी। केले भव्य छिद्र दर्शनास्तव।।९२।। स्वामींचे शिर दिसेस्तोवरी। बाज़ूस सारली मृतिका सारी। स्वयंसेवक ज़ाहले थक्क अंतरी। पाहूनी सतेज मस्तक सद्गुरुंचे।।९३।। भक्तांनी घेतले दर्शन। अहाहा! काय ते आश्चर्य महान। ऐका जनहो अद्वितीय महिमान। स्वामी परिज्ञानाश्रमांचे।।९४।। गुरु मूर्तीचे शिर केसांसहित। बैसविले त्याची स्थितीत। लवण, तुळस, बेल, पुष्पे टवटवीत। देखियली भाविकांनी।।९५।। वृक्षापासूनी करिता अलिप्त। पुष्पे, पत्रे सुकती त्वरित। पाहतो हे नैसर्गिक सत्य जगात। सर्व जन नित्यासी।।९६।। दीड वरुषे राहिली भूमी भितरी। सर्व तुळसी पुष्पे तजेल सारी। दावी अद्वितीय चमत्कार जगान्तरी। दिव्य स्वरूप श्री स्वामींचे।।९७।। नच मिळाला पुष्पांसी प्रकाश। अथवा जलप्रवाह विशेष। नच ज़ाहला पवनाचा स्पर्श। अठरा मासावरी त्यांसी।।९८।। पुष्प पत्रांदिकांस संजीवनी प्राप्ती। देई गुरुत्वाकर्षण शक्ती। करिता सद्गुरुचरणी भक्ति। होई अमृतानुभव प्राप्त।।९९।। स्वामींचे सामर्थ्य असामान्य। पत्र सुमनांनी दर्शविले पूर्ण। नच करावा याविषयी अनुमान। भाविकांनी चित्तांतरी।।१००।। भक्तांनी घेता समाधी दर्शन। ज़ाहला लिंग प्राणप्रतिष्ठा विधी महान। सुवर्ण तार एक दीर्घ परिपूर्ण। सोडिली स्वामींच्या शिरावरी।।१०१।। शिवलिंग, शाळीग्राम। श्री भवानीशंकर मूर्ती परम।

घेऊनी प्रदक्षिणेचा नेम उत्तम। केला भक्तीने तीन कार्यकर्त्यांनी।।१०२।। मग ज़ाहला नवग्रह होम। उत्सवाची सांगता उत्तम। तीर्थप्रसादा ग्रहण करुनी परम। परतले भक्त स्वगृही।।१०३।। देवी प्रतिष्ठापने उपरान्त। पूजा चाले नित्य कार्ल्यात। देवी अन् समाधी पूजा विधीयुक्त। करिती वैदिक प्रेमे।।१०४।। सुप्रभात ते रात्रीपर्यंत। सांज़सकाळी सेवा होई नियमित। श्री देवीस करिती अलंकृत। विविध पुष्प वस्त्रादी अलंकारे।।१०५।। चालती सर्व पूजादी व्यवस्थित। तरी गुरुंच्या सदेह अनुपस्थितीत। भासे सर्वही अळणी खचित। ज़ैसा लवणाविण आहार।।१०६।। सदेह ज़री नसती उपस्थित। चैतन्य रूपे गुरु असती तेथ। गुरुकृपेची होती कार्ये समस्त। यथासांग ध्यानमंदिरी।।१०७।। श्रीमत् शंकराचार्यांनी सुरेख। लिहीले काव्य 'उपदेश पंचक'। तृप्त होती अध्यात्मसाधक। श्रवण पठणाने।।१०८।। उपदेश पंचक भाषा गीर्वाण। त्यापरीच ज्ञानदायक परिपूर्ण। 'विचित्र पंचक' नाम काव्य महान। रचिले स्वामी परिज्ञानाश्रमांनी।।१०९।। पंच श्लोकयुक्त हे काव्य। दावी स्वामींचे अंतरंग संभाव्य। भासे आनंददायी सुश्राव्य। करिता श्रवण पठण।।११०।। वैचित्र्यमय या विश्वात पूर्ण। नकळे स्वामींचे अगम्य वर्तन। अथवा त्यांचे अंतरंग प्रेमपूर्ण। त्यावरी सूचकतेने टाकी प्रकाश।।१११।। प्रत्येकाच्या योग्यतेनुसार जीवनात। करील हे काव्य मार्गदर्शन अंतरात। कळेल अध्यात्म साधकासी गूढार्थ। स्वानुभवासहित गुरुकृपे।।११२।। सद्गुरु लिखित हे काव्य अमोल। नच ज़ाईल कदापि फोल। स्मरता सद्गुरुरचित शब्दबोल। लाभ निश्चित होई भक्तांसी।।११३।। इतुके कथूनी चरित्र निरुपण। गुरुपरंपरेसी वंदूया भावपूर्ण। करावे आम्हा मार्गदर्शन। येऊनी सद्गुरुरूपे आम्हासी।।११४।। अपराध केले

आम्ही अनंत। न ज़ाणिले सद्गुरुरूप महंत। सद्गुरु हाची परमात्मा अनंत। विसरलो आम्ही संपूर्ण।।११५।। परंपरा नव्हे केवळ अनुशासन। च़ाले जी वर्षानुवर्षे परिपूर्ण। अक्षय सुखाच़ा हा स्रोत संपूर्ण। वाही भक्त हृदयांतूनी।।११६।। श्री भवानीशंकरा करुणाकरा। अनंत व्यापक विश्वंभरा। सद्गुरुरूपे आम्हा तारा। अनन्य अपराध पोटी घालूनी।।११७।। गुरुदेवा तुम्ही ज्ञानसागर। आनंद शांतीच़ा झ़रा अमर। तुम्हाविण तरण्या भवसागर। आम्ही असमर्थ सर्वदा ।।११८।। शीघ्र सद्गुरु रूपे येवोनी। तारावे चित्रापुर सारस्वतां जीवनी। समाज मतैक्य साधूनी। कृपा करावी आम्हावरी।।११९।। मनुष्यात मुमुक्षुत्व देऊन। जिज्ञासा विवेक उपज़वूनी। शाश्वत सुखाप्रति नेऊनी। शिकवा आम्हा मानवता धर्म।।१२०।। हे गुरुचरित्र श्रवण पठण। करितील ज़े भक्त विश्वासपूर्ण। त्यांच़े मनोइच्छित पुरवून। करावे त्यांसी गुरुकृपापात्र।।१२१।। इतुके लिहूनी गुरुचरित्र। हा त्रयोषष्ट्यध्याय पवित्र। श्री चित्रापुर गुरुपरंपरा चरणी समर्थ। अर्पिला अनन्य भक्तीभावे।।१२२।। अध्याय।।६३।। ओंव्या १२२।। ॐ तत्सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु।।

।। इति त्रयोषष्ट्यध्यायः समाप्तः।।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

ही गुरुशक्ति सुखशांतीप्रदा। विकसित सृष्टिकर्त्री आद्या।
श्रुतींचे रहस्य ज़ाणे ती विद्या। भवसागरातूनी मोक्ष देई॥

मनःपूर्वक करावी तिची आराधना। उत्साहाने करावी साधना।
तेणे उद्दीपित होई चेतना। अखंड साधना सेवा करण्यार्थ॥

- श्रीमत् सद्योजात शंकराश्रम स्वामिजी



एकादशगुरु श्रीमत् सद्योजात् शंकराश्रम स्वामिजी

॥ श्रीभवानीशङ्करो विजयते ॥
श्री चित्रापुरमठ संस्थानम्
शिराली (उत्तरकन्नडम्)

स्वस्ति। श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्य पदवाक्यप्रमाण पारावार पारीण यमादि अष्टाङ्गयोगानुष्ठाननिष्ठ तपश्चक्रवर्ति रमणीयचरण सर्वसर्वसहासञ्चरण समुद्बोधित सच्छिष्य महाजन भक्तचिद्धरण श्रीचरण श्री गौडपादाचार्यप्रवर्तित श्रीमज्जगद्गुरु आद्यशङ्करभगवत्पाद सत्सम्प्रदाय परम्परा प्राप्त सकलनिगमागमसारहृदय वैदिक मार्गप्रवर्तक भक्तियोग वैभवसिंहासनाधीश्वर श्री गोकर्णक्षेत्रादि प्रतिष्ठापित श्रीमत् राजाधिराज श्रीगुरु सारस्वतमण्डलाचार्य चित्रापुराधीश्वर शरावतीतीरवास श्रीमत्प्रथमपरिज्ञानाश्रम गुरु सत्सम्प्रदाय विलसित श्रीभवानीशङ्कर श्रीराजराजेश्वरी दत्तात्रेय दक्षिणामूर्तिपादपद्माराधक श्रीविद्यावरिवस्यासमासक्तचित्त श्रीमत् तृतीयपरिज्ञानाश्रमस्वामी गुरुकरकमलानुग्रहसञ्जात अविच्छिन्नपरम्पराप्राप्त तुरीयाश्रमोचित अनुष्ठाननिष्ठ श्रीमठीय साम्प्रदायिक देवताराधनपरायण

श्रीगुरु सद्योजातशङ्कराश्रमस्वामिभिः
विदित नारायण स्मरणपूर्वक शुभाशीर्वादाः

॥ श्रीः ॥

शिष्यान्तश्शोधने यद्वत् तद्वत् यन्त्रालिशोधने ।
कौतुकं यस्य तम् वन्दे परिज्ञानाश्रमं गुरुम् ॥

My prostrations at the Lotus Feet of Parama Poojya Swāmi Parijñānāshram, who is adept at purifying the intellect of those who meditate upon Him and whose Spiritual Grandeur and subtle Power are evoking awe and deep reverence within a receptive Samāja.

My prostrations
... to the Guru who guides the student, the professional, the bhakta and shishya

... to the Guru whose study and mastery over modern, technological equipment inspires students and experts alike

... to the Guru whose Presence and Protection is felt instantaneously by every bhakta who seeks refuge

... to the Guru who graciously reveals the Greatness of the Paramparā to every shraddhāvān.

... to You, My Guru, whose Love is my primary protection on the Sādhanā-Patha

You, to whom the very devatās are subservient I can only admire

You, who defies all definition, I can only gaze upon in mahad-āshcharya - absolute wonder!

You, who loves to surprise and enthuse with gifts, both unexpected and generous, I can only rejoice about.

You, who are Spirituality Incarnate, have captured my love, my devotion, my imagination, my very soul!

What can I offer You?

I know nothing beyond You and truly abide in You - the Parijnāna in me - the one Intelligence behind myriad perceptions!

नवैवास्मि

Camp. Karla Math

15 June 2012

श्रीमत् आद्य शंकराचार्य सन्निधि श्रीवल्ली भुवनेश्वरीदेवी सन्निधि श्रीमन्महागणपति सन्निधि

।। श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीकुलदेवतायै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीगुरुभ्योः नमः॥१॥ गुरुपरंपरेसी मनोभावे स्मरून। सद्‌गुरु परिज्ञानाश्रमांसी करुनी वंदन। सद्‌गुरु सद्योजात शंकराश्रमांसी करुनी नमन। विनम्र प्रार्थना शुभाशिषा कारणे॥२॥ भवानीशंकरा दीनदयाळा। गताध्यायी प्रार्थिले तुज़ला। सद्‌गुरुरूपे येवूनी समाजाला। उद्धरी बापा दयानिधे॥३॥ तू घननीळ आशुतोष। सोडवी देवा आमुचे पाश। व्यापूनी राहसी चिदाकाश। चैतन्याचा चिद्विलास पहा॥४॥ स्वामी परिज्ञानाश्रमांची इच्छा एकमेव। की समाज व्हावा एक यास्तव। दावी देवा तव प्रभाव। नच काही अशक्य तुज़ला॥५॥ तरी देवा ऐसी कृपा करी। भक्तांच्या मनातील विकल्प दूर सारी। स्वामी परिज्ञानाश्रमांची इच्छा पूर्ण करी। सर्वत्र सुख शांति नांदू दे॥६॥ ऐसी हृदयपूर्वक प्रार्थना करून। आरंभ करण्या चरित्र लेखन। सद्‌गुरु देवा तुज़ आवाहन। केले पहा लेखणीत॥७॥ विश्वंभरा तू स्वयें करुनी शब्दांकन। सांगावे आता चरित्र कथन। जनहो प्रयत्नपूर्वक करुनी एकाग्र मन। परिसा पुढील वार्ता॥८॥ गताध्यायी कथिले सत्य सारे। समाजात वाहे दुफळीचे वारे। कोण खोटे कोण खरे। नच उमगे जनांसी पहा॥९॥ सद्‌गुरुंना विचारण्या नच होई धैर्य। तटस्थ राहणे ज़ाहले अनिवार्य। स्वयें करण्या नियोजित कार्य। स्वामींनाही अशक्य ज़ाहले॥१०॥ ज़े परिज्ञानाश्रमांनी होय म्हणावे। त्यावरी हितचिंतकांनी आक्षेप घ्यावे। शांतचित्ते ज़री स्वस्थ बैसावे। तेही असाध्य करिती काही जन॥११॥ सन एकोणिसशे एक्याऐंशीची घटना खास। स्वामींचा बांगरवाडी लोणावळ्यात रहिवास। भक्ताने विचारला प्रश्न हमखास। तो अवधारा सज्जनहो॥१२॥ ‘‘तुम्ही म्हणता शिष्य न घेवू आपण। तरी

भावीपिढीस जीवनी मार्गदर्शन। आणिक मंत्रदीक्षा पावन। कोण करील समाजांतरी''॥१३॥ श्री परिज्ञानाश्रम हासत वदती। ''गुरुरूपे मी केवळ निमित्त जगती। अनेक गुरुरूपे येवूनी जगती। भगवंतची कार्य करी॥१४॥ समाज आपुला सुसंस्कृत सुशिक्षित। परि आध्यात्मिक कळकळ उणी खचित। ज़ो जिज्ञासू येईल सन्निध विनीत। तयासी मार्गदर्शन होईल निश्चये॥१५॥ आम्ही ज़री शिष्य घेतला। समाज स्वीकारेल का तयाला। व्यर्थ विषय बोला कशाला। भवानीशंकर सद्गुरु समर्थ असे॥१६॥ पुढे परंपरा होईल दुजी। जनही होतील आपैसे राजी। आश्रम परंपरा म्हणवेल सहजी। तरी आमुच़ा प्रत्यक्ष शिष्य ऐसे न होई॥१७॥ असेल तो ''आमचीगेलो'' जन्मजात। दीक्षा गुरु त्याच़ा अन्य खचित। धर्मगुरु त्याच़े आम्ही निश्चित। हेंची विधिविधान पहा॥१८॥ विधिलिखित सत्यची ज़ाण। आत्ताची कासया देवू प्रमाण। पाहत रहा निश्चिंत होवून। आत्ताची वाच्यता करु नको॥१९॥ नियतीच्या कार्यामाजी ज़ाण। हस्तक्षेप न करावा आपण। तीच़ सर्वांचे कार्यकारण। अनंत सद्गुरु शक्ति पहा''॥२०॥ परिसा जन हो सत्य निखालस। सन एकोणिसशे श्याऐंशी मार्च मास। स्वामी परिज्ञानाश्रमांची भेट चेन्नईस। ज़ाहली पूर्वाश्रमीच्या समीर कोडीकलची॥२१॥ एकदा निवास असता बेंगळूरासी। ज्ञात ज़ाहले पूर्वाश्रमीच्या समीरासी। स्वामी परिज्ञानाश्रम चेन्नईसी। उपस्थित असती सांप्रतकाळी॥२२॥ तेधवा भेटीसाठी होवूनी तत्पर। आला शीघ्र चेन्नईसी समीर। स्वामींच़े आशीर्वचन ऐकले सविस्तर। दीपनमस्कारही ज़ाहला॥२३॥ दीपनमस्कारानंतर त्वरित। स्वामी परिज्ञानाश्रम निघाले कक्षेत। स्वामींच्या सायंकाल भिक्षे उपरांत। समीर प्रवेशला कक्षेत

भेटीसाठी॥२४॥ समीर सांगे स्वामी परिज्ञानाश्रमांस। ''शास्त्राध्ययन करुनी घ्यावा संन्यास। चित्तास लागला एकची ध्यास। निवृत्ति मार्गाचा निरंतर॥२५॥ माऊंट अबूसी स्वामी ईश्वरानंद गिरी। त्यांची पूर्वी भेट ज़ाहली खरी। तयांचे मार्गदर्शन घेण्या निजांतरी। तीव्र इच्छा वसे मम हृदयी॥२६॥ मी जगी ज़गण्या संन्यस्त जीवन। मातापित्यांची असे अनुमति संपूर्ण। परन्तु तुमचा आशीर्वाद महत्त्वपूर्ण। शिरोधार्य सर्वदा जीवनी''॥२७॥ स्वामींनी क्षणभरी मिटले नेत्र। धरियले कृपेचे अगोचर छत्र। स्वामींच्या कृपेसी ज़ाहला पात्र। समीर त्याक्षणी पहा॥२८॥ स्वामी परिज्ञानाश्रम वदले त्यास। ''तू ज़रूर घ्यावा जीवनी संन्यास। आमुचा आशीर्वाद तूज़संगे खास। अखंड राहील जीवनी''॥२९॥ ऐकता तृप्त ज़ाहली समीरची गात्रं। श्रद्धा भारे मिटले नेत्र। स्वामींनी नजिकचा हार पवित्र। फेंकीला समीरच्या मांडीवरी॥३०॥ धर्मगुरु परिज्ञानाश्रमांचा लाभता आशीर्वाद। मार्ग मोकळा ज़ाहला निर्विवाद। तशात पुष्पहार रुपे लाभता प्रसाद। दुग्धशर्करा–योग ज़ाहला॥३१॥ तेथूनी माऊंट अबूसी केले प्रस्थान। सद्गुरु ईश्वरानंद गिरींस शरण ज़ावून। चार मासात संन्यास दीक्षा घेवून। साधना करिती सद्योजात स्वामी॥३२॥ सन एकोणिसशे एकोणनव्वदच्या आसपास। स्वामी परिज्ञानाश्रमांपाशी आग्रह खास। धरियेला कार्यकर्त्यांनी शिष्य घेण्यास। पुनश्च मठाधिपत्य स्विकारुनी॥३३॥ स्वामी परिज्ञानाश्रमांनी देता होकार। हितचिंतक देती नकार। स्वामींनी मग शोधिला तरणोपाय सुंदर। पूर्ण वक्रनीतिचा॥३४॥ सद्गुरुंची ही अगम्य वक्रनीति। ज़णू उंटावरी स्वार गुरुशक्ति। नियतीने दिधली प्रचिती। विश्वंभर सद्गुरु लीलेची॥३५॥ विश्वंभराची विपरीत करणी। ज़ैसे श्रीफलामध्ये दडले पाणी।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

अथवा सागरामध्ये तेलाची खाणी। तैसे कार्य केले सद्गुरुंनी॥३६॥ स्वामी सद्योजातांची दाविता जन्मपत्रिका। तेवीच छायाचित्र देखा। स्वामीजी म्हणाले आपुल्या भाविकां। हा शिष्य होणे अशक्य पहा॥३७॥ भक्तांवरी स्वामींचा पूर्ण विश्वास। म्हणूनी भक्तांचिच धरुनी कास। कार्य तडीस नेले खास। त्याची परिणती अपेक्षित ज़ाहली॥३८॥ वार्ता येता हितचिंतकांच्या कानी। म्हणती बरा शिष्य आणिला ध्यानी। यांसीच आता मठाधिपति म्हणूनी। आणू पहा निर्धारि॥३९॥ जेधवा सारस्वतांचे हे बाळ। गिरी परंपरेतूनी आले निर्मळ। सत्य ज़ाहले श्री परिज्ञानाश्रमांचे बोल। सद्गुरुंची अनुपम लीला पहा॥४०॥ ज़ैसा देवकीवसुदेवनंदन। गोकुळी नंदाघरी वाढला पूर्ण। नंदयशोदापुत्र म्हणून। प्रसिद्ध ज़ाहला जगांतरी॥४१॥ उद्भवली जेधवा काळाची गरज़। कंसशिशुपालाचा वाढला माज़। तेधवा पातले श्रीकृष्णराज। द्वारकानगरीत ज़ाणा॥४२॥ तेवीच भवानीशंकरे केले काय। चित्रापुर सारस्वतांसी देण्या न्याय। आधीच दाविला तरणोपाय। तो कैसा पाहू चला॥४३॥ सगुण सद्गुरुंचे होता महानिर्वाण। तेवीच समाधि-पुनर्प्रतिष्ठान। शास्त्रोक्त रित्या कार्य संपूर्ण। उत्तराधिकाऱ्याच्या हस्ते होई॥४४॥ प्रथम शंकराश्रमांच्या महानिर्वाणानंतर। समाधिकार्य जे महत्तर। करविले शास्त्रोक्त विधियुक्त संस्कार। उत्तर हिन्दुस्थानी संन्याशाच्या हस्ते॥४५॥ परंतु पुनर्प्रतिष्ठा करते वेळी। द्वितीय परिज्ञानाश्रम सद्गुरुमाऊली। यांच्या हस्ते पूर्ण करविली। लिंगप्रतिष्ठापना पावन॥४६॥ पुनश्च ऐसी स्थिति आली। तृतीय परिज्ञानाश्रमांनी समाधि घेतली। भक्तांसी उणीव भासू लागली। तेधवा सद्गुरुंची पहा॥४७॥ दीड वर्षानंतर योग उद्भवला। समाधि प्रतिष्ठापनेचा

उत्सव सोहळा। संन्याशाच्या हस्ते व्हावा सगळा। ऐसे शास्त्रविधान असे॥४८॥ विविध आश्रमी विविध स्थळी। भक्त धाविन्नले वेळोवेळी। स्वामी परिज्ञानाश्रमांची लीला समुळी। मूक सांकेतिक सर्वस्वी॥४९॥ उत्तराधिकारी ज़री शिष्य नसला। तरी नूतन परंपरेचा रोख दाविला। भाबड्या भक्तांसी नच उमगला। त्यासमयी निर्देश ज़ाणा॥५०॥ भक्त धाविन्नले प्रेमापोटी। संतसंन्यासी आणण्यासाठी। येन तेन कारणे उठाउठी। नकार मिळाला जळीस्थळी॥५१॥ परि सद्गुरुंची विलक्षण किमया। उत्तराधिकाऱ्याची दाविली परंपरा लीलया। त्यासमयी लोणावळ्यात शिबिर घ्यावया। उपस्थित होते पूज्य ईश्वरानंद गिरी॥५२॥ जनांनी प्रार्थिले पूज्य ईश्वरानंद गिरींस। स्वीकारले तयांनी आमंत्रण खास। मठातील पुण्यकर्म करण्यास। पातले भक्तांसंगे कार्ला ग्रामी॥५३॥ समाधि लिंग-प्रतिष्ठापना सोहळ्यास। स्वयें उपस्थित राहूनी खास। पुनीत केले भक्तजनांस। स्वयें सत्कार्य करुनी॥५४॥ श्रीदुर्गाप्रतिष्ठापने उपरांत पूजन प्रथम। पूज्य ईश्वरानंद गिरींनीच केले उत्तम। हा दुर्गा परमेश्वरीचाच प्रभाव परम। पवित्र शुक्रवारी पहा॥५५॥ प्रथम पूजनाचा देवूनी मान। देवीनेच केला त्यांचा सन्मान। याविषयी नका धरु अनुमान। ही देवी, सद्गुरुंचीच इच्छा ज़ाणा॥५६॥ म्हणूनी म्हणावे लागे वारंवार। की तृतीय परिज्ञानाश्रमांची लीला अपार। सूचक प्रेरित अनिवार। हे त्रिशुद्ध त्रिवार सत्य ज़ाणा॥५७॥ स्वामी ईश्वरानंद गिरींचे शिष्य। सांप्रतचे चित्रापुर-सारस्वत-मठाधीश। सद्गुरु सद्योजात शंकराश्रम एकादश। परमपूज्य स्वामी पहा॥५८॥ आता पाहू पूर्वाश्रमीचा इतिहास। नाम धाम कुळ खास। जन्म साल तिथी दिवस। आवड निवड व्यक्तीमत्व खरे॥५९॥ सन एकोणिसशे

चौसष्ट तेरा नोव्हेंबर। शके अठराशे श्याऐंशी भृगुवासर। क्रोधीनाम संवत्सर। कार्तिक मासी जन्म ज़ाहला॥६०॥ शुक्ल पक्ष नवम तिथीस। माय प्रसवली प्रभातेस। जन्म दिधला गोंडस बाळास। आनंदी आनंद ज़ाहला॥६१॥ उपनाम कोडीकल कौंडिण्य गोत्र। पिता मोहन माता सुधा पवित्र। तयांची तृप्त ज़ाहली गात्रं। अपरिमित संतोषाने॥६२॥ समीर ऐसे नामकरण। मायबापे केले परिपूर्ण। बाळाच्या जन्मापूर्वीचे कथन। परिसा जनहो प्रेमाने॥६३॥ येरवडा पुण्यासी पालकांचे निवासस्थान। तेथे दाम्पत्य नामे लक्ष्मीनारायण। तामिळ ज़ातीचे ब्राह्मण। राहतसे गृहासमीप पहा॥६४॥ त्यांच्या गृही होई भजन। पूजन आणिक होमहवन। भजनासी ज़ाई कन्येसी घेवून। माय सुधा तेथे आवडीने॥६५॥ एकेदिनी पूजेस असता आमंत्रण। सुधा पोहचली कन्येस घेवून। पूजनापश्चात वदे लक्ष्मीनारायण। तुम्हा पुत्ररत्न लाभू दे॥६६॥ श्रवणे विचार आला मनी। देवानेच सुचविले कां मज़लागोनी। देव्हाऱ्यासमक्ष उभे राहूनी। सुधाने प्रार्थना केली मनोभावे॥६७॥ ''पुत्र व्हावा ऐसी ज़री। तुझीच इच्छा असेल खरी। तरी देई मज़ जीवनांतरी। पुत्र माझ्या मनासारखा देवा॥६८॥ सुपुत्र लाभावा आरोग्यवान। आयुष्यमान सौंदर्यवान विद्वान। स्वयें राहूनी सुखी सम्पन्न। इतरांसही सुखी करील ऐसा''॥६९॥ ऐसी प्रार्थना करिता मनांत। विस्मये स्वयेंची पडली विचारात। काव्यात्मक शब्द ऐसे प्रार्थनेत। कैसे सुचले माझिया मनी॥७०॥ ही खरी भगवंताचीच प्रेरणा। शब्दरूप आले अंतरीच्या चित्रांना। नाज़ूक पालवी फुटली शब्दांना। अवचित स्फुरली सुखद कल्पना॥७१॥ दीडवर्षानंतर ज़ाहली गर्भधारणा। पूर्ण केली देवाने मनोकामना। ज़ैसी भगवंतासी केली याचना।

तैसाची सुपुत्र जन्मला॥७२॥ तयांच्या गृही होती दिनदर्शिका। त्यावरी शिर्डीसाईंचे छायाचित्र देखा। त्याविषयीचा मातेचा स्वानुभव पक्का। आता सांगू सद्गुरुकृपे॥७३॥ सहा सात महिन्याचे बाळ। क्रंदन करीता वेळोवेळ। साईचित्रासमोर नेता तत्काळ। क्रंदन थांबवी क्षणमात्रे॥७४॥ ऐसा अनुभव येता वारंवार। तरणोपाय लाभला सहज सुंदर। बाळ रुदन करिता सत्वर। माय नेई चित्रासमोरी॥७५॥ बालपणीच रामरक्षेचे पाठांतर। वाचनाची आवड बलवत्तर। स्वामी दयानंद सरस्वती वाङ्मय महत्तर। पठण केले एकादश वर्षी॥७६॥ जन म्हणती याचे वाटे कौतुक। आध्यात्मिक वाङ्मय वाचतो देख। गृही असुनी ऐसी पुस्तके अनेक। आम्हा चाड नसे वाचनाची॥७७॥ वाचनात गर्भितार्थाकडे लक्ष। कार्यामाजी ध्येयपूर्तीस्तव दक्ष। आरंभ ते अंत वृत्ती सापेक्ष। सकारात्मक दृष्टि बाल्यापासोनी॥७८॥ शिकले कराटे, अयंगार योग। व्यायाम योगासनी होती दंग। लक्ष्यभेदाची आवड उत्साह उत्तुंग। तीर कमान छंद आवडीचा॥७९॥ विनोदीवृत्ति परिपूर्णतेवरी भर। हाडाचे उत्तम नकलाकार। मनमिळावू विशाल मित्रपरिवार। सामंजस्य पूर्ण अभिव्यक्ति॥८०॥ बालपणी नीलरंग अत्यंत प्रिय। तीक्ष्ण कार्यरत घ्राणेंद्रिय। कुठलाही मनी करिता निश्चय। तडीस नेती निर्धारि॥८१॥ अनारोग्य बळावता शरीरी। अथवा चिंतायुक्त तणाव मनांतरी। म्हणतसे देवाचीच कृपा सारी। जो ऐसा अनुभव दाविला॥८२॥ अन्यथा दुजाचे दुःख कैसे। कळेल सांगा मज आपैसे। अनुभवाचे बाळकडू देवूनी ऐसे। कृपा केली भगवन्ताने॥८३॥ महाविद्यालयीन शिक्षण घेत असता। विचित्र चलबिचल जाणवे चित्ता। हळूहळू आले कळिता। की हा नसे मम मार्ग निश्चये॥८४॥ प्रेयस प्रवृत्ती मार्ग धरावा जरी।

लौकिक शिक्षण अत्यंत ज़रूरी। श्रेयस निवृत्ती मार्ग धरिला तरी। शास्त्राध्ययन अनिवार्य असे॥८५॥ अंतरी शांत विचार करिता। निवृत्तीच़ आवडे अंतर्चित्ता। बहिर्जगात दृष्टि टाकिता। दिसे ससेहोलपट सर्वत्र॥८६॥ प्रवृत्ती-मार्गही असे च़ांगला। संसारी राहुनी परमार्थ भला। सुखी तृप्त कोणीही न दिसला। अवलोकीता जीवनांतरी॥८७॥ प्रपंचाच़ा कडूगोड व्यापताप। ज़री कीर्ती संपत्ति वारेमाप। तरीही प्रत्येक करी विलाप। येन तेन कारणे जीवनांतरी॥८८॥ मनी ज़ाहली प्रश्नांची दाटी। केवळ मनीच्या जिज्ञासेपोटी। स्वामी परिज्ञानाश्रमांची घेण्या भेटी। खार मठांत पातला समीर॥८९॥ त्यासमयी परिज्ञानाश्रम स्वामी पहुडले। आपुल्या मंचकावरी भले। अनेक प्रश्नांच़े काहूर उठले। तत्समयी समीरच्या मनी॥९०॥ मज़ मार्गदर्शन करील कोण। देईल कोण उत्तरांची ज़ाण। मी घ्यावे कोणते शिक्षण। कोणता मार्ग आचरावा॥९१॥ ऐसे मनी विचार च़ालले। स्वामींनी ना नेत्र उघडले। परि विचार स्वामींठायी उतरले। ऐसी प्रचिती आली पहा॥९२॥ तेथूनी निघूनी पार्ला गृही। समीर शीघ्र परतला पाही। उत्तर मज़ला मिळाले नाही। म्हणूनी खिन्न ज़ाहला मनी॥९३॥ गृही भगिनीची चिठ्ठी सापडली। स्वामी ईश्वरानंद गिरी यावेळी। निघाले माऊंट अबू स्थळी। सांताक्रुज़ विमानतळावरी असती॥९४॥ ज़री इच्छिसी दर्शन घ्यावे। तरी शीघ्र विमानतळावरी यावे। तेव्हा दर्शन घेण्या भावे। निघाला समीर तत्क्षणी॥९५॥ स्वामी ईश्वरानंद गिरी चरणी ज़ाहला नतमस्तक। ज़ाहले पावन दर्शन सुरेख। चित्ती लाभले अपूर्व सुख। पाहता तयांच़े चिन्मय रूप॥९६॥ चित्ती ज़डले अनाकलनीय आकर्षण। वारंवार घ्यावे श्रीईश्वरानंद गिरींच़े दर्शन। ऐशिया सात्त्विक इच्छेने वेढीले मन। ज़णू

दर्शनमात्रे साधियेला संन्निकर्ष।।९७।। तदनंतर प्रत्यक्ष पहिली भेट। ज़ाहली अहमदाबाद विमानतळावरी थेट। जेथे प्रथम संवाद उत्कृष्ट। साधियला समीरने स्वामी ईश्वरानंद गिरींसंगे।।९८।। समीर विचारी प्रश्न स्वामींसी। ''जेधवा पाहतो मी जनांसी। कोणीही नच दिसे मज़सी। पूर्णपणे सुखी या जगी।।९७।। जयांपाशी संपत्ति संतति कीर्ती। कशाचीही उणीव नसता जगती। तरीही आंतरिक समाधानाची प्रचिती। न येई तयांसी।।९८।। सांगावे याचे कारण काय। जगाच़ा हा कैसा न्याय। या वैचित्र्यावरी काय उपाय। कृपया सांगावे मज़सी''।।९९।। सज्जनहो अवधारा च़ोख उत्तर। स्वामी ईश्वरानंद गिरींच़े महत्तर। श्रवणे लाभे आनंद सत्वर। ऐसा विश्वास धरा मनी।।१००।। ''परिपूर्णता शोधिसी अशाश्वत जगती। ती नच गवसेल कल्पांती। शाश्वताची अपेक्षा ज़री धरिसी चित्ति। दिव्य परमार्थ ज़ोडी बाळा''।।१०१।। ऐकता स्वामी ईश्वरानंद गिरींच़े उत्तर। काहूर शांत ज़ाहले सत्वर। गुरुचरणी अनामिक ओढ निरंतर। वाटू लागली हृदयांतरी।।१०२।। बारावी पर्यंत घेतले शिक्षण। भगिनीच़ेही ज़ाहले लग्न। निग्रह मनी केला पूर्ण। निवृत्ती मार्ग स्वीकारण्याच़ा।।१०३।। मातापित्यासी म्हणे समीर। ''कृपया माझ़ा ऐकावा विचार। प्रवृत्ती मार्ग सोपान सुखकर। परि तो नच रूचे मज़सी ।।१०४।। निवृत्ती मार्ग ज़री खडतर। आमुच़ा निश्चय असे दृढतर। दोन्ही मार्गात सुखदुःखांच़ा संकर। याची ज़ाण असे मज़।।१०५।। तुम्हा साऱ्यांसी देवूनी दुःख। कसे पावेन मी सुख। माझ्याही चित्ती राहील रूखरूख। जीवनभरी हृदयांतरी।।१०६।। द्यावी तुम्ही मज़ अनुमति। आणिक आपुले आशीर्वाद निश्चिती। अन्यथा निष्फल होतील जगती। आमुच़े यत्न संपूर्णतः''।।१०७।। ऐकता

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

वदती पिताश्री मोहन। ''तुझा निश्चय ज़री असेल गहन। सर्वस्वी चिंतामुक्त होवून। प्रस्थान करी निवृत्ती पथावरी॥१०८॥ परंतु पुनश्च एकदा करी विचार। घेवू नको कधी माघार। कष्ट ज़री आले अपार। डगमगू नको जीवनी॥१०९॥ निश्चिंत होवूनी ज़ाई बाळा। भेटू आम्ही तुज़सी वेळोवेळा। तूझ्या आनंदात आमुचा सगळा। आनंद वसे जीवनी''॥११०॥ मातापित्याचा शुभाशिष घेवूनी। चेन्नईसी स्वामी परिज्ञानाश्रमांची भेट घेवूनी। तयांचा आशीर्वाद प्राप्त करूनी। निघाले थेट माऊंट अबू आश्रमी॥१११॥ सुरु ज़ाहले आश्रमात अध्ययन। गीर्वाण-श्लोक-स्तोत्रांचे पठण। मनन चिंतन जप ध्यान। प्राणायाम व्यायाम योगासने॥११२॥ शास्त्रोक्त पूजनाची आवड उत्तुंग। विमर्शात होती आवडीने दंग। स्वाध्यायात शास्त्रीय विविध तरंग। उमटती सहजी वक्तव्यातूनी॥११३॥ साधनेने घेतला जीवनी वेग। त्यात गुरुकृपेचा दिव्य संयोग। निदिध्यासन होवू लागले अभंग। आत्मविश्वास द्विगुणित ज़ाहला॥११४॥ एकदा श्रीईश्वरानंद गिरींसी प्रश्न सम्यक। माता सुधा विचारी एक। ''या कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यासी अध्यात्माची भूक। उपज़ली अंतरी केवी रित्या''॥११५॥ तिज़सी वदती स्वामी ईश्वरानंद गिरी। ''पूर्वजन्मीच्या सुकृताची किमया सारी। त्यास्तव उद्‌भवली जिज्ञासा अंतरी। अध्यात्माची गोडी अवीट निश्चये''॥११६॥ स्वामी सद्योजातांनी जोधपूरच्या दवे शास्त्रींकडूनी। प्रारम्भिक गीर्वाण व्याकरण शिकूनी। सखोल शास्त्राभ्यासाची इच्छा धरूनी। प्रार्थिले स्वामी ईश्वरानंद गिरींसी प्रेमे॥११७॥ ''अध्ययन योगशास्त्र, वेदान्ताचे। व्याकरण संपूर्ण गीर्वाण भाषेचे। तर्क, न्याय आदि विषयांचे। पठण इच्छितो मी''॥११८॥ तेधवा वदती श्रीईश्वरानंद गिरी। ''स्वामी

गणेशानंदाचार्य असती हरिद्वारी। तयांचे मार्गदर्शन घ्यावे सत्वरी। काही काळ हरिद्वार आश्रमांत राहूनी॥११९॥ ते सात्त्विक महामंडलेश्वर ज्ञानी पुनीत। संस्कृत शास्त्रांत पूर्ण पारंगत। सुयोग्य प्रशिक्षण देतील समस्त। तुज़ बाळा निश्चये॥१२०॥ तदनंतर ज़ावे ऋषीकेश कैलासाश्रमी। तेथे महामंडलेश्वर विद्यानंदाचार्य स्वामी। स्वयेंची परिचय करवू आम्ही। आमुच्या बडे गुरुजींचा॥१२१॥ बडे गुरुजी विद्यानंदाचार्य महान। परमज्ञानी गीर्वाण भाषा प्रवीण। सर्व शंकांचे करितील निरसन। तेथे करावा तू शास्त्राभ्यास॥१२२॥ अपेक्षित अध्ययन पूर्ण होताक्षणी। यावे माऊंट अबूसी परतोनी। अध्ययनकाळी ध्यान अनुष्ठानी। खंड नच पडू द्यावा''॥१२३॥ स्वामींच्या मार्गदर्शनापरी केले प्रस्थान। हरिद्वार ऋषीकेशी वाराणसीत घेती शिक्षण। शास्त्रांचे करूनी यथोचित अध्ययन। परतले माऊंट अबू आश्रमी॥१२४॥ अनुभवाविण शास्त्राभ्यास अपूर्ण। शिष्यासी सर्वार्थे करण्या परिपूर्ण। ज़बाबदारी घेतो जी महत्त्वपूर्ण। स्वयें सद्गुरु निरपेक्षपणे॥१२५॥ स्वामी सद्योजातांसी गुरुचरणी भक्ति प्रचंड। तेणे गुरुकृपा ज़ाहली उदंड। ज्ञानासी अनुभवाची ज़ोड अखंड। लाभली संन्यस्त जीवनांतरी॥१२६॥ एकदा चेन्नईस पूज्य ईश्वरानंद गिरीं समवेत। मार्गी चालत असता स्वामी सद्योजात। विलक्षण अनुभव लाभला प्रत्यक्षात। त्याविषयी परिसा सज्जनहो॥१२७॥ स्वामी ईश्वरानंद गिरी ज़े वदती। तयाची मिळे प्रत्यक्ष अनुभूति। दृष्टोत्पत्तीस तैसी वस्तुस्थिति। अकस्मात येई जीवनी॥१२८॥ संविद्-साधना चालली दैनंदिन। संविद्-प्रचार कार्य चालले ग्रामोग्रामातून। आनंद विभूषित होई मन। सत्कार्य करिता जगांतरी॥१२९॥ आता परिसा पुढील कथन। स्वामी परिज्ञानाश्रमांचे

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकरसद्गुरु

होता महानिर्वाण। मनोमनी अनुतापित ज़ाहले जन। सद्गुरुंचे महत्त्व कळू लागले॥१३०॥ मठाचा न कोणी उत्तराधिकारी। मठाधिपत्याचा सद्गुरुची अधिकारी। सरकार सूत्रे घेईल सारी। ऐसी चिंता वाटे कार्यकर्त्यांसी॥१३१॥ तृतीय परिज्ञानाश्रमांनी पूर्वी घेतला निर्णय। अलिखित तरीही महत्त्वपूर्ण अनिवार्य। शिष्य म्हणुनी संन्यासदीक्षा देण्याचे कार्य। करण्या शिष्याचे वय असावे किमान अठरा वर्षे॥१३२॥ जन प्रार्थिती भवानीशंकरा। सद्गुरुरूपे आम्हा तारा। अपराध आम्ही केला खरा। क्षमा करी बा अनंता॥१३३॥ जन करीती भजन पूजन। हितचिंतकांनी पुढाकार घेवून। गायत्री पुरश्चरणाचा संकल्प पावन। केला दृढ निश्चये॥१३४॥ स्वामी सद्योजात आले दृष्टिपथात। त्याचे कारण कथिले पूर्वी ग्रंथात। स्वामी ईश्वरानंद गिरींसी सतत। प्रार्थिती शिष्य देण्या कारणे॥१३५॥ पूज्य ईश्वरानंद गिरी वदती कार्यकर्त्यांसी। आमुचा शिष्य हवा समाजासी। ऐसे ज़री वाटे सारस्वतांसी। तरी आम्ही विचार करु॥१३६॥ प्रथम शास्त्राधारे घ्यावी संमति। शृंगेरी शंकराचार्यांची अनुमति। सद्योजातांची असावी पूर्ण स्वीकृति। मठाधिपत्य स्वीकारण्यार्थ पूर्णत्वे॥१३७॥ पट्टाभिषेकाच्या कैक वर्षांपूर्वीची घटना। थोरामोठ्यांचे आशिष फळले स्वामींना। एका वृद्ध स्त्रीचे उद्गार सत्य ज़ाणा। प्रत्यक्षात साकार ज़ाहले॥१३८॥ स्वामी परिज्ञानाश्रमांच्या जयंतीस देख। एकत्र ज़मुनी काही भाविक। भजन करिती भक्तिभावे सुरेख। बेंगळूरु शहरी पहा॥१३९॥ एकदा स्वामी सद्योजात असता बेंगळूरू शहरी। जयंतीस करूनी सर्व तयारी। स्वामींस आमंत्रिले प्रेमाने स्वगृहांतरी। एका वृद्ध महिलेने एकोणिसशे शहाण्णव साली॥१४०॥ गृही येता म्हणे महिला ज्येष्ठ। भविष्यकाळी चित्रापुर मठाधिपति

श्रेष्ठ। व्हाल तुम्ही ऐसा विश्वास घनिष्ठ। वसे माझ्या अंतरी॥१४१॥ पाकीटात काही दक्षिणा ठेवूनी। म्हणे ती वृद्धा स्वामींसी झणी। ही समज़ावी दक्षिणा नागरकट्टीवंशजांकडूनी। म्हणूनी हात स्वामींच्या शिरी ठेविला॥१४२॥ ज़णू ईश्वराच़ाच़ शुभ संकेत। लाभला वृद्ध-स्त्रीमुखातूनी निश्चित। ज़ो सत्य ज़ाहला प्रत्यक्षात। स्वामी सद्योजात होता मठाधिपति॥१४३॥ आता अवधारा पुढील कथन। कार्यकर्ते करिती शिकस्त पूर्ण। आपापुले मतभेद विसरून। यत्न करिती मठाधिपति शोधनार्थ॥१४४॥ जुळविल्या अनेक ब्रह्मचार्यांच्या पत्रिका। परंतु राजसंन्यासयोग न सापडे देखा। पाहता स्वामी सद्योजातांची जन्मपत्रिका। गवसला राजसंन्यासयोग पत्रिकेंतरी॥१४५॥ स्वामी सद्योजातांची पत्रिका ठरली उत्कृष्ठ। तेणे सुखावले कार्यकर्ते वरिष्ठ। मठाधिपति पदासी निवडण्या श्रेष्ठ। एकमुखाने निर्णय ज़ाहला॥१४६॥ वारंवार कार्यकर्ते आश्रमी येती। सद्योजात स्वामींसी भेटण्या यत्न करिती। स्वामी सद्योजात कार्यकर्त्यांसी टाळती। सर्वही परतती नैराश्याने॥१४७॥ एकदा स्वामी ईश्वरानंद गिरी वदले। ''जनोद्धार ब्रीद जीवनाचे आपुले। कार्यकर्त्यांच्या चिंतेच़े कारण वहिले। ऐकूनी घेई बाळा शांतचित्ते॥१४८॥ त्यावरी निरंतर करी विचार। परमार्थ संन्यासी जीवनाच़ा आधार। हृदयी पटेल तो करी निर्धार। अंतिम निर्णय सांग तयांसी''॥१४९॥ एके दिनी करीत असता अनुष्ठान। दृढ विचार स्फुरला गहन। हा नशिबाच़ा कौल मानावा पावन। वा गुरुपरंपरेच़ा प्रसाद बरवा॥१५०॥ मठाधिपत्याच़ा करण्या स्वीकार। स्वामी सद्योजातांनी दिधला होकार। स्वामी ईश्वरानंद गिरींच़े मन थोर। अनुमति दिली प्रेमभरे॥१५१॥ या आनंदी वार्तेसह अपूर्व चतुःषष्ठ्यध्याय संपविला सर्व।

पुढील अध्यायात नूतन पर्व। सांगू सद्योजात शंकराश्रम स्वामींचे॥ १५२॥ सद्गुरु परिज्ञानाश्रम चरणी वंदन। स्वामी ईश्वरानंद गिरींसी करुनी नमन। स्वामी सद्योजात शंकराश्रम चरणी पावन। समर्पिला चतुःषष्ट्यध्याय भक्तिभावे॥१५३॥ ॥अध्याय ६४॥ ॥ओंव्या १५३॥ ॥ ॐ तत् सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥

॥ इति चतुःषष्ट्यध्यायः समाप्तः॥

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

।। श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीकुलदेवतायै नमः। श्रीगुरुभ्योः नमः।।१।। सद्गुरु परिज्ञानाश्रमांसी अखंड दंडवत। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमपदी प्रणिपात। गुरुपरंपरेसी केली प्रार्थना मनांत। शुभाशिष द्यावा आम्हासी।।२।। स्वामी सद्योजात शंकराश्रम चरणी मागणे। तुमचे चरित्र तुम्हीच लिहीणे। मजसी केवळ निमित्त करणे। हेंची गाऱ्हाणे तव चरणी।।३।। माझिया कडूनी करवूनी लेखन। तुम्हीच करावे चरित्र कथन। तुमचे तुम्हीच साक्षी राहून। अक्षरे गिरवा मम हस्ते।।४।। ज्ञानाचा वाहू द्या झरा। शब्द सुचू द्या भराभरा। चैतन्यरूपी गार वारा। मुक्त वाहू द्या आसमंती।।५।। जे जे भाविक वाचती चरित्र। त्यांवरी धरावे कृपाछत्र। गुरुभक्ति स्रोत वाहू द्या पवित्र। भक्तांचिया हृदय मंदिरी।।६।। मनीचे गळूनी सारे किल्मिष। चित्तात जागू द्या नवोन्मेष। हृदयी अनुभवू द्या परितोष। क्लेश दूर होवू द्या सारे।।७।। गुरुपरंपरेसी असे माझी प्रार्थना। पूर्ण होवू द्या सद्गुरु कामना। विकल्प रहित होवूनी जनांच्या भावना। एकसंघ व्हावा सारस्वत समाज।।८।। तुम्हासी नसे बा काही कठीण। आम्ही आलो तुम्हासी शरण। शत्रुबुद्धि सरु द्या जनमनातून। मांगल्य नांदू द्या घरोघरी।।९।। इतुके गुरुचरणी मागणे मागून। आरंभिन आता चरित्र लेखन। आता परिसा पुढील कथन। आणिक पट्टाभिषेक सोहळा वर्णन।।१०।। सद्गुरु ईश्वरानंद गिरींनी देता अनुमति। स्वामी सद्योजातांनी देता संमति। पुढील योजनेसी देण्या गति। कार्यकर्ते सज्ज जाहले।।११।। खास महासभा बोलावूनी मुंबापुरीत। प्रतिनिधींसी कथिली योजना समस्त। संमति घेवूनी कागदोपत्रात। लेखी प्रस्ताव मांडियला।।१२।। संकल्पानुसार अंतिम गायत्री पुरश्चरण। मल्लापूर ग्रामी जाहले संपूर्ण।

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

तेथूनी गाठूनी ग्राम गोकर्ण। प्रार्थना केली समाधिसन्मुख॥१३॥ आद्य परिज्ञानाश्रम समाधि संन्निध। ज़मले सारस्वत जन सुविद्य। प्रार्थना करिताच़ ज़ाहला प्रसाद। अनुमति रूपे ज़ाणा॥१४॥ प्रतिनिधींनी घेतला सर्वसंमत निर्णय। पट्टाभिषेकाच़े शीघ्र करण्या कार्य। या सत्कार्यार्थ करण्या सहकार्य। आवाहन केले जनांसी॥१५॥ स्वामींसी येण्या गिरी परंपरेतूनी। आश्रम परंपरेत येण्या झ़णी। काही शास्त्रोक्त आक्षेप उद्भवूनी। कार्यकर्ते सचिन्त्य ज़ाहले॥१६॥ अन्य परंपरेच्या दंडधारणार्थ। शास्त्रोक्त विधि करावा भावे निस्वार्थ। ऐसे लेखी विधान सार्थ। शास्त्रांत कथियले ज़ाणा॥१७॥ धार्मिक संचलन व्हावे शुद्ध। अनुशासन असावे शिस्तबद्ध। म्हणूनी नियम काही च़ाकोरीबद्ध। लिहीयले आद्य शंकराचार्यांनी॥१८॥ दिधला चारी मठांच्या शंकराचार्यांसी। अधिकार सर्वस्वी निर्णय घेण्यासी। संप्रदाय बदलण्या अनुमति देण्यासी। संन्याशाच़े तपसामर्थ्य पाहूनी॥१९॥ यतीच़े ज्ञान तपोबल सर्वस्वी ज़ाणावे। शास्त्राधिकार ध्येय समजूनी घ्यावे। मठाधिपति शंकराचार्यांच़े कर्तव्य बरवे। संमतिपत्र देण्यापूर्वी पहा॥२०॥ शृंगेरी मठाची अनुमति अनिवार्य। करण्या पट्टाभिषेकाच़े कार्य। कार्यकर्त्यांनी केले आवश्यक कार्य। स्वामी सद्योजातांची भेट घडविली॥२१॥ भेटीत विस्मित ज़ाहले शंकराचार्य। तेजस्वी मुखचर्या वाक्चातुर्य। गुरुंप्रति निष्ठा अतुल्य धैर्य। आणिक गीर्वाण शास्त्राध्ययन परिपक्वता॥२२॥ प्रसन्नतेने श्रीशंकराचार्य कार्यकर्त्यांसी वदती। ''पट्टाभिषेकासी देऊ ज़रूर संमति। स्वयें उपस्थित राहू निश्चिती। निर्भयतेने करावे पुढील कार्य॥२३॥ परंतु दंडधारण-दीक्षा कामी। त्या संप्रदायाच़ा असावा स्वामी। ऐसा शास्त्राधारित नियम नेहमी। वसे पहा प्रचलित॥२४॥ त्यास्तव

आश्रम परंपरेशी संलग्न। संन्याशाच्या हस्ते दीक्षा देवून। प्रारंभापासूनी उपस्थित तेथे राहून। दंडधारण विधि पूर्णत्वे न्यावा॥२५॥ कार्यकर्त्यांनी हेब्बूर ग्रामी ज़ावूनी। टुमकूर कोदंडाश्रमांच्या स्वामींसी वंदूनी। श्रीनारायणाश्रमांसी कार्यकर्त्यांनी केली विनवणी। श्रीवल्लीग्रामी येण्या कारणे॥२६॥ येण्याचे कारण कथिले सविस्तर। आणिक गुरुपंरपरेविषयी संक्षिप्त सुंदर। नारायणाश्रमांनी मान्य केले सत्वर। कार्यकर्त्यांचे निमंत्रण आनंदाने॥२७॥ सद्गुरु ईश्वरानंद गिरींसी साष्टांगे वंदून। स्वामी सद्योजात निघाले माऊंट अबूहून। द्रवले सहपाठ्यांचे नयन। सात्त्विक अश्रूंनी परिपूर्ण॥२८॥ स्वामी ईश्वरानंद गिरींनी दिधला प्रसाद। एक पावन शिवलिंग विशुद्ध। आणिक रुपेरी विग्रह प्रबुद्ध। आद्य शंकराचार्यांचा ॥२९॥ सद्गुरु ईश्वरानंद गिरी वदती प्रेमाने। बाळा शिवलिंगाचे पूजन करी नेमाने। हे शिवलिंग तुझे रक्षण करील सर्वार्थाने। दक्षिणामूर्तीची कृपा होईल जीवनी॥३०॥ सद्गुरुंच्या हस्ते लाभता प्रसाद। सरला मनीचा विरह विषाद। कृतज्ञतेचा अवीट आनंद। प्रगटला हृदयांतरी॥३१॥ अगोचर अज्ञात भविष्यकाळ। नावापुरता परिचित समाज केवळ। तशांत भूतकाळाच्या घटनांचा घोळ। मठाचे स्पष्ट चित्र नच उमगे॥३२॥ घेण्या दश-सद्गुरुंचे शुभाशिष पावन। आणिक घेण्या समाधि-दर्शन। कार्यकर्त्यांनी करूनी योग्य नियंत्रण। सर्वत्र दर्शन घडविले॥३३॥ गोकर्ण, मल्लापूर, श्रीवल्ली-मठांत,। मंगळूर, कार्ला समाधिमठांत,। कोल्लूर-मुकाम्बिका, विठ्ठल-अनंतेश्वर मंदिरात। गोमांतकात कुलदेव-दर्शनार्थ॥३४॥ ऐशापरी श्रीवल्लीत ज़ाहले आगमन। उगवला पट्टाभिषेकाचा सुदिन। सजग ज़ाहले स्वामींचे अंतर्मन। पूर्ण ज़बाबदारी घेण्या कारणे॥३५॥ माघ वद्य पंचमी बृहस्पतीवार। स्वाती

नक्षत्र धात्र संवत्सर। शके एकोणिसशे सत्तावीस शुभंकर। सन एकोणिसशे सत्याण्णव॥३६॥ सत्तावीस दिनांक मास फेब्रुवारी। सारस्वतांसी निरोप धाडीला सत्वरी। अल्प दिवसात सुव्यवस्था सारी। केली कार्यकर्त्यांनी अत्युत्तम॥३७॥ ज़मले सहस्त्रावधी जन भाविक। नेटाने कार्य करिती स्वयंसेवक। स्वामींची मुखचर्या पाहूनी थक्क। होती दर्शक भक्तजन॥३८॥ तेजःपुंज सुस्वरूप मुख। तारुण्य तत्परता बुद्धि तल्लख। कर्तव्यदक्षतेची ज़ाणीव प्रामाणिक। व्यक्तिमत्वात सहिष्णुता बहरली॥३९॥ आता संक्षिप्तरूपे सांगू सकळां। पट्टाभिषेकाचा अपूर्व सोहळा। नयनरम्य दिव्यत्वे आगळा। पर्वणी अपूर्व दर्शकांसी॥४०॥ भल्या पहाटे ज़ाहला घंटानाद। सुप्रभात स्तोत्र देई आल्हाद। सनई चौघड्यांचा भव्य निनाद। शंख किंकिणीचाही पहा॥४१॥ पुष्प तोरणांनी सज़विले महाद्वार। यज्ञवेदिकेवरी रंगवल्लिका सुंदर। रंगबिरंगी फुलांची आरास मनोहर। सुगंध दरवळला चोहीकडे॥४२॥ अगरबत्तींचा मोहक सुवास। आरतीची सज़ावट खास। सुश्राव्य ध्वनीने मंत्र सुमनांस। वैदिकांनी न्याय दिला पहा॥४३॥ दंडधारणार्थ शास्त्रोक्त रूपे हवन। विधियुक्त पट्टाभिषेक सोहळा संपूर्ण। स्वामी नारायणाश्रमांनी महावाक्य देवून। दिधले 'सद्योजात शंकराश्रम' नाम॥४४॥ ज़णू गिरीकंदरीचा संन्यासी सद्योजात। 'आश्रम'परंपरेत अवतरला नवोदित। म्हणूनी सद्योजात शंकराश्रम निश्चित। नामाभिधान दिधले पूज्य नारायणाश्रमांनी॥४५॥ श्री सद्योजात शंकराश्रम सूचक नाम। लौकिक-जगतात करण्या काम। श्रीवल्ली-मठ-संस्थान गुरुधाम। मठाधिपति-स्वरूपे राहण्यासी॥४६॥ प्राचीन-नूतन-परंपरेची धारा। संमिश्ररूपे ज़ाहला स्वधर्माचा झरा। हा स्वामी ईश्वरानंद गिरींसी

मानाच़ा मुज़रा। आश्रम-परंपरेसी दंडवत अनंत कोटी॥४७॥ शृंगेरी मठाधिपति देती आशीर्वचन। वदती ''तुम्हा लाभले सद्‌गुरु महान। भक्तिभावे करा त्यांच़ा सन्मान। तुमच्याचि हिताकारणे॥४८॥ मठाची होण्या सर्वांगीण उन्नति। सद्‌गुरु चरणी धरावीभक्ति। सद्‌गुरु तुमच़े समर्थ असती। स्वीकारा तयांसी मनोभावे''॥४९॥ वदती श्रीशंकराचार्य भारती तीर्थ स्वामींगल। ''मठात असावे श्रीयंत्र निर्मल। श्रीयंत्राने घडे सदा सुमंगल। अमांगल्य निरसे समूळतः''॥५०॥ स्वामी नारायणाश्रम सांगती आशीर्वचनात। ''आदि शंकराचार्य ज़ाहले समाधिस्थ। वयाच्या बत्तीसाव्या वर्षी खचित। हे सर्वश्रुत सत्य असे॥५१॥ स्वामी सद्योजात शंकराश्रम पावन। यांच़े ही ज़ाहले गुरुरूपे पदार्पण। बत्तीसाव्या वर्षीच़ परिपूर्ण। हा योगायोग अलौकिक ज़ाणा॥५२॥ ज़णू शंकराचार्यची अवतरले भूवर। करण्या आपुल्या भक्तांच़ा उद्धार। तेवींच़ सनातन-धर्मप्रचार। ऐसे भासतसे मज़सी''॥५३॥ सायंकाळी ज़ाहला दिग्विजय सोहळा। स्वामींच़ा सत्कार समारंभ आगळा। मिरवणूकीत जनांच़ा तांडा मोकळा। निघाला जयजयकार जल्लोषात॥५४॥ आता परिसा पुढील वर्तमान। स्वामींनी आरंभिले समाज-प्रबोधन। गुरुभक्ति-महिमा आशीर्वचनातून। समज़ाविण्या आरंभ केला॥५५॥ गुरुशक्तीची महिमा सांगण्या कामी। सदा तत्पर राहती स्वामी। स्वामींच़ा उपक्रम ठरला विक्रमी। परिसा स्वामींच़े विचार व्यापकत्वे॥५६॥ ''जीवनी संकटांच़ा होता भडीमार। गुरुशक्तीच़ करी त्यातूनी पार। अचिन्त्य शक्ति देवूनी आधार। भक्त-रक्षण करी सन्मार्गावरी॥५७॥ गुरुचरणी जेधवा ज़ाल शरण। श्रद्धा, भक्ति, निष्ठा ज़पावी पूर्ण। गुरु निःसंशय करील मार्गदर्शन। परि भय त्यजावे अंतरीच़े॥५८॥

मार्गातील समूळ काढूनी अडथळा। गुरुशक्ति करी मार्ग मोकळा। राजमार्ग प्रदान करी सगळा। परन्तु धैर्य धरावे मानसी॥५९॥ ज़से ज़से गुरुस्मरण होई। गुरुवात्सल्याचा अनुभव येई। ज्यापरी माता हात धरूनी नेई। बालकासी योग्य मार्गावरी॥६०॥ हा गुरुंचाच अनुग्रह ज़ाणा। जन तत्पर ज़ाहले अनुष्ठाना। भजन पूजन जप साधना। नित्य करु लागले॥६१॥ तेणे उद्भवले अद्वितीय चैतन्य। गुरुपदी ज़डू लागली भक्ति अनन्य। सद्गुरुंविषयी आदर असामान्य। स्फुरु लागला समाजात॥६२॥ गुरुभक्ति असावी पर्वतापरी निश्चल। अथांग सागरापरी गंभीर सखोल। ध्रुव ताऱ्यापरी उत्तुंग अढळ। खंबीर निष्ठा असावी चित्तांतरी॥६३॥ गुरुसंकल्प असो कितीही कठीण। तो यशस्वी करण्या संपूर्ण। गुरुभक्तिच कार्य महत्त्वपूर्ण। करी मानवी जीवनांतरी॥६४॥ गुरुसंकल्पात असावी तीव्रशक्ति। भक्तांनी हृदयी ज़पावी दृढ भक्ति। पर्वतांसही आंदोलित करण्याची शक्ति। सहज़ उद्भवे संकल्पपूर्तीस्तव''॥६५॥ स्वामी सद्योजात शंकराश्रम वदती। ''सद्गुरुकृपेची घ्या हो प्रचिती। सद्गुरुंशी अनुसंधान साधा चित्ती। विलक्षण सामर्थ्य गवसेल पहा॥६६॥ गुरुचरण असंख्य शक्तींचे भांडार। ध्यानात चित्ति व्हावे निर्विकार। साधनेने ढळती सर्व विकार। कैवल्य अनुभवाची प्रचिती येई॥६७॥ सत्संगाने उमज़े गुरुंचे ऐश्वर्य। प्रासादिकरूपे गुरु करी कार्य। शक्ति शाम्भव समावेश सत्कार्य। गुरुशक्तिच करी निरंतर॥६८॥ ही गुरुकृपाच निश्चये जगती। युवा-जनांत ज़ाहली उन्नती। स्वाभिमानाने सर्व कर्तव्य करिती। संयमित होवूनी उत्साहे॥६९॥ अहंरूपी जो अहंकारू। त्याचाही आधार असे सद्गुरु। म्हणूनी गुरुचरणी अर्पावा अहंकारू। अन्यथा ते गर्वरूपी विष होई॥७०॥

समर्पणातही वसे सूक्ष्म अहंकार। तयाचे होई विषात रूपांतर। गुरुशक्तीचे सामर्थ्य असे भयंकर। जे विषही पचवी सहज़तया॥७१॥ विष प्राशूनही ज़ाहला अमर। तो नीलकंठ भवानीपति शंकर। ज़री सद्गुरुचि सर्वांचा आधार। अहंकार गुरुठायी वसेल कैसे॥७२॥ गुरु निःसंशय शुद्ध परब्रह्म। सगुणरुपे करी मार्गदर्शन। सर्व गुण-वैगुण्यासहित स्वीकारून। भक्तोद्धार करी केवळ सद्गुरु॥७३॥ परब्रह्म साक्षी केवळ। आत्मस्वरूपे गवसे गुरुतत्वची निर्मळ। कल्मष निर्मूलनाची कला सकळ। सद्गुरुरूपे परब्रह्मची देई॥७४॥ गुरुशक्ति करी तमोगुणांचे हनन। मंगलमय करी जीवन। व्यवसायात यश लाभून। उत्कर्ष होई शिष्याचा॥७५॥ गुरु-उपदेशाचे करावे श्रवण स्मरण। तेणे आंतरिक कोलाहल शांत होवून। प्रकाशित होई अंतःकरण। तमोहनन होवूनिया॥७६॥ ऐसी ही शक्ति दैदिप्यमान। गुरुंचीच हे स्वयें ज़ाणून। स्वानुभवे नतमस्तक होई मन। उत्तम साधकाचे कृतज्ञतेने''॥७७॥ ऐशिया विविध शब्दांनी सालंकृत। गुरुमहिमा वर्णिला स्वामींनी निश्चित। याचा विलक्षण सुपरिणाम अपेक्षित। ज़ाहला जनमानसावरी॥७८॥ स्वामींनी ठेविले जनांसमक्ष। पादपूजे विषयी आदर्श लक्ष्य। गुरुपादुकांचे पूजन करण्या प्रत्यक्ष। रिवाज़ नवीन मांडियला॥७९॥ स्वयें नच स्वीकारिता पादपूजन। गुरुपादुका पूजनार्थ दिले प्रोत्साहन। स्वामींच्या विनम्रतेचे हे लक्षण। कृतज्ञता सद्गुरुंप्रति ज़ाणा॥८०॥ मंत्रदीक्षेने केले जनांसी पुनीत। नित्य जप करण्या उत्तेजित। भक्तांचे सुखदुःख ज़ाणूनी नियमित। शंकानिरसन करिती सप्रेमे॥८१॥ पट्टाभिषेका अनन्तर ज़ाहली भेट। पुट्टपर्ती श्रीसत्यसांईबाबांची वरिष्ठ। तयांनी भेषजेश्वर नीललिंग श्रेष्ठ। दिधले स्वामी सद्योजात शंकराश्रमांसी॥८२॥ सद्गुरु अंतर्जगताचा चक्रवर्ती।

सर्वांसी समत्वे पाहे जगती। सद्गुरुंसी नातीगोती नसती। लक्ष्य तयांचे भक्तोद्धार पहा॥८३॥ याविषयी सत्य घटना एक। सांगू आता जनांसी सुरेख। विश्वंभर गुरुशक्तीची लीला व्यापक। त्याविषयी परिसा सज्जनहो॥८४॥ स्वामी सद्योजातांची मावशी भाविक। अंतरीची भावुक मनाने सात्त्विक। तिने मांडियला प्रश्न एक। स्वामी सद्योजात शंकराश्रमांसी॥८५॥ ''सारस्वतांचे तुम्ही ज़ाहलात गुरु। जनांनीही केला तुमचा स्वीकारु। गुरुरूपांत मी कोणांसी स्मरू। शरण ज़ाऊ कोणासी॥८६॥ बाल्यापासूनी तुमचे केले कौतुक। भाचा म्हणूनीच पाहिले सुरेख। सद्गुरु म्हणूनी स्वीकारण्या देख। माझे मन नच मानी॥८७॥ आता सांगा मज़सी उपाय। कोण देईल मज़ला न्याय। मार्गदर्शन करील कोण सदय। सद्गुरु रूपे येवूनी''॥८८॥ स्वामी राहिले निरूत्तर। आर्द्र हाक ऐकता भक्तीपुरस्सर। तोषले भगवान भवानीशंकर। त्याविषयी सत्य घटना ऐकावी॥८९॥ गृही देव्हाऱ्यासमीप उभी पाही। श्रीपरिज्ञानाश्रम चित्रासन्मुख राही। तुम्ही तरी मज़ सांगा काही। म्हणे अश्रू ढाळिता निरंतर॥९०॥ माझा यात काय दोष। मज़ नच सुटती मोहाचे पाश। श्री सद्योजात शंकराश्रम पूर्ण निर्दोष। परंतु ममत्व राही मम हृदयी॥९१॥ वात्सल्याने पाहिले भाचा म्हणून। गुरुरूपात नच स्वीकारी मन। कोण मज़ सद्गुरुरूपे येवून। तारील या जगांतरी॥९२॥ नयनी वाहती अश्रू घळघळ। हृदयी वाढली अतीव तळमळ। सद्गदित कंठे प्रार्थना निर्मळ। करी देव्हाऱ्यासन्मुख राहूनी उभी॥९३॥ अचानक पुरुषी आवाज़ ऐकला। तिज़ वाटे भास ज़ाहला। कोणीही नव्हते त्या वेळेला। गृहांतरी ज़ाणा तियेच्या॥९४॥ ध्वनी म्हणे त्यावेळी तिज़ला। ''तुझा भाचा मठाधिपति नाही झाला। परि मठाधिपतीने जन्म घेतला।

तुमच्या घरी पहा''॥९५॥ ऐकता तत्क्षणी गळला अभिमान। स्वामी सद्योजात शंकराश्रम माझे गुरु पावन। ऐसा विचार स्फुरला नाविन्यपूर्ण। मन शांत ज़ाहले शीघ्रत्वे॥९६॥ स्वामींची शीघ्र भेट घेतली। स्वामींना घटना सर्व कथिली। स्वामींच्या हृदयीची कृतज्ञता द्रवली। आनंदाश्रू-रूपे त्या समयी॥९७॥ स्वामी वदती आर्द्र-चक्षूंसहित। ही सद्गुरुंची कृपा निश्चित। मावशी म्हणे प्रकाश पडला लखलखीत। मम ज्ञानचक्षूंसमोरी॥९८॥ ममत्वाने झाकले माझे नयन। परि आता शांत ज़ाहले मन। मज़सी करावे मार्गदर्शन। उद्धरावे गुरुरूपे या जीवनी॥९९॥ असो आता पुढील कथन। वैश्यवाणी समाजाचा मठ पावन। हळदीपूर ग्रामात वसे पुरातन। तेथे स्वामींनी मठाधिपति नेमियला॥१००॥ वैश्यवाणी समाजाच्या विनंति अनुसार। स्वामी सद्योजात शंकराश्रम यतीवर। यांनी संन्यास-दीक्षा देवूनी सत्वर। मार्गदर्शन केले शिष्यासी॥१०१॥ वैश्यवाणी समाजातील शिष्य निवडून। महावाक्यासहित संन्यास- दीक्षा देवून। वामनाश्रम देवूनी नामाभिधान। मठाधिपति पदावरी स्थानापन्न केले॥१०२॥ अपरिचितांसीही ज़ाहला मठ परिचित। मठसुबत्ता वर्धिली खचित। जनांचे आवागमनही वाढले निश्चित। सुबुद्ध मठाधिपति लाभता॥१०३॥ स्वामींचा तृतीय उपक्रम पावन। सुरेल भजन, शास्त्रोक्त पूजन। स्वयें जनांसमक्ष पूजन करुन। जनांसीही शिकविती नेमाने॥१०४॥ सोमवासरी सामुहिक शिवपूजन। बृहस्पतीवारी सामुहिक गुरुपूजन। शुक्रवारी देवीपूजन। स्वामी सद्योजात शंकराश्रम करिती नेमे॥१०५॥ सद्गुरु ईश्वरानंद गिरींनी दिलेली भेट। पवित्र शिवलिंग पूजिती नीट। सद्गुरुंचा कृपा-प्रसाद श्रेष्ठ। वसे शिवलिंगाठायी॥१०६॥ स्वामी स्वयें पूजन शिकविती। पूजनाची उद्भवली जनांत प्रीति। वारंवार पूजनाने मनीं भक्ति। दृढावली

सहज़तया॥१०७॥ शास्त्रोक्त पूजन ज्ञात होता। अर्थपूर्वक मंत्र जपता। प्रयत्नांती लाभे चित्ती एकाग्रता। तनमनासी आल्हाद पाही॥१०८॥ मूर्तिपूजन वारंवार करिता। तन्मयतेने चित्त एकाग्र होता। मूर्तरूपात दिव्यत्व अवलोकिता। रहस्य पूजनाचे ज्ञात होई॥१०९॥ न्यास आणिक मुद्रांसहित। पूजनाचे नियम जे प्रचलित। जनांसी समज़ावूनी समस्त। स्वामींनी पूजनार्थ उत्तेजिले॥११०॥ पुरुषांना पारंपारिक गणवेशा सकट। गायत्री जप वा पूजन करण्या थेट। समज़ावूनी तयाचे प्रयोजन नीट। स्वामींनी आज्ञापिले जनांसी॥१११॥ शुद्ध शुभ्र वस्त्र नेसता। वा रेशमी सोवळे वस्त्र वेष्टिता। आसमंतीच्या सकारात्मक शुद्धअणूंचे प्रत्यक्षतः। आकर्षण होई देहाठायी॥११२॥ जरी हे सत्य भासे अगोचर। तयाची घनता वसे आसमंती दृढतर। सकारात्मक अणूंचा दिव्य संकर। प्रवेशे श्वासातूनी देहांतरी॥११३॥ सहज़तेने होई शिस्तपालन। कर्तव्यदक्षता राही परिपूर्ण। प्रसन्नतेचे निर्मळ वातावरण। सहजी उद्भवे धार्मिक कार्यांतरी॥११४॥ याचीकारणे सर्व धर्मांत। शुद्धतेसी महत्त्व दिले अपरिमित। पूजन-जपापूर्वी विशुद्ध स्नान नियमित। कथियले वैदिक शास्त्रांतरी॥११५॥ स्वामींचा चतुर्थ महत्त्वपूर्ण उपक्रम। गुरुज्योतिपदयात्रा परम सुगम। त्याविषयी वर्णन करू उत्तम। पुढील अध्यायी सद्गुरुकृपे॥११६॥ स्वामी सद्योजात शंकराश्रम जगजेठी। सारस्वतांच्या अक्षम्य गुरुद्रोहापोटी। जनांना प्रायश्चित्त घेण्यासाठी। आवाहन करिती निधरि॥११७॥ हा गुरुभक्ति-नाम अध्याय। समर्पिला सद्गुरुचरणी निरामय। स्मरुनी विश्वंभर गुरुशक्तीसी अक्षय। पूर्ण केला पञ्चषष्ठ्यध्याय पवित्र॥११८॥ ॥ अध्याय ६५॥ ॥ओंव्या ११८॥ ॥ ॐ तत्सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥॥ इति पञ्चषष्ठ्यध्यायः समाप्तः॥

श्रीगुरुज्योति यात्रा, त्रिशति वर्ष २००८

श्रीगुरुपादुकासन्निधि (चित्रापुर मठ)

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीकुलदेवतायै नमः। श्रीगुरुभ्योः नमः॥१॥ सज्जनहो अवधारा पुढील वर्तमान। भजन पूजनी लागले जन। आवडीने करिती गुरुपादुका पूजन। गुरुपदी ज़डला विश्वास पहा॥२॥ स्वामींच्या मनांत राहिली खंत। स्वामी परिज्ञानाश्रमांच्या कार्ला समाधिमठात। आक्षेप घेती काही विश्वस्त। स्वामींनी पूजा करण्या कारणे॥३॥ सद्गुरुंना असे समाधि-पूजनाचा हक्क। तेवीच मूलभूत कर्तव्य एक। त्याकारणे वसे मनी रूखरूख। श्रीसद्योजात स्वामींच्या॥४॥ तेणे स्वामींस ज़ाहला मनस्ताप। तशात मठाधिपत्याचा व्याप। हृदयी दुःख दाटले वारेमाप। परि मूकपणे सोशिती॥५॥ सन दोन हज़ार पाच साली। स्वामी परिज्ञानाश्रमांची कृपा ज़ाहली। बुद्धिमान विश्वस्तात वैचारिक क्रान्ति घडली। तेणे कार्य साधियले॥६॥ सकारात्मक करूनी पूर्ण विचार। बहुतांश विश्वस्तांनी लिहीले सुंदर। बिनापत्र एक सविस्तर। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांसी॥७॥ स्वामींसंगे करूनी लेखी करार। प्रत्यक्ष करण्या धार्मिक संस्कार। एकादश मठाधिपति म्हणूनी सर्वाधिकार। दिधले स्वामींसी॥८॥ स्वामींना येण्यासी चातुर्मासार्थ। निमंत्रिले त्या पत्रात सार्थ। सरला वितंडवाद व्यर्थ। बहुतांश रूपे ज़ाणा॥९॥ सन दोन हज़ार सहा साली। चातुर्मासार्थ पातली गुरुमाऊली। स्वामींच्या हस्ते पूजा होवू लागली। नित्यनियमे कार्ला मठांतरी॥१०॥ निर्बंध एक मोकळा ज़ाहला। परंतु कर्तव्यभाग प्रामुख्ये राहिला। स्वामींचा कर्तव्यभाग येथे कसला। त्याविषयी परिसा सज्जनहो॥११॥ स्वामी परिज्ञानाश्रमांवरी लाविले लांछन। चित्रापुर सारस्वतांनी दूषण देवून। तेणे त्यजूनी मठाधिपत्याचा मान। स्वामींनी इच्छामरण साधियले॥१२॥ हा चित्रापुर

सारस्वतांचा प्रमाद। निश्चितरूपे अक्षम्य अपराध। त्यास्तव प्रायश्चित्त घेणे निर्विवाद। अनिवार्य कर्तव्य जनांचे॥१३॥ स्वामी परिज्ञानाश्रमांच्या मातेसी पावन। स्वामी सद्योजातांनी दिले वचन। ''स्वामी परिज्ञानाश्रमांना मानाचे स्थान। देईन श्रीवल्लीसी सन्मानाने''॥१४॥स्वामी परिज्ञानाश्रमांच्या तनमनासी ज़ाहल्या यातना। त्याची प्रत्यक्ष ज़ाण व्हावी जनांना। सांगावे प्रायश्चित्त घेण्या सारस्वतांना। ऐसे चिंतिती स्वामी मानसी॥१५॥ स्वामी सद्योजातांनी शोधिला उपाय। 'गुरुज्योति-पदयात्रा' हाची तरणोपाय। प्रायश्चित्त घेण्याचे धरोनी ध्येय। आयोजन केले पदयात्रेचे॥१६॥गुरुज्योति-पदयात्रेविषयी करू कथन। सज्जनहो आता करावे श्रवण। गोकर्ण ते श्रीवल्ली पथक्रमण। जनांनी पायी केले पहा॥१७॥ सात फेब्रुवारी दोन हज़ार आठ। भक्त ज़मले कार्ला मठात। ज़णू ध्वनीसागराची भव्य लाट। त्यापरी सामुहिक प्रार्थना ज़ाहली॥१८॥ उपासनेच्या जाज्वल्य लहरी। प्रगटल्या संकल्पितांच्या अंतरी। ज़से दिंडी घेवूनी पंढरीचे वारकरी। ज़ाती टाळ-मृदुंगाच्या गजरात॥१९॥ भक्तांनी केले देवी-अनुष्ठान। वैदिकांनी विधीयुक्त गणेशहवन। देवीपूजन करूनी मंगलारती पावन। दाविली स्वामींनी श्रीदुर्गापरमेश्वरीसी॥२०॥ श्रीगणेशासी करूनी वंदन। ग्रामदेवता एकवीरेसी प्रार्थून। पावनहस्ते 'दिव्य-ज्योति' प्रज्वलन। केले पूज्य स्वामींनी॥२१॥ श्रीपरिज्ञानाश्रम-समाधीची पूजा करूनी।गुरुज्योति यात्रेचा संकल्प मांडूनी। प्रज्वलित केली 'ज्ञान-ज्योति' स्वामींनी। साष्टांग दंडवत घातले सद्गुरुंसी॥२२॥ तद् उपरांत ज़ाहले गुरुपादुका-पूजन। स्वामींहस्ते ज़ाहले तीर्थवितरण। घेवूनी स्वादिष्ट प्रसादभोजन। यात्रेसी सिद्ध ज़ाहले जन॥२३॥ मृण्मयीवरील दश पावन सरिता।

गुरुज्योति-पदयात्रेत समाविष्ट होण्या तत्त्वता। ज़णू या गुरुयात्रेच्या संकल्पिता। पातल्या वीस कलशांठायी अंशरूपे॥२४॥ यात्रेच्या आदिपासूनी अंतापर्यंत। शृंगारित- रथासंगे राहूनी खचित। श्रीपरिज्ञानाश्रमांच्या तपाची ग्वाही निश्चित। दिधली या सरितांनी॥२५॥ गंगा, यमुना, सरस्वती,गोदावरी,। नर्मदा, सिंधु, तुंगभद्रा, कावेरी। ब्रह्मपुत्रा विशाल नद्या भारतांतरी। कॅनडातील क्रेडीट नदी ज़ाणा॥२६॥ कॅनडात असता परिज्ञानाश्रम चातुर्मासार्थ। भाद्रपद पौर्णिमेसी सीमोलंघनार्थ। पूजन करूनी भावे निःस्वार्थ। क्रेडीट नदीत केला नौकाविहार॥२७॥ ज़णू फेडण्या स्वामींच़े ऋण। पातली क्रेडीट नदी पावन। आपुल्या भक्तांसंगे येथे येवून। कलशांत बैसली अंशरूपे॥२८॥ ही निसर्गदेवतेची भाषा मौन। नियतीचीच़ अद्‌भुत कृपा गहन। क्रेडीटच़े जल आणण्या कॅनडाहून। प्रेरणा दिली भक्तांसी॥२९॥ कार्ल्याहूनी ज़ाहला गुरुयात्रेच़ा प्रारंभ। संकल्पित भक्त न लाविता विलंब। शिस्तबद्धतेच़ा करूनी अवलंब। आले पुण्यनगरीत वाहनांतूनी॥३०॥ पुण्यनगरीच़ा भव्य पुण्यमय मठ। स्वामी सद्योजातांनी बांधविला विशिष्ठ। पुण्याच्या सारस्वतांनी सहकार्य उत्कृष्ट। दिधले स्वामींसी मनोभावे॥३१॥ स्वामींसह भक्त येता मठात। बालगोपालांनी केले स्वागत। द्विहस्ते धरूनिया दीप प्रज्ज्वलित। जयजयकार केला भक्तांनी॥३२॥ मठ परिसरात झेंडूपुष्पांच़े तोरण। रंगवल्लिकेने सुशोभित आंगण। दुजे दिनी पुण्यातूनी गोमांतकात प्रयाण। गुरुज्योतीसह स्वामींनी केले॥३३॥ पारंपारिक सनईचौघड्याच्या नादात। महांगिरीश-मंदिरात ज़ाहले स्वागत। मंदिराच्या वैदिकांनी भक्तिभावे आदरयुक्त। गुरु-पादुका-पूजन केले॥३४॥ गोवा-गोकर्ण-पथावरी कारवार।

त्याग्रामी वसे श्रीसीताराम-मंदिर। तेथीच्या भक्तांच्या विनंतीपुरस्सर। सर्वांनी घेतली क्षणभर विश्रांति॥३५॥ कारवारहूनी अंकोल्यासी केले प्रस्थान। तेथे श्रीलक्ष्मीनारायण महामाया देवस्थान। गुरुपादुका-पूजनान्ती आशीर्वचन देऊन। स्वामींनी संतोषित केले जनांसी॥३६॥ आगमन होता श्रीगोकर्ण-मठात। वैदिकांनी केले पूर्णकुम्भ-स्वागत। जगातील विविध देशातूनी भक्त। पातले गुरुज्योति यात्रे कारणे॥३७॥ दहा फेब्रुवारीस ज़ाहला जलाभिषेक। कट्टे विनायक मंदिरात सुरेख। साधना-शृंखला संकल्प जागतिक। ज़ाहला पूजना-उपरांत॥३८॥ तीन दिवसांची संकल्पित पदयात्रा। सहर्ष जनांची भरियली जत्रा। स्वामींनी घेवूनी धैर्याचा पवित्रा। उत्साह वर्धिला सकलांचा॥३९॥ साधना-शृंखला अत्यंत महत्त्वपूर्ण। तियेचे स्वामींनी समज़ाविले प्रयोजन। त्या उपक्रमाचे करूनी मार्गदर्शन। नियोजनार्थ आज्ञापिले कार्यकर्त्यांसी॥४०॥ श्रीमहाबळेश्वराच्या पुरातन मंदिरी। स्वामींनी शिवपूजन करुनी सत्वरी। आशीर्वादार्थ याचिले मनांतरी। सर्व समाजाच्यावतीने पहा॥४१॥ बारा फेब्रुवारीस संकल्प महत्त्वाचा। ज़ाहला लक्ष-गायत्रीजपाचा। तद्उपरांत उद्देश गुरुज्योतिपदयात्रेचा। स्वामींनी कथिला जनांसी॥४२॥ ''श्रीभवानीशंकर आणिक गुरुपरंपरेने अखंड। कृपाछत्र धरुनी मार्गदर्शन केले उदंड। आनंदे कृतज्ञता व्यक्त करण्या प्रचंड। गुरुज्योति यात्रेचे पवित्र ध्येय संकल्पिले॥४३॥ गुरुशक्ति-कृपेचा हा मौलिक क्षण। अखिल गुरुपरंपरेसी सन्मानपूर्वक अभिवादन। स्वामी तृतीय परिज्ञानाश्रम-चरणी पावन। हृदयपूर्वक प्रायश्चित्तपूर्ण क्षमायाचना॥४४॥ ही ऐतिहासिक सुवर्णसंधी देवून। गुरुशक्तिच कार्य करवी हे ज़ाणून। करुणामूर्ति परिज्ञानाश्रमांचा गौरव गाण्या

महान। योजिला सामुहिक विनम्र प्रयास गुरुज्योतियात्रेचा''॥४५॥ तदनंतर ज़ाहले भवानीशंकर-पूजन। नित्यापरी समाधीचे पूजन-अर्चन। सन्निधी सन्मुख क्षमायाचना मनापासून। स्वामींनी केली सारस्वत समाजाच्यावतीने॥४६॥ अवधारा स्वामींची प्रार्थना हृदयंगम। भक्ति, निग्रह, निष्ठेचा अपूर्व संगम। विलसे संकल्पपूर्तीस्तव विलक्षण संयम। जेणे चैतन्यात चेतना प्रभावली॥४७॥ ''देवा, समाजाहातूनी ज़ाहला प्रमाद। गुरुद्रोहाचा अक्षम्य अपराध। प्रायश्चित्त घेण्या घालितो साद। आम्ही सारस्वत तुज़सी॥४८॥ विद्रोह करूनी केली चूक । नच राहिली जनांसी अध्यात्माची भूक। गुरुरूपे येण्याचे कारण अचूक। ज़ाणण्या प्रयास नच केला॥४९॥ सद्गुरु परिज्ञानाश्रमांच्या तनमनासी महान। ज़ाहल्या पीडा अतीव गहन। तरीही त्या सर्व करूनी सहन। निमूट राहिले जीवनी॥५०॥ देहाची पीडा व्हावी ज्ञात। मनानेही घ्यावे प्रायश्चित्त। म्हणूनी गुरुज्योति यात्रा ही पुनीत। आयोजित केली भवानीशंकरा॥५१॥ तरी आम्हा देवूनी अभय। माझ्या ब्रह्मीभूत सद्गुरुंसी निरामय। चित्रापुर-श्रीवल्ली-मठात अक्षय। लाभावे चिरंतन स्थान सन्मानाने॥५२॥ माझे सद्गुरु परिज्ञानाश्रम प्रबुद्ध। यांचे इच्छित होवू दे सिद्ध। चित्रापुर सारस्वत समाज सुविद्य। एकत्वाने नांदू दे॥५३॥ सारस्वतांच्या वतीने करितो प्रार्थना। ऐकावी आमुची क्षमायाचना। तनमनाचे धैर्य देई जनांना। गुरुज्योति यात्रा यशस्वी होवू दे''॥५४॥ श्रवणे शरीरी रोमांच उठले। भक्तांच्या नेत्री अश्रू डबडबले। कंठ सद्गदित ज़ाहले। हीच आत्मशक्तीची कृपा ज़ाणा॥५५॥ प्रार्थनेने प्रसन्नतेच्या प्रशांत लहरी। तरंगु लागल्या आसमंतांतरी। धैर्य उपज़ले भक्तहृदयांतरी। चैतन्याचा नवोदित मेघ बरसला॥५६॥ प्रसन्नतेची

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

हळुवार झुळुक। चित्ती देवू लागली सुख। आतुरता मनी होवूनी उत्सुक। टकमक पाही चोहीकडे॥५७॥ दिन उगवला फेब्रुवारी तेरा। वाहू लागला उत्साहाचा वारा। प्रार्थना करण्या कोटीतीर्थावरी सारा। जनसागर ज़णू लोटला॥५८॥ कोटीतीर्थावरी सच्चिदानंद शिवलिंग राही। जागृत लहरींचा तेथे प्रभाव पाही। याची मिळतसे अंतरी ग्वाही। त्या स्थानी ध्यान करिताना॥५९॥ म्हणूनी तृतीय परिज्ञानाश्रमांनी खास। कथिले पूर्वी भक्तजनांस। की ''ज़री तुम्हा गुरुंची आस। तरी करावे ध्यान कोटीतीर्थावरी॥६०॥ प्रार्थना करावी महाबळेश्वरासी निर्मळ। प्राशून तुलसीदल आणिक जल। निश्चये प्रेरणा होईल अंमळ।सद्गुरु-प्राप्तीकारणे''॥६१॥ भक्त, विरोधक, तटस्थ जन। सांप्रतकाळी एकत्र येणे कठीण। म्हणूनी गोकर्ण-समाधीवरी प्रार्थून। प्रसाद घेतला पट्टाभिषेका कारणे॥६२॥ असो आता पुढील कथन। प्रारंभ ज़ाहला गुरुज्योतिपदयात्रेचा पावन। सुशोभित रथ सज्ज ज़ाहला पूर्ण। गुरुज्योति यात्रे कारणे॥६३॥ स्वामी परिज्ञानाश्रमांचे भव्य छायाचित्र। स्वामींनी स्वहस्ते ठेविले पवित्र। विविध पुष्पांची सज़ावट सर्वत्र। रथाच्या सर्वांगी शोभियली॥६४॥ ज़णू श्रीपरिज्ञानाश्रम-तपोबलाची देण्या साक्ष। 'दिव्यज्योति''ज्ञानज्योति'रूपे प्रत्यक्ष। चित्शक्ति, ज्ञानशक्ति होवूनी निरपेक्ष। प्रतिमेच्या दोहीकडे राहिल्या उभ्या॥६५॥ तीर्थोदकांचे पवित्र कलश वीस। प्रतिमेसमोर रथावरी स्थापिले खास। नयनसुख लाभले दर्शकांस। पाहता लखलखीत नक्षीदार कलश॥६६॥ गुरुज्योति यात्रेसी करण्या आरंभ। रथाचा बनूनी आधारस्तंभ। श्रीवल्लीचा 'राम' नामे वृषभ। सज्ज ज़ाहला शृंगारित होवूनी॥६७॥ ज़णू पातला शिवशंकराचा नन्दी। गुरुसेवा करण्या होवूनी आनंदी। मूकभाषेने

परिज्ञानाश्रमांसी वंदी। भवानीशंकर-स्वरूप चिंतूनी॥६८॥ वृषभ 'राम' नसे सामान्य। पूर्वजन्मीचे पुण्य फळले अनन्य। रथसंचलनाचे कर्म असामान्य। लाभले रामासी सद्गुरुकृपे॥६९॥ जयजयकारे नभ दुमदुमले। डोईवरी घेवूनी पादुका चालले। आळीपाळीने धरिती भाविक भले। गुरुपादुका पवित्र परोपरी॥७०॥ सद्गुरु त्रिकाल ज्ञानी खास। यावरी धरा मनी विश्वास। सद्गुरुंचे शब्द न जाती विलयास। पाहू संक्षिप्त इतिहास। या पादुकांचा॥७१॥ या पादुका ठेविण्या शिराली मठात। सन एकोणिसशे सत्याहत्तर सालात। स्वामी परिज्ञानाश्रम असता ऋषीकेश ग्रामात। स्वामींनी आदेशिले बेंगळूर-'सिमा' स्वयंसेवकांसी॥७२॥ बेंगळूरच्या काही भक्तजनांनी। या पवित्र पादुकांस गोकर्ण-मठात आणूनी। स्वामी सद्योजात शंकराश्रमांसी इतिहास झणी। कथिला सन दोन हजार एक साली॥७३॥ पूज्य परिज्ञानाश्रमांसी श्रीवल्ली-मठात मनोहर। सन्मानाने देण्या स्थान निरंतर। योग जुळवूनी कार्य अजरामर। केले स्वामी सद्योजात शंकराश्रमांनी॥७४॥ योग्यसमयी उचितवेळी। सद्गुरुकृपा होते समूळी। गुरुपादुका-स्थापनेचा योग जवळी। प्रवर्तला तीस वर्षाउपरांत॥७५॥ आता सांगू पुढील प्रवास। कौतुके सांगावे तितुके थोडे खास। मनी धरूनिया सेवेची आस। परजातीय भक्तही सहभागी जाहले॥७६॥ 'लागो तुझे पायी ध्यान दयाळा'। भजन परिचित जनांसी सकळा। गुरुज्योतिपदयात्रेचा शुभारंभ सोहळा। जाहला या भक्तिपर भजनाने॥७७॥ पदयात्रा चालली वाजत गाजत। श्रवणीय भजन आणिक नामघोषात। निर्दोष पथक्रमण रथासमवेत। चालले जनांचे संतोषे॥७८॥ संकल्पित, आयोजक, स्वयंसेवक। तीन गट प्रामुख्याने होते सुरेख। व्यवस्थापनाचे

कार्य प्रमुख । बेंगळूर, गोकर्ण सभेने केले मनोभावे॥७९॥ दृष्ट लागावी ऐसे व्यवस्थापन। स्वयंसेवक करिती नियंत्रण। आयोजक स्वयें करिती निरीक्षण। संकल्पितांनी शिस्तपालन केले॥८०॥ वैद्य, परिचारिका औषधांसहित। रुग्णवाहिका आधुनिक उपकरणयुक्त। ॲक्यूप्रेशरचे तज्ञ निष्णात। उपस्थित गुरुज्योति यात्रेंतरी॥८१॥ होमियोपथी औषधे, परिचय-पत्र। शक्तिवर्धक पेय, जल उपलब्ध सर्वत्र। पीत-शीरस्त्राण आणिक माहितीपत्र। आपत्कालीन दूरध्वनी-क्रमांकासह॥८२॥ राजमार्गाच्या दोहीकडे दर्शकांची दाटी। पवित्र गुरुज्योति यात्रा पाहण्यासाठी। स्वयें चालती रथाच्या पाठी। स्वामी सद्योजात शंकराश्रम जनांसंगे॥८३॥ जन पाहती होवूनी उत्सुक। मठाधिपतींचे करिती कौतुक। आदर्श ठेविला जनांसन्मुख। स्वामींनी गुरुभक्ति-निष्ठेचा॥८४॥ उत्साही बाल, तरुण, वृद्ध। सद्भावे येवूनी रथासन्निध। भक्तिभावे अर्पिती आरती विशुद्ध। आणिक फलसमर्पण ग्रामोग्रामी॥८५॥ सुशोभित रथाचा अनुपम थाट। सुगंधी अगरबत्तींचा घमघमाट। ज़शी सागराची भव्य लाट। त्यापरी जनसमुदाय भरियेला॥८६॥ अल्पोपहार ज़ाहला ग्रामी मिरजान। कुमठा ग्रामी प्रसादभोजन। धारेश्वरासी नाश्ता सेवन। रात्रीचा विश्राम हळदीपूर ग्रामी ॥८७॥ यात्रिकांसी लवणयुक्त उष्ण पाणी। आल्हाद वाटावा जीवा म्हणूनी। परिश्रम-परिहारार्थ पाय बुडवूनी। बसण्या सोय ज़ाहली हळदीपूर ग्रामी॥८८॥ हळदीपूरची अनपेक्षित सोय। स्वयंसेवकांचे परिश्रम अतिशय। ज़णू सद्गुरुंनीच दिले अभय। यात्रेकरूंची निष्ठा पाहूनी॥८९॥ रथ येता हळदीपूर ग्रामी। सद्गुरु सद्योजात शंकराश्रम स्वामी। यांनी गुरुपूजन केले त्या धामी। रात्री पोहोचता त्वरित निधरि॥९०॥ दुजे दिनी स्वामी

वामनाश्रम पावन। वैश्यवाणी समाजाचे मठाधिपति महान। यांनी स्वामी सद्योजातांची भेट घेवून। साष्टांग प्रणिपात केला॥९१॥ स्वामी वामनाश्रमांनी यात्रेत सहभागी होवूनी। अल्प-योजनेपर्यंत पथक्रमण करूनी। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांसंगे स्वयें चालूनी। गुरुंच्या गुरुंचाही सन्मान राखिला॥९२॥ गोकर्ण-पर्तगाळी मठाचे स्वामी पावन। पूज्य विद्याधिराज वडेर तीर्थ महान। यांनी राजमार्गावरी स्वतःची गाडी रोखून। भेट घेतली स्वामी सद्योजात शंकराश्रमांची॥९३॥ पूज्य विद्याधिराज वडेर तीर्थांचे थोर मन। की राखिला परस्परांचा सन्मान। स्वामी परिज्ञानाश्रमांविषयीचा आदर पूर्ण। दाविला स्वयें रथासमक्ष येवूनी॥९४॥ राजमार्गावरी शिस्तीत चालले यात्रिक। होन्नावर ग्रामी जाहला नाश्ता रोचक। स्वामींच्या निष्ठेचे करिती कौतुक। यात्रिकांच्या उत्साहाचेही दर्शक सारे॥९५॥ मंकीग्रामी श्रीजनार्दन-मंदिरात। प्रसादभोजन उरकूनी त्वरित। बैलूरग्रामी येता रथ। कलिंगडाचे शरबत दिले ग्रामस्थांनी॥९६॥ मुर्डेश्वर ग्रामी पानकपेय प्राशूनी। चित्रापुर-ग्रामी पोहोचले झणी। श्रीमहामाया-गणपती मंदिरात जावूनी। जमले सर्व यात्रिक॥९७॥ फटाक्यांच्या भव्य निनादात। झगमगत्या दिव्य प्रकाशात। जयजयकाराच्या नामघोषात। रथ प्रवेशला शिरालीग्रामी॥९८॥ रथ महामाया-गणपति मंदिरात आला। चौऱ्याण्णव किलोमीटरचा प्रवास जाहला। उधाण आले जनांच्या उत्साहाला। संकल्पपूर्ति समीप पातली॥९९॥ स्वामींनी रात्री गुरुपूजन करूनी। परिश्रमांस सहजी विस्मृत करूनी। गुरुभक्तिची साक्ष अप्रत्यक्ष देवूनी। प्रत्यक्ष आदर्श ठेविला जनांसमोरी॥१००॥ 'न भूतो न भविष्यति' ऐसा सोहळा। दर्शकांसी अलभ्यलाभ जगावेगळा। यात्रिकांचा अद्वितीय अनुभव

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

आगळा। अविस्मरणीय पदयात्रा जीवनी॥१०१॥ या सोहळ्याचा ऐसा प्रभाव। ज़णू अमृतसिंचन करू लागले देव। अनपेक्षितरित्या हलका वर्षाव। ज़ाहला पर्जन्याचा प्रभातेसी॥१०२॥ पाहूनी अनुपम अद्वितीय सोहळा। देवांनीच आनन्दाश्रूंचा वर्षाव केला। ऐसा भक्तांचा भाव ज़ाहला। भक्त तोषले हृदयांतरी॥१०३॥ पहाटे ज़मले भक्तजन सर्व। आरंभिले गुरुज्योतिपदयात्रेचे अंतिम पर्व। शृंगारित-गजराज एकमेव।ज़णू यात्रेचा प्रतिनिधि ज़ाहला॥१०४॥ श्रीमहामाया-गणपति-मंदिर ते चित्रापुर ग्राम। गजराजापाठी वृषभ राम। डौलाने रथ खेचितसे सप्रेम। ज़णू विजयी विक्रम गाज़विला॥१०५॥ स्वामी चालती रथाच्या पाठी। यात्रिकांची ज़ाहली एकची दाटी। आबालवृद्ध मार्गाच्या काठी। तिष्ठती रथदर्शनार्थ ज़ाणा॥१०६॥ श्रीवल्लीच्या स्त्रिया शृंगारित होवूनी। हाती पूर्णकुम्भ घेवूनी।चित्रापुर महाद्वारी येवूनी। स्वागत करित्या ज़ाहल्या॥१०७॥ घरोघरी लाविले पुष्पांचे तोरण। रांगोळीने सज़विले मुक्त आंगण। प्रत्येक गृहातूनी गृहिणी येवून। फलसमर्पण करिती आनंदे॥१०८॥ श्रीवल्ली-शालेय वाद्यवृंद। विद्यार्थ्यांनी ढोल वाज़विला स्वच्छंद। सुरेल संगीताने श्रोत्यांसी आनंद। दिधला मुलांनी विशेषत्वे॥१०९॥ कृतज्ञतेने शालेय मुलामुलींनी। भगवत्-गीतेचा बारावा अध्याय गावूनी। शब्दांजलि वाहिली सद्गुरुचरणी। अत्यंत समरस होवूनी॥११०॥ अश्वत्थ-चौथऱ्यासमीप येता रथ। वेदघोषे दुमदुमला आसमंत। जनांनी करिता जयघोष उन्मुक्त। मंत्रमुग्ध ज़ाहला परिसर॥१११॥ स्वामी परिज्ञानाश्रमांची पूज्य जननी। शुक्ल-शांतीने उपस्थित राहूनी। उत्सव पाहिला तृप्त नयनांनी। हृदयी तियेच्या शांति स्थिरावली॥११२॥ लोकांनी श्रीपरिज्ञानाश्रमांसी

दुखावल्याची खंत। सलतसे तियेच्या मातृहृदयात। गुरुज्योतिपदयात्रा पाहता संतोषले चित्त। कृतार्थ ज़ाहली जीवनी॥११३॥ स्वामी परिज्ञानाश्रमांसी दिले मानाचे स्थान। श्रीवल्ली-मठात गौरवपूर्ण। हे सत्कार्य अद्भुत विलक्षण। स्वामी सद्योजात शंकराश्रमांचे ज़ाणा॥११४॥ गुरुपरंपरेचा हा प्रगट विजयोत्सव। प्रायश्चित्तरूपे पाहिला भक्तांचा भाव। ग्रामोग्रामीच्या जनांवरी पडला प्रभाव। सद्गुरु परिज्ञानाश्रमांचा दिग्विजय खरा॥११५॥ स्वामी परिज्ञानाश्रमांचा एक परजातीय भाविक। स्वामी सद्योजातांचे करूनी कौतुक। म्हणे गुरुपदयात्रेचे कार्य अलौकिक। तुम्ही साधियले निर्धारे॥११६॥ आपुल्या प्रयत्नबळेची प्रबळ। स्वामी परिज्ञानाश्रमांचे कर्तृत्व सकळ। अत्युच्च तपःसामर्थ्य महिमा निर्मळ। जनांसी ज्ञात होवू लागला॥११७॥ स्वामी परिज्ञानाश्रमांचा वर्धिला सन्मान। समाजात आणियले अचिन्त्य परिवर्तन। माझिया मनी तुमचा मान। निश्चित उंचावला पहा॥११८॥ यावरी स्वामींनी दिले प्रत्युत्तर। स्वामी परिज्ञानाश्रमांचीच ही कृपा महत्तर। गुरुपरंपरेचा आशीर्वाद निरंतर। राहिला आमुच्या संगे जीवनी॥११९॥ सद्गुरु-कृपेविना कार्य अशक्य। हे ध्यानी धरावे माझे वाक्य। त्यांच्या प्रेरणेनेची ज़ाहले शक्य। जनांसी प्रायश्चित्त घेणे॥१२०॥ सद्गुरु परिज्ञानाश्रमांसी देणे मानाचे स्थान। आमुचे कर्तव्य महत्त्वपूर्ण। सद्गुरुकृपाची असे कारण। हे त्रिवार सत्य निःसंशय''॥१२१॥ तो भाविक वदे स्वामींना प्रेमळ। ''ही तुमची विनम्रता निव्वळ''। ''विनम्रता नव्हें, ही वस्तुस्थिति केवळ''। प्रत्युत्तरात वदती स्वामीजी॥१२२॥ असो परिसा सत्य कथन। उत्सवाचा कार्यभाग संपूर्ण। स्वामींनी पादुकांसाठी कैसे व्यवस्थापन। सारासार विचारे केले पहा॥१२३॥ वास्तुशास्त्राचा घेवूनी

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

आधार। यात्रेपूर्वीच़ स्वामींनी केला निर्धार। स्वामी परिज्ञानाश्रमांसी स्वतंत्र स्थान निरंतर। गुरुसमाधि-सन्निध द्यावे॥१२४॥ श्रीमहागणपति मूळ मूर्ति पावन। तिज़सी देवूनी स्वतंत्र स्थान। त्या गर्भगुडीत गुरुपादुका स्थापन। केल्या स्वामींनी स्वहस्ते॥१२५॥ सद्गुरु परिज्ञानाश्रमांसी देता स्थान मठात। स्वामी सद्योजात शंकराश्रम ज़ाहले सद्गदित। विमलांबूधारा वाहू लागल्या सतत। नेत्रातूनी घळाघळा॥१२६॥ कृतज्ञताभारे द्रवले हृदय। गुरुपरम्परेने दिधला न्याय। क्षणैक प्राणही ज़ाहला तन्मय। प्रसन्नतेच्या मोहक लहरींतरी॥१२७॥ सगुण-साकार-जगताची स्वामिनी। श्रीदेवी भुवनेश्वरी ऐश्वर्यदायिनी। तिज़ मठमंदिरी प्रस्थापूनी। शक्तिच़े पूजन आरंभिले॥१२८॥ सनातन वैदिक धर्मप्रवर्तक। भाष्यकार आदिशंकराचार्य सात्त्विक। अद्वैत-मठाच़े सार्वभौम प्रचारक। यांच़ा विग्रह मठात स्थापियला॥१२९॥ स्वामी पांडुरंगाश्रम समाधिसन्निध। स्थापिल्या परिज्ञानाश्रम-पादुका विशुद्ध। बाणलिंगासमीप श्रीचक्र विशुद्ध। आणिक दिव्यज्योति, ज्ञानज्योति ज़ाणा॥१३०॥ श्रीवल्ली-मठाच्या पुण्यमय आंगणी। तांब्याच़ा गरुडस्तंभ उभारुनी। 'रामांजनेय' क्षेत्रपाल प्रतिष्ठापूनी। नित्यपूजनार्थ वैदिक नेमियला॥१३१॥ 'रामांजनेय' शक्तिशाली रक्षक पावन। तयांच़े ज़रुर घ्यावे दर्शन। प्रवास करील सुगम निर्विघ्न। वदले स्वामी भक्तांसी॥१३२॥ तद्पश्चात ज़ाहले सान्निध्य हवन। महापूजा, पादुकापूजन, तीर्थवितरण। धर्मसभेत दिधले आशीर्वचन। स्वामी सद्योजात शंकराश्रम सद्गुरुंनी॥१३३॥ ऐशापरी गुरुज्योति यात्रेची ज़ाहली सांगता। स्वामींच्या गुरुसंकल्पाची ज़ाहली पूर्तता। विलक्षण प्रसन्नतेने वेढीले चित्ता। अवर्णनीय केवळ शब्दांतूनी॥१३४॥ आयोजक,

स्वयंसेवक, संकल्पित। सर्वांसी आनंद ज़ाहला अपरिमित। अखंड पदयात्रेने घेवूनी प्रायश्चित्त। निष्ठेने कर्तव्यपूर्ती साधियली॥१३५॥ अल्प दिवसां-उपरांत स्वामींनी घडविली। दुजी पदयात्रा सुनियंत्रित सानुली।बेंगळूरु शहरात सम्पन्न ज़ाहली। ध्येय प्रायश्चित्तयुक्त क्षमायाचना॥१३६॥ दुज्या यात्रेचे काय कारण। तरी परिसा देवूनी अवधान। स्वामी परिज्ञानाश्रम असता जीवित परिपूर्ण। तयांचा उपमर्द केला काही जनांनी॥१३७॥बेंगळूरु-मठात राहण्या आली बंदी। परन्तु नेम्पळ्ळी-कुटुम्बिय स्वामींसी वंदी। तयांच्या गृही होवूनी आनंदी। स्वामी राहिले अंतसमयवरी॥१३८॥ स्वामी परिज्ञानाश्रमांनी घेतले इच्छामरण।बेंगळूरु शहरी नेम्पळ्ळी-भालचंद्र-गृही पावन। स्वामींच्या दिव्य पादुका महान। तयांच्या गृही असती पहा॥१३९॥ महानिर्वाण ज़ाहले तयांच्या गृही। कुटुम्ब पुनीत ज़ाहले पाही। परन्तु मठात निवास स्वामींचा मान राही। तो नच लाभला स्वामी परिज्ञानाश्रमांसी॥१४०॥ जेणे ज़ाहला घोर गुरुद्रोह। याची ज़ाण दिधली निःसंदेह। देवीशर्मा नामे व्यक्तीने निस्पृह। प्रश्नकुंडली मांडूनिया॥१४१॥ गुरुज्योति यात्रेची सांगता ज़ाहली ज्या दिनी। देवीशर्माने संदेश धाडूनी। स्वामींसी अभिवादिले मनापासोनी। तयांच्या सत्कार्याकारणे॥१४२॥ श्रीयुत देवीशर्मा वदले स्वामी सद्योजात शंकराश्रमांसी। ''गुरुज्योति यात्रेने सन्मानिले स्वामी परिज्ञानाश्रमांसी। सन्मानाने स्थान दिधले तुम्ही श्रीवल्लीसी। यामाजी नच संशय॥१४३॥ परन्तु देह त्यजिला ज्या स्थानी। त्या ग्रामीच्या मठात नेवूनी। सन्मान तयांसी द्यावा झणी। तेणे प्रायश्चित्त पूर्ण होईल समाजाचे''॥१४४॥ त्यास्तव नेम्पळ्ळी-गृह ते बेंगळूरु-मठ। गुरुज्योति यात्रा दुजी काढीयली थेट। स्वयें स्वामी सद्योजात शंकराश्रम

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

श्रेष्ठ। सहभागी ज़ाहले प्रामुख्याने॥१४५॥बेंगळूरु-मठासी वाज़त गाज़त। एक प्रदक्षिणा घातली पादुकांसमवेत। मठांत नेऊनी नाम जल्लोषात। वैदिकांनी दाविली आरती॥१४६॥ तदनंतर ज़ाहले गुरुपादुका-पूजन। स्वामींचे ज़ाहले आशीर्वचन, भजन। तोवरी दीड तासांचा अवधि संपूर्ण। ज़ाहला सहज़तेने॥१४७॥ दीड तास ज़ाहला तरी। फूलवातींची आरती तेवत राहिली खरी। किंकिणीनाद मठाच्या माडीवरी। प्रत्यक्ष ऐकिला सर्व भक्तांनी॥१४८॥ या दिव्य अनुभवानंतर वारंवार। स्वामींच्या अस्तित्वाची प्रचिती निरंतर। घेती अनेकदा उपस्थित भक्तवर। विस्मित होवूनी प्रत्यक्ष॥१४९॥ पूर्वी बेंगळूरु-मठात भासे निरव शांतता। आता गवसे दिव्य लहरींचा प्रभाव चित्ता। अदृश्य ध्वनीलहरींची आध्यात्मिक घनता। देई प्रसन्नता हृदयांतरी॥१५०॥ कधी अनुभवा येई दिव्य सुगंध। कधी ऐकू येई सूक्ष्म किंकिणीनाद। कधी नुपुरांचा झनत्कार मंद। दिव्य अस्तित्वाचा भास देई॥१५१॥ सद्गुरु परिज्ञानाश्रम-पदी क्षमायाचना करून। बेंगळूरु-मठातही देता गौरवपूर्ण सन्मान। पूर्णतया सिद्ध ज़ाहले प्रयोजन। दोन्ही गुरुज्योति यात्रांचे ॥१५२॥ गुरुज्योति यात्रेविषयी करूनी कथन। केला षट्षष्ट्यध्याय संपूर्ण। पुढील अध्यायी स्वामींच्या यात्रांविषयी पूर्ण। सांगू सद्गुरुकृपे॥१५३॥ सद्गुरु परिज्ञानाश्रम पवित्र चरणी। भक्तीभावे क्षमायाचना करूनी। पूज्य सद्योजात शंकराश्रम सद्गुरु चरणी। अर्पिला 'गुरुज्योतिपदयात्रा'नाम अध्याय॥१५४॥ ॥अध्याय ६६॥ ॥ ओंव्या १५४॥॥ ॐ तत् सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥

॥ इति षट्षष्ट्यध्यायः समाप्तः॥

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीगुरुभ्योः नमः॥१॥ सकल कुलदेवतांसी करूनी नमन। स्वामी परिज्ञानाश्रमांसी ज़ाऊनी शरण। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांसी महान। साष्टांग प्रणिपात माझा॥२॥ आता पाहू स्वामींचा यात्रासंचार। भक्तांसंगे तीर्थयात्रा योजिल्या सुखकर। भक्तजनांस पर्वणी ही सुंदर। अभयंकर सद्गुरु असता संगे॥३॥ सन एकोणिसशे नव्व्याण्णव साली। चारधामयात्रा फलिता आली। पट्टाभिषेकानंतर यात्रा पहिली। अल्प जनांसंगे परिपूर्ण॥४॥ उत्तरकाशी, गंगोत्री, जमुनोत्री,। बद्रीनाथ, केदारनाथ तीर्थक्षेत्री। आदिशंकराचार्य-समाधिक्षेत्री। आणिक गोमुख-कुंडाठायी ज़ाणा॥५॥ तीन हज़ार आठशे ब्याण्णव मीटर उंचीवरी। हिमालयाच्या शीतल परिसरी। बर्फगार गोमुख-कुंडांतरी। स्वामींनी स्नान केले पहा॥६॥ दुजी यात्रा मानस-सरोवर। कैलासाचा पावन भव्य परिसर। सन दोन हज़ार एक महत्तर। शहाण्णव सारस्वत जनांसंगे॥७॥ नेपाळदेशी पोहोचता सर्वजण। पशुपतिनाथ-मंदिरी घेवूनी दर्शन। तीन दिवसांचे शिबिर घेवून। जनांसी आनंदित केले॥८॥ तेथूनी पातले ब्रह्मपुत्रा-नदीतीरी। स्वामींनी सत्संग केला सत्वरी। मग आगमन होता मानस-सरोवरी। भक्तांसी आनंद ज़ाहला अपरिमित॥९॥ मानस-सरोवराचे जल शुद्ध। स्वच्छ, श्यामल, प्रशांत, विशुद्ध। ही निर्मिति ब्रह्मदेवाचीच प्रबुद्ध। ऐसा शास्त्राधार असे॥१०॥ मानस-सरोवरात घेवूनी स्नान। स्वामींनी तेथे केले पूजन। भक्तांनीही केले तीर्थस्नान। शीतल मानस-सरोवरी॥११॥ रावणाच्या लिंगाचे लाभले दर्शन। शिवाची कृपा ज़ाहली पूर्ण। कैलासावरी शिवाची त्रिमुखे पावन। दृष्टोत्पत्तीस स्पष्ट आली॥१२॥ स्वामींनी अंतर्परिक्रमेला

आरंभ केला। अवचित हिमवर्षाव होऊ लागला। मार्गी 'विकासगिरी' नामें सन्यासी भेटला। तयाने सहयोग दिधला कौतुके॥१३॥ हाती त्रिशूल जटाधारी। भगवे वस्त्रधारी संन्यासी विकासगिरी। सातत्याने कैलास-परिक्रमा करी। रिक्त चरणांनी वारंवार॥१४॥ ''स्पर्श करूनी कैलासासी मनोहर। मनःपूर्वक करावे दंडनमस्कार। मागावे कैलासाचे आत्मलिंग साकार''। वदती सद्गुरु सद्योजात श्रीविकासगिरीसी॥१५॥ ऐकता विकासगिरी थट्टेने वदले। ''आत्मलिंग रावणाने नेले''। स्वामी सद्योजात शंकराश्रम प्रत्युत्तरात म्हणाले। ते परिसा शब्द सज्जनहो॥१६॥ ''स्वामी ईश्वरानंद-गिरींनी इच्छिली गुरुदक्षिणा। कैलास-आत्मलिंगास्तव दिली प्रेरणा। भले डावावरी लावू प्राणा। परि आत्मलिंगाविना नच परतू''॥१७॥ स्वामी सद्योजात शंकराश्रमांचा निग्रह घनिष्ट। पाहता विकासगिरी जाहले संतुष्ट। स्वामींसी सहयोग देण्याचा निर्णय श्रेष्ठ। घेतला संन्यस्त विकासगिरींनी॥१८॥ विकासगिरींचा कॅमेरा जो बिघडला। स्वामींनी स्वतःचा नवीन कॅमेरा दिला। तेणे कार्यभाग सहज साधियला। वास्तविक छायाचित्रणाचा॥१९॥ हे विकासगिरींचे निःस्वार्थ सहकार्य। जेणे सुलभ जाहले अंतर्परिक्रमा-कार्य। स्वामींचे असीम धैर्य, अतुल्य शौर्य। छायाचित्रित जाहले प्रत्यक्ष॥२०॥ कैलास-अंतर्परिक्रमा पूर्ण करूनी। स्वामींनी श्रीभवानीशंकरासी प्रार्थिले मनी। कैलास-आत्मलिंगाची याचना करूनी। सद्गुरुंसी आत्मियतेने वंदिले॥२१॥ स्वामींनी दंडनमस्कार केले कैलासाला। ध्यानार्थ बैसले सूर्यास्ताला। हिमाच्छादित पाषाण घरंगळत आला। स्थिरावला स्वामींसमीप येवूनी॥२२॥ शिव-अनुग्रहाचीच ही साक्ष। शिवाचा प्रसाद म्हणा प्रत्यक्ष। स्वामींचे निजानंदी असता लक्ष।

कैलासाचे आत्मलिंग लाभले॥२३॥ जनांच्या मनी उद्भवेल प्रश्न। कुठलाही एक पर्वताचा पाषाण। आत्मलिंग म्हणण्या काय प्रमाण। अन्यांपरीच तो पाषाण पहा॥२४॥ तरी ऐका त्याचे उत्तर। कैलासावरूनी स्वयेंची घरंगळूनी सत्वर। ज़री मिळे कैलासाचा पत्थर। तयासी आत्मलिंग संबोधती कैलासाचे॥२५॥ भगवंताच्या प्रतिमेवरील फूल। मानतो प्रसाद आम्ही सकळ। तेवीच हे आत्मलिंग निर्मळ। कैलासाचे ज़ाणावे॥२६॥ कैलासावरी शिवशक्तीचे अगोचर स्थान। ऐसे पुराणोक्त वचन महान। त्यांच्या आशीर्वादानेच परिपूर्ण। पाषाण समीप येऊनी ठाकला॥२७॥ यासी म्हणा शिवाचा आशीर्वाद। वा स्वामींची मनःपूर्वक साद। सद्गुरुंचीच कृपा ही निर्विवाद। यामाजी नच संशय॥२८॥ होवूनी पूर्ण ध्यानी दंग। स्वामींनी मनःपूर्वक याचिले आत्मलिंग। पूर्ण करण्या आकांक्षा उत्तुंग। स्वामी ईश्वरानंद-गिरींची निश्चये॥२९॥ पाहता स्वामींची निष्ठा, गुरुभक्ति। आत्मलिंगाची लाभली प्रचिती। ऐसी प्राप्त होण्या स्वानुभूति। सद्गुरु कृपाची कार्य करी॥३०॥ माऊंट अबूसी ज़ावूनी स्वामींनी। स्वामी ईश्वरानंद-गिरींसी साष्टांगे वंदूनी। कैलास-आत्मलिंग गुरुदक्षिणा देऊनी। धन्यत्व अनुभवले मानसी॥३१॥ फेब्रुवारी सन दोन हज़ार चार। संगे घेवूनी भक्तपरिवार। श्रीवैष्णोदेवी-यात्रा करूनी साकार। नंदित केले जनांसी॥३२॥ सन दोन हज़ार सहा निवडिले क्षेत्र। अमरनाथ-यात्रा योजिली पवित्र। मार्गातील प्रसिद्ध देवालये सर्वत्र। पाहिली भक्तांनी स्वामींसंगे॥३३॥ पठाणकोट ते श्रीनगर। तेथीच्या सुंदर दऱ्या, डोंगर,। काश्मीरचे शंकराचार्य-मंदिर। आणिक हरि-पर्वत काश्मीरचा॥३४॥ क्षीरभवानी, वेरिनाग मार्तंड-मंदिर। अमरनाथचे हिमाच्छादित शिवलिंग

गोचर। प्रसिद्ध मानसबल-सरोवर। स्वामी भुवनानंदगिरीसंगे॥३५॥ सन दोन हज़ार सात साली। कुरुक्षेत्र-सरस्वती-यात्रा निघाली। सरस्वती-नदीच्या उगमस्थळी। आदिबद्री-ग्रामी हरियाणा-प्रांती॥३६॥ त्रिशतक-महोत्सव-आरंभापूर्वी। सारस्वतांची पाळेमुळे शोधावी। सरस्वतीच्या उगमस्थळी भेट द्यावी। ऐसा संकल्प केला स्वामींनी॥३७॥ या संकल्पपूर्तीची धरूनी कामना। यात्रा योजिली सरस्वतीच्या उगमस्थाना। संगमरवरी शिलालेखाची करूनी प्रस्थापना। संगमरवरी गोमुखही स्थापियले॥३८॥ शिलालेखावरील अनुपम शब्दांकन। परिसा देवूनी पूर्ण अवधान। स्वामींची दिव्य दूरदृष्टि महत्त्वपूर्ण। ज्ञात होई पूर्णत्वे॥३९॥ ''त्रिशतकपूर्ति-स्मृतिप्रीत्यर्थ। हिमालय-उतारावरी शिलालेख सार्थ। स्वामी परिज्ञानाश्रमांच्या कृपेने समर्थ। अर्पियला पवित्र भारतवर्षाच्या पदकमळी''॥४०॥ इंग्रजीत या शिलालेखाचे शब्दांकन। कोरीयले असे महत्त्वपूर्ण। आता अवधारा पुढील कथन। सरस्वतीयात्रेचे॥४१॥ परमपूज्य श्रीसद्योजात शंकराश्रम स्वामींनी। नवनिर्मित कुंडात उतरूनी। गोमुखाची शास्त्रोक्त पूजा करूनी। सरस्वती-तीर्थोदक प्राशियले॥४२॥ सरस्वतीचे जल भरियले तीन कलशात। वेदमंत्रांच्या पावन जल्लोषात। वैदिकांनी गायिले सरस्वतीसूक्त। वेदांकित मंत्र उच्चस्वरे॥४३॥ प्रतिध्वनि उमटला दऱ्याखोऱ्यात। मंत्रमुग्ध ज़ाहला आसमंत। ज़णू पर्वतही सांगती उच्च स्वरात। आम्ही सारस्वतांचे साक्षी ज़ाणा॥४४॥ हा नव्हे केवळ योगायोग। भूत-वर्तमानाचा अभिनव संयोग। ज़ाहला ज़री सरस्वती-सरितेचा वियोग। तियेचे अस्तित्व अमर पहा॥४५॥ आता सांगू कथन सत्वरी। प्रतिकरूपी देवी सरस्वती सुंदरी। तियेसी स्थापियले एका

कलशावरी। भक्तजनांनी सप्रेमे॥४६॥ स्वर्णमुकुटासह स्मितमुखधारी। स्वर्णकिनारयुक्त शुभ्रवस्त्रधारी। आभूषणभूषित-हाती वीणा धरी। मुक्त केशसंभार ऐसी प्रतिमा ज़ाणा॥४७॥ प्रतिमेसी पालखीत स्थापियले सुरेख। स्वामींसह च़ालले भाविक। 'सरस्वती'सरोवरासमीप येता देख। जयजयकारे नभ दुमदुमले॥४८॥ स्वामींनी सरोवरासमीप केले पूजन। एकशे आठ रूपेरी पद्मे परिपूर्ण। अष्टोत्तर-नामावलीसहित पावन। समर्पिली 'सरस्वती'सरोवरांतरी॥४९॥ सरोवरासी पालखीसंगे प्रदक्षिणा घालून। भक्तांनी भजन करूनी मनभावन। त्रिशतक-महोत्सवाची धून। तियेच़े उद्घाटन केले त्या पुण्यक्षेत्री॥५०॥ पर्वतशिरी वसे 'मन्त्रादेवी'मंदिर। जी सरस्वती-उगमाची साक्षी निरंतर। तेथूनी दिसे नयन मनोहर। देवालय केदार-बद्रीनाथाच़े॥५१॥ स्वामींनी पांच आम्रफल-वृक्षारोपण। सरस्वती-सरोवराभोवती करून। सत्कर्मांच़ा आदर्श ठेविला ज़पून। भावी पिढीकारणें स्वामींनी॥५२॥ भविष्यकाळी आम्रवृक्ष देईल फळ। अभ्यागतांसी देईल छाया निर्मळ। स्वामींची दिव्य दूरदृष्टि प्रांजळ। आणिक उगम स्थळाच़ा सन्मान॥५३॥ तदनंतर सरस्वती-संग्रहालय पाहूनी। 'ब्रह्म'सरोवरासी परिक्रमा करूनी। बोधपर आशीर्वचनाने स्वामींनी। सांगता केली यात्रेची॥५४॥ सन दोन हज़ार आठ साली। श्रीवल्ली ते नगर यात्रा ज़ाहली। आश्रमपरंपरा ज्याकाळी आरंभिली। त्या 'बसवेश्वर' राजाच्या साम्राज्यस्थळी॥५५॥ सांप्रत च़ालली लोकशाही। साम्राज्य-वैभवाच़ा लवलेशही नाही। प्राचीन देवालये काही। भक्तांनी अवलोकिली॥५६॥ ''नगर चलो'' देवूनी शीर्षक। स्वामींनी यात्रा करविली आकर्षक। इतिहासाची उज़ळणी सुरेख। ज़ाहली या यात्रेने॥५७॥ त्रिशतक-महोत्सव-

पूर्वारम्भीच़ा सोहळा। सरस्वती-उगमस्थळी ज़ाहला। त्रिशतक-अंत्यपूर्व प्रवास आगळा। ज़ाहला 'प्रभास-सोमनाथ-सरस्वती' यात्रेने॥५८॥ सन दोन हज़ार नऊ साली। 'प्रभासतीर्थ ते सोमनाथ' यात्रा निघाली। येथे सरस्वती सरिता मिळाली। सिंधु-महासागरासी॥५९॥ 'रानी की वाव' ते 'रूद्रमहालय' प्रसिद्ध। गुजरात सिद्धापूरच़े देवालय विशुद्ध। तेथे सर्वप्रथम केले मातृश्राद्ध। जमदग्नि-सुत परशुरामाने॥६०॥ सिद्धापूर ते नलसरोवर। सरस्वतीच़ा संभाव्य स्त्रोत निरंतर। प्रशांत जलयुक्त परिसर। पक्षांच़े मधुर गुंजन ऐकू येई॥६१॥ प्रभास-पाटण ते सोमनाथ। प्रवास च़ालला आनंदात। सोमनाथच़े शिवमंदिर विख्यात। अति प्राचीन देवालय॥६२॥ सोमदेवे केले मंदिर स्थापित। ऐसी लोककथा वसे इतिहासात। वारंवार मंदिर ज़ाहले विध्वंसित। यवन-साम्राज्यांतरी॥६३॥ पहाटे घेवूनी सोमनाथ-दर्शन। मनसोक्त केले भक्तांनी भजन। तदनंतर 'बालिका'तीर्थासी केले प्रस्थान। जेथे गुजरातच़ा त्रिवेणी-संगम वसे॥६४॥ हिरण्य, सरस्वती, कपिला। तीन सरितांच़ा संगम ज़ाहला। यात्रिकांनी तीर्थक्षेत्राच़ा आनंद लुटला। या सुरम्य तीर्थक्षेत्री॥६५॥ भक्तांनी पाहिले गीता-मंदिर। बलराम-गुहा प्रासादिक निरंतर। ऐकील्या पौराणिक कथा मनोहर। आणिक स्थानमहात्म्य कौतुके॥६६॥ दोन हज़ार दहा साली गाठले क्षेत्र। प्रयाग-त्रिवेणी-संगम पवित्र। गंगा, यमुना, सरस्वतीच़े पात्र। एकरूप ज़ाहले या स्थळी॥६७॥ तेथूनी काशी-विश्वंभर दर्शन। तेथे स्वामींनी पूजा करून। पाहिले गयाक्षेत्र अति प्राचीन। आणिक शिवपाद-मंदिर॥६८॥ स्वामी रामदास, माताजी कृष्णाबाई संत। यांच्या कन्ननगड रामनगर आश्रमात। यात्रा केली स्वामींनी प्रशांत। फेब्रुवारी दोन

हज़ार अकरा साली॥६९॥ रामनगर आश्रमांत स्वामी वदती। लोक वारंवार आम्हा विचारती। अहंकार-मुक्त व्हावे कोणे रिती। त्या विषयी परिसा सज्जनहो॥७०॥ अहंकार मुक्त करण्यार्थ। केवळ गुरुशक्ति कार्य करी निस्वार्थ। साधकासी करण्या समर्थ। तडाखे देई विपरित॥७१॥ गुरुशक्तिची विपरित क्रिया होताना। अहंकार-मुक्तिची असुनही कामना। साधकाच्या दुखावती भावना। प्रशंसा-अभिलाषेकारणे॥७२॥ परन्तु हाची मानवाचा अहंकार। ज़पावा जगी करिताना व्यवहार। कचेरीत ज़रूरी तितका अहंकार। राखावा कार्य करण्यार्थ॥७३॥ व्यवहाराचे वातावरण ज़णू प्रयोगशाळा। तेथे अहंकाराचा प्रयोग करावा सगळा। व्यवहारात किंचित अहंकार सांभाळा। ऐसे स्वामींनी कथिले युवाजनांसी॥७४॥ परन्तु व्हाल जेव्हा भगवत् सेवेत रुज़ू। अहंकार ठेवावा बाज़ू। अन्यथा गर्ज़ता अहंकाराचा आवाज़ू।कार्य कठीण होईल निश्चित॥७५॥ अहंकारमुक्त होता मानव। कदापि न ढळे त्याचा प्रभाव। होई दिव्यत्व-प्राप्तिचा संभव। केवळ अहंकारमुक्त मानवा॥७६॥ ऐसा मनुष्य दिव्यप्रेमाने प्रेरित। दिव्यत्वाने सदा भारित। दिव्यत्वाशी संपर्क प्रस्थापित। होई ऐशा साधकाचा आपैसे॥७७॥ अहंकार-मुक्त होता मति। दिव्य समाधान लाभे चित्ती। सेवेत लाभे साधकासी प्रचिती। आनन्द-शान्तिची॥७८॥ मनोमालिन्य अल्पांशात हृदयी। वसे प्रत्येक मानवा ठायी। किंतु योग्य उपदेश योग्य समयी। लाभता सहजी रूज़े चित्तांतरी॥७९॥ लौकिक-शिक्षण लाभता स्वतंत्र। देह शुद्धीचे आकळे शास्त्र। जपाने साधक होई पात्र। मनोमालिन्य निरसण्यार्थ॥८०॥ दुसऱ्यांचे दोष पाहणे संपूर्ण। हा मानवी-स्वभाव संकीर्ण। ज़ो करी मानवी-मना विदीर्ण। मनोमालिन्याने

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

सर्वकाळी॥८१॥ मनोमालिन्याची निकृष्ट विकृति। सदा ज़ाणावी सजगतेने चित्ती। दुसऱ्यांत दोष पहाण्याची वृत्ती। आवरावी प्रयत्नबळे जळी-स्थळी॥८२॥ जेधवा विकृत-वृत्ती निरसेल। हृदयी परमात्मा प्रवेशेल। दिव्यत्वाची प्रचिती लाभेल। ऐशिया पावन-हृदयांतरी॥८३॥ रामनगरचा हा आश्रम पावन। प्रशांत दिव्यत्वाने भारलेला पूर्ण। येथे संतांनी करूनी अनुष्ठान। आत्मज्ञान प्राप्त केले॥८४॥ पप्पा, माताजींनीही दिली संकटांशी झुंज़। अडथळ्यातूनी काढीला मार्ग सहज़। सत्कार्य करूनिया निर्व्याज। पायऱ्या रेखियल्या साधकांकारणे॥८५॥ तेणे मार्ग ज़ाहला सोपान। पवित्र लहरींचे वास्तव्य येथे परिपूर्ण। हे निश्चित भाग्याचे लक्षण। वैयक्तिक-साधनेस्तव साधकासी॥८६॥ संतांचा येथे तपोप्रभाव। ऐसा जागृकतेने धरूनी दृढभाव। तयांच्या दिव्य वास्तव्याचा घ्यावा अनुभव। रामनामासहित घालूनी प्रदक्षिणा॥८७॥ जपाचे महत्त्व कथिताना। स्वामी सद्योजात शंकराश्रम सांगती जनांना। श्रवणार्थ उत्तेजित करा कर्णांना। परिसा स्वामींचे सखोल बोल॥८८॥ जपाचे विविध प्रकार पाही। जप होई प्रदक्षिणा करिताही। जप साधे एका स्थानी बसुनही। ती द्वितीय पायरी जपाची॥८९॥ एका स्थानी बसुनी करिता जप। नेत्र मिटता क्षणी आपोआप। विचार उठती वारेमाप। साधकाच्या मनांतरी॥९०॥ ऐशिया समयी प्रयत्नपूर्वक। विचार मनी आणावे सुरेख। महापुरुषांकडूनी प्राप्त अनुभव स्वाभाविक। आणिक तयांचे वात्सल्यप्रेम॥९१॥ गुरुकृपेची विकसले परिपूर्ण। हृदयकमळ ते पावन। अनुभवा प्रत्येक श्वासातून। प्रगल्भता हृदयांतरी॥९२॥ कमळाची प्रत्येक मनोहर पाकळी। कोमल परि प्रफुल्लित आगळी। प्रत्येक पाकळी सद्गुणांची खाण समुळी।

ऐसा विचार बाणवावा चित्ती॥९३॥ प्रत्येक पाकळीत सद्गुण भरियेला। प्रेम-शक्ति-शांतीचा आगळा। प्रसन्नतेने तेजाने नटला। हृदयीचा गाभा दिव्यत्वे॥९४॥ हृदयकमळ सहजी उमलेल ज़ैसे। मनोमालिन्य, विषाद विरतील तैसे। ऐसे विचार स्फुरविता आपैसे। आगंतुक विचार निरसतील॥९५॥ हृदयकमळाचा अनुभवावा विचार। मन करावे तेथे तदाकार। आरंभ करावा जप तदनंतर। तेणे साधनेचा पाया दृढ होई॥९६॥ अर्जुन रणांगणी ज़ाहला संभ्रमित। ऐशिया विशेष निर्णायक क्षणांत। जगद्गुरु श्रीकृष्णाने उपदेश उपयुक्त। देऊनी विश्वरूप दाविले॥९७॥ जीवनांत विश्व वसे आधिभौतिक। तदनंतर वसे विश्व आध्यात्मिक। मध्यावरी राही आधिदैविक। दोही मधला दुवा ज़ाणा॥९८॥ भौतिक सर्वशक्तिमान खास। अदृश्य आध्यात्माची धरण्या कास। दैव घडवी प्रत्यक्ष आभास। साधकाच्या जीवनांतरी॥९९॥ दैव एक निखालस सत्य। अतीव अनिवार्य कार्य करी स्तुत्य। मंत्रजप करिता मनोभावे नित्य। इष्टदेवतेसी सामीप्य जोडी॥१००॥ विश्वरूप हे मनोमय मध्य। जप-माध्यमे दर्शन होई साध्य। आध्यात्मिक विश्व जे सदा वंद्य। तयाची आवरणे उलगडवी निरंतर॥१०१॥ गुरु-उपदेश अत्यंत प्रभावी। अनुभव देऊनी शाश्वत सत्य दावी। गुरु-उपदेशार्थ पात्रता असावी। साधकाच्या व्यक्तिमत्वांतरी॥१०२॥ तप निश्चये ध्यान-योग। तपासाठी करावा लागे त्याग। तप साधनेचा महत्त्वपूर्ण भाग। साधक-जीवनांतरी॥१०३॥ सद्गुरुंनी अनुभवले अनंत निर्विकार। तयांचे चित्त निजानंदी तदाकार। तपसाधना तयांची अपरंपार। तेणे साध्य ज़ाहली परमानंद-स्थिति॥१०४॥ हे तप आहे तरी काय?। मन शांत करण्याचा स्थिर उपाय। तपाने सहिष्णुता वाढे विनासाय। वैचारिक द्वंद्व विलया ज़ाई॥१०५॥ मानसी धरुनिया तप-

संकल्प। निग्रहाने करिता नित्य जप। मन शांत होई आपोआप। तेंची खरे तप ज़ाणा॥१०६॥ तप घडवी साधका भक्तिसी पात्र। तपाविण भक्तिही व्यर्थ। राग-द्वेषादि षड्रीपु-व्याप्त गात्रं। परिवर्तित नच होती तपाविना॥१०७॥ तप करी साधकावरी योग्य उपचार। सामर्थ्य वाढवी अनिवार। मनावरी करुनी उचित संस्कार। परिपक्व करी साधका॥१०८॥ मृत्तिकेने घट बनवी कुंभार। सम्यक जल मिसळे मृत्तिकेवर। योग्य मिश्रण साधुनिया सत्वर। सुडौल मनोहर घट बनवी॥१०९॥ त्यापरी भक्ति देई मनासी आर्द्रता। तप वाढवी साधकाची पात्रता। तेणे स्थैर्य लाभे चित्ता। समाधान मिळतसे चित्तांतरी॥११०॥ सम्यक-दृष्टि, सम्यक-पठण,। संतसंग, विशुद्ध वातावरण। दिव्यत्वाशी साधा अनुसंधान। प्रसन्न प्रफुल्लित हृदयाने॥१११॥ गुरुशिष्य-परंपरेत सर्वमान्य। शुश्रुषेसी लाभले प्राधान्य। शुश्रुषा म्हणजे. श्रवणेच्छा अनन्य। सुश्रुषा सेवेसी संलग्न असे॥११२॥ सेवेविना शुश्रुषा न होई। सेवेने अहंकारमर्दन होई। अहंकार निरसता अधिकार येई। श्रवणे ज्ञान ग्रहण होई सहज़तया॥११३॥ आत्मज्ञानार्थ ज़ावे सद्गुरुंठायी। मनःपूर्वक सेवा करण्या पायी। सेवेने तप, भक्तिरस साध्य होई। आनंद, प्रेम भासे अंतरी॥११४॥ सेवेचे हे सर्वांगीण फल। तेणे साधे शुश्रुषा निर्मल। सूक्ष्मातिसूक्ष्म गोष्टींची ज़ाण केवळ। उद्भवेल जागृकतेने॥११५॥ प्रारंभी ज़पावे यम-नियम संपूर्ण। तेणे उमज़ेल गुरुशक्तिची क्रिया गहन। गुरुशक्ति कैसे करी मार्गदर्शन। स्वानुभवे ज्ञात होई॥११६॥ सर्व विश्व होई ज़णू तारक। पदोपदी बनूनी मार्गदर्शक। साधकाचे ज़तन-रक्षण सुरेख। करी गुरुशक्ति सप्रेमे॥११७॥ सद्गुरु सद्योजात शंकराश्रम वदती। असूया असे दोषदृष्टि निश्चिती। इतरांच्या गुणातही दोष शोधण्याची वृत्ति। वसे साधकांतरी॥११८॥

साधनेचा हा क्लिष्ट प्रकार। मनांत असूया उद्भवे वारंवार। निष्ठा-भक्तिने होता तपात तदाकार। स्वतःतील वैगुण्याची ज़ाण येई॥११९॥ स्वतःच्या वैगुण्याची ज़ाणीव समस्त। ऐसा साधक उत्तम निश्चित। परि आध्यात्माचा अहंकार क्लिष्ट खचित। विलया ज़ाणे कठीण पहा॥१२०॥ आध्यात्मिक सूक्ष्मातिसूक्ष्म अहंकार। अनुभवला अनेक साधकांनी वारंवार। जगती ऐसी उदाहरणे फार। गवसती पारमार्थिक इतिहासांत॥१२१॥ हा आध्यात्माचा अंतिम प्रतिबंध। साधकासी करी गर्वाने धुंद। मी श्रेष्ठ ऐसा भाव स्वच्छंद। विलसे ऐशिया साधकांतरी॥१२२॥ सूक्ष्म अहंकार ज़ाण्या विलया। भक्ति, सद्सद्विवेक ज़पावा हृदया। या अंतिम विघ्नातूनी पार कराया। केवळ सद्गुरुची समर्थ असे॥१२३॥ सद्गुरुंवरी स्थिर असावा विश्वास। तप करावे निष्ठेने नित्यास। तेणे अक्षय गुरुकृपा होवूनी खास। अहंकार होईल विसर्जित॥१२४॥ प्रगल्भित करावे अंतरंग। तप-भक्तित व्हावे दंग। भक्ताच्या भल्याबुऱ्याची ज़ाण अभंग। परिपूर्ण असे दिव्य गुरुशक्तिसी॥१२५॥ निरपेक्ष निष्कलंक श्रद्धा उपज़ेल जेव्हा। सूक्ष्म अहंकार विरघळेल तेव्हां। दिव्य शक्तिचे मार्गदर्शन लाभेल तेधवा। दिव्यत्वाची प्रचिती येईल॥१२६॥ ऐशापरी तप, भक्ति, सेवा, शुश्रुषा,। असूया, अध्यात्मिक-अहंकार परिभाषा। आणिक साधकावस्थेतील संघर्षा। कथिले स्वामींनी आशीर्वचनांत॥१२७॥ चिंतूनी स्वामींच्या उपदेशाचे सार। जप-सेवा-शुश्रुषेचा घेवूनी आधार। अन्तर्जगत् यात्रेत करण्या संचार। प्रयत्नशील राहू आनंदे॥१२८॥ गुरुपरंपरेसी करुनी त्रिवार वंदन। सप्तषष्ठ्यध्याय केला संपूर्ण। वाचकांचे सुखमय होवो जीवन। ऐसी विनम्र प्रार्थना सद्गुरुचरणी॥१२९॥ ॥अध्याय ६७॥ ॥ओंव्या १२९॥ ॥

ॐ तत् सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥ ॥ इति सप्तषष्ठ्यध्यायः समाप्तः॥

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीगुरुभ्योः नमः॥१॥ सर्व कुलदेवतांसी मनोभावे वन्दन। सद्गुरु परिज्ञानाश्रमांसी विनम्र नमन। स्वामी सद्योजात शंकराश्रमांसी पावन। साष्टांग प्रणिपात माझा॥२॥ स्वामींनी राबविले विविध उपक्रम। धार्मिक-सांस्कृतिक-सामाजिकाचा त्रिवेणी संगम। सर्वांगिण जनोद्धारक कार्य उत्तम। अलौकिक कर्तृत्व निःसंशय॥३॥ परिसा स्वामी सद्योजात शंकराश्रमांचे कार्य। ज़े सर्वोत्कृष्ट सांगणे अनिवार्य। अन्यथा अपूर्ण राहील कार्य। माझिया लेखणीचे निर्विवाद ज़ाणा ॥४॥ बालपणी कोवळ्या निरागस मनावर। करिता योग्य धार्मिक संस्कार। वर्तनात रूज़ती सदाचार-। धैय-सहिष्णुता-कृतज्ञता॥५॥ प्रार्थना-वर्गात बैसोनी नीट। प्रयत्न करूनी आटोकाट। श्लोक-स्तोत्रें करिती पाठ। लहान बालके आवडीने॥६॥ पौराणिक कथा करिती श्रवण। संस्कृत-नाट्याद्वारे सोपे संभाषण। तेणे होवू लागले आकलन। सोपान संस्कृत शब्दांचे॥७॥ संस्कृत भाषेचा व्हावा प्रचार। ऐसी श्रीपरिज्ञानाश्रमांची इच्छा अनिवार। परि यश न लाभले सत्वर। विद्यार्थी मिळण्याकारणे॥८॥ सद्गुरुंची करण्या इच्छापूर्ति। संस्कृत–वर्ग आरंभिले निश्चिती। चुरस उत्पन्न ज़ाहली चित्ती। संस्कृतपठणार्थ समाजात॥९॥ उपासना-आराधना-साधना-। धारणा ऐसे वर्ग नाना। पठणार्थ क्रमशः दिली उत्तेजना। जनमानसासी निधरि॥१०॥ गीर्वाण-प्रतिष्ठा नाम देवूनी। षण्मासिक-पाठ्यक्रम निवडूनी। संस्कृत-व्याकरण सलील करूनी। वर्ग आरंभिले समाजात॥११॥ जागतिक स्तरावरी देण्या प्रशिक्षण। संगणकाचा योग्य उपयोग करून। अभ्यासवर्गही केले निर्माण। सर्वदेशीय जनांकारणे॥१२॥ बालक-युवक-वयोवृद्ध। सर्वांसी लागला संस्कृतचा छंद।

संस्कृत- संभाषण-लेखन विशुद्ध। होऊ लागले आपैसे॥१३॥ परिक्षान्ती मिळे प्रमाणपत्र। स्वामींच्या पुनीत हस्ते पवित्र। विद्यार्थी ज्या श्रेणीस पात्र। त्या नोंदीसहित असे पहा॥१४॥ संभाषणासी देण्या विशेष उत्तेजन। योजिले संभाषणात्मक वर्ग संपूर्ण। जेणे वृद्धींगत ज़ाहला पूर्ण। आत्मविश्वास विद्यार्थ्यांचा॥१५॥ व्याकरणाचे होता आकलन। शास्त्रांचे होवू लागले वाचन। साध्य जा हले मनन चिंतन। आणिक विवेचन जनांमाजी॥१६॥ नूतन ऊर्जा ज़ाहली उत्पन्न। अर्थपूर्वक होता श्लोकपठण। पूजनांत लाभे आनंद गहन। नवचैतन्य प्रसवले समाजांतरी॥१७॥ आसनस्थ होवूनी व्यवस्थित। आबाल-वृद्ध-युवक समस्त। गुरुपूजन इत्यादि करिती विधियुक्त। अपूर्व अद्वितीय दृश्य ज़ाणा॥१८॥ स्वामी परिज्ञानाश्रमांचे स्वप्न सुरेख। साकार ज़ाहले निश्चये देख। स्वामी वदती 'मी निमित्त एक। कर्ते करविते सद्गुरु पहा'॥१९॥ स्तोत्रांवरी स्वाध्यायरूपे गहन। विचार मांडती स्वामी महान। अनेक विषयांवरी विमर्श करून। विचारांसी प्रवृत्त केले जनां॥२०॥ जयांसी नच आकळे संस्कृत-शास्त्र। केवळ म्हणती जे मुखे स्तोत्र। तयांसी स्तोत्रांचा गर्भितार्थ पवित्र। ज्ञात ज़ाहला सहज़तेने॥२१॥ तेणे सलील ज़ाहले मनन। आवडीने ऐकती आशिर्वचन। सद्गुरु-संदेशावरी मनन चिंतन। होवू लागले आपैसे॥२२॥ विमर्श साधनेचा अविभाज्य घटक। स्वतंत्र बौद्धिक, विचार मौलिक। ज़से हिऱ्याचे पैलू अनेक। प्रत्येक आपुल्यापरी विचार सुचवी॥२३॥ भक्तही वाचूनी शास्त्रे अनेक। घेती वैचारिक मंथनाचे सुख। अनुभवाचीही उदाहरणे कित्येक। विमर्शात सांगती निर्भयत्वे॥२४॥ कित्येकांसी उमगले सुप्त गुण। वक्तव्याचे अचिन्त्य धैर्य जाण। तेणे आवड जाहली निर्माण। साधना-

उपासनेंतरी॥२५॥ परमपूज्य परिज्ञानाश्रमांवरी एक। तेरा-श्लोकयुक्त स्तोत्र सुरेख। पठणार्थ दिधला आदेश चोख। सर्व भाविकांसी स्वामींनी॥२६॥ 'परिज्ञानाश्रम त्रयोदशी' म्हणती नेमे। तेवीच अन्य स्तोत्रे प्रेमे। श्रीदेवी-अनुष्ठान नित्यनेमे। करिती प्रति भृगुवासरी॥२७॥ शक्यतो ललिता-सहस्रनामाचा एक श्लोक। एक श्वासात म्हणता देख। अनायासे प्राणायाम होई सुरेख। हे स्वाभाविक रहस्य ज़ाणा॥२८॥ वारंवार स्मरता गुरुनाम चित्ती। सहज़ची फुलली हृदयी भक्ति। नाम-महिमेची येवू लागली प्रचीति। सुख-स्वास्थ्य लाभले जीवनी॥२९॥ नाम-महिमा वर्णावा काय। तेथे वसे अग्निचा न्याय। अनवधानाने अग्निवरी पडे पाय। तरीही दाह होतो निश्चये॥३०॥ प्रारंभी वैखरी घेई नाम। मग मध्यमा करी काम। हळू हळू मन घेई विराम। विकल्परहित होई सातत्याने॥३१॥ भक्तांचे वाढले अनुष्ठान। नित्य होवू लागले पूजन। तेणे सहज़तेने जनज़ागरण। साध्य ज़ाहले समाजांतरी॥३२॥ जनजागृती होता सबळ। होवू लागला समाज प्रबळ। गुरुकृपेचे लाभता पाठबळ। आत्मविश्वास द्विगुणित ज़ाहला॥३३॥ होऊ लागले वैचारिक मंथन। संकुचित वृत्ती ज़ाहली क्षीण। प्रगल्भ आचार-विचार परिपूर्ण। उद्भवू लागले मनांतरी॥३४॥ सद्गुरुंनीच वाहिला कार्यभार। तयांनीच केले आम्हा पार। ऐसे सर्वव्यापक दृढ विचार। मांडती श्रीसद्योजात शंकराश्रम स्वामी॥३५॥ आपुल्या कारकीर्दीत परिज्ञानाश्रमांनी। 'चित्रापूर यंग मेन्स असोसिएशन' स्थापूनी। युवकांसी उत्तेजन देण्या जीवनी। प्रयत्न केले अपार पहा॥३६॥ परंतु अपुरे पडले सहकार्य। स्थगित ज़ाहले संस्थेचे कार्य। सद्गुरुंच्या इच्छापूर्तीचे केले कार्य। स्वामी सद्योजात शंकराश्रम सद्गुरुंनी॥३७॥ युवकांसी करण्या जीवनी

प्रोत्साहित। आणिक समाज-कार्यास्तव प्रवृत्त। 'चित्रापुर युवधारा' नामे गट नवोदित। निर्मिला स्वामींनी निर्धारे॥३८॥ युवकांनी ज़गावे सकारात्मक जीवन। सृजनात्मक सक्षम जागरूक परिपूर्ण। धार्मिक-सांस्कृतिक-सामाजिक प्रतिष्ठान। असावे युवकां कारणे॥३९॥ असा उद्देश्य धरूनी मनी। युवकांशी प्रत्यक्ष संपर्क साधूनी। मार्गदर्शन सर्वतोपरी केले स्वामींनी। तेणे युवाशक्तीचे ज़ाहले प्रवर्धन॥४०॥ त्यायोगे ज़ाहला परस्परांचा परिचय। सद्गुरुंसंगे वैचारिक समन्वय। युवकांसी लाभले मनी अभय। विश्वास उपज़ला हृदयांतरी॥४१॥ स्वामींच्या प्रत्यक्ष उपस्थितीने सदेह। तरुणांवरी अंकुश राहिला निःसंदेह। श्रद्धेसह उगवला संयम उत्साह। शिस्तप्रियता दृढावली॥४२॥ भगवद्-गीतेचे करिती पठण। संस्कृत-नाट्य, भजन, पूजन। वाद्यवृंद स्थापूनी करिती मनोरंजन। आणि भजनांच्या प्रतियोगिता॥४३॥ संस्कृती-परिचय-शिबिरे घेवूनी। सनातन-धर्माविषयी उपदेशूनी। आध्यात्मिक-सांस्कृतिक-परिचय देवूनी। धन्य केले स्वामींनी युवकांसी॥४४॥ व्यायामयोगे होई आरोग्य-संवर्धन। आरोग्य देई मनःस्वास्थ्य संपूर्ण। मनःस्वास्थ्य करी चिंतेचे उत्सर्जन। धैर्य लाभे आपत्काली॥४५॥ योजिली योग-प्रशिक्षण-शिबिरे सतत। करसेवा आयोजिली श्रीवल्ली-ग्रामात। वनभोजन निसर्ग सान्निध्यात। युवा-संपर्क साधियला वारंवार॥४६॥ आंतर-सभा-युवात जागावी चुरस। किन्तु नच व्हावा कदापि विरस। म्हणूनी सुवर्णमध्य शोधियला सुरस। श्रीवल्ली-मठ-छत्र धरियेले॥४७॥ श्रीवल्ली-मठ एकछत्राखाली। युवापिढीची धुरा उचलली। जेणे युवापिढी एकसंघ ज़ाहली। सारस्वत-समाजांतरी॥४८॥ प्रत्येक तरुणाचे विहित कौशल्य। सुप्त कलागुणांसी अमूल्य।

संधी देण्याचे कार्य अतुल्य। स्वामींनी केले आनंदे॥४९॥ ज़णू स्वामी परिज्ञानाश्रमांचे शल्य। की युवाकार्यात राहिले वैफल्य। त्या अपुऱ्या प्रकल्पाचे साफल्य। युवधारारूपे ज़ाहले॥५०॥ स्वामी सद्योजात शंकराश्रमांचा विश्वास। सद्गुरुंचीच ही लीला खास। त्यांनीच करवून घेतले कार्यास। ऐसी प्रचंड निष्ठा गुरुंठायी ॥५१॥ देशोदेशी, शहरी, ग्रामोग्रामी। युवक लागले सक्रिय कामी। युवाशक्ति-प्रवाह वाहावा नेहमी। सर्वांगिण उन्नति कारणे॥५२॥ हेंची युवधाराचे अंतिम प्रयोजन। युवकांनी कार्यरत व्हावे पूर्ण। कुटुम्ब, समाज, संस्कृतीचे जत न। करावे कर्तव्यदक्षतेने युवकांनी॥५३॥ शिबिर असो वा वनभोजन। प्रामुख्याने समरसती युवाजन। अष्टमूर्ति-उपासनेचे महत्त्व सांगून। स्वामींनी विचार-प्रवृत्त केले॥५४॥ स्वामी वदती ''पहा सृष्टी-सौंदर्य। सृष्टी भगवंताचे सृजनात्मक कार्य। निसर्गदेवता एक परम आश्चर्य। अविरत करुणेचा प्रवाह ज़ाणा॥५५॥ पृथ्वी,आप, अग्नि, वायु, आकाश,। सूर्य, चंद्र आणि आत्मप्रकाश। मन एकाग्र करूनी सावकाश। चिंतन करावे मनी॥५६॥ ज़सज़शी उपासनेत प्रगती होई। अष्टमूर्तींचा अंतरी अनुभव येई। मानवी-जीवन सुखी होई। लाभता प्रशांत आनंददायी अनुभव''॥५७॥ अवधारा पुढील कार्य सत्वर। सद्योजात शंकराश्रम सद्गुरुंचे सुखकर। योजनाबद्ध कार्यक्रम निरंतर। रेखिला धार्मिक संजीवक पथावरी॥५८॥ त्रिशतक-महोत्सव आनंदसोहळा। स्वामींनी भक्तांस आदेश दिधला। साधना-शृंखलेचा मार्ग दाविला। तेवीच गायत्री-अनुष्ठानाचा पावन॥५९॥ साधना-शृंखला, गायत्री-अनुष्ठान। अखिल गुरुपरंपरेसी मानाचे वंदन। साधना-शृंखलेतील उपासना संपूर्ण। स्वामींनीच निर्देशित केली ॥६०॥ कार्यक्रमाचे वेळापत्रक

आखूनी। स्वयें उपासनाक्रम अभ्यासूनी। अभ्यासकांनी शिस्तबद्ध होवूनी। अन्य भक्तांसी मार्गदर्शन केले॥६१॥ जागतिक-स्तरावरी पस्तीस गट। अनुक्रमे उपासना करण्या उत्कट। मनस्वी साधक ज़ाहले समाविष्ट। साधना-शृंखलेत भव्यरित्या॥६२॥ प्रत्येक गटाच़ा प्रतिनिधी एक। त्यांसह अन्य काही संयोजक। मार्गदर्शन करिती सुरेख। उपासनेविषयी जनांसी स्वानंदे॥६३॥ नवोदितांसी देवूनी पूजा-प्रशिक्षण। पूजासामग्री सोपविली संपूर्ण। बालगोपाळ-तरूण-वृद्ध सर्वजण। सहभागी ज़ाहले उत्साहे॥६४॥ जयांसी नसे पूजनाची गोडी। तेही समाविष्ट ज़ाहले आवडी। भक्ति- कुसुमांची सुगंधित परडी। भक्तांनी अर्पियली गुरुंचरणी॥६५॥ साधनेच़ा नियोजित क्रम प्रतिदिन। नवरात्र, नित्यपाठ, देवी-अनुष्ठान,। ललिता-सहस्रनाम, शिवमानस-स्तोत्र पठण। दोन दिवसांच़ा दिनक्रम ज़ाणा॥६६॥ भगवद्-गीता दोन अध्यायांच़े पठण। अनुक्रमे बारावा, पंधरावा अध्याय संपूर्ण। साधकांनी करूनी प्रामाणिक प्रयत्न। उपासनेसी दिधला न्याय ॥६७॥ अन्य तीन दिवसांत होई वाराप्रमाणे। गुरुपूजन वा शिवमानस-स्तोत्र-पठण नेमाने। देवीपूजनही होई अनुषंगाने। सुलभ नियोजनापरी व्यवस्थित॥६८॥ पांच दिवसांची साधना-शृंखला। सामुहिक उपक्रम जगावेगळा। मांगल्य लहरींची अगोचर शृंखला। चैतन्याच़ा वास अनुभवा येई॥६९॥ या सामुहिक उपासनेची प्रचीति। तृप्ती समाधान आनंद निश्चिती। कित्येकदा सुगंधरूपे दिव्य अनुभूति। लाभली भक्तांसी अवचित॥७०॥ स्वामींच्या छायाचित्रावरील फूल। अनपेक्षितरित्या पडता अनमोल। अंतरी अनुमोदनाची ग्वाही सखोल। मिळे जनांसी तत्क्षणी॥७१॥ ऐशिया अनुमोदनाच़ा आनंद विलक्षण।

तशात साधनापूर्तीचे. समाधान। कर्तृत्वाचा, दक्षतेचा स्वाभिमान। हेचि उपक्रमाचे साफल्य ज़ाणा॥७२॥ शृंखलेचा अन्य उपक्रम गायत्री-अनुष्ठान। एकशे आठ वेळा मंत्रोच्चारण। पुरुषांकारणे नियोजिले प्रतिदिन। वर्षातील त्रिशत-दिवसपर्यंत॥७३॥ वैयक्तिक साधनेस देण्या उत्तेजना। स्वामींनी आदेश दिला पुरुषांना। गायत्री-मंत्राची करावी साधना। आणिक संध्यावंदन नित्यनेमे॥७४॥ अन्यथा अल्पज़ण उपनयना-उपरांत। गायत्रीमंत्र जपती नियमित। तीनशे दिवसांच्या नियमाने सतत। जप होऊ लागला नित्यनेमे।७५॥ त्रिशत-महोत्सवाचे दोन्ही उपक्रम। जयात विलसे अनन्य संयम,। निष्ठा, मनाचा निग्रह उत्तम। उत्साहाचा महासागर ज़णू॥७६॥ साधना-शृंखलेचा करूनी अंगिकार। साधनेत होवूनी तदाकार। श्रद्धा-सुमनांचा दिव्य हार। अर्पिला भक्तांनी सद्गुरु-चरणी॥७७॥ स्तोत्रपठणाने धार्मिक वातावरण। अभिमंत्रित जे मांगल्यपूर्ण। चैतन्याचा चिद्विलास पावन। जनजागृतीने गाठली परिसीमा॥७८॥ 'चित्रापूर रङ्गरञ्जनी' कार्यक्रम सांस्कृतिक। समरसतापूर्ण कलाकृति मनोरंजक। कलाकारांच्या रंगात रंगला प्रेक्षक। संतोषदायी जाहला त्रिशत-महोत्सव॥७९॥ त्रिशतक-महोत्सवाची सांगता। श्रीवल्लीसी ज़ाहली संपूर्णतः। रात्री ठीक बारा वाज़ता। दीप रोषणाई केली अनुपम॥८०॥ प्राचीन शिवगंगा-सरोवराकाठी। फटाक्यांची आतिषबाजी ज़ाहली गोमटी। त्रिशत दीप लावियले सरोवरतटी। नेत्रदीपक अविस्मरणीय सोहळा॥८१॥ असंख्य दीप एकावेळी प्रज्वलित। भाविक सारे जाहले विस्मित। स्वामींची मुखचर्या तेजान्वित। आनंद देई जनांसी॥८२॥ त्रिशतक-सोहळा जाहला संपूर्ण। अजरामर गुरुपरंपरेचे तपोबल परिपूर्ण। समाजात

ज़ाहले जाज्वल्य प्रबोधन। ज़णू नवोदित तेजोल उगवला॥८३॥ तीनशे वर्षांचे पूर्ण ज़ाहले पर्व। नूतन वर्षाची सुप्रभात अभिनव। म्हणूनी आरंभिला 'प्रत्युषोत्सव'। मुंबापुरीत उत्साहे॥८४॥ नवोदित कालपर्व अवतरले। समाजात आमूलाग्र परिवर्तन ज़ाहले। 'स्वामी परिज्ञानाश्रम प्रेरणेने कार्य फळले'। विनम्रतेने वदती सद्गुरु सद्योजात शंकराश्रम॥८५॥ साधना-शृंखला, साधना-पञ्चक। सन्निकर्ष-सेवा सन्निधीत सात्विक। कार्ल्यासी सेवा-सप्ताह सुखदायक। गुरु-स्मृतीमय चित्त ज़ाहले॥८६॥ शिवरात्रीस चारयाम-पूजन। श्रीदत्त-जयंतीस सद्गुरुपूजन। नवरात्रीत नित्य देवीपूजन। षष्ठीसी अनंतेश्वरपूजन स्वामी करिती॥८७॥ परिसा स्वामींचे देवीपूजन-विषयी आशिर्वचन। आणिक शिवतत्त्व-महिमा महत्त्वपूर्ण। श्रवणे तोषित होईल मन। भक्तजनांचे निश्चये॥८८॥ शक्तिचे महत्त्व समज़ाविताना। स्वामींनी नवरात्रीत कथिले जनांना। वीर्यवत्-कार्य करण्याची प्रेरणा। प्रचंड गुरुशक्ति देई॥८९॥ शिवतत्त्व वस्तुतः ज्ञेयतत्त्व। आत्म्याशी ज़ोडी अभिन्नत्व। 'मीच शिव' हे ब्रह्मतत्त्व। साध्य होई साधनेने॥९०॥ आत्मज्ञानाची इच्छा धरूनी अंतरी। मनांत धैर्य, स्थैर्य आणूनी ज़री। साधक निष्ठेने साधना करी। आराधना शक्तिचीच होई॥९१॥ आरंभ होता शक्ती-जागरण। अमांगल्य होवू लागले निवारण। शक्तिविना दुर्बल होई मन। साधने योग्य नच राही॥९२॥ प्रयत्नबळे मनासी लाभे स्थैर्य। शक्तिवर्धनाने उपज़े धैर्य। 'अहं ब्रह्मास्मि'भावात साधे ऐक्य। तत्समयी वस्तुतः आराधना होई॥९३॥ शिवतत्त्व जा णण्याचे धरूनी लक्ष्य। शक्ति-आराधनेत भक्त होई दक्ष। तेधवा गुरुंचीच आराधना प्रत्यक्ष। होई अप्रत्यक्षरित्या।९४॥ मंत्रद्रष्टा वैदिकऋषींनी केली स्तुती। शक्तिसी मूळ–प्रकृती

संबोधिती। धन, सम्पत्ती, ऐश्वर्य देई जगती। ती केवळ आदिप्रकृति महामाया॥९५॥ ही गुरुशक्ति सुखशांतीप्रदा। विकसित सृष्टिकर्त्री आद्या। श्रुतींचे रहस्य ज़ाणे ती विद्या। भवसागरातूनी मोक्ष देई॥९६॥ मनःपूर्वक करावी तिची आराधना। उत्साहाने करावी साधना। तेणे उद्दीपित होई चेतना। अखंड साधना सेवा करण्यार्थ॥९७॥ विजयादशमीसी देवूनी आशिर्वचन। शमीपूजनाचा अभिप्रेत अर्थ सांगून। शमनाचे साधनेत विशेष स्थान। समज़ाविले सुलभ शब्दांनी॥९८॥ शमीवृक्षाचे पूजन करते– समयी। वस्तुतः शमनाचे आराधना होई। वृक्षरूपी अपराजिता देवतेच्या ठायी। निर्मल निरपेक्ष अभिवादन॥९९॥ शमनाचा करावा सराव। तेणे अहंकार-मर्दन होई संभव। वस्तुतः तीच शमीपूजा अभिनव। होई मानवजीवनी॥१००॥ जेव्हां विनम्र आत्मीयतेने सेवा होई। वस्तुतः आनंद अनुभवा येई। प्रशंसेची अभिलाषाही समाप्त होई। शमीचे समाधानात होई परिवर्तन॥१०१॥ शम-दम-उपरति-। तितिक्षा-श्रद्धा-समाधान चित्ती। तयांसी म्हणती षट्संपत्ति। ऐसे कथियेले शास्त्रांतरी॥१०२॥ सद्गुरु-शक्तिचे चाले संचरण। तेणे स्पष्ट प्रकट ज़ाहले अनुष्ठान। जनांत रुची, उत्सुकता निर्माण। ज़ाहली सद्गुरुकृपे॥१०३॥ शम देई मनावरी संयम। इंद्रियांवरी लगाम धरी दम। आरंभी शम साधावा उत्तम। तेणे समाधान साधे सहज़तया॥१०४॥ सातत्याने होता शमाचा अभ्यास। मन-चांचल्य निरसे खास। शुद्ध परब्रह्म तत्त्वात बुद्धीस। समाहित करावे सर्वदा॥१०५॥ शम-दम- तितिक्षा इत्यादींचा। अभ्यास करिता सातत्याने सचा। क्रमे क्रमे उद्वेग मनीचा। शांत होई निश्चये॥१०६॥ आता वर्णू स्वामींची दूरदृष्टी। अवलोकिती सभोवतालीची समष्ठी। पाहता अनेक

सारस्वत कष्टी। शोधियले तयाचे कारण॥१०७॥ नोकरीधंदा शोधिण्या उदरनिर्वाहार्थ कुटुम्बासी आर्थिकदृष्ट्या करण्या समर्थ। अन्य जनांसंगे वैदिकही अर्थाजनार्थ। विविध शहरी ज़ाहले स्थायिक॥१०८॥ सारस्वतांची प्राचीन मंदिरे मूळग्रामात। वर्षानुवर्षे उपेक्षित राहिली समस्त। अनवधानाने अपराध सुप्त। ज़ाहला चित्रापूर सारस्वत लोकांकडूनी॥१०९॥ मूळग्रामाची ज़ाहली विस्मृती। जयाचे आडनांव लावितो जगती। ऋण-विस्मृतीने खुंटली गति। चिंतित ज़ाहले अधिकांश जन॥११०॥ त्यास्तव प्रत्येक ग्रामी ज़ावूनी। सारस्वतांची मंदिरे शोधूनी। मंदिराचा जीर्णोद्धार करूनी। मंदिरे सम्पन्न केली स्वामींनी॥१११॥ जेथे ज़ाहल्या मूर्ती भग्न। तेथे स्थापिले विग्रह नूतन। विग्रह पुनर्प्रतिष्ठापना करुन। वैदिक नियुक्त केले पूजनार्थ॥११२॥ मंदिरांस लाभली उर्जितावस्था। मूळग्राम कळले जनां समस्तां। मूळग्रामाविषयी उत्कंठनीय अवस्था। ज़ाहली नव्या पिढीची॥११३॥ प्रतिष्ठेस्तव मूळ-कुटुम्बिय शोधता। परिचय वाढला कार्याकरिता। परस्पर संबंध हा सातत्याने येता। कर्तव्यदक्षता, आदर दृढावला चित्ती॥११४॥ वैदिकांसी लाभले गृह, रोज़गार। सुखमय होवू लागला संसार। गृहस्थही येवू लागले वरचेवर। ग्राम-वैभवही ज़ाहले वृद्धिंगत॥११५॥ काही सारस्वत-मन्दिरे पुरातन। दुर्लक्षाकारणे ज़ाहली सरकारी-प्रशासनाधीन। ती मन्दिरे शासनासी विनंती करून। मागुती मिळविली स्वामींनी॥११६॥ ज्या सारस्वत मन्दिरांचा न राहिला वाली। ऐशा मन्दिरांसी घेवूनी मठ-प्रशासनाखाली। सर्वतोपरी बनविले शक्तिशाली। धार्मिक-सत्कार्य आरंभूनी॥११७॥ श्रीवल्ली-मठासी ज़े वैदिक संलग्न। तयांचे वाढविले मासिक वेतन। अन्य

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

अनेक सवलती देवून। तृप्त केले सर्व मठांच्या वैदिकांसी॥११८॥ नागदेवता पूर्वजांचे प्रतीक। पूर्वजची त्या स्थानाचे स्थापक। नागमहिमा अत्यंत प्रासादिक। विसरले कालांतराने जन॥११९॥ मूळग्रामी पूर्वजांनी केली प्रतिष्ठापना। ते नागदैवत उपेक्षिले ज़ाणा। नकळत कां होईना। प्रमाद घडला वंशजांकडूनी॥१२०॥ तेणे बहुतांश कुटुम्बियांच्या कुण्डलीत। नागदोष स्पष्ट दिसे खचित। शमनार्थ पळती विविध स्थळांत। त्रस्त ज़ाहले अनेक जन॥१२१॥ अनेक जनांच्या येवूनी निद्रावस्थेत। वारंवार फुत्कारती नाग स्वप्नात। तेणे भय उद्भवले अंतर्चित्तात। अनेक अनुभविक जनांच्या॥१२२॥ जन घेती स्वामींपाशी धाव। प्रार्थिती ''सद्गुरु दावा प्रभाव। आमुच्या सेवेत कोणती उणीव। होतसे सांगावे आम्हासी''॥१२३॥ वारंवार विचारती एकची प्रश्न। ''नागदोषाचे कसे करावे शमन। सर्पदोष-शांतीचे उपाय गहन। सुमुहूर्तावरी केले आम्ही अनेकदा॥१२४॥ तरीही नच सरे आमुचा त्रास। म्हणूनी सद्गुरु धरियली तुमची कास। सांगावा आम्हा उपाय खास। कायमची चिंता निरसेल जेणे॥१२५॥ त्यावरी स्वामींनी करूनी सखोल विचार। धाडिले जनांसी घेण्या सुविचार। ज्योतिष आणि प्रश्न-शास्त्रातील ज़ाणकार। 'देवीशर्मा' नामे मान्यवरापाशी॥१२६॥ स्वामींच्या विनंतीसी देवूनी मान। देवीशर्मा यांनी तत्क्षणासून। अनेक जनांच्या जन्मपत्रिका अभ्यासून। शोधियले चिंतेचे मूळ कारण॥१२७॥ शर्मा म्हणे स्वामींसी सात्त्विक। जन्मपत्रिकेत नावे ज़री अनेक। तरी सगोत्रिय पत्रिकांत प्रमुख। गवसे नागदोष पिढ्यान्पिढ्या॥१२८॥ पूर्वी राहती जन ज़ोड-कुटुम्बात। आता विखुरले सर्वत्र जगात। परि मूळग्रामी स्थापिले जे नागदैवत। ते राहिले उपेक्षित॥१२९॥ सगोत्रिय

कुटुम्बियांनी एकत्र येवून। पूर्वजांच़ा श्रद्धेने राखावा सन्मान। नाग-पुनर्प्रतिष्ठा मूळग्रामी करून। सन्मानित करावे नागदेवतेसी॥१३०॥ ऐसा उपाय गवसता झणी। अनेक कुटुम्बियांनी एकत्र येवूनी। नाग-पुनर्प्रतिष्ठा केली मनापासूनी। तेणे दोष-निवारण होवू लागले॥१३१॥ परन्तु काही कुटुम्बियांसी करण्या नागस्थापना। मूळग्रामी अशक्य झाले ज़ाणा। तेणे चिंता उद्भवली जनांचिया मना। चिंतेच़े कारण स्वामींसी कथियेले॥१३२॥ स्वामी सद्योजात शंकराश्रम सद्गुरुंनी। परिपूर्णरूपे विचार करूनी। नागदेवतेसी स्वतंत्र स्थान देण्या योजूनी। भूखंड श्रीवल्लीसी निवडीला॥१३३॥ भूमीपूजन करिताना होवूनी दक्ष। ईशान्य-दिशेतूनी अनेक नाग प्रत्यक्ष। ज़णू अनुमोदनाची देण्या मूळ-साक्ष। पातले त्या मृण्मयस्थानी॥१३४॥ नाग पाहता तेथे अवचित। जनही ज़ाहले अत्यंत विस्मित। ही पूर्वजांचीच़ कृपा खचित। नागदेवतेची करूणा खरी॥१३५॥ ऐशापरी नागदैवत स्वतंत्र स्थापिता। चिंता मिटू लागल्या तत्त्वता। धन्यवाद देई कृतज्ञतेने जनता। आनंदित होवूनी जीवनी॥१३६॥ विठ्ठलग्रामीच्या अनंतेश्वरमंदिरी। स्वामींनी ब्रह्मकलश-पुनर्प्रतिष्ठा केली। धन्य धन्य म्हणे जनता सगळी। संतोषाने प्रफुल्लित होवूनी॥१३७॥ नूतन ध्वजस्तंभ प्रतिष्ठापिला। सहस्र-कलशाभिषेक ज़ाहला। नवीन बांधियली यज्ञशाळा। ब्रह्मकलशांग-रथोत्सव केला साज़रा॥१३८॥ श्रीगोपालकृष्ण-मंदिर होन्नावरग्रामी। रथोत्सव पुनश्च सुरु करण्या कामी। सद्गुरु सद्योजात शंकराश्रम स्वामी। यांनी सहयोग दिला पूर्णत्वे॥१३९॥ सद्गुरु परिज्ञानाश्रम प्रेरणेने ज़ाहले कार्य। हे त्यांच्याची कृपेच़े औदार्य। ऐसे कृतज्ञतेने वदती गुरुवर्य। स्वामी सद्योजात शंकराश्रम प्रेमाने॥१४०॥ स्वामींच़े धार्मिक,

सांस्कृतिक कार्य सांगून। अष्टषष्ट्यध्याय केला संपूर्ण। कृतज्ञतेने भक्तिपूर्वक केला समर्पण। स्वामी सद्योजात शंकराश्रम पदकमळी॥१४१॥ ॥अध्याय ६८॥ ॥ओंव्या १४१॥ ॥ ॐ तत् सत् श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥ ॥ इति अष्टषष्ट्यध्यायः समाप्तः॥

॥ इति अष्टषष्ट्यध्यायः समाप्तः॥

केशवामनकृष्णपांडुरंगआनंद

परिज्ञानगुरुसद्योजातशंकरसद्गुरु

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीगुरुभ्योः नमः॥१॥ सर्व कुलदेवतांसी नमन सतत। अखिल गुरुपरंपरेसी साष्टांगे प्रणिपात। स्वामी सद्योजात शंकराश्रम चरणी पुनीत। साष्टांग प्रणिपात माझा॥२॥ धार्मिक-सांस्कृतिक कार्या व्यतिरिक्त। परिसा स्वामींचे समाजकार्य विस्तृत। स्वामींनी स्वयें शिस्तपालनाने सक्त। आदर्श ठेविला जनांसमोर॥३॥ मठव्यवहार ज़ाहला सुरळीत। गुरुकृपे स्थिरावली समृद्धि खचित। सजीवां संगे जडाचाही निश्चित। उद्धार केला स्वामींनी॥४॥ वास्तु ज़री भासे जड निश्चल। तियेत वसे चैतन्य शक्ति सोज्वळ। वास्तुदेवतेचा तेथे वास अढळ। राही सदा सर्वदा॥५॥ पाषाणासी देता मूर्तरूप। मूर्तीत भासे दिव्य स्वरूप। भावे शृंगारिता तिजसी अमाप। दिसे जाज्वल्य तेज मूर्तीठायी॥६॥ परंतु ज़री नसे हृदयी भाव। पाषाणापरि भासे जीवितही सदैव। मग कैचा जीव अथवा शिव। भासे जड सर्व काही॥७॥ परिसा स्वामींचे कार्य मनोहर। गोकर्ण, मल्लापुर, चित्रापुर, मंगळूर। मठ नूतनीकरणाचे कार्य महत्तर। केले स्वामींनी परिपूर्ण॥८॥ ध्यानमंदिर बांधूनी विस्तीर्ण। बैठक भक्तांची केली सुखद संपूर्ण। भक्तांचे तोषित ज़ाहले मन। विशाल ध्यानमंदिर पाहता॥९॥ वास्तूचे ज़ाहले सौंदर्यवर्धन। आयुष्यवर्धनही ज़ाहले पूर्ण। मठासी स्वरूप लाभले नाविन्यपूर्ण। प्राचीन अर्वाचिनाचे मिलन ज़ाणा॥१०॥ गोशाला आणिक पाठशाला। यांचाही भव्य विस्तार ज़ाहला। आधुनिक उपकरणांसहित प्रत्येक विद्यार्थ्याला। सुखसोयी प्राप्त ज़ाहल्या॥११॥ दुभत्या गाईंचे एकत्र संगोपन। केले श्रीवल्ली गोशालेत परिपूर्ण। गोशालेचे केले नूतनीकरण। सर्वतोपरि उत्कृष्ट॥१२॥ वृद्ध गाईंचे व्हावे संगोपन। आणिक वृषभांचेही स्वतंत्रपणे

परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

ज़ाण। त्यास्तव कॅम्ब्रे ग्रामी गोशाला नवीन। बांधविली स्वामींनी॥१३॥ सर्व पशूंच्या आरोग्य संवर्धनार्थ। पशूतज्ञ वैद्य नेमिला समर्थ।ज़ो सेवा करी भावे निस्वार्थ। पशूंचे आरोग्य ज़ोपासण्या॥१४॥ गोविष्ठेचा संग्रह करूनी। गोबर गॅस प्रकल्प उभारिला झणी। पाकगृहासी ज्वलन वायु पुरवुनी। सुविधा केली अखंडित॥१५॥ पाकगृह बांधियले विस्तीर्ण। विशाल भोजनकक्ष परिपूर्ण। सर्व आधुनिक सुखसोईंनी सम्पन्न। अतिथिगृह बांधियले॥१६॥ शेतकी तज्ञांच्या सल्ल्यापरि। शेती बागायतीस बी बियाणे सारी। खते, आधुनिक उपकरणे ज़रुरी। दिधली उपलब्ध करूनिया॥१७॥ पूज्य परिज्ञानाश्रमांनी मनी धरूनी निग्रह। रानोमाळी फिरूनी शोधियले विग्रह। प्राचीन त्यक्त मूर्तींचा संग्रह। करूनी स्थापियले संग्रहालय॥१८॥ सन दोन हजार आठ साली प्रेमाने। वास्तुशिल्प उभारूनी निर्धाराने। संग्रहित मूर्तींसी योग्य स्थाने।दिधली नवीन संग्रहालयांतरी॥१९॥ श्री परिज्ञानाश्रम वस्तुसंग्रहालय। नामें आधुनिक भव्य आलय। बांधूनी कृतज्ञता अर्पिली निःसंशय। स्वामींनी मूकपणे गुरुचरणी॥२०॥ या वस्तु संग्रहालयात ठेविल्या पाही। दशम गुरुंच्या भेटवस्तु काही। स्वामींची चित्रें हस्तलिखिते सर्वही। आणिक दुर्मिळवस्तु पुरातन॥२१॥ सन दोन हज़ार आठचे मठाध्यक्ष विनोद येन्निमिडी यांनी। माता-पित्याच्या नामे देणगी देउनी। संग्रहालय निर्मितीचा संपूर्ण भार उचलुनी। सहयोग दिला स्वानंदे॥२२॥ आता सांगू भक्त जनांना। विस्मयकारक एक घटना। संग्रहालय उद्घाटनापूर्वी कार्यकर्त्यांना। अनुभवा आली अवचित॥२३॥ मठाचे चालले जेधवा नूतनीकरण। भग्नावशेषयुक्त मृत्तिका संपूर्ण। कॅम्ब्रे मळ्यानजीक नेऊन। मजूरांनी टाकियली॥२४॥ भग्न अवशेष काही। नजिकच्या

शेतात टाकीले पाही। तयात एक दडून राही। ताम्रध्वज चौदाव्या शतकाचा॥२५॥ संग्रहालय शुभारंभापूर्वी काही दिन। तो ताम्रध्वज शेतकऱ्याने आणून। स्वामी सद्योजात शंकराश्रमपदी पावन। समर्पिला अत्यंत विनम्रतेने॥२६॥ हा ज़णू ज़ाहला शुभशकुन। गुरुपरंपरेचे लाभले अनुमोदन। संग्रहालयात ठेवियला ताम्रध्वज प्राचीन। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांनी॥२७॥ ज़ुने ते सोने ही म्हण। सत्य करूनी दाखविली पूर्ण। मठ आसमंतीच्या त्यक्त काष्ठांपासून। कपाटे निर्मियली संग्रहालयाकारणे॥२८॥ कागदपत्रे ज़ुनी ऐतिहासिक। जयांत अनेक स्वामींची हस्तलिखिते सुबक। सुनीट ठेवण्याचे कार्य आवश्यक। स्वामींनी सोपिविले बेंगळूरूच्या भक्तांसी॥२९॥ ही गुरुपरंपरेची बहुमूल्य सेवा। सद्गुरुंच्या हस्ताक्षरांचा ज़पण्या ठेवा। स्वामींनी 'सेवा स्पदंन' नावे बरवा। नियमित उपक्रम योजिला॥३०॥ वर्षानुवर्षे ज़पण्या कागदपत्रे पुरातन। त्यावरी रासायनिक प्रक्रिया करुन। स्वयंसेवक करिती यथासांग जतन। श्रीवल्लीसी येवूनी प्रतिमासी॥३१॥ स्वामी सद्योजात शंकराश्रमांचे कार्य विशेष। अज़ुनही सांगणे राही शेष। श्रवणे मिटती मनीचे क्लेश। स्वामींचे कार्य परिसा सज्जनहो॥३२॥ गोकर्ण मल्लापुर मंगळूर मठ। तयांचें नूतनीकरण करूनी थेट। वैभव वाढवूनी कारभार सुनीट। केला सर्व चित्रापुर सारस्वत मठांचा॥३३॥ 'श्रीवल्ली ट्रस्ट' नामे संस्था स्थापूनी। शिक्षणार्थ बालवाडी स्थापियली स्वामींनी। उच्च माध्यमिक शाळा बांधुनी। शिक्षणासी प्राधान्य दिले श्रीवल्लीत ॥३४॥ एका परदेशस्थ सारस्वत कुटुंबियांनी। शालेय इमारतीचा संपूर्ण खर्च उचलुनी। विद्यार्थ्यांना भोजन आणिक शालेय सामग्री पुरवुनी। योगदान दिले निःस्वार्थ भावे॥३५॥ पूर्वी उच्च

प रि ज्ञा ना श्र म शं क र स द्गु रु

माध्यमिक शिक्षणार्थ। विद्यार्थ्यांसी ज़ावे लागे अन्यत्र। श्रीचित्रापुर मठाने धरिता छत्र। ग्रामस्थांसी आनंद ज़ाहला॥३६॥ खेडोपाडी सर्वत्र विद्युत कपात। तेणे अध्ययनार्थ कष्ट विपरीत। वारंवार विद्युतशक्ति होता खंडीत। चिंता ग्रासे मानसी विद्यार्थ्यांसी॥३७॥ त्यास्तव श्रीवल्ली शालेय प्रांगणात। सौरउर्जा प्रकल्प उभारुनी त्वरित। विद्यार्थ्यांची सोय केली समस्त। अनेक सौरदीप देवूनी॥३८॥ विद्यार्थ्यांनीही ठेवूनी कृतज्ञतेने ज़ाण। नित्य नेमे अध्ययन करुन। स्वामींसी कृतज्ञतेने दिधला बहुमान। जेणे सत्कार्य सार्थकी लागले॥३९॥ आज़वरी मंडळात शंभर टक्के लावूनी निकाल। स्वतःचे भविष्य घडवूनी उज्ज्वल। उच्च श्रेणी प्राप्तीने यश निर्मळ। प्राप्त केले स्वप्रयत्ने जीवनी॥४०॥ क्रीडा क्षेत्रात देवूनी प्रोत्साहन। सरावार्थ सर्व सुविधा उपलब्ध करून। सर्वांगीण विकासार्थ दिले उत्तेजन। शालेय विद्यार्थ्यांसी सर्वतोपरी।।४१।। प्रयत्नांती वसे परमेश्वर। यज्ञवत् वीर्यवत् यत्न करा निरंतर। घडवा स्वजीवन उज्ज्वल बलवत्तर। स्वामी सद्योजातांनी कथिले विद्यार्थ्यांसी।।४२।। प्राप्त सुवर्णसंधीचे करूनी चीज़। विद्यार्थ्यांनी सराव केला रोज़। राज्यस्तरावरी बक्षिसे मिळवूनी सहज़। नैपुण्य यश संपादिले।।४३।। श्रीवल्ली परिच मल्लापुर ग्रामांत। नूतन शाळा बांधूनी प्रशस्त। सर्व सुविधा देवूनी उपयुक्त। शिक्षणार्थ उत्तेजिले विद्यार्थ्यांसी॥४४॥ बाल युवकांस्तव स्थापियली व्यायाम शाळा। आरोग्य केंद्र उपलब्ध केले सकळां। 'संवित् सुधा' नामे राबविला। उपक्रम ग्रामीण स्त्रियांसाठी उत्तम॥४५॥ स्त्रियांसी स्वयंरोज़गार मिळवूनी देणे। तयांसी स्वायत्त होण्या कारणे। शिवण भरतकामादि शिक्षण देणे। ऐसे कार्य 'संवित् सुधा' करी॥४६॥ पाहता संवित् सुधेचे यशस्वी कार्य। महिलांची

सर्वांगीण प्रगति आणिक धैर्य। बक्षिसाच़ा बहुमान देवूनी सहकार्य। दिधले 'मोतीभाई दोशी फौंडेशन' संस्थेने।।४७।। अनाथवृद्धांच़ा आश्रम नाम 'आनंदाश्रय'। श्रीवल्लीसी स्थापिला परिज्ञानाश्रमांनी चिन्मय। वृद्धाश्रमीच़ अन्न मिळण्याची सोय। स्वामींनी केली आनंदे॥४८॥ नाश्ता भोजन सर्वही प्रतिदिनी। आनंदाश्रयात पाठविण्याची सोय करूनी। श्रीवल्लीत असता भेट देवूनी। स्वामींनी दिलासा दिधला वृद्धांसी॥४९॥ विविध विषयावरील पुस्तके अनेक। वेद पुराणादि ग्रंथ धार्मिक। वाचनाकारणे उपलब्ध केली निःशुल्क। ग्रंथालय बांधूनी॥५०॥ श्रीवल्ली मठाची नूतन कचेरी। संगणकासहित आधुनिक स्थापिली सारी। तेणे वैश्विक संपर्क अत्यंत ज़रूरी। साध्य ज़ाहला क्षणमात्रे॥५१॥ संगणकाद्वारे स्थापूनी संकेत स्थळ। मठाच़े कार्य आणिक प्रकल्प समूळ। अद्ययावत् माहिती मठाची उज्ज्वळ। उपलब्ध केली जगांतरी।।५२।। 'वसुधैव कुटुम्बकम्' ही संकल्पना। संकेत स्थळाद्वारे साध्य केली जनां। जेणे सारस्वत एकतेची भावना। रुज़ू लागली जगी सारस्वतांपरी।।५३।। ज़शा कुटुम्बातील सर्व घटना। सहज़ ज्ञात होती कुटुम्बियांना। तशा मठातील नियोजित घटना। कळू लागल्या सर्वांसी जगांतरी।।५४।। परदेशी जन्मलेल्या सारस्वत बालयुवकांत। मठाच़े आकर्षण वाढले खचित। सनातन रूढी संस्कार ज़ाहले परिचित। भारतीय संस्कृतीच़ा आदर दृढावला।।५५।। मठाविषयी उद्भवली प्रासादिक उत्सुकता। स्वामींठायी जडली निःसीम आत्मीयता। उदेली सकारात्मकदृष्टि सापेक्षता। मति प्रफुल्लित जाहली अंतरी।।५६।। कचेरीच्या इमारतीत ध्यान मंदिर। संन्यासी अतिथींस्तव निवासस्थान सुंदर। बांधूनी स्वाध्यायार्थ ध्यान मंदिर। श्रीवल्ली मठ केला

परिपूर्ण॥५७॥ पंचवटीचा नैसर्गिक रम्य परिसर। पंचवटी मार्गाचा केला विस्तार। तेथीच्या इमारतीचे पुनर्निर्माण महत्तर। करूनी चौफेर लावियले पुष्पवृक्ष॥५८॥ उत्सवासी येती हज़ारो जन। त्यांसाठी स्नानगृहे बांधवून। आणिक शौचालये आधुनिकता सम्पन्न। बांधियली सर्व मठांच्या परिसरात॥५९॥ भारतीय रेल्वेसी करूनी विनंती। चित्रापुर रेल्वे स्थानक उभारिले निश्चिती। तेणे पर्यटकांची सोय सहज़गती। ज़ाहली उत्तम श्रीवल्लीसी॥६०॥ 'श्री चित्रापुर मठ चॅरिटेबल ट्रस्ट'। 'भारतीय एग्रो इंडस्ट्रीयल फाऊंडेशन' विशिष्ट। यांच्या संयुक्त विद्यमाने घनिष्ट। कार्य योजिले परिमोचनार्थ॥६१॥ परिमोचनाचा कार्यक्रम स्तुत्य। पांच ग्राम दत्तक घेण्याचे कृत्य। पंचक्रोशीतील जनोद्धाराचे सत्कृत्य। करण्याचा विडा उचलिला स्वामींनी॥६२॥ ग्रामीण जनांसी करावे व्यसनमुक्त। प्रत्येक कुटुंबासी करावे स्वायत्त। आर्थिक सुबत्ता देवूनी सुशक्त। चिंतामुक्त करावे जनांसी॥६३॥ सुतार, कुम्भार, गवळी, धनगर। यांसी तज्ञांच्या मार्गदर्शनाने सत्वर। ज्ञान आणिक अनुभवाचा संकर। साधियला आधुनिक उपकरणे देवूनी॥६४॥ स्वायत्त स्त्रियांचा स्थापियला बचत गट। स्त्रियांनी सांभाळूनी संसाराचा थाट। संकटातूनी योग्यरीत्या काढूनी वाट। आत्मनिर्भर ज़ाहल्या जीवनी॥६५॥ उत्पादन जनांचे ज़ाहले द्विगुणित। अपेक्षा उंचावल्या जनांच्या निश्चित। कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास ज़ाहला वृद्धिंगत। आनंद ज़ाहला स्वामींसी॥६६॥ भविष्यकाळी परिमोचनाचा करण्या विस्तार। तीनशे कुटुम्बियांचा करण्या उद्धार। स्वामींनी केला दृढ निर्धार। येत्या तीन वर्षाच्या कालावधीत पहा॥६७॥ पुण्यात मठ बांधविला नवीन। कार्ला मठाचे केले नूतनीकरण। विस्तीर्ण पाकगृह बांधियले परिपूर्ण।

स्वयंपाकाचे सहज़ ज़ाहले संचलन॥६८॥ स्थापिली स्वतंत्र नवीन यज्ञशाळा। स्वतंत्र मंदिरात स्थापियले नागदेवतेला। नियमित रोग्यांसी तपासण्याला। नूतन आरोग्य केंद्र प्रस्थापिले॥६९॥ खास वृद्ध वा दुर्बलांच्या सोयीसाठी। उन्नयनी उभारली एक छोटी। स्वागतकक्ष भोजनगृहापाठी। बांधियला स्वतंत्रपणे॥७०॥ नियमित विद्युत केंद्र संचलित करून। अन्य स्थळी शौचालये बांधियली अर्वाचीन। श्रीपरिज्ञानाश्रम मार्गाचा विस्तार करून। सुशोभित केला मठ परिसर॥७१॥ सन्निकर्ष सेवा प्रति रविवार। कार्ला मठात करण्या निरंतर। स्वामींनी आज्ञापिले भक्तांसी सत्वर। तेणे सेवा आपैसी ज़ाहली॥७२॥ आळीपाळीने येवूनी प्रति रविवारी। सन्निकर्ष सेवा प्रत्येक मठसभा करी। भक्त कार्ल्यासी राहूनी सप्ताहभरी। सेवा करिती श्रद्धाभावे॥७३॥ स्वामी सद्योजात शंकराश्रमांच्या आदेशानुसार। प्रत्येक सप्ताहात येवूनी शनि-रविवार। व्यवस्थापकांच्या योग्य सूचने अनुसार। श्रमसेवा करिती युवाजन॥७४॥ आता सांगु स्वामींचे अनुपम कार्य। वाराणसीत मठ स्थापण्याचा घेता निर्णय। कार्यकर्त्यांनी आरंभिले स्थळ शोधन-कार्य। पावन गंगेच्या पवित्र तटी॥७५॥ शोधनार्थ प्रवेशिता एका इमारतीत। गुरुवर्य आनन्दपरिज्ञानाश्रमांचे छायाचित्र पुनीत। पाहता कार्यकर्ते ज़ाहले स्तंभित। महत् आश्चर्याने॥७६॥ चौकशीअन्ति ज्ञात ज़ाहले। सद्गुरु आनन्दाश्रम, परिज्ञानाश्रम पूर्वी त्या स्थळी राहिले। कार्यकर्त्यांनी तत्क्षणी दूरध्वनीने कळविले। स्वामी सद्योजात शंकराश्रमांसी॥७७॥ गुरुपरम्परचे अनुमोदन मानूनी। प्रसन्नतेने निर्णय घेतला स्वामींनी। त्यास्थळी वाराणसी मठ स्थापूनी। करावा श्रीवल्ली मठाचा विस्तार॥७८॥ परिव्राजकाचार्य स्वामी सद्योजात शंकराश्रमांनी।

वाराणसी पुरातन तीर्थक्षेत्र स्थानी। नवीन मठ निर्माण करूनी। सोय केली चित्रापुर सारस्वतांची॥७९॥ स्वामींनी इमारतीत केले योग्य व्यवस्थापन। सुगम ज़ाहले सारस्वतांचे आवागमन। काशीत राहण्या हक्काचे स्थान। प्राप्त ज़ाहले चित्रापुर सारस्वतांसी॥८०॥ श्रीवल्ली ग्रामस्थांसाठी मनोहर। लग्न मुंजी कार्यास्तव सुंदर। अत्यंत अल्प भाडे तत्त्वावर। 'श्रीपरिज्ञानाश्रम सभागृह' बांधियले॥८१॥ 'परिज्ञान फौंडेशन' संस्थेमार्फत। स्वामींनी भूखंड घेवूनी निश्चित। कॅम्ब्रे ग्रामी भूमीपूजन केले त्वरित। हस्तनिर्मित कागद उत्पादनार्थ योजिले॥८२॥ या प्रकल्पानुसार भविष्यकाळी खचित। लघु उद्योगासी प्राधान्य लाभेल सतत। कागदापासूनी ज़े उद्योग निर्मित। त्यास्तव रोज़गार मिळेल स्थानिकांसी॥८३॥ स्वामी ईश्वरानंद गिरींचे लागावे चरण। श्रीवल्लीच्या प्रवित्र मठासी पावन। ऐसी स्वामी सद्योजात शंकराश्रमांची गहन। इच्छा वसे सात्त्विक ॥८४॥ अनेक वर्षांनी होता श्री ईश्वरानंद गिरींचे आगमन। आनंदे व्यापिले स्वामी सद्योजातांचे मन। प्रसन्नतेने भरियले वातावरण। संतोष परिमळ पसरला चोहीकडे ॥८५॥ ग्रामीण महिलांसी प्रशिक्षण देवूनी। सन दोन हज़ार अकरा डिसेंबर २५च्या सुदिनी। स्वामी ईश्वरानंद गिरीं हस्ते उद्घाटन करूनी। शुभारंभीला ग्रामोद्योग कॅम्ब्रे श्रीवल्लीसी॥८६॥ समाजात ज़ाहले ज़े प्रबोधन। धर्म व समाजकार्यात उत्साहवर्धन। मठाचा सर्वांगीण उत्कर्ष पाहून। तोषले स्वामी ईश्वरानंद गिरी महाराज॥८७॥ 'श्रीमत् परिज्ञानाश्रम हॅण्ड मेड पेपर युनिट'। ऐसे कारखान्यासी नाम देवूनी सुष्ट। ग्रामीण स्त्रीउद्धाराचे काम उत्कृष्ट। आरंभिले स्वामी सद्योजात शंकराश्रमांनी॥८८॥ स्वामींसी प्राप्त गुरुदक्षिणेतूनी। स्वतंत्र निधि उभारूनी।'परिधारणम्'

नामे योजना आखूनी। सत्कार्य आरंभिले स्वामींनी॥८९॥ श्रीवल्ली मठान्वये धरूनीआर्थिक छत्र। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांनी पवित्र। औषधिय उपचारार्थ चालविले सत्र। ऑक्टोबर दोन हजार दहा साली॥९०॥ स्वामीजी वदती कार्यकर्त्यांसी। आमुच्या धनाचा लाभ व्हावा गरजूंसी। आम्ही अनासक्त संन्यासी। आम्हा कासया धन संचय॥९१॥ पादकाणिकेचा पैसा लोकांनी अर्पिला। दीन-गरजूंच्या प्रयोजनार्थ लागावा भला। दीन रूग्णांच्या उपचारार्थ सगळा। धनसंचय कामी यावा॥९२॥ आपुल्याच समाजात वसती अनेक। दुर्धर रोगाने ग्रस्त लोक। तयांसी तनमनाचे दुःख। ग्रासे सतत जीवनी॥९३॥ अगतिक अनारोग्या कारणे। रूग्णांचे असह्य जाहले जीणे। व्याधि-उपचारार्थ खर्च करणे। अनिवार्य जाहले जीवनी॥९४॥ स्वजनांवरी अत्यंत प्रीति। परंतु बिकट आर्थिक स्थिति। जनांची पाहता अगतिक स्थिति। दुःख वाटे अंतरी॥९५॥ या दुःखितांची करण्या चिंता दूर।जरी उचलू तीळभरी भार। सार्थक होईल जन्माचे फार। यामाजी नच संशय॥९६॥ वार्षिक उत्पन्न अत्यंत कमी। तयांसी उपचारार्थ धन देण्या कामी। योजनेद्वारे देण्याची हमी। आम्ही देतो निश्चये॥९७॥ कुटुम्बियांसी देण्या दिलासा प्रामाणिक। हा प्रांजळ प्रयत्न एक। जेणे आर्थिक विवंचना प्रमुख। निरसे रूग्णांच्या कुटुम्बियांची॥९८॥ दुसरा उपक्रम परिधारणम् योजनेचा। विमा योजनेत सहयोग देण्याचा। आपत्काली दीन-गरजू विमा धारकाचा। वाहण्या आर्थिक भार॥९९॥ परिधारणम् आर्थिक योजनेचे धन। लोकांसाठी स्वामींनी अर्पिले संपूर्ण। सद्गुरुंची करुणा वसे परिपूर्ण। या आर्थिक योजनेत जाणा॥१००॥ पतंगोत्सव साजरा करून। शालेय विद्यार्थ्यांसी दिले प्रोत्साहन। श्रीवल्लीत मांडीयले

प्रदर्शन। विद्यार्थी-निर्मित पतंगांचे॥ १०१॥ हुशार होतकरु दीन विद्यार्थ्यां- लागूनी। स्वामींनी शिष्यवृत्त्या अनेक देवूनी। उच्च शिक्षणार्थ प्रवृत्त करूनी। दिधले प्रोत्साहन उज्ज्वल भविष्यार्थ ॥१०२॥ या शिष्यवृत्त्यांचा लाभ घेवूनी। वैद्य, अभियंता, शास्त्रज्ञादि बनूनी। सार्थक केले विद्यार्थांनी जीवनी। धन्य ज़ाहले पालक आणिक देणगी दाते॥१०३॥ जगासी परिचय देण्यालागूनी। श्रीवल्ली मठाचे ध्वजचिन्ह योज़ूनी। सार्थ संस्कृत श्लोक त्यावरी लिहूनी। दिव्य संदेश दिधला विशेषत्वे॥१०४॥ "चक्षुर्नो धेहि चक्षुषे चक्षुर्विख्यै तनूभ्यः। सञ्चेदं वि च पश्येम॥" या संदेशात दडला विशेष अर्थ। ऋषि प्रार्थी भावे निस्वार्थ। म्हणे भगवंता मी अध्यात्माचा पार्थ। सहाय्य करी मज़ पथावरी॥१०५॥ दिलेस मज़ चक्षूद्वय। पाहण्या दृश्यमान विश्वाचे सौंदर्य। अवलोकिण्या तव स्वरूप निरामय। अंतर्दिव्य दृष्टि मज़ देई॥१०६॥ परमार्थ आणिक समाजकार्य। याचा स्वप्रयत्ने साधुनिया समन्वय। आबाल वृद्धांसी दिधले अभय। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांनी॥१०७॥ प्रकाशूनी श्रीवल्ली मठाची मुद्रारुपे स्मृति। आंतरराष्ट्रीय स्तरावरी मिळवूनी स्वीकृति। त्रिशत वर्षीय गुरुपरम्परा कीर्ति। उज्ज्वल केली विश्वांतरी॥१०८॥'अन्तरंगिणी' नामे भजनांच्या ध्वनिमुद्रिका। लिहूनी 'ध्यान प्रवेशिका ॲण्ड अष्टमूर्ती उपासना' नामे पुस्तका। कार्यक्रमाच्या दृकश्राव्य फितीका। उपलब्ध केल्या जनांकारणे ॥१०९॥ परिसा आता देवूनिया अवधान। क्रान्तिकारक निर्णय अनन्य साधारण। स्वामी सद्योजातांनी घेतला विलक्षण। पादूका-पूजनाविषयी दोन हज़ार बारा साली॥११०॥ जगांतरी एकविसाव्या शतकाच्या प्रगतकाळी। ज़ाती भेद नच मिटला समुळी। परस्पर-ज़ाती-धर्म विवाहाने सांप्रतकाळी।

शिथिल ज़ाहले उच्च नीच भेद॥१११॥ श्रीमत् भगवद्गीतेत कथिताना तत्वज्ञान। वदती अर्जुनासी श्रीकृष्ण भगवान। मीच़ निर्मिले चतुर्वर्ण। प्रत्येकाच्या गुण कर्मापरी॥११२॥ ज़ैसे जयाच़े अंगिभूत गुण। तेवीच़ कर्मात कौशल्य परिपूर्ण। कर्मांसी प्राधान्य देवूनी निर्माण। केले चतुर्वर्ण ज़ाणा॥११३॥ किन्तु कालमान परत्वे ज़ाहले। जन्मज़ाती वरूनी भेद सगळे। उच्चनीच ज़ातीभेद उद्भवले। तेवीच़ धर्मभेद ज़ाणा॥११४॥ काहींच्या विचारांच़ा ज़ाहला जगभरी प्रसार । त्यांच्या विचारांना लाभला धर्माच़ा आकार। त्यातूनी विचार भिन्नत्वे झ़ाले साकार। नाना पंथ धर्मांतरी॥११५॥ हा मानवी मनाच़ा मद। जेणे उद्भवले ज़ातीभेद। भेदातूनी अंकुरले अप्रत्यक्ष छेद। मानवी समाजांतरी॥११६॥ एकमेव धर्म ज़ो मानवता। तयाच़े विस्मरण ज़ाहले प्रमुखतः। तेणे बुद्धीवादी कर्मठांची सत्ता। स्थिरावली कुपमंडूक वृक्षोकारणे॥११७॥ आत्मज्ञानीयांसी नसे अणुमात्र खेद। वा धर्म ज़ाती पंथांत भेद। तयांसी अंतरी लागती वेध। अनुसंधानाच़े सर्वकाळी॥११८॥ द्वितीय परिज्ञानाश्रमांनी तारिली सावकारकांता। त्यांच्या परिवारा लाविले भक्तिपंथा। गणपत रामजी मानेसी उद्धरिले तत्वता। स्वामी पांडुरंगाश्रमांनी जीवनांतरी॥११९॥ स्वामी पांडुरंगाश्रमांनी सावकार-सुत उद्धरिला। आणिक अल्लीशा यवन तारीला। स्वामी आनन्दाश्रमांनी निवास केला। पाटील गृही संपूर्ण रात्र॥१२०॥ मठातील दीन-होतुकरू कर्मचार्यांसी। गरज़ेनुसार देवूनी आर्थिक सहकार्यासी। रूज़विली कृतज्ञता श्रद्धा मानसी। स्वामी आनन्द-परिज्ञानाश्रमांनी॥१२१॥ ज़ाती-धर्म-पंथभेद विसरूनी। माणुसकी ज़ागावी मानवाच्या मनी। ऐसी अनुपम इच्छा धरूनी। स्वामी परिज्ञानाश्रमांनी आरंभिले कार्य॥१२२॥ परधर्म

ज़ातीयांस दिला मठात प्रवेश। त्यावरी टीका ज़ाहल्या विशेष। तेणे स्वामींच्या मनीचा शुद्ध उद्देश। राहिला ठायीच्या ठायी॥१२३॥ तेणे स्वामींचे अनेक परज़ातीय भक्त। ज़े पादुका-पूजन वांछिती मनांत।तयांनी इच्छा केली अभिव्यक्त। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमां समक्ष॥१२४॥ सद्गुरु परिज्ञानाश्रमांचे व्यापक विचार। आणिक भक्तांच्या मानसपूर्तीस्तव मनोहर। स्वामी सद्योजात शंकराश्रमांनी सत्वर। प्रार्थिले कार्लासमाधि समक्ष॥१२५॥ एक मार्च दोन हज़ार बाराचा सुदिन। प्रार्थिले श्रीपरिज्ञानाश्रमांसी मनापासून। स्वामींची प्रार्थना प्रेम-पुरस्सर पावन। अवधारा सज्जनहो॥१२६॥ ''अन्य धर्म ज़ातीय भक्तजन। ज़े भक्तिभावे इच्छिती पादुका-पूजन। तयांसी करण्या गुरुपादुका-पूजन। अवसर लाभावा जीवनी॥१२७॥ या विषयी निर्णय घेण्या निश्चित। मार्गदर्शन करावे आम्हा त्वरित। अनन्य भावे होवूनी प्रेरित। इच्छा अर्पिली तव चरणी॥१२८॥ ज़री निर्णय आम्ही घोषित करावा। तरी आम्हासी आदेश द्यावा। अंमलात आणण्या आम्हा लाभावा। तुमचा आशिष सर्वदा''॥१२९॥ काही दिवसा उपरांत लाभली प्रेरणा।''धर्म- ज़ाती-भेदाविना। पादुका-पूजन उपलब्ध करावे जनां। स्तुत्य निर्णय हा खरा''॥१३०॥ शालिवाहन शके एकोणिसशे चौतिस पावन। तिथी चैत्र पौर्णिमा संवत्सर नंदन। सहा एप्रिल दोन हज़ार बारा सन। दिडशे वषीर्य रथोत्सव संपन्न ज़ाहला।।१३१।। आशीर्वचनात या निर्णयाची करूनी घोषणा। ज्ञात केला विचार सकल जनां। व्यापक दृष्टिकोन स्वामींचा सर्वजनां। तोषित करीता ज़ाहला॥१३२॥ स्वामी सद्योजात शंकराश्रम वदती।'' स्वामी परिज्ञानाश्रमांची लाभली अनुमति। परितोष ज़ाहला आम्हां चित्ती।

त्यास्तव घोषणा केली या शुभदिनी।।१३३।। मठाची करूनी अनन्य सेवा । मनी ज़पूनी श्रद्धा निष्ठेचा ठेवा। मनोमनी करूनी भगवंताचा धावा। विजातीयांनीही कष्ट केले अगणित।।१३४।। शतकानुशतकांचे पुण्य फलिता आले। अन्य धर्मजातीयांनी सद्भावे कार्य केले। श्रम तयांचे सार्थकी लागले। पादुकापूजन सेवा अवसर लाभला'' ।।१३५।। त्यादिनी काही अन्यज़ातीय प्रतिनिधींनी । मनोभावे पादुका पूजन करूनी। धन्यत्व अनुभवूनी जीवनी। शुभनिर्णयाची मुहुर्तमेढ रोविली।।१३६।।स्वामींचे अनुपम अलौकिक कार्य। सांगणे आता निःसंशय अनिवार्य। तीर्थ वितरण समयी अमूल्य सहकार्य। करिती स्वामी स्वयें वृद्धांसमीप ज़ावूनी॥१३७॥ स्वामीं हस्ते घेण्या तीर्थ प्रांजळ। वृद्धांच्या अंतरी आस निर्मळ। रांगेत राहण्या शक्ति केवळ। उणी वसे देहाठायी॥१३८॥ भक्तजनांची अपार गर्दी। वृद्धापकाळी लावे अनारोग्य वर्दी। परि स्वामीजी असहायांचे दर्दी। म्हणूनी हे सत्कार्य आरंभिले॥१३९॥ वृद्ध अपंग वा मतिमंद। सर्वांस लाभे मनी परमानंद। स्वामींसही लाभे निजानंद। पाहता जनांचे प्रसन्न मुख॥१४०॥ आता देवूनीया अवधान। तीर्थमहिमा अवधारा विलक्षण। सद्गुरुं हस्ते प्राप्त तीर्थग्रहण। करीता अलभ्य लाभ होई॥१४१॥ सद्गुरु सदा आत्मज्ञानी। भक्तांचे अंगीभूत गुण ज़ाणूनी। तयांस प्रोत्साहन देती जीवनी। जेणे धैर्य प्राप्त होई भक्तासी॥१४२॥ सद्गुरु हा मानव दृश्यमान। इतरांपरिच भासे सर्वसाधारण। परन्तु तयाचे रोम रोम पूर्ण। उज़ळे आत्मतेजाने॥१४३॥ मानवी काया हेंचि मंदिर। संत वदती तन हेचि पंढरपूर। काया काशीक्षेत्र मनोहर। वदती आदि शंकराचार्य॥१४४॥ या देवालयात वसे निरंतर। आत्मारुपी परमेश्वर। परमात्मा सगुण होवूनी साकार। प्रगटतो सगुण

सद्गुरुरूपे॥१४५॥ नयनी देखता अन्यांपरिच्‍ शरीर। तरी कासया म्हणावे तयासी परमेश्वर। हा सहज़ सुलभ प्रश्न वारंवार। उद्भवे सामान्यतः मनुष्यांच्या मनी॥१४६॥ ज्ञात होता स्वतःच्‍े शाश्वत स्वरूप। शिवत्वात विलसे जीव सुखरूप। अणूरेणूत स्वयं- प्रकाशित निजरूप। पाही आत्मज्ञानी अंतरी ॥१४७॥ सद्गुरुंची प्रत्येक कृति सृजनशील। कालबद्ध व्यवस्थापन प्रबळ। पंचमहाभूतांकित कार्य सारे सकळ। गुरुशक्तीच्या आधीन सर्वकाळी॥१४८॥ ज़णू हा हिरण्यगर्भाच्‍ा जन्मदाता। आनंद- सागरचि तत्वतः। अस्तित्व मात्रे पुनीत करी भक्तां। देहातूनी दिव्य प्रकाश उज़ळे॥१४९॥ ज़णू पेशी पेशी सूर्य एक। अनुभवी दैदिप्यमान निजप्रकाशाच्‍े सुख। आकाशगंगा ज़णू अवयव प्रत्येक। ऐशा दिव्य महातेजे भारावला॥१५०॥ ऐशा आत्मज्ञानी सद्गुरुंच्या पाई। षड्रीपूंच्‍ेही परिवर्तन होई। तयांची प्रत्येक क्रिया आकार घेई। पवित्र तीर्थाच्‍ा॥१५१॥ हृदयीच्या गंगेच्‍े होई ज्ञानगंगेत परिवर्तन। भक्ति यमुनेच्‍े प्रतीक पूर्ण। नर्मदा योगदायिनी बनून। सद्गुरु देहांतरी वास्तव्य करी॥१५२॥ करुणामयी सरिता कावेरी। वात्सल्य क्षमामयी गोदावरी। वाहे सिन्धू भाग्यदायिनी बनूनी अंतरी। सरस्वती गुप्त अलौकिक सत्य ज्ञान॥१५३॥ या सप्त सरिता चैतन्यमय। सद्गुरु देहांतरी होवूनी आनन्दमय। नाडीतूनी प्राणशक्तिद्वारे क्रिया अक्षय। करीती तन्मयतेने सद्गुरु इच्छेपरी॥१५४॥ लोहासी चुंबकाच्‍े ज़ैसे आकर्षण। तैसे शिष्याच्‍े गुरुचरणी ज़डे मन। शिष्य नतमस्तक होता गुरुपदी पावन। सद्गुरु कृपा होई आपैसे॥१५५॥ भक्तासी प्रबोधन करुनी असामान्य। अंगीभूत गुणांसी देवूनी प्राधान्य। प्रोत्साहन देवूनी जीवन धन्य। घडवी साधकाचे॥ १५६॥ सत्य क्षमा दया ज्ञान।

शम दम वैराग्य परिपूर्ण। विशुद्ध मानस तप प्रिय भाषण। परब्रह्म स्वरुपी रत चर्या॥१५७॥ ऐशा सद्गुरुंचे करिता पादपूजन। वा करीता पादुका-पूजन। गुरुशक्तीचा स्रोत जलात मिसळून। पवित्र तीर्थाचे स्वरूप घेई॥१५८॥ वा सद्गुरुकृत विग्रह पूजन। त्या अभिषेकाचे जल पावन। तेही पवित्र-सिद्ध तीर्थ बनून। प्राशकांसी पुनीत करी॥१५९॥ जैसा भाव तैसा देव। ऐसे संत वदती सर्व। सद्गुरु हस्ते प्राप्त तीर्थ सदैव। प्रभाव दावी जीवनी॥१६०॥ या तीर्थाने होई व्याधि निरसन। स्थैर्य धरी चंचल मन। कित्येकांची इच्छापूर्ती होवून। लाभे धैर्य, समाधान चित्ती॥१६१॥ शांत होता चित्तवृत्ति। संशय विरहीत होई मति। तेणे व्यवहारी लाभूनी प्रगति। साधनेस्तव आकर्षित होई मन॥१६२॥ ऐसा हा तीर्थाचा महिमा। जयासी नसे शब्दानुरूप उपमा। सद्गुरु हस्ते प्राप्त तीर्थोदकाचा मधुरिमा। अनुभवेची घ्यावा भक्तांनी॥१६३॥ भक्तांची तृप्ति आणि स्वामींचे प्रसन्न मुख। स्मरुनी अंतरी उपभोगुया सुख। सद्गुरु चरणी होवुनी नतमस्तक। समर्पिला एकोनसप्तत्यध्यायः भक्तिभावे॥१६४॥

॥अध्याय ६९॥ ॥ओंव्या १६४॥ ॐ तत् सत्- श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥

॥ इति एकोनसप्तत्यध्यायः समाप्तः॥

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरूभ्यो नमः। श्रीभवानीशंकराय नमः॥१॥ सकल गुरुपरम्परेसी करूनी नमन। सद्गुरु सद्योजात शंकराश्रमांसी विनम्र आवाहन। गुरुपूजन विषयीचे आशीर्वचन। शब्द फुलांनी शृँगारावे या ग्रन्थान्तरी॥२॥ आता परिसा सद्गुरुंचे बोल। शब्दांसी रूजू द्या हृदयी सखोल। सांकेतिक वा स्पष्ट गुरुमुखी अनमोल। ज्ञानाचा अक्षय स्त्रोत ज़ाणा॥३॥ पूजेस्तव ज़रूरी कलश किंकिणी अक्षता। काडेपेटी दीप प्रज्वलना करिता। पुष्पे, गंध, निरांजन आरती करीता। आसन, नैवेद्य, आणिक दक्षिणा॥४॥ पाट, ताट पादुका स्थापनार्थ। वाटी, चमचा, ताम्हण आचमनार्थ। अगरबत्ती, कर्पूर पुष्पे पूजनार्थ। तेवीच शंख इत्यादि सामग्री॥५॥ पूजेस्तव सामग्री करूनी निवेदन। आबाल वृद्ध नवोदितांसी ध्यानी धरून। सामग्रीची उपयुक्तता समज़ावून। कथिला पूजाविधि अथ ते इति॥६॥ प्रत्येक सामग्रीसी विशेष महत्व। घंटा वा किंकिणीतही वसे देवता तत्व। ध्वनी लहरींचे येथे महत्व। तेणे एकाग्रता साधे सहज़तया।७॥ पूजा सामग्रीसी आधि दैव संबोधून। ज़णू शास्त्रांनी सामग्रीसी दिला बहुमान। त्याविषयी करीती समर्थन। सद्गुरु सद्योजात शंकराश्रम आशीर्वचनातूनी॥८॥ सामग्री ठायी दैवी शक्तीचे अधिष्ठान। घंटारवात नादब्रह्माची सत्ता पावन। मंजुळ ध्वनीने प्रसन्न होई मन। पूजेस्तव समरसता दाटे चित्ती॥९॥ प्रज्वलित दीप देतसे प्रकाश। दीपास तेजान्वित करी आध्यात्मिक प्रकाश। त्या तेजतत्त्वाने व्यापिले आकाश। ऐशिया संविद-दीपासी करावा नमस्कार॥१०॥ गंधात समाविष्ट शीतलत्व। पृथ्वीतत्त्वाचे येथे महत्व। अक्षतांत प्रतिकात्मक अमरत्व। अक्षय ब्रह्माचे निश्चित॥११॥ पंचप्राणांचा अधिष्ठाता

वायुतत्त्व। पंचकोशात विलसे याचे महत्व। अगरबत्तीत सुगंधाचे सत्व। धूपास्तव सामग्री योजिली॥१२॥ दिव्य भावे स्मरूनी निरंतर। कल्पनातीत जो परमेश्वर। विविध रंगी पुष्पे मनोहर। अर्पावी भक्तीभावे॥१३॥ शंखध्वनि उमटे पोकळीतून। आकाशतत्त्वाचा निर्देश येथे महान। देवदेवतांसी होई आवाहन। शंख ध्वनीने पूजनांतरी॥१४॥ कर्पूरांत दडले अग्नितत्त्व सुप्त। सद्गुरुंचे अप्रत्यक्ष वास्तव्य पादुकांत। पाटांत आसनशक्ति गुप्त। कलश वा घट सृजन शक्तीचे प्रतिक॥१५॥ पाद पूजनार्थ घेतो कलशात जल। सप्त जलयोगिनींचे वास्तव्य निर्मल। ताम्हणात धातूदेवतेचे अधिष्ठान प्रबळ। आचमनार्थ वापर पूजेंतरी॥१६॥ नैवेद्यात अन्नब्रह्माचा संकेत। ताम्बूलात जीवशिव एकत्व गुप्त। अपराजितेची ऐश्वर्यशक्ती सुप्त। दर्शविली दक्षिणारूपे शास्त्रांतरी॥१७॥ मन्त्रपुष्पाञ्जलीत मन्त्रशक्ति तारक। न्यासात दिगबन्ध आवश्यक। मुद्रांकित दिव्यशक्ति आवाहनार्थ समर्पक। पूजातन्त्रात वर्णिली ऋषीमुनींनी॥१८॥ पाहूनिया पूजासामग्रीतील दिव्यशक्ति। आधिदैव ऐसे द्रष्टा ऋषि सम्बोधती। अणुरेणु व्याप्त गुरुशक्तिची महती। दर्शविली असे शास्त्रान्तरी॥१९॥ ऐसी पूजासामग्री घेवूनी आधी। चित्त ठेवूनिया आनंदी। समीप वसे देवाची मंगलमय सन्निधि। ऐसा दृढ विश्वास धरावा अंतरी॥२०॥ देव होवूनी देवासी भजावे। म्हणजे अंतःकरण-शुद्धीस साधावे। तन्मयता साधूनी भक्तीभावे। मुख्य पूजेसी करावा प्रारंभ॥२१॥ प्रथम करुनिया गुरुंचे ध्यान। तदनंतर सप्रेमे करावे आवाहन। आवाहनाचे सात्त्विक प्रयोजन। स्वामींनी कथिले करुणाबळे॥२२॥ तीन श्लोकांचा देवूनी आधार। सद्गुरु सद्योजात सगुण साकार। आशीर्वचनातूनी करिती शब्दाकार। ध्यानाचे पवित्र तंत्र

परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

सुलभतेने॥२३॥ गुरुपूजनावरी करिता मनन। पूजाविधि ज्ञात होई संपूर्ण। तेणे सहज़तया होई गुरुस्मरण। एकाग्रता साधे अंतरी॥२४॥ भ्रूमध्ये आज्ञाचक्रात करावे ध्यान। द्विदल-कमल-युक्त चक्र पावन। तेथे गुरुंसी करावे आवाहन। आराधनेस्तव प्रसन्न चित्ते॥२५॥ स्मरावे गुरुचे मुखारविंद प्रसन्न। चिन्मुद्रा प्रकट करूनी विराजमान। तेज गुरुंचे दिसे दैदिप्यमान। ज्ञानप्रदायक सर्वदा॥२६॥ वेदांतात कथियले ज़े सत्य। ऐसी बोधमार्तंड गुरुमूर्ती स्तुत्य। शिवमय गात्र धारण करिती नित्य। श्रुती वेदवेदांताचे सार ज़ाणा॥२७॥ अज्ञान आणिक तत्जन्य शोक निवारक। पूर्णत्वात रमलेले आनंदकारक। भक्त-अनुग्रहार्थ गुरु करुणाकारक। प्रकटले ध्यानी भक्ताच्या॥२८॥ ऐशापरि सद्गुरु स्वरुप चिंतुनी। संपूर्ण शरणागती साधूनी। अंतरंगी संयम ज़पूनी। आज्ञाचक्रात गुरुंसी करावे आवाहन॥२९॥ दुज्या ध्यान श्लोकाविषयी सविस्तर। स्वामी सद्योजात शंकराश्रम सद्गुरुवर। भक्तांसी समज़ाविती प्रेमपुरस्सर। गुरुपूजन विषयी आशीर्वचनातूंनी॥३०॥ अनाहत चक्र स्थित हृदयी। तीव्र साधना करते समयी। भक्तीभावे साधक हृदयी ध्यायी। सद्गुरुंसी आवाहन करिताना॥३१॥ हृदयकमळी मधोमध विराजमान गुरुमूर्ती। तेजभारे दैदिप्यमान ज़री भासती। चन्द्रकला प्रकाशापरी शीतल असती। प्रशांति विलसे दिव्य मुखावरी॥३२॥ अभीष्टवर-प्रदायक दक्षिणामूर्ती। शास्त्रज्ञान देण्यार्थ धरिले पुस्तक हाती। चिन्मुद्राधारी चिन्मय मूर्ती। भक्तांसी अभय प्रदान करी॥३३॥ यापरि सद्गुरु-स्वरूप चिंतूनी। पूजेपूर्वी करावे ध्यान मनी। तेणे अंतरंगी विश्वास उद्भवूनी। चित्ती लाभे समाधान॥३४॥ आपुल्या ध्यानी प्रकटले सद्गुरु। हा गुरुंच्या अनुग्रहाचा प्रभाव सुंदरु। भक्ताचा

भाव वर्धिण्या दयासागरु। भक्तध्यानी अवतरला॥३५॥ विनम्रतेने ऐसी राखूनी ज़ाण। कृतज्ञता भारे करावे नमन। तद्नंतर करावे गुरुंसी आवाहन। वदती सद्गुरु सद्योजात शंकराश्रम॥३६॥ सहस्रार चक्रात शिरी करिता ध्यान। ब्रह्मात्म ऐक्य भावात्मक गुरुशक्तीसी आवाहन। जेथे शिवशक्तीचे सामरस्य परिपूर्ण। भक्त करी सहस्रदल कमलांतरी॥३७॥ सहस्रारी कैसे करावे आवाहन। त्याविषयी स्वामी सद्योजात करिती कथन। एकाग्र चित्ते करावी श्रवण। सद्गुरुवाणी निर्धारे॥३८॥ प्रथम करुनिया गुरुपरम्परेचे स्मरण। तद्नंतर करावे गुरुंसी आवाहन। सद्गुरु सन्निधी ज़ावे शरण। स्वरूप निरुपणार्थ इच्छा धरूनी॥३९॥ प्रकाश, विमर्श ही तत्वे दोन। तेवीच स्वच्छ शिवमय प्रकाश पावन। विमशार्थ शक्तिदायक गुरुतत्त्वासी महान। परमगुरु रूपात करावे आवाहन॥४०॥ स्वात्माराम स्वरूपी परमेष्ठी गुरु। सर्वबन्धमुक्त अथांग सागरु। सर्वात्मभावांत स्थित विश्वंभरु। सर्वसाक्षी सर्वदा॥४१॥ सर्वांच्या हृदयी विराजमान। भेद विरहीत पूर्णत्वात रममाण। प्रत्येक हृदयातील चैतन्य स्पंदन। सर्वत्र व्याप्त ज़े विश्वांतरी॥४२॥ ऐसे चिंतूनी गुरुंसी द्यावे आसन। शिरी सहस्रदलात पावन। तदनंतर करावे आवाहन। गुरु-आराधना करावी मनोभावे॥४३॥ स्वामी सद्योजात शंकराश्रम करीती इशारा। भक्तीविण भासे सर्व व्यर्थ पसारा। श्रद्धा विश्वासाचा घेवूनी सहारा। गुरुंसी स्मरावे अंतरंगी॥४४॥ भावाविण पूजा न होई सिद्ध। केवळ मानसी उचंबळे मद। गुरुभक्तीचा घेवूनी आसरा विशुद्ध। शरणागत भावे करावे गुरुंचे ध्यान॥४५॥ यापरि तिन्ही चक्रांत करिता आवाहन। भावबळे सलिल होई जागरण। गुरुकृपे त्रिचक्र शुद्धि होवून। प्रसन्नता लाभे भक्तमानसी॥४६॥

सद्गुरु चल अचल दोन्हीत विराजमान। चैतन्य चित्शक्तीचे अधिष्ठान। ऐशिया सद्गुरुचे करावे पादपूजन। पवित्र जल घेवूनी॥४७॥ अनन्य शरणागतीने अर्पिलेले जल। होई गंगाजला सदृश पवित्र निर्मळ। शरणागत भावे अर्पिलेले जल। तेंची पवित्र तीर्थ ज़ाणा॥४८॥ विशुद्ध मने अर्पिता पादोदक। भक्तासही लाभे अंतरी सुख। गंगाजलापरि शुद्ध सात्त्विक। पादोदकासी लाभे वैभव॥४९॥ औषधी सुगंधी रत्नादि युक्त जल। विनय गुणेमंडीत अनन्य भक्त प्रांजळ। कैवल्यदाता सद्गुरुंसी सोज्वळ। अर्घ्यरूपे अर्पावे पादोदका उपरांत॥५०॥ अर्घ्यानंतर करावे आचमन। तीन वेळा द्यावे उदक पावन। आचमनाचा गर्भितार्थ गहन। समज़ाविला स्वामींनी जनांसी॥५१॥ कर्मे मानसिक वाचिक कायिक। अर्पावी गुरुंसी स्मरणपूर्वक। जलासी निर्मलत्व, पावित्र्य, सात्त्विक। प्राप्त होई भक्ति कारणे॥५२॥ ऐसे करीता त्रिशुद्ध आचमन। सद्गुरु होवूनी प्रसन्न। सहर्षे स्वीकारिती आचमन। तन्मयता प्राप्त होई गुरुकृपे॥५३॥ तद्उपरान्त विधि, गुरु स्नान। कल्मषविरहीत निर्मुक्त गुरुतत्त्व महान। ऐशा गुरुंसी स्नानाचे काय प्रयोजन। ते परिसा सज्जनहो॥५४॥ सद्गुरु सद्योजात वदती जनांसी। वैचारिक मंथन करा मानसी। औपचारिक स्नान अर्पावे सद्गुरुंसी। कोणत्या कारणे ज़ाणा हो॥५५॥ अनंत गुरुतत्त्वासी विशुद्ध परिपूर्ण। कोणत्या उदके घालावे स्नान। जयापासूनी ज़ाहले जल निर्माण। शुद्धत्वासी शुद्ध करावे कैसे॥५६॥ श्रद्धापूर्वक करूनी शास्त्रांचे अध्ययन। साधनेने करावे मनन चिंतन। विचार-विमर्शे करूनी रसग्रहण। ज़ाणावे शास्त्रातील सार॥५७॥ शास्त्रातील सारांश रसतापूर्ण। तोयस्वरूपे स्नानार्थ करावे अर्पण। श्रद्धेने घालिता भक्ताने स्नान। तोषती अंतरी

सद्गुरु॥५८॥ स्नानानंतर पूजनांतरी अर्पितो वस्त्र। गुरुतत्त्व जे व्याप्त सर्वत्र। ऐशा सद्गुरुंसी कैसे अर्पावे वस्त्र। त्याविषयी परिसा स्वामींचे बोल॥५९॥ गुरुतत्त्व सच्चिदानंद स्वरूप। निर्गुण निरामय भवरूप। मायावस्त्रे वेष्ठित अलंकृत स्वरूप। ऐसे हे महान तत्त्व ज़ाणा॥६०॥ गुरुंसी अर्पितो वस्त्रे दोन। उत्तरीय आणिक पीतांबर नविन। श्रद्धा, भक्ति रूपी वस्त्रे समर्पण। भक्त करी गुरुपूजनेंतरी॥६१॥ भक्त होवूनी तन्मय अंतरी। श्रद्धेने गुरुंसी विनवणी करी। हे सच्चिदानंदगुरु कृपया स्वीकारी। परिधानार्थ ही दोन वस्त्रे॥६२॥ गुरुपूजनांत वस्त्रार्पण हे प्रतिकात्मक। अंतरी श्रद्धा-भक्तीचि देई सुख। गुरुंसी अर्पिता सद्भावे प्रामाणिक। सद्गुरु स्वीकारी प्रसन्न चित्ते॥६३॥ सद्गुरु भावाचा भूकेला। सर्वशक्तीमान स्वयंभू आगळा। म्हणूनिया होवूनी अंशरूपे वेगळा। भक्त स्वरूपे स्वीकारी भावपूजा॥६४॥ अन्यथा त्यासी काय उणे। कोण कुठले देणे घेणे। हेची अद्वैताचे सांगणे। परि द्वैताचा आनंद अवर्णनीय॥६५॥ सद्गुरुंसी कल्पनेने करावा शृंगार। अर्पूनी चन्दन अक्षतादि अलंकार। म्हणावे हे गुरु मज़ करी पार। अपरिपक्व अवस्थेतूनी॥६६॥त्रिनेत्रधारी ईश्वरासी स्मरूनी। त्र्यंबक मन्त्र म्हणावा पूजनीं। रमणीय पुष्टीवर्धक गुरुतत्त्व कल्पुनी। सद्गुरुंसी आळवावे चित्ती॥६७॥ हे सद्गुरु तू सर्वव्यापक। सर्व दृष्टीने तू सदा उद्धारक। आम्ही अनुभवितो स्थिति अपरिपक्व। मृत्यु बन्धनातूनी मुक्त करी॥६८॥ मुक्तीतूनी लाभो परिपूर्णत्व। प्राप्त होवो आम्हा अमृतत्त्व। संसारी ग्रस्त होवूनी अपूर्णत्व। अनुभवितो निज जीवनी॥६९॥ सुगन्धी शीतल ऐसे हे चन्दन। तैसे तुझे स्वरूप शांत मनभावन। आनन्द परिमळे व्यापो माझे मन। पूर्णज्ञाने प्राप्त जे॥७०॥ हे त्र्यंबका तूंची

ईश्वर। गुरुरूपांत आराधना तुझी श्रेष्ठतर। ब्रह्मात्म ऐक्य भाव सुखकर। स्थापित करी मम अंतरंगी॥७१॥ तदनंतर विधि पुष्पार्पण। सद्गुरुंसी विनम्रतेने वंदून। विविध रंगी सुगन्धी पुष्पे घेवून। अर्पावी गुरुपूजनांतरी॥७२॥ पुष्पांचा गर्भितार्थ महत्तर। घेवूनी श्लोकाचा आधार। समज़ाविती स्वामी सद्योजात सद्गुरुवर। जनांसी आशीर्वचनातूनी॥७३॥ पुष्प निसर्गाचे प्रफुल्लित सौंदर्य। अनामिक उत्स्फूर्त औदार्य। पूजनार्थ मूक सहकार्य। सृष्टिची विनम्रता खरी॥७४॥ उपलब्ध करूनी पुष्पे पूजनार्थ। निसर्ग प्रकट करी भाव निस्वार्थ। कृतज्ञता भावे ज़ोडी परमार्थ। निसर्ग सृष्टीही जनासंगे॥७५॥ आणिक वदती श्री सद्योजात शंकराश्रम। जागृति स्वप्न सुषुप्ति अवस्था उत्तम। तूर्या एक अधिष्ठान परम। साधकावस्थेंत अंतःसाक्षी स्थिति खरी॥७६॥ तूर्या सविचार सविकल्प समाधि। तूर्यावनीं संचरुनिया आधी। तेथीची निवडक पुष्पे सुगंधी। अर्पावी गुरुसन्निधी दिव्य भावे॥७७॥ ''कल्पनेपरे हे विशाल गुरुतत्त्व। परि अणूरेणूतही व्याप्त सूक्ष्मत्व। सूर्यचन्द्र नक्षत्रांचे अस्तित्व। तुझ्या कृपेची उदेले॥७८॥'' नक्षत्रमाळांचा घालूनी अलंकार। प्रकटलासी ध्यानी सगुण साकार। हृदयी बैसोनि देसी आधार। तव सामीप्य अनुभवितो क्षणोक्षणी॥७९॥ ऐसा हृदयी धरूनी विश्वास। आळविता महानतत्त्वासी खास। भक्ताचा भाव पाहूनी निरागस। शीघ्र अनुभवा येई गुरु सान्निध्य॥८०॥ ऐसे सांगूनी जनांसी निश्चयपूर्वक। समज़ाविला पूजाविधि समर्पक। धूपाचा अर्थ ज़ो सांकेतिक। आणि प्रयोजन विज्ञानासह॥८१॥ पंचकोशमय हे शरीर। तयात वसे आत्मतत्त्व मनोहर। जेवी गुग्गुळात लपला परिमळ सुन्दर। ज्वलनाने पसरे आसमंती॥८२॥ गुग्गुळापरि या पन्चकोशांसी। ज्ञानाग्निने

ज़ाळीता स्थूल शरीरासी। प्राण स्पन्दन येई अनुभवासी। तेधवा दिव्यशक्तीचा प्रत्यय येई॥८३॥ मी नव्हे प्राण ऐसे भान। साधक चित्ती अनुभवे उद्भवून। प्राणमय शरीर गुग्गुळापरि ज्वलन। होई ज्ञानरूप अग्निकारणे॥८४॥ ज्ञात होता मी नव्हे प्राण। अन्य कोशांप्रति होई वैचारिक जागरण। अन्नमय मनोमय विज्ञानमयादि कोश संपूर्ण। हे मी नसे ऐसा विचार स्फुरे॥८५॥ ऐसे ज्ञानाग्निने करूनी पंचकोशांचे ज्वलन। अन्ति उरे तेंची मी पूर्ण। ऐशा सत्यविचारे सुगन्धित मन। धूप रूपे अर्पावे सद्गुरुंसी॥८६॥ ज्ञानरुपी अग्नि तोषक खरा। सत्याचा घेवूनिया आसरा। अज्ञानाचा करूनिया निचरा। आनन्द सुगन्ध पसरवी॥८७॥ तदनंतर आरती दीप प्रज्वलन। स्वामी सद्योजात शंकराश्रम महान। बोध देती जनांसी आशीर्वचनातून। त्याविषयी अवधारा एकाग्रचित्ते॥८८॥ विवेकरूपी घेवूनिया पात्र। वैराग्यरूपी तैल घेवूनी पवित्र। भक्तिरूप वातीचे धरूनी एकसूत्र। सद्गुरुंसी प्रार्थावे ज्ञान प्राप्तीस्तव॥८९॥ भक्तहृदयीची पाहूनी पात्रता। आणि भक्तिभावाची निरागसता। प्रसन्न होवूनी गुरु त्या भक्ता। ज्ञानदीप प्रदान करी॥९०॥ सद्गुरुंपासूनी प्राप्त ज़े ज्ञान। ते अत्यंत कृतज्ञतेने आरती करून। शिष्य सांगे गुरुंसी मनापासून। ''मम जीवन ज़ाहले सार्थक॥९१॥ तुम्ही लाविला ज़ो बोधदीप। तयाच्या ज्ञानप्रकाशे वारेमाप। जीवनी पालटले मोज़माप। संकल्प विकल्पाचे॥ ९२॥ तनाची संवेदना मनाची भावना। बुद्धीची धारणा अंतरीची प्रेरणा। सत्य असत्याची स्वयंरचित कल्पना। सर्व शुद्ध ज़ाहल्या ज्ञानदीपे॥९३॥ गुरुतत्त्वाच्या ज्ञानप्रकाशे प्रदिप्त। प्रज्ञेचा बोधदीप उज़ळला लखलखित। तेणे वास्तविकतेची प्रचिती प्राप्त। ज़ाहली मज़ अंतरी''॥९४॥

पूजाविधि ज़ो दीप समर्पण। ते तृप्त कृतकृत्यभावाचे लक्षण। प्रतिकात्मक स्वरूपे आरती समर्पण। भक्त करी गुरुंसी पूजनांतरी॥९५॥ दीप उपरांत नैवेद्य समर्पण। प्रेमपूर्वक शिज़वूनी अन्न। ब्रह्मनिष्ठ सद्गुरुंसी अर्पितो मिष्ठान्न। मधुर प्रसन्नभावे चित्ती॥९६॥ ऐशा नैवेद्याचा गर्भितार्थ। करूणाबळे सांगुनी भावे निस्वार्थ। स्वामी सद्योजातांनी कथिला परमार्थ। गुरुपूजन विधिविषयी॥९७॥ ब्रह्मांड आपुल्यापासूनी परे। ऐशा भ्रमांत मानव जगी विचरे। मोह अज्ञान बळे संचरे। तेणे त्रस्त होई जीवनी॥९८॥ साधकाने करूनी निदिध्यासन। ज्ञानाग्नि अंतरी चेतवून। समाधीचा अभ्यास करावा पूर्ण। तेणे यथोचित ज्ञान लाभे॥९९॥ शनै शनै पूर्णतेत होवूनी स्थित। पिंडी तेंची ब्रह्मांडी निश्चित। ऐशिया निजभावे प्रयत्ने पूर्णत्वात। विसावे भक्त जीवनांतरी॥१००॥ या अक्षय ब्रह्मासी साधनेने ज़ाणून। अक्षतांसी ब्रह्मांडाची उपमा देवून। समाधि-अग्नीत अक्षता शिज़वून। मधुर मिष्ठान्न निर्मिले॥१०१॥ केवळ इन्द्रियसंयम नच पर्याप्त। साधनेने करूनी समाधि प्राप्त। पूर्णत्वात रमावे होवूनी तृप्त। सर्वात्मभावात रंगावे स्वानुभवे॥१०२॥ समाधीत लाभता परिपक्वता। प्रसन्नता रूपी माधुर्य लाभे चित्ता। ब्रह्मांडी स्थित जी एकात्मता। समरसता देई चित्तांतरी॥१०३॥ सर्वात्मभावाचे मधुर मिष्ठान्न। ब्रह्मनिष्ठ गुरुंसी प्रेमे समर्पून। भक्त रंगता गुरुभावात परिपूर्ण। गुरुंचे कार्य सिद्ध होई॥१०४॥ जीवब्रह्मैक ज्ञाने तृप्त गुरुंसी। किंचितही कष्ट न देता मानसी। जीवनमुक्त स्थितीत सुख देण्यासी। प्रतिकात्मक मुखशुध्यर्थ ताम्बूल अर्पावे॥१०५॥ ऐशा तृप्त सद्गुरुंचे तेज अलौकीक। ते पाहण्याचे लाभावे नयनसुख। निरांजन त्या तेजाचे प्रतिक। त्यास्तव अर्पावे मंगलमय निरांजन॥१०६॥

अनंत सूर्यसम तेजे व्याप्त सृष्टि। महातेज पाहण्या लाभावी दृष्टि। भयाने भक्त नच व्हावा कष्टी। म्हणूनी गुरुंसी दावावी जलारती॥१०७॥ हाती धरूनी पुष्पांची ओंज़ळ। मुखे मन्त्र म्हणूनी सोज्वळ। मन्त्र पुष्पांजली अर्पिता मने प्रांजळ। स्विकारिती सद्गुरु आनंदे॥१०८॥ सुगन्धी फुले अथवा पर्णे। वा मंगल मन्त्ररूपी शब्द सुमनें। सद्गुरुंसी अर्पिण्या कारणे। श्रद्धा भक्ति असावी दृढतर॥१०९॥ तद् उपरांत येई प्रदक्षिणा विधि। ही क्रिया भासे सोपी साधी। साधनेने शुद्ध होवूनी सदसद्विवेक बुद्धि। सम्यक विचार स्फुरती अंतरी॥११०॥ प्रदक्षिणेविषयी समज़ाविताना। स्वामी सद्योजात शंकराश्रम वदती भक्तांना। वतुर्ळाकार प्रदक्षिणा करीताना। कैसे विचार ज़पावे मनी॥१११॥ ईश्वर गुरुरूपे सर्वत्र विराजमान। ब्रह्माण्ड करी तया भोवती भ्रमण। गुरुच़ कर्ता कार्य कारण। तोची हसवी खेळवी सर्वांसी॥११२॥ ऐशा विशाल तत्वाच़े परिभ्रमण। केवळ अशक्य कोटीच़े लक्षण। संविद ज्ञानदृष्ट्या प्रदक्षिणा पूर्ण। करणे सहजी साधतसे॥११३॥ गुरुंच़े प्रत्येक जे अंशरूप। ते अंतिम गुरुतत्त्वाच़े स्वरूप। मनाच़े दूर सारूनी विकल्प। प्रत्येक अंशरूपात पहावी गुरुशक्ति॥११४॥ शरीरी अनुस्यूत गुरुशक्ति। जगत् साक्षिणी चैतन्य निश्चिती। ते संविद् चैतन्य मी ऐसी प्रचिती। घ्यावी साधकाने जीवनी॥११५॥ नित्य करीता जप अनुष्ठान। मी नव्हे वस्तु दृश्यमान। मी शुद्ध चैतन्य ऐशा भावे मन। बलवान होई अंतरी॥११६॥ स एव अहम् ऐसे भान। स्मरता अहर्निश चित्तातून। आत्मविश्वासाने प्रज्ञा दृढ होवून। रागद्वेष विरहित राही चित्त॥११७॥ चितशुद्धीने व्हावे भक्ताच़े जागरण। शिष्यासी लाभावे शाश्वत ज्ञान। केवळ या सद्हेतूने पावन। गुरु निर्माण करी विपरीत

स्थिति॥११८॥ जीवनी जे जे लाभे तोची प्रसाद। ऐसा विश्वास धरावा निर्विवाद। तेणे वृथा विचार होवूनी बाद। मन शांत होई साधनेने॥११९॥ सुखदुखाःत्मक कोणतिही स्थिति। ती माझ्या उद्धारास्तव निश्चिती। ऐसा दृढभाव ज़पता चित्ती। तीच़ मानावी संविद्दृष्ट्या प्रदक्षिणा॥१२०॥ अज्ञानाने बंद ज़ाहलेल्या चक्षूंतरी। ज्ञानांजनाने दिधली दिव्यदृष्टि खरी। आत्मतत्व प्रबोधक गुरुंसी हृदयांतरी। करावा संविद्दृष्ट्या नमस्कार॥१२१॥ श्रुतिस्मृति पुराणादि शास्त्रांच़े अधिष्ठान। साधकांकारणे करुनिया लेखन। जनांसी केले मार्गदर्शन। ऐशा महापुरुषांसी करावा नमस्कार॥१२२॥ कृष्ण, वेदव्यास, केशव, भवानीशंकर। आदि श्री शंकराचार्य सद्गुरुवर। बादरायणादि सूत्रभाष्य कर्ते श्रेष्ठतर। यांसी मनोभावे करावे वंदन॥१२३॥ तदनंतर करावी क्षमायाचना। पूजा स्वीकारण्यार्थ करावी प्रार्थना। सद्गुरुंनी पूजा स्वीकारल्याविना। नच लाभे पूजेसी पूर्णत्व॥१२४॥ स्वामींनी देवूनी गुरुमन्त्राची किल्ली। श्रद्धा भक्तीची प्रभावी शक्ति वर्णिली। आत्मरूप-गुरुमहिमा कथिली। इच्छा ज्ञान क्रियेच़े मूळ जे॥१२५॥ साधनेंतरी स्थैर्य निष्ठा संयम। गुरुंवरी विश्वास श्रद्धा भक्तीच़ा संगम। नित्यनेमे करी जप अनुष्ठान उत्तम। व्यवहारी कर्तव्ये करी उचित॥१२६॥ ऐसा भक्त ज़ो जीवनी दक्ष। परि चित्ती परमार्थावरी लक्ष। ऐशा भक्तजीवनी प्रत्यक्ष। गुरुतत्त्व सदा कृपा करी॥१२७॥ सद्गुरु होवूनी शिष्याच़ा सखा। सर्वकाळी रक्षिण्या होई पाठीराखा। आपुल्या अनन्य साधक भाविका। नच उणे पडू दे जीवनी॥१२८॥ ऐसे वदूनी स्वामी सद्योजात शंकराश्रमांनी। कळकळीच़े आवाहन केले जनांलागूनी। नियमित पूजन-मनन-जपादि करूनी। उद्धरा स्वजीवन गुरुकृपे॥१२९॥ गुरुपूजन

विषयी स्वामींचे आशीर्वचन। सद्गुरुंनी सुचविले त्यापरि लिहून। सप्तत्यध्याय करूनी सम्पूर्ण। अर्पिला सद्गुरु सद्योजात शंकराश्रम दिव्य चरणी॥१३०॥ ॥अध्याय ७०॥ ॥ओंव्या १३०॥

॥ ॐ तत् सत् - श्रीसद्गुरुनाथचरणारविंदार्पणमस्तु॥

॥ इति सप्तत्यध्यायः समाप्तः॥

ॐ परिज्ञानाश्रम श्रीगुरुशंकर

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीभवानीशंकराय नमः। श्रीगुरुभ्योः नमः॥१॥ सर्व कुलदेवतांसी करूनी नमन। आता सांगू पुढील कथन। स्वामींची आशीर्वचने परिपूर्ण। अल्प शब्दात संक्षिप्तरूपे॥२॥ स्वामींच्या वैखरीचे अनमोल बोल। विविध विषयांवरील सखोल। संक्षिप्त शब्दात राखूनी समतोल। सांगू सद्गुरु सुचविती त्यापरि॥३॥ स्वामींची शास्त्रसिद्ध आशीर्वचने। मनन करणे अगत्याचे साधकाने। मनन चिंतनाने तयासी पारखणे। महत्त्वपूर्ण साधनेंतरी॥४॥ सद्गुरुंचा अनुभवसिद्ध उपदेश। त्यातील आशय शोधावा आदर्श। तेणे साधनेत साधे उत्कर्ष। सर्वतोपरी जीवनांतरी॥५॥ विविध विषयांवरी होता चिंतन। दैवीकृपे लाभे अनुभूति गहन। साधकाचे प्रगल्भित होई मन। साधनेत परिपक्वता येई॥६॥ दीपावली शुभसंदेश देताना। स्वामी कथिती भक्तजनांना। श्रीराम वनवासातूनी परत येताना। दीपावलीचा होता शुभदिन॥७॥ प्रजेने दीप करूनी प्रज्वलित। प्रभु श्रीरामाचे केले स्वागत। प्रेम आदर केला अभिव्यक्त। आपुल्या महाराज चरणी॥८॥ दीपावलीचा महोत्सव सुरेख। स्वसाम्राज्य-प्राप्तीचे द्योतक। ज्ञान-प्राप्तीचे प्रकट प्रतीक। मानवी जीवनांतरी॥९॥ राष्ट्र, कुल, परंपरेच्या लौकिक दृष्टीने। अथवा वैयक्तिक जीवभावाने। लक्ष्य साधावे सतत मनुष्याने। पूर्ण ज्ञानप्राप्तीचे॥ १०॥ प्रज्वलित दीप ज्ञानाचे द्योतक। म्हणूनी आर्यावर्त भारतात वास्तविक। दीप प्रज्वलन करिती भाविक। देव्हाऱ्यात नित्य नेमे॥११॥ ज़सज़शी साधनेत होई अभिवृद्धि। साधकाची होई चित्तशुद्धि। स्वाभिमान युक्त सदसद्विवेक बुद्धि। उदया येई साधक चित्तांतरी॥१२॥ उत्तम संस्काराने उपजे विवेकरूपी पात्र। तयात वैराग्यरूपी तैल घालूनी पवित्र। भक्तिरूपी वात प्रज्वलित होता सर्वत्र। ज्ञानप्रकाश

उज़ळे जीवनी॥१३॥ वैराग्य नव्हे अरूचि वा त्याग। आसक्तिमुक्त विशेष शक्तिसंयोग। सदसद्विवेकयुक्त विशेष राग। वस्तुतः त्यासीच़ म्हणती वैराग्य॥१४॥ वैराग्यात वसे सम्यक दृष्टि। तेणे सहजी लाभे भक्तीसी पुष्टि। जीवनी मानव राही सदा कष्टी। विवेक-संयमरहित अपेक्षांनी॥१५॥ अनासक्त सूक्ष्म चिंतन अभंग। यात जिज्ञासु साधक होई दंग। प्रदीप्त ज्ञान प्रकाशे भक्त-अंतरंग। नतमस्तक होई विनम्रतेने॥१६॥ कार्य वैयक्तिक वा सामाजिक। अथवा असो कार्य सामुहिक। संयम, माधुर्य,रसताही प्रामाणिक। उद्भवे कार्य करिताना ॥१७॥ ऐशिया जिज्ञासु साधकास जीवनांतरी। व्यवहारी यशस्वी होण्या सत्वरी। बोध लाभे चित्तांतरी। तेणे कृतज्ञता उपज़े सहज़तया॥१८॥ गुरुकृपेच़ा वारंवार पाहता प्रभाव। हृदयी विलसे कृतज्ञतेने भक्तिभाव। समर्पणाची प्रणाली ज़णू सदैव। वाहे साधक जीवनांतरी ॥१९॥ अनावश्यक इच्छेची न धरिता कास। आंतरिक विमर्श सतत व्हावा खास। जीवनानुभव घडवी वैराग्यास। परि ज़पावी चित्ति सम्यक दृष्टि॥२०॥ ऐशिया साधकावस्थेच्या अनमोल क्षणी। भा-आवली होई दीपावली झणी। साधनेत माधुर्यपुष्प उमलूनी। सुगंधरूपी आनंद लाभे॥२१॥ गुरुकृपेने प्राप्त होता बोध। मार्गदर्शन मिळे विशुद्ध। ऐसा आनंदानुभव करण्या समृद्ध। दीप प्रज्वलित करी साधक॥२२॥ गुरु-उपासनेत साधना होई आरंभ। स्वाभिमानयुक्त अधिष्ठानाच़ा करूनी अवलंब। कृतज्ञतापूर्ण समर्पणाच़ा प्रारंभ। हीच़ समज़ावी खरी दीपावली॥२३॥ श्रीयंत्र पूजनाविषयी सांगताना। स्वामींनी समज़ाविले भक्तांना। श्रीयंत्र मूळ-शक्तीची उपासना। ज़े मांगल्यमय सर्वदा॥२४॥ श्रीयंत्र-पूजनाच़े तंत्र सुव्यवस्थित। पद्धतशीर शक्तिउपासना खचित।

श्रीदेवी राजराजेश्वरीची शुद्ध चैतन्य स्वरूपात। आराधना होई पूजनांतरी॥२५॥ सृष्टिचा प्रारंभिक विस्तार भव्य। जेथुनी स्पंदन आरंभिले संभाव्य। शुद्ध चैतन्यरूपी आदिशक्ति दिव्य। प्रतीकात्मक बिंदूरूपात वसे॥२६॥ सूक्ष्म बिंदूतुनी अवतरे। स्थूल दृश्यमान जगत विस्तारे। शुद्ध चैतन्यरूपी एक शक्ति वावरे। अगणित शक्ति स्वरूपांत॥२७॥ श्रीयंत्रावरी आकृत्या अनेक। बिंदू , त्रिकोण,अष्टकोन सुरेख। चतुर्दश,त्रिकोण,वर्तुळ,भूपूरे अनेक। प्रतीकात्मक आकृतीत दर्शविती॥२८॥ चित्राच्या बहिर्सीमेवरूनी करीता पूजन। प्रथम दिसे आकृती चौकोन। चतुर्प्रवेश द्वारांसह किल्ला परिपूर्ण। तदनंतर तीन वर्तुळाकार वलये॥२९॥ तत्पश्चात् दिसे षोडशदल कमल। नंतर अष्टदल कमल। अनेक त्रिकोणाकृति शक्तिमाला मण्डल। वसुकोण, त्रिकोण मध्यावरी बिंदू॥३०॥ प्रथम आवरण देवता पूजन। तदनंतर त्याहूनी उच्च-देवता पूजन। बिंदूत जगज्जननी राजराजेश्वरी अधिष्ठान। शुद्ध चैतन्य स्वरूपात राही॥३१॥ श्रीयंत्रांत नऊ चक्रांचे वास्तव्य राही। प्रत्येक आवरणात एक चक्र पाही। प्रत्येक चक्रांत देवता राही। शक्तिस्वरूपात निश्चये॥३२॥ आकृतीच्या बाहेरील आवरण। तया म्हणती चक्र 'त्रैलोक्यमोहन'। तेथे होता शक्ति-संचलन। साधनेस्तव आकर्षित करी साधकाला॥३३॥ साधनेच्या प्रारंभी उत्साह उत्तुंग। दिव्यत्वाचे आकर्षण अभंग। चित्तशक्ति करी साधनेत दंग। साधकासी जीवनांतरी॥३४॥ दुसरे चक्र 'सर्वाशापरिपूरक'। येथे समाधानी राही साधक। साधकांत येई परिवर्तन सुरेख। साधकाच्या अभिवृद्धिस्तव॥३५॥ तिसऱ्या स्तरावरी'सर्वसंक्षोभन' चक्र वसे। शक्ति क्रिया थोडीशी वक्र भासे। पूर्वग्रहित विचारांना हादरा बसे। चूकीच्या धारणा त्यजाव्या

लागती॥३६॥ साधकाच्या आध्यात्मिक उन्नती कारणे।शक्ति तडाखे देई सहज़तेने। मनोमालिन्य निरसूनी या क्रियेने। बुद्धि प्रगल्भित होई॥३७॥ डावावरी लागे साधकाच़ा संयम। परि साधनेत घेता परिश्रम। दैवी कृपा लाभूनी उत्तम। विघ्नांसी सामोरे ज़ाई धैर्याने॥३८॥ शरीरशुद्धि, मानसिकशुद्धि। वैचारिक मंथनाने शुद्ध होई बुद्धि। होईस्तोवरी संपूर्ण चित्तशुद्धि। भडीमार होई अकल्पित विघ्नांच़ा॥३९॥ शक्तीच़ा ओघ इथे प्रचंड। साधका वाटे ज़णू देव देई दंड। परि गुरुशक्तीच़ा प्रवाह उदंड। वाहे अशुद्धि-निर्मुलनार्थ अहर्निश॥४०॥ साधक दुःख-विवंचनेने ग्रस्त। साधका भासे सर्व होई उध्वस्त। मंत्र जपता होवूनी आसनस्थ। चित्तशुद्धि होई वेगे॥४१॥ याकाळी मंत्राच़ा घ्यावा आसरा। बळेची दूर करावा चिंतेच़ा पसारा। साधनेवरी भार द्यावा सारा। भक्ति-विश्वासबळे॥४२॥ साधकाने धरावी मनी चिकाटी। सद्गुरु-शक्ति सदा उभी पाठी। ऐसा विश्वास धरूनी चित्सरोवराकाठी। विहार करावा साधनेत मनसोक्त॥४३॥ ऐसी धारणा धरिता चित्ती। चित्तशुद्धि उपरांत दिव्यशक्ति। प्रस्थान करी 'सर्वसौभाग्यदायक' चक्राप्रति। लीलया सुलभतेने॥४४॥ 'सर्वसंक्षोभन' चक्रातूनी होता पार। सोसूनी नियतिच़े तडाखे वारंवार। साधक होई संवेदनशील फार। तेवीच़ शक्तिवान जीवनी॥४५॥ 'सर्वसौभाग्यदायक' चक्रांत होता प्रवेश। भाग्य उज़ळे विशेष। मिटू लागती शनै शनै क्लेश। साधकाच्या जीवनांतूनी॥४६॥ स्वतः विषयीच्या मूढ धारणा। तेवीच़ साधने विषयीच्या संकल्पना। त्यजिता सर्व व्यर्थ विवंचना। सौभाग्य प्रवेशे जीवनी॥४७॥ अंतरीच़े वादळ होई शांत। मन निर्मळ होवूनी राही प्रशांत। भगवत् स्मरण होई निवांत। अचिन्त्य अलभ्य लाभ चित्तांतरी॥४८॥ येथे

कृतज्ञतेने इमानी साधक। साधना करी आत्मीयतेने सुरेख। सजगतेने जगी विचरे भाविक। शांतिपूर्वक जीवनांतरी॥४९॥ ऐशिया स्थिति उपरांत। शक्ति प्रवेशे 'सर्वार्थसाधक' चक्रात। सर्व सुइच्छित सिद्ध होई जीवनात। दिव्य दृष्टि प्राप्त होई॥५०॥ मंत्रसाधना करिता अखंड। गुरुकृपा लाभे उदंड। मार्गदर्शन लाभे प्रचंड। पदोपदी साधकासी॥५१॥ 'सर्वार्थसाधक' चक्रशुद्धि उपरांत। शक्ति प्रवेशे 'सर्वरक्षाकार' चक्रांत। देवी अनुग्रहाच़ा स्वानुभव प्रत्यक्षात। प्राप्त होई साधका॥५२॥ दिव्यत्वाच़ा वसे अविरत संग। देवीच़े रक्षण लाभे अभंग। या ज़ाणीवेने होवूनी साधनेत दंग। निःशंक होई साधक अंतरंगी॥५३॥ सर्वरक्षाकार चक्रातूनी होई शक्तिप्रवेश। सर्वरोगहारक चक्रात विशेष। मानसिक दुःख भावनिक क्लेश। यावरी नियंत्रण लाभे साधकासी।।५४।। अनारोग्य मानसिक असो वा भावनिक। दैवीकृपे व्यथामुक्त होई साधक। परिपूर्ण आरोग्य लाभूनी भाविक। निश्चिन्त होवूनी विलसे॥५५॥ तद्पश्चात वसे चक्र 'सर्वसिद्धिप्रदा'। साधकासी उमगे मी निमित्तमात्र सदा। जीवनी करी ज़री संकल्प साधा। तरी तो शिवसंकल्प होई आपैसे॥५६॥ अन्ति वसे चक्र 'सर्वआनंदमय'। ही एक स्थिति निरामय। साधक निजानंदी होवूनी तन्मय। आत्मज्ञान प्राप्त करी॥५७॥ ऐशापरी चक्रांविषयी सांगून। स्वामी कथिती आशीर्वचनातून। आम्ही सारे सारस्वत जन। सरस्वतीच़े उपासक सारे॥५८॥ सरस्वतीची उपासना करि ज़ो साधक। ज्ञानाची कामना करी ज़ो भाविक। तोची खरा सारस्वत नेक। म्हणती सद्गुरु सद्योजात शंकराश्रम॥५९॥ खरा सारस्वत प्रार्थि मनापासून। हे माते मज़ द्यावे शाश्वत ज्ञान। लौकीकात नच रमे माझे मन। मज़ नलगे अन्य काही॥६०॥ ज़ोवरी प्रभुचरण नच पाहीन। तोवरी

यत्न मी ना सोडेन। अंतिम शुद्ध-चैतन्यस्वरूप पावन। ज़े वसे माझ्यात परमात्मरूपे॥६१॥ ऋषि म्हणे श्लोकात 'सारस्वत मज़ देहि'। म्हणजे शाश्वतज्ञानाचे साधन सांग काही। जेणे याची डोळा याची देही। लाभेल चैतन्यानन्दाची स्वानुभूती।।६२।। सारस्वत म्हणजे सरस्वती-मंत्र वा इष्टदेवताचा मंत्र। ज़ो उलगडवी आत्मज्ञानाचे तंत्र। अंतरीच्या शक्तिदेवता पवित्र। प्रसन्न होती ज्या मंत्राने॥६३॥ ऐसा मंत्र घडवी शुद्धीकरण। सर्व संकटात करी तारण। जीवनी घडवी परिवर्तन। चित्शक्तीसी जागृत करी॥६४॥ शक्ति चित्तांतरी जागृत होता। आनंदानुभव लाभे चित्ता। मंत्र सद्भावे ज्ञानेच्छेने ज़पता। अकल्पित तृप्ति दाटे पदोपदी॥६५॥ स्वतः आत्मनिरीक्षण करूनी अंतरी। स्वतःच स्वतःच्या चूका निस्तरी। साधक प्रगतिपथावरी प्रयाण करी। दुसऱ्यांसही करी सहकार्य॥६६॥ ज़री परस्पर सहकार्यार्थ न ज़ागे भाव। तरी ज़ाणा हा कल्मषाचा प्रभाव। तेणे घडे आत्मीयतेचा अभाव। हे न्यून साधकाच्या अंतरीचे॥ ६७॥ परस्पर सहकार्याची ज़ागण्या भावना। सत्संगाची धरूनी कामना। सक्रीय रहावे सामुहिक पूजना। वा सहभागी व्हावे सामुहिक मेळाव्यांत॥६८॥ ज़री कल्मष वसे अंतरी। ते उफाळूनी येई मनःपटलावरी। जागृकतेने तयांसी ज़ाणूनी सत्वरी। करावे त्याचे निर्मुलन॥६९॥ दुसऱ्यांत कल्मषाचा होता भास। कल्मष परिहारार्थ त्या पामरास। सहयोग द्यावा सद्भावनेने खास। मैत्रीभाव ज़पूनी अंतरी॥७०॥ जपाने करावी साधना प्रबळ। चित्ती ज़पूनी ज्ञानाची कळकळ। संतसंग साधावा निर्मळ। ज्ञानोत्कर्षार्थ रहावे तत्पर॥७१॥ केवळ आर्थिक सहयोग नव्हे दान। शेजाऱ्यांशी साधावे आदान प्रदान। समाजकार्य हे ही उत्तम दान। गरज़वंतासी करिता सहकार्य॥७२॥

परिज्ञानाश्रम शंकरसद्गुरु

शक्ति जागृत होता साधे शक्तिविकास। अभिव्यक्त शक्ति आणावी उपयोगास। ऐशा स्थितीत दानाच्या प्रक्रीयेस। आरंभ करावा जीवनी॥७३॥ अन्यथा बिघडूनी आंतरिक संतुलन। क्लेशयुक्त होईल जीवन। ते वगळण्या संपूर्ण। दान कथियले शास्त्रांतरी॥७४॥ धन, धान्य वा अन्न। वस्त्र, निवारा वा विद्यादान। समाजकार्य ज़े कर्म प्रधान। वा सहकार्य एक दुज्यासी॥७५॥ निरपेक्ष भावे करिता दान। शक्तीचे अंतरी साधे संतुलन। तेणे अनन्य साधारण समाधान। विलसे दात्याच्या ठायी॥७६॥ होम, हवन आणिक यज्ञ। यांचे महत्व ज़ाणती आध्यात्मिक प्राज्ञ। त्याची कारणे महाराजे, ऋषि, मुनि सुज्ञ। करिती यज्ञ वैदिक काळापासूनी॥७७॥ तरि त्याचा सुप्त अर्थ। आणिक कर्मकांडाचे प्रयोजन सार्थ। सांगती स्वामी सद्योजात शंकराश्रम समर्थ। ते परिसा सज्जनहो॥७८॥ स्थूल रूपाने करिता विचार। होम, यज्ञ भासे कर्मकांडाचा प्रकार। तयासी अनुभव सिद्ध शास्त्राधार। यजुर्वेदात कथियेला॥७९॥ यज्ञात हवनकुंडात देती आहुति। देवतांच्या स्मरणे द्रव्य त्याग करिती। द्रव्य न माझे ऐसा दावा करिती। यज्ञकर्ते यजमान यज्ञांतरी॥८०॥ आहुतीने देवता प्रसन्न होती। यज्ञकर्त्यांची इच्छापूर्ती करीती। इच्छापूर्तीरूपी प्रसाद लाभता चित्ती। तृप्ति लाभे यज्ञकर्त्यासी॥८१॥ हवन असो वा पूजा पावन। स्तोत्र श्लोकादि करीता पठण। बौद्धिक स्तरावरी विकास संपूर्ण। होई साधकाच्या अंतरी॥८२॥ तेवीच मानवी शरीर एक मंदिर। तयात वसती अनेक देवता मनोहर। शिवशक्ति रूपे निरंतर। परमात्मा वसे दिव्य रूपे॥८३॥ मंत्रात वसे दिव्य शक्ति। अर्थ ज़ाणूनी स्मरता मंत्र चित्ति। जागृत होवूनी मंत्र शक्ति। मनोबुद्धिस्तरावरी विकसित होई॥८४॥ साधक

शरीररूपी यज्ञकुंडांतरी। मंत्रजपाची आहुति देवूनी सत्वरी। कायस्थ देवतांसी प्रसन्न करी। तेणे दिव्य लाभ होई साधका॥८५॥ शक्तिसंवर्धन साधिण्या निरंतर। समरसतेने जप करावा दृढतर। अनुशासनाने स्थूलतम शारीरिक स्तरावर। व्यायाम साधावा खंबीरतेने॥८६॥ काया, मन आणिक बुद्धि। त्याही परे जी आध्यात्मिक शुद्धि। या तिन्ही स्तरांवरी आणण्या शुद्धि। जप अनुष्ठान हेंची साधन॥८७॥ ऐशापरी आध्यात्मिक विविध विषयांत। स्वामींनी दिली आशीर्वचने सतत। भक्तांसी साधनेस्तव केले प्रबोधित। आत्मज्ञान प्राप्ति कारणे॥८८॥ जप,तप, यज्ञ, दान, गुरुपूजन। सेवा,शुश्रुषा, शिवतत्व,देवीपूजन। श्रीयंत्रावरील कोरीव आकृतीचे महिमान। कथियले जनांसी॥८९॥ देह चक्रांतील शक्ति संक्रमण। तदनुसार विविधावस्थांचे सम्यक प्रतिपादन। साधनापरिपूर्ती साधण्या उत्तेजन। दिधले श्रीसद्योजात शंकराश्रम सद्गुरुंनी॥९०॥ विविधावस्थांचे ऐकता यथोचित वर्णन। साधकाचे मानस बल वर्धिले संपूर्ण। अनमोल संजीवक धैर्य निर्माण। ज़ाहले साधकांच्या चित्तांतरी॥९१॥ स्थळ, प्रसंग, भाषा घेवूनी ध्यानी। हिंदी, मराठी, संस्कृत, कोंकणी, इंग्रजीतूनी। समयोचित विचार प्रगट करूनी। श्रवण सुख दिले श्रोत्यांसी स्वामींनी॥९२॥ बहुविध शास्त्रांचा करूनी परिचय। आध्यात्मिक जीवनाचा सांगूनी आशय। जनांसी साधनेत देवूनी अभय। कृतकृत्य केले सर्वदा॥९३॥ एकादश स्वामींचा स्मरावा उपदेश। गुरुभक्ति हाची मानूनी आदेश। गुरुचरणे ज्या पथावरी करिती निर्देश। त्याचे अनुसरण करा निःशंक मनें॥९४॥ गुरुपरंपरेचा चरित्ररूपी दिव्य प्रसाद। श्रद्धेने घ्यावा त्याचा आस्वाद। पठणाने चित्ति लाभो आल्हाद। हेंची मागणे गुरुपरंपरेच्या चरणी॥९५॥ येथवरी

परिज्ञानाश्रम शंकर सद्गुरु

संक्षिप्तरूपे आशीर्वचन लिहून। एकसप्तत्यध्याय केला संपूर्ण। सद्‌गुरु सद्योजात शंकराश्रम पदी पावन। प्रणाम माझे अनंत कोटी॥९६॥ स्वामी सद्योजात शंकराश्रमांचे चरित्र कथन। सद्‌गुरुंनी सुचविले त्यापरि लिहून। सद्‌गुरु सद्योजात शंकराश्रम चरणी समर्पण। करिते उषा रवींद्र बिजूर भक्तीभावे॥९७॥ ॥अध्याय ७१॥ ॥ओंव्या ९७॥ ॥ ॐ तत् सत् श्री सद्‌गुरुनाथ चरणारविंदार्पणमस्तु॥

॥ इति एकसप्तत्यध्यायः समाप्तः॥

आरती श्री सद्गुरूंची

मंगलारती करीन भावे सद्गुरुरायासी।
माझ्या सद्गुरु पतितपावन आनंदाश्रमश्रीगुरुसी,
परिज्ञानाश्रम श्री गुरुसी, सद्योजात शंकर गुरुसी।। पल्ल।।
विश्वव्यापका दीनदयाळा तारक तू होसी।
सत्त्व रज तम माया निरसुनि दैवी नटलासी।
धाव रे पाव रे करुणाघनमूर्ती ।।१।।
चिन्मयमूर्ती चित्सुखदाता भवभय हरलासी।
उन्मनी सुख हे दाखवी जगता निजपदि रमलासी।
तारका त्र्यंबका सुरमुनीवरदासी ।।२।।
भक्तवत्सला करुणासागरा तारी दीनासी।
निशिदिनि नमितो तव पदकमले चित्रापुरेश तुजसी ।।३।।

।। शरणाष्टकम् ।।

आदिनाथा तव शरणम्।शिव हरि सद्गुरु तव शरणम्। चतुरानना जगज्जीवना। विष्णुतनया तव शरणम् ।।१।। वसिष्ठ सुरऋषितव शरणम्। शक्तिश्रेष्ठा, तव शरणम्। पराशरा प्रभु दीनोद्धारा। दीनदयाळा तव शरणम्।।२।। कृष्णव्यासा तव शरणम्। शुकमुनिराया तव शरणम्। गौडपाद आचार्य सद्गुरो। योगीराया तव शरणम्।।३।। श्रीगोविंदा तव शरणम्। आद्याचार्या तव शरणम्। श्रीमत् शंकर कलिकल्मषहर। धर्मरक्षका तव शरणम्।।४।। पद्मपादा तव शरणम्। हस्तामलका तव शरणम्। तोटक गुरुवर सुरेश्वरगुरो। शंकरशिष्यांबुज शरणम्।।५।। प्रकाशरूपा तव शरणम्। चिन्मयरूपा तव शरणम्। अच्युत आश्रम आश्रमदायक। द्वारावतिविभु तव शरणम्।।६।। आनंदाश्रम तव शरणम्। योगिवरा प्रभु तव शरणम्। सच्चित्सुखमय ज्ञानदायका। सद्गुरुराया तव शरणम्।।७।। कैवल्याश्रम तव शरणम्। वाराणसिविभु तव शरणम्। द्वयपीठस्थाधिष्ठित यतिवर । ज्ञानप्रदीपा तव शरणम्।।८।। नृसिंह आश्रम तव शरणम्। केशवआश्रम तव शरणम्। निजपददायक स्वामिवरा विभु। विश्वनाथा तव शरणम्।।९।। वामनआश्रम तव शरणम्। कृष्णाश्रम गुरु तव शरणम्। पांडुरंगआश्रम सद्गुरुवर। काशिनिवासा तव शरणम्।।१०।। परिज्ञानाश्रम तव शरणम्। सारस्वतगुरु तव शरणम्। भवानिशंकर साक्षात् ईश्वर। परंपरागुरु तव शरणम्।।११।। शंकर सद्गुरु तव शरणम्।परिज्ञानाश्रम तव शरणम्। द्वितीय शंकर दत्तदिगंबर। अवधूतरूपा तव शरणम्।।१२।। केशवआश्रम तव शरणम्।वामनआश्रम तव शरणम्। ज्ञानमूर्ते तपोनिधे गुरु। श्रीकृष्णाश्रम तव शरणम।।१३।। दत्तात्रेया तव शरणम्। काषायांबर तव शरणम्। पांडुरंगआश्रम सद्गुरुवर। त्रिगुणातीता तव शरणम्।।१४।। लक्ष्मीकांता तव शरणम्। आसुरमर्दनतव शरणम्। आनंदाश्रम सच्चित्सुखदा। विश्वपालका तव शरणम्।।१५।। भक्तवत्सला तव शरणम्। भक्तरक्षका तव शरणम्। भक्तोद्धारक आनंदाश्रम। तेजोरूपा तव शरणम्।।१६।।अज्ञाननाशका तव शरणम्। प्रज्ञानदायका तव शरणम्।।ज्ञानप्रकाशा जितेंद्रिया ।परिज्ञानाश्रम तव शरणम्।।१७।। ज्ञानानंदा तव शरणम्।सन्मार्गदर्शका तव शरणम्।। प्रेमस्वरूपा शांति प्रदायक। परिज्ञानाश्रम गुरु शरणम् ।। १८।।धर्मप्रवर्तक गुरु शरणम्।धैर्यदायका गुरु शरणम्।भक्तप्रबोधक सर्वात्मका । सद्योजात शंकराश्रम शरणम्।।१९।। स्वयंप्रकाशिता तव शरणम्। उत्कर्षदायका तव शरणम्। मुक्तिदायका शास्त्रनिपुणा । सद्योजाता तव शरणम्।।२०।।

।। श्रीमदानंदाश्रमसद्गुरुस्तवनम् ।।

श्रीमत्परमहंसाय परिव्राजकरूपिणे। नम आनन्दगुरवे सच्चिदानन्दमूर्तये।।१।।

सच्चिदानन्दमद्वैतमनाद्यन्तमगोचरम्। आनन्देति समाख्यातं गुरुदैवतमाश्रये।।२।।

यच्च सर्वगतं ब्रह्म चित्स्वरूपं निरञ्जनम्। तदेव गुरुरूपेण श्रीमदानन्दसंज्ञया।।३।।

परिव्राजकरूपेण दृश्यतेऽस्मिन्महीतले। स आनन्दगुरुः साक्षादस्माकं कुलदैवतम्।।४।।

आनन्दादिगुणैर्युक्तमानन्दपददायकम्। सानन्दं दर्शनं यस्य तमानन्दं गुरुं भजे।।५।।

यस्य दर्शनमात्रेण मानसं प्रविलीयते। अष्टभावाः प्रजायन्ते तमानन्दं गुरुं भजे।।६।।

नमः श्रीगुरुदेवाय ब्रह्मेशविष्णुरूपिणे। साक्षाद्ब्रह्मस्वरूपाय आनन्दाय नमो नमः।।७।।

पतितोद्धारिणीशक्तिर्यत्कृपापाङ्गवर्तिनी। अव्याजकरुणामूर्तिरव्यादानन्दसद्गुरु ।।८।।

गुरुस्तोत्रमिदं पुण्यं सर्वेप्सितफलप्रदम्। यः पठेद्भक्तिमान्नित्यं स आनन्दमयो भवेत् ।।९।।

- शिवराम विठ्ठलभट

धर्मपालनें चित्तशुद्धि। विकास पावे जीवबुद्धि।
ध्यानधारणें आत्मसिद्धी। लाभतसे मानवा।।

सद्धर्म नाशितो पापांसी। उद्धरितो तो सकळिकांसी।
नका विसरूं धर्माचारासी। ब्राह्मण्य तैसें रक्षावें।।

-श्रीमत् परिज्ञानाश्रम स्वामीजी

सूक्ष्म अहंकार ज़ाण्या विलया। भक्ति, सद्सद्विवेक ज़पावा हृदया।
या अंतिम विघ्नातूनी पार कराया। केवळ सद्गुरुची समर्थ असे।।

सद्गुरुंवरी स्थिर असावा विश्वास। तप करावे निष्ठेने नित्यास।
तेणे अक्षय गुरुकृपा होवूनी खास। अहंकार होईल विसर्जित।।

-श्रीमत् सद्योजात शंकराश्रम स्वामीजी

पूज्य उमाबाई आरुर (लेखिका)

१९००-१९७४

श्रीमती शांताबाई नागरकट्टी (लेखिका)

सौ. उषा रविन्द्र बिजूर (लेखिका)

।। श्रीगुरुभ्यो नमः ।।

।। श्रीभवानीशङ्कराय नमः ।।

पूज्य आरुर उमाबायि आक्काक भावपूर्ण आदरांजलि

लिहिला हा थोर ग्रंथ । दिलें गुरुकृपामृत । व्हावयासी भवमुक्त । मनोभावें प्राशावें ।।१।।

गुरुभक्ति हीच शक्ति । गुरुभक्ति हीच मुक्ति । हेंच वात्सल्याच्या पोटीं । सांगे आरुर उमाक्का ।।२।।

संत भवपार होती । इतरांसीही तारिती । प्रेमें धरुनियां हातीं । ग्रंथरूपें सदैव ।।३।।

ऋषी पंचमीचा दिन । इसवी एकोणीसशें सन । दिलें देवानें धाडून । हिज ह्याच कारणें ।।४।।

बाळपणीं जो मांडिला । संसार हिचा मोडला । भवपाश जो सुटला । तो गुंते गुरुपायीं ।।५।।

शिवानंद तीर्थ गुरु । नेती हिज पैलपारु । जाहले हे मोक्षगुरु । बाड मठाधिपति ।।६।।

गुरुकृपा विसरतां । येईना पुढती जातां । चित्रापूरींचे भेटतां । धर्मपीठींचे गुरु ।।७।।

त्या सर्वांसी हिची आई । भक्तिभावें नित्य ध्यायी । म्हणे लेकीस तूं लिही । सारें हें मराठींत ।।८।।

मातृआज्ञेचें पालन । मोक्षसिद्धीचें साधन । परी करावें लेखन । कैसें म्हणे ही लेक ।।९।।

हिच्या मनींचें जाणूनी । श्रीमदानंदाश्रमांनीं । हाती देऊनी लेखणी । चेतविली प्रतिभा ।।१०।।

सद्विचार सदाचार । निजधर्मासी आधार । सांगती साधनासार । धर्मगुरु हिजसी ।।११।।

कोणी कशी किती गावी । हिच्या भक्तीची थोरवी । सांगा कोण दीप लावी । पहावया सूर्यासी ।।१२।।

पुण्यक्षेत्र शिरालींत । एकादशीचा मुहुर्त । एकोणीसशें चौऱ्यांहत्तर । मेची अठरा तारीख ।।१३।।

काळानें हे हिरावून । नेलें आमुचें भूषण । कराया परी जतन । ठेविलें हें भांडार ।।१४।।

पुण्यवान भाग्यवान । आम्ही सारस्वत जन । अक्षय हें वरदान । लाभे गुरुकृपेचें ।।१५।।

५ जून २००७, मधु चंदावरकर (गोरेगांव)